# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
## महापालिका सचिव विभाग
### मा.प्रशासक यांच्या कार्यकाळातील घेण्यात आलेले प्रस्ताव व ठरावाचे कार्यवृत्तांत विषय/ठराव क्रमांक-1001 ते विषय क्रमांक-1134 पर्यंत

**प्रस्ताव क्रमांक 1001/2023:-** **(मालमत्ता विभाग)** **(दि.03.10.2023)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका व हिन्दुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन यांच्या मार्फत संयुक्तरित्या गट क्र.08/पी, कांचनवाडी येथे पेट्रोलपंप उभारणीसाठी यापुर्वीचा ठराव क्र.871/2023 दि.17.07.2023 रोजीच्या ठरावानुसार 30.05 मी.X33.0 मी.=1006.50 चौ.मी.जागा 19 वर्षे 11 महिन्या साठी सिध्दशिघ्र गणकानुसार प्रती माह भाडे र.रु.1,12,654/- व त्यावर 18% जी.एस.टी.व इतर कर वेगळे आकरणी करुन तसेच भाडे रक्कमेत दर तीन वर्षांनी 10% भाडेवाढ करण्याच्या अटीस अधिन राहून जागा भाडेतत्वावर देणे बाबत दि.17.07.2023 रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये धोरणात्मक निर्णय झालेला आहे.

तथापि, कंपनीच्या दि.22.09.2023 प्राप्त दि.23.0.2023 रोजीच्या पत्रान्वये वाढीव जागा देण्यासाठी विनंती केलेली आहे. पुर्वी ठरावाद्वारे देण्यात आलेल्या जागेच्या स्थानावर वाढीव जागा असल्याने व सदर जागेचा वापर इतर कोणत्याही कामासाठी होणार नसल्याने पुर्वीच्या ठरावामध्ये दुरुस्ती करुन 34.00 मी.X40.56 मी.X40.74 मी.X40.00 मी.असे एकुण=1494.00 चौ.मी.जागा (1494Xरु.19,900/-=रु.2,97,30,600/- चे 6% रु.17,83,836/- नुसार 19 वर्षे 11 महिन्यासाठी सिध्द शिर्घ गणकानुसार प्रतीमाह भाडे र.रु.1,48,653/- प्रमाणे वार्षिक भाडे र.रु.17,83,836/ त्यावर 18% जी.एस.टी.र.रु.3,21,090/- असे एकत्रित जी.एस.टी.सह भाडे र.रु.21,04,926/- एवढी आकारणी करुन तसेच दर तीन वर्षांनी 10% भाडेवाढ करण्याच्या अटीस अधिन राहून जागा भाडेतत्वावर देणे साठीचा यापुर्वीच्या मा.सर्वसाधारण सभेचा ठराव कायम ठेऊन केवळ वाढीव क्षेत्र व त्यानुसार होणारे भाडेवाढ बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1001/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका व हिन्दुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन यांच्या मार्फत संयुक्तरित्या गट क्र.08/पी, कांचनवाडी येथे पेट्रोलपंप उभारणीसाठी यापुर्वीचा ठराव क्र.871/2023 दि.17.07.2023रोजीच्या ठरावानुसार 30.05 मी. X33.0 मी.= 1006.50 चौ.मी. जागा 19 वर्षे 11 महिन्या साठी सिध्दशिघ्र गणकानुसार प्रती माह भाडे र.रु.1,12,654/- व त्यावर 18% जी.एस.टी. व इतर कर वेगळे आकरणी करुन तसेच भाडे रक्कमेत दर तीन वर्षांनी 10% भाडेवाढ करण्याच्या अटीस अधिन राहून जागा भाडेतत्वावर देणे बाबत दि.17.07.2023 रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये धोरणात्मक निर्णय झालेला आहे.

तथापि, कंपनीच्या दि.22.09.2023 प्राप्त दि.23.0.2023 रोजीच्या पत्रान्वये वाढीव जागा देण्यासाठी विनंती केलेली आहे. पुर्वी ठरावाद्वारे देण्यात आलेल्या जागेच्या स्थानावर वाढीव जागा असल्याने व सदर जागेचा वापर इतर कोणत्याही कामासाठी होणार नसल्याने पुर्वीच्या ठरावामध्ये दुरुस्ती करुन 34.00 मी.X40.56 मी.X40.74 मी.X40.00 मी.असे एकुण=1494.00 चौ.मी.जागा (1494Xरु.19,900/-=रु.2,97,30,600/- चे 6% रु.17,83,836/- नुसार 19 वर्षे 11 महिन्यासाठी सिध्द शिघ्रगणकानुसार प्रतीमाह भाडे र.रु.1,48,653/- प्रमाणे वार्षिक भाडे र.रु.17,83,836/ त्यावर 18% जी.एस.टी. र.रु.3,21,090/- असे एकत्रित जी.एस.टी.सह भाडे र.रु.21,04,926/- एवढी आकारणी करुन तसेच दर तीन वर्षांनी 10% भाडेवाढ करण्याच्या अटीस अधिन राहून जागा भाडेतत्वा वर देणे साठीचा यापुर्वीच्या मा.सर्वसाधारण सभेचा ठराव कायम ठेऊन केवळ वाढीव क्षेत्र व त्यानुसार होणारे भाडेवाढ बाबतसाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1002/2023:-</u> (कर निर्धारक व संकलक विभाग)** **(दि.04.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील झोन क्र.08 चा परिसर मोठा असल्याने नागरीकांना नागरी सुविधा पुरवणे, मालमत्ता कर, पाणीपट्टी कराची वसुली करण्यासाठी प्रशासकीय ठराव क्र.886 दि.25.07.2023 अन्वये झोन क्र.08 चे विभाजन करुन कांचन वाडी, ईटखेडा,नक्षत्रवाडी, सादातनगर,सिल्कमिल कॉलनी आदी भागाकरीता झोन क्र.10 निर्माण करण्यात आले आहे. या क्षेत्राकरीता पुर्वीचे झोन क्र.08 चे रेल्वेस्टेशन येथील कार्यालयाची इमारत सोई ची असून झोन क्र.08 सातारा देवळाईसाठी मनपाची जागा उपलब्ध नसल्याने या क्षेत्रासाठी मध्यवर्ती व सोईस्कर अशी इमारत भाडेतत्वावर घेणे प्रशासनाच्या विचाराधीन होते.

झोन क्र.08 साठी प्रशासनाने श्री.जगजितसिंग दौलतसिंग मैनी व इतर दोन प्लॉट नं.02, गट नं.60 सातारा परिसर, बीडबायपास रोडवरील पहिल्या मजल्यावरील इमारत ज्याचे क्षेत्र फळ 278.40 चौ.मी.इतके आहे. सदर इमारत मालमत्ताधारका कडून भाड्याने घेण्याचे ठरले आहे. या इमारतीस पहिल्या सहा महिन्यासाठी दरमहा.रु.95000/- (मुल्य वर्धीत करासह) भाडे देण्याचे ठरले असुन सहा महिन्यानंतर प्रतिमाह रु.1,00,000/- इतके भाडे राहील. प्रत्येक तीन वर्षानंतर मुळ भाड्यात नैसर्गिक भाडेवाढ म्हणुन 10 टक्के भाडेवाढ देण्यात येईल. जितकी जागा महानगरपालिकेच्या वापरात असेल तितका मालमत्ता कर मनपाने अदा करावा असे ठरले आहे. मनपाने वापरलेल्या विद्युत विजेसाठी लाईट बील मनपाला भरावे लागेल तसेच मनपाने लिफ्टचा वापर केल्यास त्याचे विद्युतदेयक भागश: महानगरपालिकेस भरावे लागेल. भाडे करारनामा हा श्री.जगजितसिंग दौलतसिंग मैनी हे स्वखर्चाने करुन घेणार आहेत. या अटी व शर्तीनुसार भाडेतत्वावर इमारत घेण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

करीता, झोन क्र.08 साठी भाडेतत्वावर इमारत घेण्यास व करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार दर माहभाडे अदायीसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1002/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.08 साठी प्रशासनाने श्री.जगजितसिंग दौलतसिंग मैनी व इतर दोन यांचे प्लॉट नं.02, गट नं.60 सातारा परिसर, बीडबायपास येथील पहिला मजला ज्याचे क्षत्र फळ 278.40 चौ.मी.इतके आहे. सदर इमारत मालमत्तधारकाकडून भाडेतत्वावर घेण्यास मान्यता देण्यात येते. या इमारतीस पहिल्या सहा महिन्यासाठी दरमहा र.रु.95000/- (मुल्य वर्धीत करासह) भाडे देण्यात येईल व सहा महिन्यानंतर प्रतिमाह र.रु.1,00,000/- (मुल्यवर्धीत करासह) इतके भाडेवाढ देण्यात येईल. प्रत्येक तीन वर्षानंतर मुळ भाड्यात नैसर्गिक भाडेवाढ म्हणुन10 टक्के भाडेवाढ देण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. दरमहा भाड्यासाठी खर्च होणारी रक्कम अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1003/2023:-</u> (घरकुल विभाग)** **(दि.09.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, "सर्वांसाठी घरे" या संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजनेतील परवडणारी घरे (AHP) घटक क्र.3 मधील शासकीय जमिनीवर खाजगी भागीदारीद्वारे (DROHS) गृहप्रकल्प राबविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेने पारित केलेला ठराव क्र.1003 दि.22.02.2019 आणि ठराव क्र.1308 दि.06.02.2020 नुसार मौजे तिसगाव येथील शासकीय जमिनीवर प्रधानमंत्री आवास योजना राबविण्याबाबत ठराव पारित केला आहे. तसेच शासन निर्णय क्र.प्रआयो/2017/प्र.क्र.12 गृहनिधो-2/शिकाना,दि.11 जानेवारी 2018 मधील तरतुदीनुसार सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्वावर खाजगी विकासकाची नेमणुक करणे करीता निविदा मागविण्याचा ठराव पारित आहे. तसेच मा.सर्वसाधारण सभागृहाने पारित केलेला ठराव क्र.736 दि.10.03.2023 अन्वये मौजे पडेगाव येथील गट क्र.69 मधील 3.16 हे.आर. व मौजे सुंदरवाडी येथील गट क्र.9 व 10 मधील अनुक्रमे 4.46 हे.आर. व 11.32 हे.आर. या शासकीय जमिनीवर AHP गृहप्रकल्प उभारण्या साठीच्या निविदा कार्यवाही होण्यासाठी ठराव पारित आहे. मा.सर्वसाधारण सभागृहाने पारित केलेला ठराव क्र.839 दि.28.06.2023 अन्वये मौजे हर्सुल येथील गट क्र.216 मधील 1.02 हे.आर.या शासकीय जमिनीवर AHP गृहप्रकल्प उभारण्यासाठीच्या निविदा कार्यवाही होण्यासाठी ठराव पारित आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत पक्क्या स्वरुपात घर नसलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरीकांना घर उपलब्ध करुन देण्यासाठी घटक क्र.3 अंतर्गत प्रतिकृती क्र.5 नुसार खाजगी भागीदारीमध्ये परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्या करीता मौजे सुंदरवाडी गट क्र.9 व 10 येथील एकुण 5.38 हेक्टर, मौजे तिसगाव गट क्र.227/1 येथील 12.55 हेक्टर, मोजे तिसगाव गट क्र.225/1 येथील 5.29 हेक्टर, मौजे पडेगाव गट क्र.69 येथील 1.27 हेक्टर या शासकीय जमिनीवर गृहप्रकल्प उभारण्या करीता खाजगी विकासकाच्या नियुक्तीसाठी तृतीय वेळ निविदा कार्यवाहीत दि.05.06.2023 रोजी निविदा मागविण्यात आली होती. प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेची मुदत दि.23.06.2023 दु.5.00 वा.पर्यंत होती. मौ.तिसगाव गट क्र.225/1 सुंदरवाडी गट क्र.9 व 10 या करीता दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. मौजे तिसगाव गट क्र.227/1 आणि मौजे पडेगाव गट क्र.69 करीता प्रत्येकी एकच निविदा प्राप्त झाली आहे. मौ.तिसगाव गट क्र.225/1, सुंदरवाडी गट क्र.9 व 10 या करीता दोन निविदा प्राप्त असल्याने या ठिकाणचे तांत्रिक लिफाफा उघडणे बाबत सर्वानुमते ठरविण्यात आले. परंतु मौजे पडेगाव गट क्र.69 आणि मौजे तिसगाव गट क्र.227/1 करीता एकच निविदा प्राप्त असल्याने सदरील निविदांची तांत्रिक लिफाफे उघडण्याबाबतच्या निर्णयासाठी निविदा मुल्यमापन समितीची बैठक दि.27.06.2023 रोजी पार पडली आणि निविदाधारकांनी दाखल केलेल्या दराबाबत वाटाघाटी/लेखी स्पष्टीकरण सादर करण्यासाठी निविदा मुल्यमापन समितीची बैठक दि.08.09.2023 रोजी पार पडली. बैठकीत पुढील गृहप्रकल्प निहाय निविदा दराबाबत निर्णय घेण्यात आला.

मौजे सुंदरवाडी गट क्र.9 व 10 या ठिकाणी गृहप्रकल्प उभारणीसाठी L1 निविदाकार संघ करीता एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा.लि.यांनी र.रु.30,900/- चौ.मी.दर सादर केला. तसेच L2 निविदाकार संघ जागृत सारा इन्फ्रास्ट्रक्चर LLP कंपनी यांनी र.रु.41,625/- चौ.मी.दर सादर केला आहे.

मौजे तिसगाव गट क्र.225/1 या ठिकाणी गृहपकल्प उभारणीसाठी L1 निविदाकार संघ करीता एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा.लि.यांनी र.रु.30,900/- चौ.मी.दर सादर केला. तसेच L2 निविदाकार संघ जागृत सारा इन्फ्रास्ट्रक्चर LLP कंपनी यांनी र.रु.42,291/- चौ.मी.दर सादर केला.

मौजे तिसगाव गट क्र.227/1 या ठिकाणी गृहप्रकल्प उभारणीसाठी L1 निविदाकार संघ करीता एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा.लि.यांनी र.रु.31,500/- चौ.मी.दर सादर केला.

मौजे पडेगाव गट क्र.69 या ठिकाणी गृहप्रकल्प उभारण्यासाठी L1 निविदाकार संघ लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी र.रु.31,899/- चौ.मी.दर सादर केला.

तसेच मौजे हर्सुल गट क्र.216 या ठिकाणी गृहप्रकल्प उभारणीसाठी L1 निविदाकार संघ करीता सारा इन्फ्रास्ट्रक्चर यांनी र.रु.45,333/- चौ.मी. आणि L2 निविदाकार संघ के.एच.कन्स्ट्रक्शन यांनी र.रु.46,501/-/चौ.मी. याप्रमाणे निविदा दर सादर केलेले असल्याने आणि प्रचलित दरपेक्षा अधिकचे असल्यामुळे निविदा समिती बैठकीतील L1 निविदाकार संघ करीता सारा इन्फ्रास्ट्रक्चर यांनी वाटाघाटी अंती र.रु.40,000/-/चौ.मी.दर सादर केला. वर नमुदप्रमाणे गृहपकल्प निहाय निविदा दरास वाटाघाटी नंतर निविदा समितीने मंजुरी दिली.

करीता, सविस्तर प्रस्तावित केल्याप्रमाणे मौजे सुंदरवाडी गट क्र.9 व 10 या ठिकाणी L1 निविदाकार एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे निविदा दर र.रु.30,900/-/चौ.मी. मौजे तिसगाव गट क्र.225/1 या ठिकाणी यांनी L1 निविदाकार एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा.लि.यांचे निविदा दर र.रु.30,900/- चौ.मी., मौजे तिसगाव गट क्र.227/1 या ठिकाणी निविदाकार एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे निविदा दर र.रु.31,500/-चौ.मी., मौजे पडेगाव गट क्र.69 याठिकाणी निविदाकार लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे निविदा दर र.रु.31,899/- चौ.मी., मौजे हर्सुल गट क्र.216 या ठिकाणी L1 निविदाकार संघ करीता सारा इन्फ्रास्ट्रक्चर यांनी वाटाघाटी अंती र.रु.40,000/- चौ.मी. याप्रमाणे गृहप्रकल्पाचे निविदा दरास मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1003/2023:-</u>**

प्रस्तावात सविस्तर नमुद केल्यानुसार वरील पाच ठिकाणचे गृहपकल्पाचे निविदा दरास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1004/2023:-</u> (दिव्यांग विभाग)** **(दि.09.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या मार्फत दिव्यांगाकरिता सन 2023-24 अर्थसंकल्पीय तरतुद मध्ये क-19 दिव्यांग विकास व उत्थान कार्यक्रम या लेखाशिर्षका अंतर्गत दिव्यांगाच्या कल्याणकारी एकूण 15 योजना प्रयोजनांकरिता र.रु.17.00 कोटी ची तरतुद करण्यात आलेली आहे.

दि.28.10.2015 च्या शासन निर्णयातील 2015/प्र.क्र.118 नवि-20 दि.28.10.2015 च्या शासन निर्णयातील दिव्यांगासाठी मार्गदर्शक सूचनां नुसार विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी मा. सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.534/2022 चा ठराव पारीत करण्यात आलेला आहे. ठरावानुसार दिव्यांग लाभार्थ्यांकरिता 15 कलमी योजना सन 2022-23 मध्ये राबविण्यात आलेल्या आहेत.

**थेरपी सेंटर :-**

दि.16.11.2022 रोजीच्या बैठकीतील इतिवृत्तान्वये

1. दिव्यांग करिता आवश्यक असलेल्या वेगवेगळया प्रकारच्या Therapy Physiotherapy, Speech Therapy व Occupational therapy इत्यादी करिता Therapy Center उभारणे.
2. नवजात बालकांमध्ये एखादे दिव्यांगत्व असल्यास त्याचे लवकर निदान व उपचार होण्याच्या दृष्टीने Early Intervention Center उभारणे या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता थेरपी सेंटरव्दारे मुलांच्या एकात्मतेची तयारी आणि नियमित शाळेतील अभ्यासक्रमाच्या गरजा यामधील अंतर कमी करण्याच्या उद्येशाने स्थापन करण्यात येणार आहे.

थेरपी दिव्यांगाच्या विकासात्मक वाढीला दिलासा व चालना देणारी आहे या केंद्रांमार्फत विशिष्ट प्रकारच्या थेरपी एकाच छताखाली बालकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. येथे थेरपिस्ट/ चिकित्सक हे दिव्यांगांच्या पुनर्वसनाच्या प्रक्रियेत पालकांना आधार देणे व त्यांच्या गरजांवर आधारित सेवा पुरविणेची भुमिका बजावतील.

**थेरपी सेंटरचा उद्देश :-**

समाजात स्वमग्नता आणि विकासात्मक विकारांबाबत जागरूकता निर्माण करणे आणि बालकांमधील दिव्यांगत्व लवकर ओळखून त्यांना एकाच छताखाली विशिष्ट प्रकारच्या सर्व चिकित्सा मोफत आणि माफक दरामध्ये उपलब्ध करून देणे तसेच चिकित्सेचा लाभ घेणाऱ्या शहरातील दिव्यांगांना दैनंदिन जीवनात स्वावलंबी व सक्षम बनविणे व त्यांच्या एकात्मतेची तयारी आणि नियमित शाळेतील अभ्यासक्रमाच्या गरजा या मधिल अंतर कमी करणे हा केंद्राचा मुख्य उद्येश आहे. करीता थेरपी सेंटर उभारण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

तसेच मनपातर्फे दिव्यांगांना पुरविण्यात येणाऱ्या इतर योजनांची माहिती तसेच त्यांना द्यावयाच्या प्रशिक्षणाकरिता सोय निर्माण करणे व इतर सुविधा देणेकरिता दिव्यांग भवन उभारणे करीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

दिव्यांगांना वैद्यकिय खर्चाकरीता निधी उपलब्ध करणे या शिर्षकाखाली दिव्यांगांना वैद्यकिय निधी वैद्यकिय खर्च, थेरपी सेंटर उभारणे, अर्ली इंटरवेन्शन सेंटर व हेल्थ कॅम्प आयोजित करणे या प्रयोजनाकरीता अर्थसंकल्पीय तरतुद रु.1.00 कोटी उपलब्ध आहे.

**<u>सेन्सरी गार्डन:</u>** दिव्यांग लाभार्थी यांच्या करिता सेन्सरी गार्डन द्वारे खालील सुविधा मिळणार आहेत.

1. सेन्सरी गार्डन दिव्यांग मुलांना त्यांच्या अनेक इंद्रियांना गुंतवून ठेवताना अन्वेषण, शोध, कल्पना, निर्माण, जाणीव इत्यादी शिकण्याची प्रेरणा तसेच स्पर्शज्ञान, सुगंध, ध्वनी, चव व्हेस्टीब्युलर आणि प्रोप्रीओसेप्शन या सात इंद्रियांना नैसर्गिक पध्दतीने उत्तेजित केले जाते. यावर आधारित संकल्पनेवर हे सेन्सरी गार्डन विकसित करण्यात येणार आहे. यामध्ये विशिष्ट उपकरणांचा वापर केला जाणार आहे.

2. **उद्येश :-** सेन्सरी गार्डनद्वारे बालकांच्या संवेदन क्षमता पातळी सुधारणे आणि त्यांच्या संवेदना स्वतंत्रपणे व संयोगिक रित्या उत्तेजित करण्यासाठी त्यांना संवेदनशील उपकरण एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे.
3. **पध्दत:-** सेन्सरी गार्डनमध्ये वेगवेगळ्या रंगाचे चित्र, फुले, आकर्षक आणि हेतू पुर्ण खेळणी, ट्रॅक घसरगुंडी, विशिष्ट प्रकारचे झोके, लाकूड, वाळु, गोटे असलेला रस्ता वापरून बालकांमध्ये असलेल्या आजारांच्या सुधारण्याचा क्रियाशील प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यामुळे बालकांना फक्त खेळच नाही तर विचारात्मक व विकासात्मक बाढ होण्यास सेन्सरी गार्डनचे मोलाचे कार्य ठरणार आहे.

**सेन्सरी गार्डन उभारणे करिता अर्थसंकल्पीय तरतुद रु.1.00 कोटी ठेवण्यात आलेली आहे.**

दिव्यांगांकरीता सेन्सरी गार्डन व थेरपी सेंटर एन-12 येथील मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा याचा जागेवर उभारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. एन-12 येथील शाळेत बालवाडी व वर्ग 1 ली ते 7 वी चे एकूण विद्यार्थी संख्या 24 आहे व प्रत्यक्ष उपस्थिती 12 च्या आसपास असते. त्यामुळे शिक्षण विभागातर्फे सदर शाळेचे समायोजन मनपा प्राथमिक शाळा एन-11 या शाळेत करण्यात आले आहे. एन-12 शाळेची इमारत अतिशय जुनी असून इमारतीचे संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) करण्यात आले असून सदर इमारत हि वापरण्यास धोकादायक असल्याचा अहवाल प्राप्त आहे. शिक्षण विभागाने सदर जागी दिव्यांगांकरीता थेरपी सेंटर, सेन्सरी गार्डन व दिव्यांग भवन उभारण्यास संमती दर्शविली आहे. त्यामुळे सदर इमारत पाडून त्या जागी दिव्यांगांकरीता थेरपी सेंटर, सेन्सरी गार्डन व दिव्यांग भवन उभारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

करीता, दिव्यांग लाभार्थीकरिता मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा एन-12 या ठिकाणी थेरपी सेंटर, सेन्सरी गार्डन व दिव्यांग भवन उभारण्याकरिता लागणाऱ्या खर्चाबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1004/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिव्यांग लाभार्थीकरिता मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा एन-12 या ठिकाणी थेरपी सेंटर व दिव्यांग भवन उभारण्या करीता र.रु.1.00 कोटी व सेन्सरी गार्डन उभारण्या करिता र.रु.1.00 कोटी खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1005/2023:-** **(आस्थापना विभाग-1)** **(दि.10.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहराच्या विकासासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या हद्दीत नवीन प्रकल्प/कामे सुरु आहेत.

सध्या कार्यरत तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असुन सदरील कामे पार पाडण्या साठी तांत्रिक व अनुभवी अधिकाऱ्यांची आवश्यकत आहे. तसेच उपलब्ध तांत्रिक अधिकाऱ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे.

श्री.राजेंद्र प्रल्हादराव वाघमारे, उपअभियंता, झोन क्र.07 हे दि.30.09.2023 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असून त्यांना तांत्रिक कामांचा प्रत्यक्ष अनुभव असल्याने त्यांच्या सेवेचा लाभ होऊ शकतो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(1) नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे.-मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत-त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

परंतु, आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्जविषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्वमंजुरीने या अटीवर करता येतील की, आयुक्तांने अशी प्रत्येक नेमणुक करतांना त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीनकरण करता येणार नाही.

करीता, “स्वर्गीय मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक व स्मृतीवन, सातारा देवळाई जननि:स्सारण प्रकल्प, कमल तलाव पुनरुज्जीवन तसेच नो-नेटवर्क एरियातील ड्रेनेज लाईन टाकणे इ.प्रकल्पाचे कामे करणे” या विवक्षित कामाकरीता श्री.राजेंद्र प्रल्हादराव वाघमारे, उपअभियंता(स्थापत्य) (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने, सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची विहित कार्यपध्दतीने पालन करुन करार पध्दतीने नेमणुक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्यावेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वेगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. या अटीवर घेण्याबाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1005/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, “स्वर्गीय मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक व स्मृतीवन, सातारा देवळाई जननि:स्सारण प्रकल्प, कमल तलाव पुनरुज्जीवन तसेच नो-नेटवर्क एरियातील ड्रेनेज लाईन टाकणे इ.प्रकल्पाचे कामे करणे” या विवक्षित कामाकरीता श्री.राजेंद्र प्रल्हादराव वाघमारे, उपअभियंता(स्थापत्य) (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने, सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची विहित कार्यपध्दतीने पालन करुन करार पध्दतीने नेमणुक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्यावेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वेगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. या अटीवर घेण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1006/2023:-</u> (आस्थापना विभाग-1)** **(दि.10.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, “गरवारे स्टेडियम येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम व क्रिडा संकुल उभारणे” हा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या महत्वाच्या व महत्वाकांक्षी प्रकल्प असुन सदर प्रकल्प निर्धारित वेळेत व यशस्वीपणे पुर्ण करणे आवश्यक आहे.

सदर प्रकल्प पुर्ण करण्यासाठी तांत्रिक व अनुभवी अधिकाऱ्यांची आवश्यक आहे. तथापि, सद्यस्थितीत कार्यरत तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असून सदरील प्रकल्प पुर्ण करण्यासाठी उपलब्ध तांत्रिक अधिकाऱ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे.

श्री.वसंत मारुतीराव निकम, उपअभियंता (स्थापत्य) हे दि.28.02.2019 रोजी सेवानिवृत्त झाले असुन त्यांची शैक्षणिक अर्हता हे बी.ई.(सिव्हील), एल.एल.बी. अशी आहे. त्यांनी त्यांच्या सेवाकाळात अनेक पदांवर काम केलेले आहे. त्यांना तांत्रिक कामांचा प्रत्यक्ष अनुभव असल्याने त्यांच्या सेवेचा लाभ होऊ शकतो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(1) नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे.-मग असे अधिकारी तात्पुरते किंवा कायम असोत- त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

परंतू आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्या असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणूका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पूर्वमंजूरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करतांना त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पूर्वमंजूरी वाचून अशा कोणत्याही नेमणूकीचे नविनकरण करता येणार नाही.

करिता "गरवारे स्टेडियम येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम व क्रिडा संकुल उभारणे विषयक कामांवर पर्यवेक्षण करणे" या विवक्षित कामाकरीता "विशेष कार्य अधिकारी" म्हणून श्री. वसंत मारुतीराव निकम, उपअभियंता (स्थापत्य) (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथमतः06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने, सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्यावेळी

महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. या अटीवर घेण्याबाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1006/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "गरवारे स्टेडियम येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम व क्रिडा संकुल उभारणे विषयक कामांवर पर्यवेक्षण करणे" या विवक्षित कामाकरीता "विशेष कार्य अधिकारी म्हणून श्री.वसंत मारुतीराव निकम, उपअभियंता (स्थापत्य) (सेवानिवृत) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रयशत : 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतना एवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्ती वेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. या अटीवर घेण्याबाबत प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1007/2023:- (कार्यकारी अभियंता-ड्रेनेज विभाग) (दि.11.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कांचनवाडी STP च्या ठिकाणी शुद्ध पाणी प्रकल्प (Tertiary Treatment Plant) प्रायोगिक तत्वावर उभारणे साठी अमृत 2.0 प्रकल्पा अंतर्गत प्रस्तावास शासना कडून तत्वत: मंजुरी प्रदान करण्यात आली होती. सदर मंजुरीनुसार कांचनवाडी STP च्या ठिकाणी 30 MLD क्षमतेचा प्रकल्प उभारणे करणेसाठी रीतसर निविदेद्वारे M/s Tondon Urban Solutions Pvt.Ltd., Mumbai यांचे एकूण प्रकल्प किंमतीच्या 1.25% दराने (GST वगळून) नियुक्ती करण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर निविदेस मा.स्थायी समिती प्रस्ताव क्र.762 दि.13.04.2023 अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर मंजुरीनुसार नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) यांनी सर्वेक्षण करून त्यांचा प्राथमिक अहवाल सादर केला आहे. सदर अहवालामध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी नमुद केलेल्या कारणांमध्ये (1) नमुद केले की, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ औरंगाबाद, त्यांच्याशी संलग्न औद्योगिक संघटना व या शिवाय भारतीय रेल्वे विभागाने जी प्रक्रिया युक्त पाण्याची मागणी नमुद केली आहे की, 05 MLD एवढीच आहे. (2) याशिवाय प्रक्रियायुक्त पाणी ज्यास संस्थांकडून/स्वारस्य धारकांना आवश्यक आहे त्यांनी त्यांचे स्थळापर्यंत पाणी पोहोचविण्या साठीची वितरण वाहिनी टाकणे अपेक्षित असल्याचे मागणीत दिसून आले आहे. या कारणाने प्रकल्पाच्या खर्चात पर्यायाने प्रक्रियायुक्त पाण्याचे दर शुद्ध पाणी जे की शहराला महानगरपालिकेकडून पुरविले जाते त्यापेक्षा अधिक दर येईल असे दिसून येत आहे. तसेच सद्यस्थितीत MIDC शुद्ध पाणी रू.16.24/- प्रतिलीटर प्रमाणे पुरवत आहे. जे प्रक्रियायुक्त पाणी मनपा MIDC ला पुरवणार आहे त्याचा दर MIDC करत असलेल्या शुद्ध पाण्यापेक्षा जास्त म्हणजेच अंदाजे रु.22/- ते रु.23/- एवढा असणार आहे. (3) तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीमध्ये प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर करण्यासाठी Dual Plumbing Policy अवलंबलेली नसल्याने अशा प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर फारच मर्यादित आहे. (4) याशिवाय अशा स्वरूपाने प्रक्रिया युक्त पाण्याचा वापर करणेबाबत सामाजिक दृष्टीकोन हा वापर न करण्याचा दिसून आला आहे. (5) तसेच MIDC, DMIC-AURIC यांनी स्वतःचे मल-जल प्रक्रिया केंद्र (STP/ETP), याबाबत औद्योगिक क्षेत्राचे पुढील 20 वर्षात होणारी वाढ विचारात घेऊन नियोजन केलेले आहे. त्यामुळे MIDC महानगरपालिकेकडून शुद्ध पाणी प्रकल्पातून निर्गमित होणारे पाणी खरेदी करणेस फारसे उत्सुक नाहीत. त्यामुळे शुद्ध पाणी प्रकल्पाची उभारणी केल्यानंतर अत्यल्प प्रतिसाद पाहता या प्रकल्पाची देखभाल दुरूस्ती व्यवहार्य ठरत नसल्याचे PMC यांनी त्यांच्या पत्रात नमुद केले आहे.

तसेच सद्यस्थितीत महानगरपालिकेद्वारे मल-जलावर STP द्वारे दुय्यम प्रक्रिया (Secondary Treatment) करण्यात येत असून सदरचे प्रक्रिया युक्त पाणी जवळच्या नदी नाल्यामध्ये सोडले जात आहे. सदर प्रक्रिया युक्त पाण्याचा वापर हा लगतच्या भागातील शेतकरी शेतीकरिता करीत आहेत. सदर STP मुळे दुषित पाणी नदीत सोडण्याची समस्या दूर झाली आहे व प्रक्रिया केलेले पाणी नदीत

सोडल्याने शेतीसाठी शुद्ध पाणी वापरले जात आहे. त्यामुळे पर्यावरणास होणारे नुकसान टाळण्यात आले असुन उत्पनाचा दर्जाही सुधारला आहे. त्यामुळे पर्यावरणात होणारे नुकसान टाळण्यात आले असून शेती उत्पन्नाचा दर्जाही सुधारला आहे.

सदर प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर शेतीकरिता व महानगरपालिकेच्या उद्यान देखभाल दुरुस्ती करिता जरी होत आहे तरी त्यामुळे महानगरपालिकेस कोणताही आर्थिक लाभ होत नाही. परंतु निश्चित पणे यामुळे नदी-नाले, भुजल दुषित होण्याचे प्रमाण अत्यंत कमी झाले आहे तसेच रोगराई पसरण्याची शक्यता देखील कमी झाली आहे. तसेच मागणी नुसार इतर वापरासाठी हे पाणी उपलब्ध करून दिले जात आहे.

उक्त नमुद प्रमाणे PMC यांनी सादर केलेला प्राथमिक अहवाल, वस्तुस्थिती व शुद्ध पाणी प्रकल्पातून निर्गमित होणारे पाणी वापरण्याबाबत नागरीकांमध्ये सामाजिक स्वीका-यार्हता पाहता या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मुंबई येथे बैठकीत चर्चा झाली असता उक्त बाबींबाबत शासन स्तरावर अवगत करण्यात आले असता या प्रकल्पाऐवजी शहरामध्ये ज्या ठिकाणी जलनि:सारण वाहिन्यांचे जाळे निर्माण झालेले नाही अशा No Network Area मध्ये जलनि:सारण वाहिनी टाकण्याचा प्रकल्प प्रस्तावित करण्या बाबत अनुकुलता दर्शविली आहे.

त्याऐवजी ज्या भागामध्ये जलनि:सारण वाहिन्यांची सुविधा नाही, अशा ठिकाणी मल-जल उघड्यावर, नदी नाले इ. मध्ये सोडले जाते. त्यामुळे नदी नाले प्रदुषित होतात. तसेच उघड्यावर सोडलेल्या मल-जलामुळे रोगराई पसरण्याची शक्यता आहे. तसेच भुजल दुषित होत आहे.

करिता ज्या भागात जलनि:सारण वाहिन्यांची सुविधा नाही अशा ठिकाणी जलनि:सारण वाहिन्या टाकुन मल-जल प्रक्रिया केंद्रास जोडल्यास नदी नाल्यांचे प्रदुषण कमी होण्यास मदत होईल, भुजल दुषित होणार नाही, तसेच रोगराई पसरण्याची शक्यता कमी होईल. यामुळे या No Network भागात मलनिःसारण वाहिनी टाकल्याने त्याचा जास्त प्रभाव राहणार आहे.

या बाबीस अनुसरून No Network Area पैकी काही भागामध्ये जलनि:सारण वाहिनी टाकणे या प्रकल्पासाठी निविदेद्वारे निवड झालेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) Yash Innovative Solutions LLP यांना सुचना करण्यात आली असता त्यांनी छत्रपती संभाजीनगर शहरातील पडेगाव, मिटमिटा, भीमनगर, हमालवाडा-रेल्वेस्टेशन, राहुलनगर, बनेवाडी, कांचनवाडी-नक्षत्रवाडी, इटखेडा इ. या भागांमध्ये Package-1 म्हणून जलनि:सारण वाहिनी नव्याने टाकणेबाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल रु.232,21,27,411.00 किमतीचा प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन 2023-2024 व सार्वजनिक बांधकाम दरसुची सन 2022-2023 नुसार तयार करून सादर केला आहे. उर्वरीत No Network भागासाठी स्वतंत्र प्रस्ताव करण्यात येईल. सदर प्रकल्पासाठीचे नियोजन सन 2026 मधील त्यावेळी असणारी लोकसंख्या व पुढील 30 वर्षांची लोकसंख्या वाढ विचारात घेऊन करण्यात आलेले आहे. या प्रकल्प अहवालात खालील तक्त्यात नमुद प्रमाणे विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे-

| **Sr. No.** | **Name of Sub Work** | **Total Cost Of Components in Rs.** |
|---|---|---|
| 1. | Working Suravey | 1844876.00 |
| 2. | Collection System (Length 222km) | 1386610742.60 |
| 3. | Manhole Pumping Station @07 | 10292810.00 |
| 4. | Manhole Pumping Station @08 | 13233602.00 |
| 5. | Sevage Pumping Station at 01 | 8087433.00 |
| 6. | Rising Main 1 (200 m Long-350 mm Dia.)@06 | 1721072.00 |
| 7. | Rising Main 2 (200 m Long-350 mm Dia.)@07 | 916742.00 |
| 8. | Rising Main 3 (200 m Long-350 mm Dia.)@08 | 1380495.00 |
| 9. | Mechanical Works of Pumping Station-01 | 22945932.00 |
| 10. | Express Feeder | 14054827.00 |
| 11. | Solar Power Plant (300 kwp) | 11437930.00 |

| | | |
|---|---|---|
| 12. | STP of Capacity 6.5 MLD-SBR | 111008551.00 |
| 13. | STP of Capacity 1 MLD-MMBR | 24909903.00 |
| 14. | STP of Capacity 3 MLD-MMBR | 41906404.00 |
| 15. | Compound Wall (Length-900 m) | 14136489.00 |
| 16. | House Service Connection (1000 nos HH) | 25151586.00 |
| 17. | Road Restoration (Length-55 km) | 177213478.50 |
| 18. | Utility Shifting | 14260740.00 |
| 19. | Special Purpose Vehicl Mounted Combination of suction cum Jetting Machine | 7132750.00 |
| 20. | Trial Run for Three Month | 2706351.00 |
| 21. | Trial Run for One Year | 10825401.00 |
| 22. | Royalty charges for Natural sand, rubble stone above 40 mm size & Hard Murum of PWD item | 1762455.00 |
| 23. | Push Through for Crossing line under Major Raod | 21634237.00 |
| 24. | PWD/Railway Permission Charges | 20085000.00 |
| | **Total Cost Rs.(A)** | **1945259807.06** |
| | **PMC Charges 1.52%** | **29567949.07** |
| | **Provision for 18% GST Without Express Feeder And Royalty Charges (B)** | **347299654.51** |
| | **Total Net Cost (A+B)** | **2322127411.00** |

करीता, उक्त नमुद वस्तुस्थिती विचारात घेता, प्रकरणी (1) कांचनवाडी STP च्या ठिकाणी जो शुध्द पाण्याचा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर उभारणेचे नियोजन करण्यात आले होते ते रद्द करणे, (2) या ऐवजी अमृत 2.0 च्या संकेतस्थळावर शुध्द पाणी प्रकल्पासाठी जी अंदाजित तरतुद र.रु.170.00 कोटी नमुद करण्यात आली होती, त्यात सुधारणा करुन या प्रकल्पाऐवजी शहरातील ज्या भागात जलनि:स्सारण वाहिन्यांचे जाळे नाही अशा भागांपैकी Pacakage-1 मध्ये जलनि:स्सारण वाहिनी टाकणे व संलग्न कामे करण्यासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) Yash Innovative Solutions LLP यांनी तयार केलेला अं.प.र.रु.232,21,27,411/- शासन नियुक्त नोडल एजन्सी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून तपासून व तांत्रिक मान्यता घेऊन शासनास अनुदान मागणीसाठी सादर करणे (3) शासनाने या नव्याने सादर करण्यात येत असलेल्या जलनि:स्सारण प्रकल्पाच्या विस्तृत प्रकल्प अहवालात मान्यता प्राप्त झाल्यानुसार व शासनाने ठरवून दिलेल्या आर्थिक आकृतीबंधानुसार महानगरपालिकेचा हिस्सा टाकणे, त्यासाठी मनपा अर्थसंकल्पात योग्य ती आर्थिक तरतुद करणे (4) पुर्व मान्यतेनुसार कांचनवाडी STP च्या ठिकाणी जो शुध्द पाण्याचा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर उभारणे प्रकल्पासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) M/s Tondon Urban Soultions Pvt.Ltd.Mumbai यांनी दिलेल्या अहवालानुसार सदर प्रकल्प रद्द करणे व त्यांनी काम केलेल्या हद्दीपर्यंतच्या वस्तुस्थितीचे आकलन करुन त्यांचे सेवामुल्य अदा करणे, तसेच (5) भविष्यात शहरात इतर भागात म्हणजेच ज्या भागामध्ये जलनि:स्सारण वाहिन्यांचे जाळे नाही अशा भागांचा विधानसभा मतदार संघनिहाय विस्तृत प्रकल्प अहवाल सादर करण्यास नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) Yash Innovative Solutions LLP यांना त्यांचे कामाचे व्याप्तीमध्ये समावेश असल्याने त्यांना यासाठी सुचना करणे (6) शासनाकडून सादर जलनि:स्सारण प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर शासन निर्देशा नुसार निविदा कार्यवाही व इतर संलग्न कार्यवाही करणे तसेच जलनि:स्सारण वाहिनी नसलेल्या भागासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे, त्यात आवश्यकतेनुसार बदल करणे बाबतचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करण्यासह मंजुरी देणेबाबत चा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1007/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कांचनवाडी STP च्या ठिकाणी शुध्द पाणी प्रकल्प (Tertiary Treatment Plant) प्रायोगिक तत्वावर उभारणे या ऐवजी शहरातील जलनि:स्सारण वाहिनी नसलेल्या

भागासाठी तयार करण्यात आलेला विस्तृत प्रकल्प अहवाल Package-1 मध्ये अं.प. र.रु.232,21,27,411/- शासन नियुक्त नोडल एजन्सी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून तपासून व तांत्रिक मान्यता घेऊन शासनास अनुदान मागणीसाठी सादर करणे (3) शासनाने या नव्याने सादर करण्यात येत असलेल्या जलनि:स्सारण प्रकल्पाच्या विस्तृत प्रकल्प अहवालात मान्यता प्राप्त झाल्यानुसार व शासनाने ठरवून दिलेल्या आर्थिक आकृतीबंधानुसार महानगरपालिकेचा हिस्सा टाकणे, त्यासाठी मनपा अर्थसंकल्पात योग्य ती आर्थिक तरतुद करणे (4) पुर्व मान्यतेनुसार कांचनवाडी STP च्या ठिकाणी जो शुध्द पाण्याचा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर उभारणे प्रकल्पासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) M/s Tondon Urban Soultions Pvt.Ltd.Mumbai यांनी दिलेल्या अहवालानुसार सदर प्रकल्प रद्द करणे व त्यांनी काम केलेल्या हद्दीपर्यंतच्या वस्तुस्थितीचे आकलन करुन त्यांचे सेवामुल्य अदा करणे, तसेच (5) भविष्यात शहरात इतर भागात म्हणजेच ज्या भागामध्ये जलनि:स्सारण वाहिन्यांचे जाळे नाही अशा भागांचा मतदार संघनिहाय विस्तृत प्रकल्प अहवाल सादर करण्यास नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) Yash Innovative Solutions LLP यांना त्यांचे कामाचे व्याप्तीमध्ये समावेश असल्याने त्यांना यासाठी सुचना करणे (6) शासना कडून सादर जलनि:स्सारण प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर शासन निर्देशा नुसार निविदा कार्यवाही व इतर संलग्न कार्यवाही करणे तसेच जलनि:स्सारण वाहिनी नसलेल्या भागासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे, त्यात आवश्यकतेनुसार बदल करणे बाबतचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1008/2023:-</u> (शहर अभियंता विभाग)** **(दि.11.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 अन्वये सन 2022-23 चे सुधारित व कलम 96 व 100 नुसार सन 2023-24 चे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती व मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.740/2023 दि.31.03.2023 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. सदरील अर्थसंकल्पातील खर्च बाजुच्या भांडवली खर्चाच्या अंदाजपत्रकायमधील शहर एकात्मिक रस्ते विकसीत करणे या मुख्य लेखाशिर्षाअंतर्गत एमआयडीसी अंतर्गत विविध विकास कामे करणे या उपलेखाशिर्षात पान क्र.ई-61 अ.क्र.8 वर र.रु.5.00 कोटीची तरतुद करण्यात अलेली आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सन 2023-24 या वित्तीय वर्षात तातडीचे आवश्यक महसुली व भांडवली स्वरुपाची अत्यावश्यक कामे करण्यास अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध नाही व अशी कामे करावयाची असल्यास सन 2023-24 च्या अर्थसंल्पात उपलब्ध करुन देण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करणे अनिवार्य आहे. या करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील एमआयडीसी अंतर्गत विविध विकास कामांसाठी महानगरपालिकेने अर्थसंकल्पात र.रु.5.00 कोटीची तरतुद उपलब्ध केलेली आहे. तथापि, सदर भागातील कामांसाठी महाराष्ट्र शासनाने एमआयडीसी अंतर्गत मुलभूत सोई सुविधांच्या कामांसाठी विशेष तरतुद उपलब्ध करुन दिलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 तसेच प्रकरण 7चे 2 (क) नुसार तातडीचे व अत्यावश्यक कामे करण्यासाठी भांडवली खर्च-अ अंदाजपत्रक या मुख्यलेखाशिर्षा अंतर्गत एमआयडीसी मध्ये विविध विकास कामे करणे या उपलेखाशिर्षात पान क्र.ई-61 अ.क्र.8 वर र.रु.5.00 कोटीची तरतुद करण्यात आलेली असून सदरील तरतुदीमधून र.रु.4.00 कोटी नवीन कॉंक्रीट रस्तेच्या कामांसाठी व र.रु.1.00 कोटी ची तरतुद जल व मलनि:स्सारण ची भांडवली कामे करणे करीता वळती करुन उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1008/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 तसेच प्रकरण 7 चे 2 (क) नुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपलिका क्षेत्रात तातडीचे व अत्यावश्यक कामे करण्यासाठी भांडवली खर्च-अ अंदाजपत्रक या मुख्यलेखाशिर्षा अंतर्गत एमआयडीसी मध्ये विविध विकास कामे करणे या उपलेखाशिर्षात पान क्र.ई-61 अ.क्र.8 वर र.रु.5.00 कोटीची तरतुद

करण्यात आलेली असून सदरील तरतुदीमधून र.रु.4.00 कोटी नवीन कॉंक्रीट रस्तेच्या कामांसाठी व र.रु.1.00 कोटी ची तरतुद जल व मलनि:स्सारण ची भांडवली कामे करणे करीता वळती करुन उपलब्ध करुन आवश्यकतेनुसार कामासाठी वळती करुन उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1009/2023:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.13.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.08, सर्व्हे क्र.154 मधील मंजुर रेखांकनामध्ये कॉंक्रीट रस्ता करणे या कामाचे ठेकेदार श्री.निसर्ग महेश भागवत यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.86% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.3236597.45/- पर्यंत करुन घेण्यास अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करण्यास/कपात करण्यास व करार करण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ:-टेंडर क्रमांक/Tender ID_2022_AMCA_852043_2

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | उपअभियंता झोन क्र.5 सिडको. |
| 2. | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.08, सर्व्हे क्र.154 मधील मंजुर रेखांकनामध्ये कॉंक्रीट रस्ता करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.सर्वसाधारण सभा दि.27.10.2022 विषय क्र.524 र.रु.50,43,056/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.41,42,049.46/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.02 डिसेंबर 2022 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.05 डिसेंबर 2022 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 7 (सात) |

(त्यापैकी पात्र टेंडरधारकाची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर र.रु. | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | निसर्ग महेश भागवत | 3236597.45 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.86% कमी दराने |
| 2. | सहारा कन्स्ट्रक्शन | 3313225.36 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.01% कमी दराने |
| 3. | हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन | 3323994.69 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.75% कमी दराने |
| 4. | कासलीवाल कन्स्ट्रक्शन | 3385297.02 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.27% कमी दराने |
| 5. | श्री.अ.रज्जाक सिद्दीकी | 3728258.72 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.99% कमी दराने |
| 6. | मे.एफ.के.कन्स्ट्रक्शन | 3893940.70 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.99% कमी दराने |
| 7. | श्री.शहानवाज खान | --- | तांत्रिक कारणाने निविदा उघडण्यात आली नाही |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | विकास योजनेअंतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली | नाही |

| | | |
|---|---|---|
| | आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | आहे |
| तरी विषयांकीत काम ठेकेदार श्री.निसर्ग महेश भागवत यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.86% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.3236597.45/- पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करण्यास/कपात करण्यास व व करार करण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव क्रमांक 1009/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जी वॉर्ड क्र.08 सर्व्हे क्र.154 मधील मंजुर रेखांकनामध्ये काँक्रीट रस्ता करण्याचे अंदाजपत्रक र.रु.5043056/- यास मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.524/2022 दि.27.10.2022 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. या अनुषंगाने सदर कामासाठी र.रु.41,42,049.46/- च्या मर्यादित निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

करीता, सदरील कामाकरीता प्राप्त पात्र निविदाधरकांपैकी l1 निविदाधारक श्री.निसर्ग महेश भागवत यांची निविदा, मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 21.86 टक्के कमी दराची म्हणजेच र.रु.32,36,597.45 ची प्राप्त असुन सदर निविदा स्विकृतीच्या प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1010/2023:-** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.13.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 15 वा वित्त आयोगाच्या पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारण व प्रभावी घनकचरा व्यवस्थापनासाठी प्राप्त अनुदानातून 02 सिंगल कॅबीन ट्रक खरेदी करण्या साठी र.रु.32,00,000/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.829 दि.21.06.2023 नुसार मान्यता घेण्यात आली आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यानंतर जीईएम पोर्टलद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता, निविदेच्या दुसऱ्या वेळी 02 निविदा तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरल्या आहेत. पात्र निविदाधारकांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1. | मे.अशोक लिलँड लि. | र.रु.25,97,000.00 |
| 2. | मे.टाटा मोटर्स् लि. | र.रु.32,91,998.00 |

उपरोक्त नुसार मे.अशोक लिलँड लि.यांचे निविदा दर तुलनात्मकदृष्ट्या कमी असुन ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा र.रु.6,03,000/- (18.84%) ने कमी आहेत. त्यामुळे त्यांची निविदा स्विकृत करणे योग्य होईल.

करीता, 02 सिंगल कॅबीन ट्रक खरेदी करण्यासाठी मे.अशोक लिलँड लि.यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा र.रु.6,03,000/- (18.84%) ने कमी दराची र.रु.25,97,000/- खर्चाची निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1010/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 02 सिंगल कॅबीन ट्रक खरेदी करण्यासाठी मे.अशोक लिलँड लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा र.रु.6,03,000/- (18.84%) ने कमी दराची र.रु.25,97,000/- खर्चाची निविदा स्विकृत करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1011/2023:-** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.13.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासनाच्या नियमानुसार महानगरपालिकेची विविध प्रकारची एकुण 59 वाहने ही 15 वर्षापेक्षा जास्त वयोमान असल्यामुळे निर्लेखित होणार आहेत. त्यानुषंगाने घनकचरा/जलनि:स्सारण/पाणी पुरवठा संबंधीत 39 नवीन वाहने/मशिनरी 15 वा वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून खरेदी करण्यासाठी र.रु.15,23,47,088/- च्या एकत्रित अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.900 दि.02.08.2023 नुसार मान्यता घेण्यात आली आहे. सदरील एकत्रित अंदाजपत्रकास 20 हजार लि.क्षमतेचे टँकर्स उभारणी करण्यासाठी 28 टन जीव्हीडब्ल्यु चेसीस करीता र.रु.71,30,148/- च्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त आहे. मान्यता मिळाल्यानुसार 20 हजार ली.क्षमतेचे टँकर्स उभारणी करण्यासाठी दोन 28 टन जीव्हीडब्ल्यु चेसीस खरेदी करीता जीईएम पोर्टलद्वारे जाहीर निविदा

मागविण्यात आल्या आहेत. निविदेच्या पहिल्या वेळी 03 निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या असून पात्र निविदाधारकांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1. | मे.गुरुनानक मोटर्स प्रा.लि. | र.रु.71,20,000.00 |
| 2. | मे.घाटगे पाटील ट्रान्सपोर्ट प्रा.लि. | र.रु.72,00,000.00 |
| 3. | मे.माय कार (पुणे) प्रा.लि. | र.रु.74,00,000.00 |

उपरोक्त नुसार मे.गुरुनानक मोटर्स प्रा.लि.यांचेनिविदा दर तुलनात्मकदृष्ट्या कमीअसुन ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा र.रु.10,148/- (0.14%) ने कमी आहेत. त्यामुळे त्यांची निविदा स्विकृत करणे योग्य होईल.

करीता, 20 हजार लि.क्षमतेचे टँकर्स उभारणी करण्यासाठी दोन 28 टन जीव्हीडब्ल्यु चेसीस खरेदी करीता मे.गुरुनानलक मोटर्स् प्रा.लि.यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा र.रु.10,148/- (0.14%) ने कमी दराची र.रु.71,20,000/- खर्चाची निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1011/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 20 हजार लि.क्षमतेचे टँकर्स उभारणी करण्यासाठी दोन 28 टन जीव्हीडब्ल्यु चेसीस खरेदी करीता मे.गुरुनानलक मोटर्स् प्रा.लि.यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा र.रु.10,148/- (0.14%) ने कमी दराची र.रु.71,20,000/- खर्चाची निविदा स्विकृत करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1012/2023:-</u> (कार्यकारी अभियंता पापु विभाग)** **(दि.13.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथे 100 व56 दलली प्रतिदिन क्षमतेचे दोन जलशुध्दीकरण केंद्र असुन या दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रात दररोज 150 दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत प्रामुख्याने तुरटी, ब्लिचींग पावडरव क्लोरीन गॅसचा वापर विविध टप्प्यांवर केला जातो. जलशुध्दीकरण प्रक्रियेत पाण्यातील गढुळता कमी करण्यासाठी तुरटी ग्रेड-1 चा वापर केला जातो. तसेच पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी प्रि-क्लोरीनेशन व पोस्ट-क्लोरिनेशनच्या स्वरुपात क्लोरीन गॅस व ब्लिचींग पावडरचा वापर केला जातो. जलशुध्दीकरण केंद्र येथे ब्लिचींग पावडर ग्रेड-1 चा वापर प्रि-क्लोरिनेशन करीता तसेच वितरण प्रणाली अंतर्गत असलेल्या विविध जलकुंभावर आवश्यकतेनुसार केला जातो. प्रि-क्लोरीनेशनकरीता 1 पी.पी.एम.इतकी ब्लिचींग पावडरची मात्रा वापरावी लागते. पावसाळ्याच्या दिवसात तसेच धरणतील पाणी पातळी कमी झाल्यानंतर या मात्रेतआवश्यकतेनुसार वाढ करण्यात येते. या सर्व बाबींचा विचार करता फारोळा जलशुध्दीकरण केंद्राची वार्षिक मागणी ही 190 मे.टन इतकी आहे.

सदरील कामाचे अंदाजपत्रक मजिप्रा मंडळाच्या सन 2021-22 च्या दरसुचीतील साहित्य पुरवठ्या करीता असलेल्या दरानुसार तयार केले असून अंदाजपत्रकीय र.रु.49,90,692/- इतकी आहे. सदरील काम रसायन सामुग्री खरेदी या लेखाशिर्षकातून प्रस्तावित करण्यात आली आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.826/2023 दि.20.06.2023 अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

सदरील कामाची ई-निविदा कार्यवाही केली असता, निविदा कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे.

संदर्भ:-टेंडर आय.डी.क्रमांक_2023_AMCA_934785_1

| अ. क्र. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा विभाग) |
|---|---|---|
| 1. | कामाचे स्वरुप | शहर पाणी पुरवठा योजना-फारोळा जलशुध्दीकरण केंद्रा करीता ब्लिचींग पावडर ग्रेड-1 चा पुरवठा करणे. |
| 2. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? | होय, र.रु.49,32,400/- |

| | | |
|---|---|---|
| | असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.826/2023 |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.41,80,000/- |
| 3. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | "ई निविदा मार्फत"दि.11.08.2023 |
| 4. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.21.08.2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.23.08.2023 |
| 5. | निविदा किती वेळेस मागविल्या? | एक वेळेस |
| 6. | एकुण किती निविदा आल्या? | तीन |
| 7. | निविदा प्राप्त दर | र.रु.16,400/- प्रति मे.टन |

(त्यापैकी पात्र निविदाधारकाची माहिती खालील प्रमाणे)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर र.रु. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | श्री.नागनाथ महाराज केमिकल्स चाकुर | र.रु.31,16,000/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 25.45% कमी |

| | | |
|---|---|---|
| 8. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | |
| 9. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | पाणी पुरवठा रसायन सामुग्री खरेदी |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 10. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागु नाही |
| 11. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता ब्लिचींग पावडर ग्रेड-1 चा पुरवठा करण्यासाठी श्री.नागनाथ महाराज केमिकल्स, चाकुर यांच्याकडून मान्यतेनुसार र.रु.16,4000/- प्रति मे.टन व र.रु.31,16,000/- किंमतीची निविदा मान्यतेस्तव व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1012/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता ब्लिचींग पावडर ग्रेड-1 चा पुरवठा करण्यासाठी श्री.नागनाथ महाराज केमिकल्स, चाकुर यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 25.45% कमी दराची तसेच र.रु.16,400/- प्रति मे.टन दराची व र.रु.31,16,000/- किंमतीची निविदा मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1013/2023:-** **(मालमत्ता विभाग)** **(दि.13.10.2023)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, एन-9, सिडको येथील बळीराम पाटील शाळेच्या पाठीमागील बाजुस असलेली छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची शालेय इमारत भाडेतत्वावर देण्यासाठी यापुर्वीचा मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1284 दि.07.01.2020 रोजीच्या ठरावानुसार संस्थेच्या मागणी प्रमाणे सिध्द शिघ्र गणका प्रमाणे भाडे आकारणी नुसार एकुण क्षेत्रफळ 696.76 चौ.मी. क्षेत्रासाठी प्रतीमाह भाडे र.रु.66,192/-प्रमाणे वार्षिक भाडे र.रु.7,94,301/- त्यावर 18% जी.एस.टी.र.रु.1,42,974-/ असे एकत्रित वार्षिक भाडे

र.रु.9,37,275-/ आकारणी दर 03 वर्षांनी मुळ भाडे रक्कमेत 10% भाडेवाढ करुन 29 वर्षांच्या कालावधी साठी करारनामा करण्यात आलेला आहे.

तथापि, संस्थेने Right To Education या नियमाप्रमाणे शाळेच्या बांधकामासाठी वाढीव जागेची आवश्यकता असलयाने वाढीव जागा देणेसाठी विनंती केलेली आहे. पुर्वीच्या भाडेपट्टा करारनामा क्र.अगग 3-5322/2022 दि.04.08.2022 रोजीच्या करारनामान्वये देण्यात आलेल्या जागेच्या संस्थेने पुर्वीच्या करारनामामधील क्षेत्र फळ दुरुस्ती करुन सिध्द शिघ्रगणका प्रमाणे भाडे आकारणी नुसार एकुण क्षेत्रफळ 1950 चौ.मी. X र.रु.18,500/-=र.रु.3,60,75,000/- चे 6% र.रु.21,64,500/12 =र.रु.1,80,375/- त्यावर 18% जी.एस.टी.र.रु.32,468/- असे एकत्रित 18% जी.एस.टी.सह प्रतीमाह भाडे र.रु.2,12,843/- नुसार वार्षिक भाडे र.रु.25,54,116/- एवढी आकारणी करुन तसेच दर तीन वर्षांनी 10% भाडेवाढ करणे. या प्रमाणे शाळे करीता बांधकामासाठी जागा देणे व मैदानाचा वापर संयुक्त राहील आणि शाळेच्या वेळे व्यतिरिक्त मैदान महानगरपालिकेच्या वापरासाठी राहील या अटीस अधीन राहून जागा भाउेतत्वावर देणेसाठीचा यापुर्वीच्या करारनामामध्ये क्षेत्र फळ व त्यानुसार होणारे भाडेवाढ व मैदानाच्या संयुक्त वापरा बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 1013/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-9, सिडको येथील बळीराम पाटील शाळेच्या पाठीमागील बाजुस असलेली छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची शालेय इमारत भाडेतत्वावर देण्यासाठी यापुर्वीचा मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1284 दि.07.01.2020 रोजीच्या ठरावानुसार संस्थेच्या मागणी प्रमाणे सिध्द शिघ्र गणका प्रमाणे भाडे आकारणी नुसार एकुण क्षेत्रफळ 696.76 चौ.मी. क्षेत्रासाठी प्रतीमाह भाडे र.रु.66,192/-प्रमाणे वार्षिक भाडे र.रु.7,94,301/- त्यावर 18% जी.एस.टी. र.रु.1,42,974-/ असे एकत्रित वार्षिक भाडे र.रु.9,37,275-/ आकारणी दर 03 वर्षांनी मुळ भाडे रक्कमेत 10% भाडेवाढ करुन 29 वर्षांच्या कालावधीसाठी करारनामा करण्यात आलेला आहे.

तथापि, संस्थेने Right To Education या नियमाप्रमाणे शाळेच्या बांधकामासाठी वाढीव जागेची आवश्यकता असल्याने वाढीव जागा देणेसाठी विनंती केलेली आहे. पुर्वीच्या भाडेपट्टा करारनामा क्र.अगग3-5322/2022 दि.04.08.2022 रोजीच्या करारनामान्वये देण्यात आलेल्या जागेच्या संस्थेने पुर्वीच्या करारनामामधील क्षेत्र फळ दुरुस्ती करुन सिध्द शिघ्र गणका प्रमाणे भाडे आकारणी नुसार एकुण क्षेत्रफळ 1950 चौ.मी. X र.रु.18,500/-=र.रु.3,60,75,000/- चे 6% र.रु.21,64,500/-/12= र.रु.1,80,375/- त्यावर 18% जी.एस.टी.र.रु.32,468/- असे एकत्रित 18% जी.एस.टी.सह प्रतीमाह भाडे र.रु.2,12,843/- नुसार वार्षिक भाडे र.रु.25,54,116/- एवढी आकारणी करुन तसेच दर तीन वर्षांनी 10% भाडेवाढ करणे. या प्रमाणे शाळे करीता बांधकामासाठी जागा देणे व मैदानाचा वापर संयुक्त राहील आणि शाळेच्या वेळे व्यतिरिक्त मैदान महानगरपालिकेच्या वापरासाठी राहील या अटीस अधीन राहून जागा भाउेतत्वावर देणेसाठीचा यापुर्वीच्या करारनामामध्ये क्षेत्र फळ व त्यानुसार होणारे भाडेवाढ व मैदानाच्या संयुक्त वापरा बाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1014/2023:-</u> (घनकचरा व्यवस्थापन विभाग)** **(दि.16.10.2023)**

**संदर्भ:-**

1. केंद्र शासनाची अधिसुचना क्र.एस.ओ.1357(इ) दि.08.04.2016 अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम-2016.
2. शासन निर्णय क्र.स्वमअ-2017/प्र.क्र.256 (1) नवि-34, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दि.07 सप्टेंबर 2018.
3. मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.566 दि.11.07.2018.
4. मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.323/2022 दि.16.03.2022.
5. जा.क्र.मनपा/घकव्यवि/432/2023 दि.07.09.2023.
6. जा.क्र.मनपा/घकव्यवि/488/2023 दि.06.10.2023.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र.एस.ओ.1357 (इ) दि.08.04.2016 अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम लागू केले आहेत. या नियमांची अंमलबजावणी शहरामध्ये प्रभावीपणे सुरु आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम-2016 च्या तरतुदीचे अनुपालन करणाऱ्या व्यक्ती/संस्थांना दंड करण्याचे (Spot Fine) अधिकार महानगरपालिकेस शासन निर्णय क्र.स्वमअ-2017/प्र.क्र.256 (1) नवि-34, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दि.07 सप्टेंबर 2018 अन्वये प्रदान करण्यात आले आहेत. त्यास मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.566 दि.11.07.2018 अन्वये मंजुरी प्रदान केली असून मनपा कार्यक्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम-2016 च्या तरतुदींचे पालन न करणाऱ्या व्यक्ती/व्यावसायीक/संस्थांकडून माहे ऑक्टोंबर-2018 पासून खालील प्रमाणे दंडनीय रक्कम वसुल करण्यात येत आहे.

**(दंडाचे जोडपत्र)**

| अ.क्र. | दंडाचा तपशील | दंडाची रक्कम |
|---|---|---|
| 1. | नागरीकांनी रस्ते/मार्गावर घाण करणे/रस्त्यावर कचरा टाकणे. | 150/- |
| 2. | छोटे हॉटेल/दुकाने/संस्था यांनी रस्त्यावर कचरा टाकणे घाण करणे | 500/- |
| 3. | Bulk Garbage Generators यांनी रस्त्यावर कचरा टाकणे/घाण करणे | 5000/- |
| 4. | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे. | 100/- |
| 5. | उघड्यावर लघवी/लघुशंका करणे. | 100/- |
| 6. | उघड्यावर शौच करणे | 500/- |

वरील प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन नियम-2016 च्या तरतुदींचे पालन न करणाऱ्या 19373 व्यक्ती/व्यावसायीक/संस्थांकडून माहे 09 ऑक्टोंबर 2018 ते 22 फेब्रुवारी 2022 पर्यंत र.रु.77,19,550/- एवढा द्रव्यदंड वसुल करण्यात आला आहे.

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे दंडाची आकारणी करुन सुध्दा शहरातील व्यक्ती/व्यावसायीक/संस्थांकडून शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन होत नसल्याचे दिसुन आले असून तत्कालीन मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांनी या दंडाच्या रक्कमेत वाढ करणे बाबत आदेशीत केले आहे. त्याअनुषंगाने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.323/2022 दि.16.03.2022 नुसार दंडाच्या रक्कमे मध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

**(वाढीव दंडाचे जोडपत्र)**

| अ.क्र. | दंडाचा तपशील | दंडाची रक्कम |
|---|---|---|
| 1. | नागरीकांनी रस्ते/मार्गावर घाण करणे/रस्त्यावर कचरा टाकणे. | 500/- |
| 2. | छोटे हॉटेल/दुकाने/संस्था यांनी रस्त्यावर कचरा टाकणे घाण करणे | 1000/- |
| 3. | Bulk Garbage Generators यांनी रस्त्यावर कचरा टाकणे/घाण करणे | 10,000/- |
| 4. | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे. | 500/- |
| 5. | उघड्यावर लघवी/लघुशंका करणे. | 100/- |
| 6. | उघड्यावर शौच करणे | 2000/- |

तथापि, मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांनी उपरोक्त प्रमाणे दंडाच्या रक्कमेमध्ये पुन्हा वाढ करणे व घनकचरा व्यवस्थापनातील इतर बाबींवर दंड आकारणे बाबत आदेशीत केले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे घनकचरा व्यवस्थापनातील नवीन इतर बाबींचा समावेश करुन दंड आकारणे व दंडात वाढ करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | दंडाचा तपशील | दंडाची रक्कम | सुधारीत दंडाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | नागरीकांनी रस्ते/मार्गावर घाण करणे/रस्त्यावर कचरा टाकणे. | 500/- | 1000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 2. | छोटे हॉटेल/दुकाने/संस्था यांनी रस्त्यावर कचरा टाकणे घाण करणे | 1000/- | 2000/- |
| 3. | Bulk Garbage Generators यांनी रस्त्यावर कचरा टाकणे/घाण करणे | 10,000/- | 20,000/- |
| 4. | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे. | 500/- | 500/- |
| 5. | उघड्यावर लघवी/लघुशंका करणे. | 1000/- | 1000/- |
| 6. | उघड्यावर शौच करणे | 2000/- | 2000/- |
| 7. | कचरा वर्गीकरण न करणे (नागरीक) | 0 | 500/- |
| 8. | कचरा वर्गीकरण न करणे (संस्था/हॉटेल/दुकाने/आस्थापना/ कार्यालय) | 0 | 2000/- |
| 9. | BWG/RWA कचरा वर्गीकरण न करणे | 0 | 10,000/- |
| 10. | अ) वैद्यकीय हानिकारक कचरा घंटागाडीमध्ये टाकणे | 0 | 10,000/- |
| | ब) वैद्यकीय हानिकारक कचरा घंटागाडीमध्ये टाकण्याची पुनरावृत्ती करणे. | 0 | Seal करणे |
| 11. | हातगाड्या/Haowkeres यांच्या द्वारे उघड्यावर कचरा टाकणे | 0 | 500/- |
| 12. | अ) C&D Waste उघड्यावर ठेवणे | 0 | 2000/- प्रतिदिन |
| | ब) C&D Waste उघड्यावर तिसऱ्या दिवसांपर्यंत ठेवणे | 0 | दंड आकारुन साहित्य जप्ती |

उपरोक्त प्रमाणे दंडाच्या रक्कमेत वाढ करुन तसेच घनकचरा व्यवस्थापनातील नवीन इतर बाबींचा समावेश करुन दंडआकारणे त्या नुसार कार्यवाही करणे योग्य होईल. तत्पुर्वी दंडाच्या रक्कमेत वाढ करणे व घनकचरा व्यवस्थापनातील इतर बाबींवर दंड आकारणे बाबत संदर्भ क्र.05 नुसार नागरीकांच्या हरकती/आक्षेप/सुचना मागविण्यात आल्या होत्या.

त्यानुषंगाने सुधाकर यादवरराव धस, रा.एफ-1/97, गुरु सहानीनगर, एन-4, सिडको छत्रपती संभाजीनगर यांनी दि.11.09.2023 संदर्भीय पत्रान्वये लेखी आक्षेप नोंदविला होता. दि.21.09.2023 रोजी आक्षेप अर्जावर पार पडलेल्या सुनावणी नुसार श्री.सुधाकर धस यांचा आक्षेप अर्ज फेटाळण्यात येत आहे.

सुधारीत दंडाच्या रक्कमेत वाढ करुन तसेच घनकचरा व्यवस्थापनातील नवीन इतर बाबींचा समावेश करुन दंड आकारणे त्यानुसार कार्यवाही करणे योग्य होईल.

करीता, उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1014/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वरील सर्व बाबींना मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1015/2023:-</u> (शिक्षण विभाग)** **(दि.16.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.विजय लिंबाजी कोल्हे, मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा, बेगमपुरा यांनी त्यांच्या मुलगा चि.वरद विजय कोल्हे याच्या रक्ताचा कर्करोग (Acute Myelobialstic Leukaemia) या आजारपणावर डॉ.एम.बी.अगरवाल, डॉ.खांडेपारकर नर्सिंग होम, मुंबई येथे दि.08.03.2022 ते दि.14.03.2022 या कालावधीत उपचार केला असून त्यासाठी एकुण र.रु.1,22,891/- (अक्षरी एक लक्ष बावीस हजार आठशे एक्क्यान्नव मात्र) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.1,16,907/- असुन सदर रक्कमेच्या 90% र.रु.1,05,216/- आहे. त्यापैकी 5% र.रु.6,144/- (एकुणदाखल केलेले देयके रु.1,22,891/- च्या 5% प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.99,072/- (रुपये नव्व्यान्नव हजार बहात्तर मात्र) देय आहे.

सदरील आजार “रक्ताचा कर्करोग” या शासनमान्य गंभीर आजारामध्ये येतो. परंतु उपचार केलेले रुग्णालय शासन मान्य असलेल्या रुग्णालयांच्या यादीत समाविष्ठ नाही.

त्यामुळे संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून र.रु.1,00,000/- मंजुर करण्यात येऊन 5% र.रु.5,000/- मनपा फंडात जमा करुन उर्वरित देय र.रु.95,000/- अदा करण्यास आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

शासन निर्णयामधील प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकारा बाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम-1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून र.रु.1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहे. तसेच र.रु.1,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मंजुरीचे अधिकार आयुक्त यांना असून र.रु.2,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करीता, श्री.विजय लिंबाजी कोल्हे, मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा, बेगमपुरा यांना शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून प्रत्यक्ष देय र.रु.95,000/- (रुपये पंच्च्यान्नव हजार रुपये मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1015/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.विजय लिंबाजी कोल्हे, मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा, बेगमपुरा यांनी स्वत:च्या मुलाच्या आजारपणावर डॉ.एम.बी.अगरवाल, डॉ.खांडेपारकर नर्सिंग होम, मुंबई येथे उपचार केला असून संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून निव्वळ र.रु.95,000/- (रुपये पंच्च्यान्नव हजार रुपये मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1016/2023:-** **(शिक्षण विभाग)** **(दि.16.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती शिल्पा भगवानराव दंडे, सहशिक्षिका, प्रा.शा. भावसिंगपुरा, कें.प्रा.शा.बेगमपुरा यांनी त्यांच्या वडिलांच्या कोव्हिड-19 या आजारपणावर एशियन सुपर स्पेशालिटी सिटीकेअर हॉस्पिटल येथे द.29.04.2021 ते दि.13.05.2021 या दरम्यान उपचार केला असुन त्यासाठी र.रु.4,70,514/- (अक्षरी रुपये चार लक्ष सत्तर हजार पाचशे चौदा मात्र) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.4,16,719/- असुन सदर रक्कमेच्या 90% र.रु.3,75,047/- आहे. त्यापैकी 5% र.रु.23,529/- (एकुण दाखल केलेले देयके र.रु.4,70,594/- च्या 5%प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.3,51,518/- (तीन लक्ष एक्कावन्न हजार पाचशे अठरा मात्र) देय आहे.

सदरील आजार (Covid-19) Mild to Moderate Illiness या शासनमान्य आजारांमध्ये येत असून संबंधीतांनी उपचार केलेले रुगणालय शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुगणालयांच्या अद्यावत यादी मधील प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरील रुगणालयाचे नाव समाविष्ठ नाही.

तथापि, औरंगाबाद मनपाच्या मा.सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.65/2020 दि.10.12.2020 च्या ठरावातील नमुद मुद्दा क्र.02 नुसार सदरील आजारास वैद्यकीय परतावा देता येतो. तसेच सदरील रुग्णालय DCH या प्रकारच्या Facility मध्ये मान्यता प्राप्त यादीत नमुद आहे.तसेच सदर प्रस्तावाची पडताळणी करुनवैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

शासन निर्णयामधील प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमालमर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम-1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रु.1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहे. तसेच रु.1,00,000/- ते रु.2,00,000/- पर्यंतचे वैद्यकीय देयक रक्कमेस मंजुरीचे अधिकार आयुक्त यांना असून र.रु.2,00,000/- पेक्षा जास्त देयक रक्कमेस मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करीता, श्रीमती शिल्पा भगवानराव दंडे, सहशिक्षिका, प्रा.शा.भावसिंगपुरा, कें.प्रा.शा.बेगमपुरा यांनी त्यांच्या वडिलांच्या कोव्हीड-19 या आजारावर उपचार केला असून शासन निर्णय आणि

मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.65/2020 दि.10.12.2020 च्या ठरावातील तरतुदींच्या अधिन राहून प्रत्यक्ष देय र.रु.3,51,518/- (तीन लक्ष एक्कावन्न हजार पाचशे अठरा मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1016/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती शिल्पा भगवानराव दंडे, सहशिक्षिका, प्रा.शा.भावसिंगपुरा, कें.प्रा.शा.बेगमपुरा यांनी त्यांच्या वडिलांच्या कोव्हीड-19 या आजारावर एशियन सुपर स्पेशालिटी सिटीकेअर हॉस्पिटल येथे उपचार केला असून संबंधीतास शासन निर्णय आणि मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.65/2020 दि.10.12.2020 च्या ठरावाच्या तरतुदींच्या अधिन राहून रक्कम वजा जाता प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली निव्वळ र.रु.3,51,518/- (तीन लक्ष एक्कावन्न हजार पाचशे अठरा मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1017/2023:-</u> (कर निर्धारक व संकलक विभाग) (दि.16.10.2023)**

आयुक्त, महानगरपालिका प्रस्ताव सादर करीता आहेत की, प्रशासकीय ठराव क्र.915/2023 दि.25.08.2023 अन्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि औरंगाबाद स्मार्टसिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड यांनी महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्तांना “QR Code” आधारित UDAN उडान (Unique Digital Address Number) योजना अंमलबजावणी साठी धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता.

सदरील केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी डिजीटल इंडिया प्रकल्पा अंतर्गत महानगरपलिका क्षेत्रातील नागरीकांना विविध सोईसुविधा देणे जसे की, विविध परवानग्या, अग्निशमन सेवा, ॲब्ल्युन्स सेवा, मालमत्ता कर, पाणी पुरवठा, कचरा संकलन, ड्रेनेज, दिव्यांग प्रमाणपत्र इ.करीता महानगरपालिकेस वेळोवेळी नागरीकांच्या घरापर्यंत सोईसुविधा पुरवाव्या लागतात. या व्यतिरिक्त नागरीकांनामहानगरपालिकेशी संलग्न नसलेल्या परंतु आवश्यक असणाऱ्या घरपोच सेवांसाठी डिजीटल प्लॅटफॉर्म तयार करणे विचाराधीन होते. ज्या आधारे शहरातील नागरीकांना कोणतीही सेवा डिजीटल पत्त्याच्या आधारे त्वरीत प्राप्त होऊ शकते.

या संदर्भात दि.12.09.2023 रोजीच्या मान्यतेनुसार सदरील योजना राबविण्यासाठी अनुभवी संस्थांकडून EOI मागविण्यात आले होते. यात 1. IndusInd Bank, 2. Vandhai Info Pvt.Ltd. 3. Sarr IT Resources Pvt.Ltd. यांनी भाग घेतला होता. सदरील संस्थांकडून दि03.10.2023 रोजी स्मार्ट सिटी कार्यालय येथे Presentation दाखविण्यात आले त्यामध्ये

1. Vandhai Pvt.Ltd. या कंपनीने ग्राम पंचायत येथे सर्वेचे काम केलेले आहे. आणि अंदाजे 7000 फक्त मालमत्तांचे सर्वेक्षण केलेले असून सदरील कंपनीला मिळकतींवर नंबरप्लेट बसविण्याचे काम करण्याचा अनुभव नाही.
2. Sarr IT Resources Pvt.Ltd.यांनीही मालमत्तांचे सर्वेक्षणाचे काम केलेले आहे परंतु नंबरप्लेट बसविण्याचे कामाचा अनुभव नाही.
3. IndusInd Bank यांनी रायपुर महानगरपालिका येथे 2,50,000 मालमत्तांवर नंबरप्लेट बसविण्याचे काम केलेले आहे आणि सदर कामाचा अनुभव आहे. महत्वाचे म्हणजे बँकेमार्फत ही सेवा राबवितांना नागरीकांकडून अथवा महानगरपालिकेकडून कुठलेही शुल्क आकारणार नाही असे त्यांनी नमुद केले आहे.

सादर करण्यात आलेले Presentation आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव तपासल्यानंतर या कामी IndusInd Bank चा प्रस्ताव मान्य करण्याची सर्वानुमते शिफारस करण्यात आली.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेस अथवा नागरीकांना कोणताही आर्थिक भार पडणार नाही. प्रत्यक्षात संगणकीय एकत्रिकरणाच्या आधारे महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक मिळकती वर तात्काळ सोईसुविधा पुरविण्याकरीता तंत्रज्ञानाचा वापर करुन डिजीटल इंडियाचे स्वप्न साकार करण्याकरीता हा प्रकल्प मोलाचा ठरेल. तसेच या डिजीटल यंत्रणेमुळे इतर शासकीय कार्यालय जसे,जी.एस.टी.पासपोर्ट ऑफीस, महावितरण, शॉप ॲक्ट लायसन्स, रेशनकार्ड इ.कार्यालयांना

त्यांच्याकडे नोंदणीसाठी प्राप्त अर्जदारांचे पत्ते प्रमाणित करुन घेण्याचीसुविधा उपलब्ध करुन देता येईल.

या करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, औरंगाबाद स्मार्टसिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड आणि योजनेचे काम करणारी संस्था IndusInd Bank यांच्यामध्ये त्रिपक्षीय सामंजस्य करार करुन शहरातील मालमत्तांचे Digitization "QR Code" आधारित UDAN उडान (Unique Digital Address Number) योजना अंमलबजावणी साठी IndusInd Bank यांची नेमणुक करण्याचा प्रस्ताव सादर करीत आहे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1017/2023:-</u>**

प्रस्तावात नमुद करण्यात आल्यानुसार या करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका औरंगाबाद स्मार्टसिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड आणि योजनेचे काम करणारी संस्था IndusInd Bank यांच्यामध्ये त्रिपक्षीय सामंजस्य करार करुन शहरातील मालमत्तांचे Digitization "QR Code" UDAN उडान (Unique Digital Address Number) योजना अंमलबजावणीसाठी IndusInd Bank यांची नेमणुक करण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1018/2023:-</u> (आस्थापाना-1 विभाग)** **(दि.17.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, "जलनि:स्सारण विभागाअंतर्गत सातारा देवळाई व महानगरपालिकेच्या हद्दीतील Uncovered Area मध्ये जलनि:स्सारण वाहिन्या टाकण्याचे कामांसाठी DPR तयार करणे" या विवक्षित कामाकरीता उपअभियंता (स्थापत्य)(जलनि:स्सारण) 1 पदासाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन पात्रता अनुभवानुसार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याकरीता दि.10.03.2023 रोजी मुलाखत घेण्यात आली होती.

त्यानुषंगाने मुलाखतीमध्ये उपअभियंता (स्थापत्य)(जलनि:स्सारण) या पदासाठी पात्र झालेले श्री.अफसर सिद्दीकी यांना उक्त विवक्षित कामासाठी प्रथमत: सहा महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने जाहिरातीत नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नेमणुक देण्यास मा.स्थायी समीचा ठराव क्र.743 दि.17.03.2023 अन्वये शिफारस केली होती. त्यानुसार संबंधीतास आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/429 दि.27.03.2023 नुसार प्रथमत: सहा महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तथापि, सदर आदेशाची मुदत दि.26.09.2023 रोजी संपल्याने शहर अभियंता यांनी संबंधीतास सेवा पुढील सहा महिन्यासाठी आवश्यक असल्याने मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला आहे.

करीता "जलनि:स्सारण विभागाअंतर्गत सातारा देवळाई व महानगरपालिकेच्या हद्दीतील Uncovered Area मध्ये जलनि:स्सारण वाहिन्या टाकण्याचे कामांसाठी DPR तयार करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.अफसर सिद्दीकी, उपअभियंता (सेवानिवृत्त) यांचीसेवा करार पध्दतीने दि10.03.2023 रोजीच्या जाहिरातीमध्ये व कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/429 दि.27.03.2023 मध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून तसेच 02 दिवसांचा तांत्रिक खंडदेऊन (सुट्टीचे वगळून) दि.03.10.2023 पासून 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1018/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "जलनि:स्सारण विभागाअंतर्गत सातारा देवळाई व महानगरपालिकेच्या हद्दीतील Uncovered Area मध्ये जलनि:स्सारण वाहिन्या टाकण्याचे कामांसाठी DPR तयार करणे" या विवक्षित कामाकरीताश्री.अफसर सिद्दीकी, उपअभियंता (सेवानिवृत्त) यांचीसेवा करार पध्दतीने दि10.03.2023 रोजीच्या जाहिरातीमध्ये व कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/429 दि.27.03.2023 मध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून तसेच 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन (सुट्टीचे वगळून) दि.03.10.2023 पासून 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1019/2023:-</u>** **(आस्थापाना-1 विभाग)** **(दि.17.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची अग्निशमन सेवा अधिक प्रभावीपणे राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने आवश्यक कामे करणे" या विवक्षित कामाकरीता मुख्य अग्निशमन अधिकारी पदासाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन पात्रता अनुभवानुसार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करारपध्दतीने घेण्याकरीता दि10.03.2023 रोजी मुलाखात घेण्यात आली होती.

त्यानुषंगाने मुलाखतीलमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी या पदासाठी पात्र झालेले श्री.शिवाजी बाबुराव झनझन यांना उक्त विवक्षित कामासाठी प्रथमत: सहा महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने जाहिरातीत नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नेमणुक देण्यास मा.स्थायी समितीचा ठराव क्र.743 दि.27.03.2023 अन्वये शिफारस केली होती. त्यानुसार संबंधीतास आदेश जा.क्र.मनपा/ आस्था-1/2023/430 दि.27.03.2023 नुसार प्रथमत: सहा महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तथापि, सदर आदेशाची मुदत दि.26.09.2023 रोजी संपल्याने अग्निशमन सेवा अधिक प्रभावीपणे राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने आवश्यक कामाची निकड लक्षात घेता, पुढील सहा महिन्यासाठी मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

करीता, "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची अग्निशमन सेवा अधिक प्रभावीपणे राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने आवश्यक कामे करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.शिवाजी बाबुराव झनझन, मुख्य अग्निशमन अधिकारी (सेवानिवृत्त) यांची सेवा करार पध्दतीनदि.10.03.2023 रोजीच्या जाहिरातीमध्ये व कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/ 430 दि.27.03.2023 मध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून तसेच 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन (सुट्टीचे दिवस वगळून) दि.03.10.2023 पासून 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1019/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची अग्निशमन सेवा अधिक प्रभावीपणे राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने आवश्यक कामे करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.शिवाजी बाबुराव झनझन, मुख्य अग्निशमन अधिकारी (सेवानिवृत्त) यांची सेवा करार पध्दतीने दि.10.03.2023 रोजीच्या जाहिरातीमध्ये व कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/ आस्था-1/2023/429 दि.27.03.2023 मध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून तसेच 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन (सुट्टीचे दिवस वगळून) दि.03.10.2023 पासून 06 महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1020/2023:-</u>** **(उद्यान विभाग)** **(दि.17.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, उद्यान विभागाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रात एकुण 107 लहान मोठी उद्याने आहेत. या मध्ये पाच हेक्टर क्षेत्रफळ मर्यादित नऊ उद्याने असून उर्वरित 98 उद्याने एक हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रफळाची आहेत. तसेच उद्यान विभागांतर्गत शहरातील रस्ता दुभाजके, हरितपट्टे, पाथवे, मोकळ्या जागा,वाहतुक बेटे इ.ठिकाण ची वृक्ष लागवड, संगोपन व अनुषंगीक कार्यभार विचारात घेता आवश्यक मनुष्यबळ, साधन-सामुग्री, मशिनरी/अवजारे आणि आर्थिक तरतुद कमी पडत असल्याने सर्वच ठिकाणी योग्य न्याय देणे शक्य होत नाही. करीता शहरातील एक हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रफळ असलेली उद्याने, रस्ता दुभाजके, चौक व खुल्या जागा पाच वर्षाच्या कालावधीसाठी देखभाल, संगोपन व विकास करणे करीता कंपनी/ उद्योगपती/व्यावसायीक/ सामाजिक संस्था/सेवाभावी संस्था/शिक्षण संस्था/व्यापारी संघटना/बँक इत्यादींना "आपले शहर-आपले उद्यान योजने" अंतर्गत दत्तक देण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

"आपले शहर-आपले उद्यान" योजने अंतर्गत प्राप्त प्रस्ताव/अर्जाची छाननी करणे, इच्छुक प्रायोजकांचे उद्यान/खुल्या जागे विषयीचे नियोजन/संकल्पन इत्यादींवर निर्णय घेणे/सुचना करणे, एकापेक्षा जास्त प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्रायोजकाचे नियोजन/संकल्पन तपासून योग्य प्रस्तावाची निवड

करणे, प्रायोजकासमवेत करावयाच्या द्विपक्षीय सामंजस्य कराराच्या अटी/शर्ती अंतिम करणे व अनुषंगीक निर्णय घेणेसाठी “छाननी समिती” गठीत करण्यात येईल.तसेच दत्तक दिलेले उद्यान/खुल्या जागेतील प्रायोजकांच्या कामगिरीचे मुल्यमापन करणे, कामाचा दर्जा तपासणे आणि त्याची निरिक्षणे इ.करीता “देखरेख समिती” स्थापन करण्यात येईल.

करीता, शहरातील एक हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रफळ असलेली उद्याने, रस्ता दुभाजके, चौक व खुल्या जागा व खुल्या जागा विकास, देखभाल व संगोपन कामी “आपले शहर-आपले उद्यान” योजने अंतर्गत कंपनी/उद्योगपती/व्यायसायीक/सामाजिक संस्था/सेवाभावी संस्था/शिक्षण संस्था व्यापारी संघटना/बँक इत्यादींना पाच वर्षाच्या कालावधीसाठी दत्तक देणे, सदर योजना राबविण्यासाठी अनुषंगीक सर्व निर्णय घेणे कामी छाननी समती आणि प्रायोजकाच्या कामकाजाची निगराणी ठेवणेसाठी देखरेख समिती स्थापन करुन सदर योजना राबविण्यासाठी अनुषंगीक सर्व निर्णय घेण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना प्राधिकृत करण्याच्या मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1020/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील एक हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रफळ असलेली उद्याने, रस्ता,दुभाजके,चौक व खुल्या जागा, व खुल्या जागा विकास, देखभाल व संगोपन कामी आपले शहर आपले उद्यान योजनेअंतर्गत कंपनी/उद्योगपती/व्यावसायीक/सामाजिक संस्था/सेवाभावी संस्था/शिक्षण संस्था व्यापारी संघटना/बँक इत्यादींना पाच वर्षाच्या कालावधीसाठी दत्तक देण्यास मान्यता देण्यात येते. तसेच सदर योजना राबविण्यासाठी अनुषंगीक सर्व निर्णय घेणे कामी छाननी समिती आणि प्रायोजकांच्या कामकाजाची निगराणी ठेवण्यासाठी देखरेख समिती स्थापन करुन सदर योजने अंतर्गत सर्व निर्णय घेण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1021/2023:-</u>** **(आरोग्य विभाग)** **(दि.18.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.शैलेश धनराज लोहाडे, औषध निर्माण अधिकारी, आरोग्यकेंद्र चिकलठाणा मनपा छत्रपतीसंभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या पत्नीच्या नामे सौ.शिला शैलेश लोहाडे यांच्या Ca Cervix Histopathologic या आजारावर उपचारासाठी खाजगी रुग्णालय टाटा मेमोरियल हॉस्पीटल, मुंबई येथे उपचार केलेला असुन र.रु.2,54,877/- (दोन लाख चोपन्न हजार आठशे सत्त्याहत्तर रुपये फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहिती सह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन Ca Cervix Histopathologic या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.2,54,877/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.15,732/- वजा जाता र.रु.2,39,145/- शिल्लक राहते व शिल्लक रक्कमेच्या 90% र.रु.2,15,230/- इतकी असुन 5% र.रु.12,743/- इतकी आहे. एकुण निव्वळ र.रु.2,02,487/- इतकी संबंधीतास द्यावयाचे आहे.

संबंधीताने टाटा मेमोरियल हॉस्पीटल, मुंबई येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकवि-2, मंत्रालय मुंबई-32 दि.16.11.2011 नुसार परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालय प्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयते साठी शासन मान्यता दिलेली आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.शैलेश धनराज लोहाडे, औषध निर्माण अधिकारी, आरोग्यकेंद्र चिकलठाणा मनपा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.2,02,487/- संबंधीतास द्यावयाच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 1021/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.शैलेश धनराज लोहाडे, औषध निर्माण अधिकारी, आरोग्यकेंद्र चिकलठाणा मनपा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या पत्नीच्या नामे सौ.शिला शैलेश

लोहाडे यांच्या Ca Cervix Histopathologic या आजारावर उपचारासाठी खाजगी रुग्णालय टाटा मेमोरियल हॉस्पीटल, मुंबई येथे उपचार घेतलेला आहे. एकुण केलेला खर्च र.रु.2,54,877/- इतका झाला असुन 90% र.रु.2,15,230/- इतकी आहे. एकुण खर्चाच्या 5% र.रु.12,743/- ही मनपा फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ र.रु.2,02,487/- इतकी आहे.करीता संबंधीतास अदा करावयाच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1022/2023:-</u>** **(आरोग्य विभाग)** **(दि.18.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.पारस हरकचंद मंडलेचा, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या आईच्या नामे श्रीमती कवरबाई हरकचंद मंडलेचा Acute Coronary Syndrome with Acclerated Hypertension with Cardiac Failure with Non Stemi MI with DM IHD with severe LV Dysfuction with right fracture femur या आजारावर युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असुन र.रु.7,75,452/-/ (सात लाख पंच्च्याहत्तर हजार चारशे बावन्न रुपये फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून Acute Coronary Syndrome with Acclerated Hypertension with Cardiac Failure with Non Stemi MI with DM IHD with severe LV Dysfuction with right fracture femur या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.7,75,452/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.1,127/- वजा जाता र.रु.7,74,325/- शिल्लक राहते व शिल्लक रक्कमेच्या 90% र.रु.6,96,892/- इतकी असुन 5% र.रु.38,772/- इतकी आहे. एकुण निव्वळ देय र.रु.6,58,120/- इतकी असुन संबंधीतास द्यावयाचे आहे.

संबंधीताने युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतले असून महाराष्ट्र शासन निर्णय क्र.मान्यता-2014/प्र.क्र.292/2014/14/राकावि-2 मंत्रालय, मुंबई दि.19 एप्रिल 2018 अन्वये विहित केलेल्या नियमानुसार युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर या खाजगी रुग्णालयास राज्य शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांना हृदय शस्त्रक्रिया, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया, ॲन्जिओग्राफी, ॲन्जिओप्लास्टी व कर्करोग या गंभीर आजारा करीता उपचार व शस्त्रक्रिया करण्या करीता व त्या प्रित्यर्थ होणाऱ्या वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती अनुज्ञेय ठरविण्यास शासन निर्णयान्वये मान्यता आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, डॉ.पारस हरकचंद मंडलेचा, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.7,75,452/- संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 1022/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.पारस हरकचंद मंडलेचा, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या आईच्या नामे श्रीमती कवरबाई हरकचंद मंडलेचा यांच्या Acute Coronary Syndrome with Acclerated Hypertension with Cardiac Failure with Non Stemi MI with DM IHD with severe LV Dysfuction with right fracture femur या आजारावर खाजगी रुग्णालय युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेला आहे एकुण केलेला खर्च र.रु.7,75,452/- इतका झाला असुन 90% र.रु.6,96,892/- इतकी येते. एकुण खर्चाच्या 5% र.रु.38,772/- ही मनपा फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ र.रु.6,58,120/- एवढी येते. करीता संबंधीतास अदा करावयाच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1023/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता विभाग पापु)** **(दि.18.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये ज्या भागात जलवाहिन्या नाहीतअशा भागात महानगरपालिकेतर्फे ड्रम पध्दतीने टँकरद्वारे स:शुल्क पाणी पुरवठा करण्यात येतो.

सद्यस्थितीत शहरामध्ये एन-5, एन-7 व कोटला जलकुंभ या तीन टँकर फिलींग पॉईट वरुन टँकर भरण्यात येतात. तसेच सातारा देवळाई भागामध्ये महानगरपालिकेच्या जलवाहिन्या नसल्याने या भागात सुध्दा नक्षत्रवाडी पंपहाऊस येथुन ड्रम पध्दतीने टँकरद्वारे स:शुल्क पाणी पुरवठा करण्यात येतो. महानगरपालिकेच्या मालकीचे टँकर नसल्याने कंत्राटदाराकडून भाडे तत्वावर टँक लावण्यात येतात.

भाडेतत्वावरील टँकरची संख्या नागरीकांच्या मागणीनुसार कमी-जास्त होत असते. शहरासाठी साधारणत: 5000 ली.क्षमतेचे 71 टँकर व 10000 ली.क्षमतेचे 6 टँकर असे एकुण 77 टँकर आणि सातारा देवळाई भागासाठी 5000 ली.क्षमतेचे 4 टँकर, 12000 ली.क्षमतेचे 3 टँकर व 24000 ली.क्षमतेचे 3 टँकर असे एकुण 10 टँकर लागतील असा अंदाज गृहीत धरुन र.रु.6,57,08,925/- खर्चाच्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.464/2022 दि.13.07.2022 अन्वये मान्यता दिलेली आहे.

करीता, शहर व सातारा देवळाई परिसरातील नागरीकांना मागणीनुसार भाडेतत्वावर टँकर लावून ड्रम पध्दतीने स:शुल्क पाणी पुरवठा करण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आली. या कामासाठी पहिल्या वेळेस ई-निविदा मागविली असता तीन निविदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | तपशील |
|---|---|---|
| 1. | मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर | निविदा अटी व शर्तीनुसार पात्र |
| 2. | मे.शेख कन्सट्रक्शन | निविदा अटी व शर्तीनुसार पात्र |
| 3. | श्री.एन.एस.घुमरे | निविदा अटी व शर्तीची पुर्तता होत नसल्याने तांत्रिकदृष्ट्या अपात्र. |

उपरोक्त प्रमाणे तीन पैकी पात्र दोन्ही निविदांचा वाणीज्य लिफाफा (Finacial Bid) उघडल्या असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

**1) मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर, छत्रपती संभाजीनगर (एल-1 निविदा)**

| अ.क्र. | टँकर क्षमता | 1 मे.टन करीता | |
|---|---|---|---|
| | | प्रतिदिन भाडे | प्रति किलोमीटर भाडे |
| 1. | 5000 लीटर | र.रु.243.91/- | र.रु.3.51 |
| 2. | 10000 लीटर व त्यापेक्षा मोठ्या टँकरद्वारे | र.रु.221.21/- | र.रु.2.71 |

**2) मे.शेख कन्सट्रक्शन, छत्रपती संभाजीनगर (एल-2 निविदा)**

| अ.क्र. | टँकर क्षमता | 1 मे.टन करीता | |
|---|---|---|---|
| | | प्रतिदिन भाडे | प्रति किलोमीटर भाडे |
| 1. | 5000 लीटर | र.रु.275/- | र.रु.3.95 |
| 2. | 10000 लीटर व त्यापेक्षा मोठ्या टँकरद्वारे | र.रु.250/- | र.रु.2.99 |

उपरोक्त प्रमाणे मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर यांची निविदा सर्वात कमी आहे. उपरोक्त तक्त्यामधील दरांनुसार तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

- निविदा किंमत :- र.रु.6,57,08,925/-
- एल-1 निविदाधारक मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर यांच्या दरांनी येणारी किंमत :- र.रु.7,74,32,220/-
- शासन निर्णयातील दरांनी येणारी किंमत :- र.रु.8,36,62,650/-
- मा.जिल्हाधिकारी यांच्या निविदेतील मंजुर दरांनी येणारी किंमत :- र.रु.7,89,93,975/-.

तुलनात्मकदृष्ट्या मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदेतील प्राप्त दर हे शासन दर व मा.जिल्हाधिकारी यांचे मंजुर दरापेक्षा कमी आहेत.

संदर्भ:-टेंडर क्र.2023_AMCA_919149_1

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा |
| 2. | कामाचे स्वरुप | छत्रपती संभाजीनगर शहर व सातारा देवळाई परिसरातील विविध भागात भाडे तत्वावरील टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे बाबत. |

| | | |
|---|---|---|
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव | र.रु.6,57,08,925/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.6,57,08,925/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-निविदा विभाग महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.23.06.2023 ते दि.03.08.2023 |
| | आ) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.09.08.2023 |
| | इ) एकुण किती टेंडर्स आली? | पहिली वेळ-तीन निविदा |

(त्यापैकी पात्र दोन टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ क्र | ठेकेदाराचे नाव व पत्ता | निविदा र.रु. | पुवगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त मे.टन करीता | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | टँकर क्षमता | प्रतिदिन भाडे | प्रति किलो मीटर भाडे |
| 1. | मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर | 6,57,08,925/- | 5000 ली. | रु.243.91 | रु.3.51 |
| | | | 10000 लीटर व त्यापेक्षा मोठ्या टँकरद्वारे | रु.221.21/- | रु.2.71 |
| 2. | मे.शेख कन्सट्रक्शन | 6,57,08,925/- | 5000 ली. | रु.275 | रु.3.95 |
| | | | 10000 लीटर व त्यापेक्षा मोठ्या टँकरद्वारे | रु.250/- | रु.2.99 |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | पाणी पुरवठा टँकर |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | लागु नाही |

या कामाच्या निविदा सुचनेअंतर्गत अट क्र.47 Empanelment मध्ये पध्दती संदर्भाने खालील बाबी नमुद केलेल्या आहे.

i. विहित पध्दतीने एल-1 निविदेचे दर अंतिम झाल्यानंतर सदर एल-1 च्या दरामध्ये काम करण्यास तयार असणाऱ्या इतर पात्र सहभागी ठेकेदारांसह जास्तीत जास्त तीन ठेकेदारांचे पॅनल निश्चित करण्यात येईल.
ii. ठेकेदाराचे पॅनल निश्चित करतांना एल-2, एल-3,एल-4 या पध्दतीने प्राधान्यक्रम देण्यात येईल
iii. आवश्यकतेनुसार पॅनलमधील ठेकेदारांना काम विभागून देण्यात येईल.
iv. कोणाला किती काम द्यावे याचे सर्व अधिकार प्रशासक/आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना राहतील.

त्यामुळे या प्रकरणी एल-1 निविदाधारक मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर अंतिम झाल्यानंतर निविदेतील अटी नुसार एल-2 निविदाधारक मे.शेख कन्सट्रक्शन यांना पत्र देऊन ते एल-1 निविदा धारकांच्या दरांनुसार काम करण्यात तयार आहेत किंवा कसे या बाबत लेखी सहमती घेऊन दोन्ही निविदा धारकांचे पॅनल निश्चित करण्यात येईल व अट क्र.47 नुसार कार्यवाही करण्यात येईल.

करीता मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर यांचे एल-1 निविदेतील दराने पॅनल निश्चिती करुन काम करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1023/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहर व सातारा देवळाई परिसरामध्ये ड्रम पध्दतीने स:शुल्क पाणी पुरवठा करण्याच्या कामासाठी ई-निविदा मागविण्यात आली असता, तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी पात्र दोन निविदांपैकी मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर, छत्रपती संभाजीनगर यांच्या (एल-1) निविदेतील दर हे शासन दर व मा.जिल्हाधिकारी यांचे मंजुर दरापेक्षा कमी आहेत.

मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर, छत्रपती संभाजीनगर (एल-1 निविदा)

| अ.क्र. | टँकर क्षमता | 1 मे.टन करीता | |
|---|---|---|---|
| | | प्रतिदिन भाडे | प्रति किलो मी.भाडे |
| 1 | 5000 ली. | र.रु.243.91/- | रु.3.51 |
| 2 | 10000 ली.व त्यापेक्षा मोठ्या टँकरद्वारे | र.रु.221.21/- | रु.2.71 |

तरी, कंत्राटदार मे.राम इन्फ्रास्ट्रक्चर, छत्रपती संभाजीनगर यांचे एल-1 निविदेतील दरास मान्यता देण्यात येते निविदा अटी व शर्तीनुसार (अट क्र.47) एल-1 च्या दराने एल-2 निविदाधारक मे.शेख कन्स्ट्रक्शन यांना पत्र देऊन ते एल-1 निविदाधारकाच्या दरानुसार काम करण्यात तयार आहे किंवा कसे या बाबत लेखी सहमती घेऊन दोन्ही निविदाधारकांचे पॅनल निश्चित करावे व निविदेतील अटीनुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी व करार करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1024/2023:-</u>** **(उद्यान विभाग)** **(दि.19.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-8, सिडको येथील नेहरु उद्यानात भौगोलिक परिस्थिती नुसार पुर्वी कडील भागात तलाव आहे. एन-8 येथील नेहरु उद्यान व स्व.मा.बाळासाहेब ठाकरे बॉटनिकल उद्यान एकत्रच असुन सदर उद्यानाचा सर्वांगीण विकास करण्यात येत आहे. त्याच बरोबर उद्यानाच्या सौंदर्यीकरणात भर टाकणे आणि नागरिक/पर्यटकांना मनोरंजनाचे साधन उपलब्ध करुन देणेसाठी नेहरु उद्यानातील नैसर्गिक तलावाचे स्वखर्चाने खोलीकरण करुन परिसराचे सौंदर्यीकरण करणे, विद्युत विषयक कामे करणे, बोटींग प्रकल्प कार्यान्वीत करुन बोटींग चालविणे आणि पाच वर्षासाठी देखभाल व संचलन खाजगी आस्थापना/एजन्सीधारक यांचे मार्फत करण्यासाठी प्रस्तावीत करण्यात येत आहे.

सदर प्रकल्पा अंतर्गत तलावासाठी स्थापत्य व विद्युत विषयक कामे करणे, तलावास संरक्षित जाळी लावणे, तलावाचे खोलीकरण करणे, बोटींग साठी सुरक्षित प्लेटफॉर्म तयार करणे, नागरीकांना बसण्यासाठी आसन व्यवस्था करणे, टिकीट घर तयार करणे इ.व अनुषंगीक कामांचा समावेश आहे.

उक्त बोटींग प्रकल्पासाठी व्यापक प्रसिध्दी देऊन स्वारस्य अभिव्यक्ती-EOI मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदेमध्ये महानगरपालिकेने बोटींग/टिकीट शुल्क (अ) लहान प्रती मुलांसाठी (3 ते 12 वर्ष वयोगट) रु.25/- आणि (ब) 12 वर्षापेक्षा जास्त प्रती मुले/व्यक्तिंसाठी रु.50/- निर्धारित करुन दैनंदिन उत्पन्नापोटी महानगरपालिकेस द्यावयाची रॉयल्टी रक्कम (%) एजन्सीधारकांकडून मागविली आहे.

कोरी निविदा पुस्तिका विक्री व निविदा स्विकृतीच्या निर्धारीत तारखेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | एजन्सीचे नाव | बोटींग प्रकल्पाचे दैनंदिन प्रवेश/टिकीट उत्पन्नाद्वारे महानगरपालिकेस देय रॉयल्टी रक्कम (%) |
|---|---|---|
| 1. | तुळजाई एन्टरप्राईजेस, खिवंसरा पार्क, उल्कानगरी, छत्रपती संभाजीनगर. | 10% |
| 2. | पितांबरी सर्व्हीसेस, नाथ मंदिर रोड, यात्रा मैदान, पैठण | 13% |

| | | |
|---|---|---|
| 3. | जय बजरंग सर्व्हिसेस, बालाजीनगर, छत्रपती संभाजीनगर. | 16% |

उक्त तीन एजन्सी यांनी सादर केलेल्या निविदेत बोटींग प्रकल्पाचे दैनंदिन उत्पन्नापोटी महानगरपालिकेस देय सर्वात जास्त रॉयल्टी रक्कम जय बजरंग सर्व्हीसेस, बालाजीनगर, छत्रपती संभाजीनगर यांची असून ती दैनंदिन उत्पन्नाच्या 16% आहे.

करीता, एन-8 सिडको येथील महानगरपालिकेच्या नेहरु उद्यानातील नैसर्गिक तलावाचे स्वखर्चाने खोलीकरण करुन परिसराचे सौंदर्यीकरण करणे, विद्युत विषयक कामे करणे, बोटींग प्रकल्प कार्यान्वीत करुन बोटींग चालविणे आणि पाच वर्षासाठी देखभाल व संचलन करणे कामी निविदेच्या अटी/शर्तीस अधिन राहून जय बजरंग सर्व्हिसेस, बालाजीनगर, छत्रपती संभाजीनगर यांच्या नियुक्तीस आणि बोटींग/टिकीट शुल्क उत्पन्नापोटी महानगरपालिकेस देय रॉयल्टी साठी जय बजरंग सर्व्हिसेस यांच्या सर्वात जास्त 16% रॉयल्टी दराचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1024/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-8 सिडको येथील महानगरपालिकेच्या नेहरु उद्यानातील नैसर्गिक तलावाचे स्वखर्चाने खोलीकरण करुन परिसराचे सौंदर्यीकरण करणे, विद्युत विषयक कामे करणे, बोटींग प्रकल्प कार्यान्वीत करुन बोटींग चालविणे आणि पाच वर्षासाठी देखभाल व संचलन करणे कामी निविदेच्या अटी/शर्तीस अधिन राहून जय बजरंग सर्व्हिसेस, बालाजीनगर, छत्रपती संभाजीनगर यांच्या नियुक्तीस तसेच बोटींग/टिकीट शुल्क उत्पन्नापोटी महानगरपालिकेस देय रॉयल्टी साठी जय बजरंग सर्व्हिसेस यांच्या सर्वात जास्त 16% रॉयल्टी दरास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1025/2023:-</u>** **(मुख्य पशुसंवर्धन विभाग)** **(दि.19.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अंतर्गत कार्यन्वीत असलेले पशुसंवर्धन विभागामार्फत मनपा हद्दीतील पाळीव जनावरे व प्राणी उदा.उंट, घोडा, गाढव, गोवर्ग (गाय, बैल, म्हैस, वासरु) वराह व शेळी,मेंढी यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम 127 (2) (क) अंतर्गत पाळीव जनावरे व प्राणी परवाना (1 एप्रिल ते 31 मार्च) वार्षिक कालावधीसाठी पाळीव जनावरे व प्राणी कर लावण्यात येत आहे.

करीता, खालील दर्शविल्याप्रमाणे पाळीव जनावरे व प्राणी परवाना व नुतनीकरण फी प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पाळीव जनावरे व प्राणी परवाना तपशील | प्रस्तावीत दर |
|---|---|---|
| 1. | नवीन परवाना वार्षिक | रु.500/- |
| 2. | नुतनीकरण वार्षिक | रु.250/- 1 एप्रिल ते 31 मे पर्यंत |
| 3. | नुतनीकरण विलंब अतिरिक्त फी | रु.500/- 31 मे नंतर |
| 4. | विना परवाना पाळीव जनावरे व प्राणी पकडून आणल्यास पाळीव जनावरे व प्राणी परवाना घेऊन परत करण्याचे खर्च (परवाना फी अतिरिक्त राहील.) | रु.2000/- |

**<u>ठराव क्रमांक 1025/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीत पाळीव जनावरे व प्राणी उदा.उंट, घोडा, गाढव, गोवर्ग (गाय, बैल, म्हैस, वासरु) वराह व शेळी,मेंढी वरील दर्शविल्या प्रमाणे पाळीव जनावरे व प्राणी परवाना व नुतनीकरण फी आकारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1026/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.20.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बायजीपुरा चौक ॲपेक्स हॉस्पीटल ते देसरडा स्कुल पर्यंत राहीलेला अर्धवट 60 फुट रुंद वि.यो.रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे करीता या कामाचे अंदाजपत्रक र.रु.49,98,600/- तयार केले आहे. या कामाची बी-1 स्वरुपाची र.रु.42,36,115/- ची निविदा प्रसिध्द

केली असता, एकुण आठ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी सर्वात कमी निविदा एल-1 निविदाधारक मे.बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज यांची 21.30% कमी दराची निविदेस मान्यता घेण्यास व करार करण्यास मा.प्रशासक महानगरपालिका औरंगाबाद यांची मान्यता प्राप्त आहे.

संदर्भ:- Tender ID_2023_AMCA_934054_1 सन 2022-23

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | उपअभियंता झोन क्र.7 |
| 2. | कामाचे स्वरुप | बायजीपुरा चौक अॅपेक्स हॉस्पीटल ते देसरडा स्कुल पर्यंत राहीलेला अर्धवट 60 फुट रुंद वि.यो.रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका या कार्यान्वयीन यंत्रणे मार्फत र.रु.49,98,600/- यास ठराव क्र.879/2023 दि.20.07.2023 अन्वये मा.स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली आहे. |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.42,36,115/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | • ई-निविदा व नियमाप्रमाणे वृत्तपत्रा मध्ये प्रसिध्द करण्यात आली. |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.10.08.2023 ते 18.08.2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.21.08.2023 |
| | क) निविदेची कितवी वेळ होती? | पहिली |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 08 (आठ) |

(त्यापैकी पात्र टेंडरधारकाची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर र.रु. | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रुपये | टक्केवारी |
| 1. | मे.बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज | 3698999.61 | 3333823.03 | 21.30% कमी दराने |
| 2. | मे.एफ.के.कन्स्ट्रक्शन | 3698999.61 | 3389316.15 | 19.99% कमी दराने |
| 3. | मे.कासलीवाल कन्स्ट्रक्शन | 3698999.61 | 3428288.41 | 19.07% कमी दराने |
| 4. | मे.सहारा कन्स्ट्रक्शन | 3698999.61 | 3430830.08 | 19.01% कमी दराने |
| 5. | श्री.प्रभाकर मोहिते | 3698999.61 | 3431256.69 | 19.00% कमी दराने |
| 6. | श्री.जागीरदार सबाउद्दीन | 3698999.61 | 3460355.81 | 18.31% कमी दराने |
| 7. | मे.व्ही.बी.ए.इन्फ्रा | 3698999.61 | 3468531.51 | 18.12% कमी दराने |
| 8. | मे.मदिना कन्स्ट्रक्शन | 3698999.61 | 3473614.85 | 18.00% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | -- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | अर्थसंकल्प 2022-23 लेखाशिर्षन शहर विकास निधीतून विविध कामे करणे, अ.क्र.-03 (1) पृष्ठ क्र.-बी-57 तरतुद रु.500.00 लक्ष |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |

| | | |
|---|---|---|
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |
| तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे L1 निविदाधारक मे.बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज, छत्रपती संभाजीनगर यांची बायजीपुरा चौक ॲपेक्स हॉस्पीटल ते देसरडा स्कुल पर्यंत राहीलेला अर्धवट 60 फुट रुंद वि.यो. रस्त्याचे कॉँक्रीटीकरण करणे या कामाची निविदा, मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 21.30% कमी दराची मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर. | | |

**<u>ठराव क्रमांक 1026/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, L1 निविदाधारक मे.बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज, छत्रपती संभाजीनगर यांची बायजीपुरा चौक ॲपेक्स हॉस्पीटल ते देसरडा स्कुल पर्यंत राहीलेला अर्धवट 60 फुट रुंद वि.यो. रस्त्याचे कॉँक्रीटीकरण करणे या कामाची निविदा, मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 21.30% कमी दराची असुन सदर निविदे बाबतचा प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1027/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.20.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.08 अंतर्गत सातारा परिसरात गट क्र.169/पैकी येथे जवळकर शाळेजवळील अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे बाबत या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2021-2022 राज्य दरसुची नुसार रक्कम 12 टक्के जी.एस.टी.सह रु.24,75,225/- चे तयार करुन दि.09.02.2022 अन्वये प्रशासकीय मान्यता झालेली आहे. सदर कामासाठी लागणारा खर्च मंजुर रेखांकनात मुलभूत सुविधा पुरविणे सन 2021-22 मधुन प्रस्तावित आहे. सदर कामाची विहीत पध्दतीने ई-निविदा मागवुन एम.बी.इन्फ्रास्ट्रक्चर यांची अंदाजपत्रक दरापेक्षा 18.50 टक्के कमी दराची निविदा दि.21.11.2022 रोजी मंजुर करण्यात आलेली असून कंत्राटदारास दि07.02.2023 रोजी कायदिया देऊन काम प्रगतीपथावर आहे.

काम करीत असतांना या रेखांकनामधील उर्वरित रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत येथील नागरिकांना मागणी केली आहे. कंत्राटदार वाढीव काम 18.50 टक्के कमी दराने करण्यास तयार असून तसे लेखी सहमती पत्र देऊन कळविली आहे. त्यामुळे रेखांकनातील उर्वरित रस्त्यांची कामे मंजुर निविदेनुसार 18.50 टक्के कमी दराने करता येईल. रेखांकनातील सर्व रस्त्यांची कामे निविदेच्या मंजुर दराने (म्हणजेच 18.50 टक्के कमी दराने) करावयाची झाल्यास 18 टक्के जी.एस.टी.गृहीत धरुन रु.32,96,500/- एवढा खर्च अपेक्षित आहे. या कामाचे सुधारीत अंदाज पत्रक निविदा 18.50 टक्के कमी दराने असल्याने ती रक्कम वजा जाता रु.32,96,500/- चे तयार करण्यात आले आहे. वाढीव कामासह या कामासाठी एकुण रु.32,96,500/- पर्यंत प्रत्यक्ष खर्च होणार आहे.

करीता, वाढीव कामे Quantity Variation सह कामांचे कंत्राटदार एम.बी.इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याकडून निविदेच्या मंजुर दराने म्हणजेच अंदाजपत्रक रक्कमेपेक्षा 18.50 टक्के कमी दराने करुन घेण्यास व त्यानुसार सुधारित अंदाजपत्रक रु.32,96,500/- ला प्रशासकीय मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर

**<u>ठराव क्रमांक 1027/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वाढीव कामे Quantity Variation सह कामांचे कंत्राटदार एम.बी.इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याकडून निविदेच्या मंजुर दराने म्हणजेच अंदाजपत्रक रक्कमेपेक्षा 18.50 टक्के कमी दराने करुन घेण्यास व त्यानुसार सुधारित अंदाजपत्रक रु.32,96,500/- ला मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1028/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.23.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर मनपा हद्दीतील काही वसाहतीमध्ये काळानुरूप वाढ झालेली आहे. या मंजुर रेखांकने, नविन वसाहती, गुंठेवारी भाग व शहरातील भागात विना परवानगी झालेला भागांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त शहरात काही जुन्या नागरी वसाहती मध्ये, पुर्वी टाकण्यात आलेली जलनि:सारण वाहिनी वारंवार ना-दुरुस्त होणे व त्या वाढीस लोकसंख्येला अपु-या पडत असल्याने, बदलणे आवश्यक झाले आहे. जेणेकरून विकसित मंजुर रेखांकनात जलनि:सारण

वाहिन्या टाकुन त्यांना मुलभुत सुविधा देणे महानगरपालिकेस शक्य होईल व त्यांचे माध्यमातून या वसाहतींना चांगली आरोग्यदायी वातावरणाचा लाभ घेता येईल.

तसेच या वसाहतीमध्ये जलनि:सारण वाहिन्यांचे जाळे निर्माण झाल्याने, उघड्यावर वाहणारे मलजलास प्रतिबंध घालता येईल. शिवाय जमिनीचा पोत खराब न झाल्याने जमिनीची सुपिकता (Fertility) वाढण्यास मदत होईल.

त्यास्तव छत्रपती संभाजीनगर मनपा हद्दीतील मध्य मतदारसंघात नविन निर्माण झालेल्या, विकसित झालेल्या वसाहतींमध्ये मंजुर रेखांकन, गुंठेवारी व इतर नागरी वसाहतींमध्ये, तसेच शहरातील जुन्यात भागातील ज्या ज्या ठिकाणी पुर्वी टाकण्यात आलेल्या जलनि:सारण वाहिन्या ज्या की वारंवार नादुरूस्त आहेत व विकसित लोकसंख्येकरीता अपुरी पडत आहे. अशा सर्व ठिकाणी जलनि:सारण वाहिन्यांचे जाळे निर्माण करणे, व काही भागातील जलनि:सारण वाहिन्या बदलणे आवश्यक आहे. अशा सर्व वसाहतींचे सर्वेक्षण करून, मध्य मतदार संघातील या भागासाठींचा विस्तृत प्रकल्प अहवाल, पुर्व मंजुर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) M/s. Yash Innovative Solutions Ltd. यांच्या माध्यमातुन तयार करण्यात आला आहे.

जो विस्तृत प्रकल्प अहवाल (D.P.R.) PMC यांनी मध्य मतदार संघातील मनपा क्षेत्रातील वसाहतीसाठी सादर केला आहे, त्यामध्ये प्रामुख्याने भीमनगर (उत्तरेकडील भाग), भावसिंगपुरा भीमनगर (दक्षिण), नंदनवन कॉलोनी शांतीपुरा, जयसिंगपुरा, कोतवालपुरा, गरमपाणी, नागेश्वरवाडी, समर्थनगर, समता नगर कोटला कॉलनी, सिल्लेखाना, गांधीनगर खोकडपुरा, भवानीनगर, संजयनगर, नवाबपुरा, राजा बाजार, गुलमंडी, भडकल गेट, बुढीलेन, खडकेश्वर, औरंगपुरा, हर्सुल, भगतसिंग नगर-म्हसोबा नगर, एकता नगर, चेतना नगर- राज नगर, वानखेडे नगर होनाजी नगर, यादव नगर एन-11, मयुर पार्क, सुरेवाडी, मयुर नगर- सुदर्शन नगर, रोजाबाग, भारतमाता नगर, विश्वास नगर हर्ष नगर, पहाडसिंगपुरा, बेगमपुरा, आरेफ कॉलनी प्रगती कॉलनी, जयभीमनगर-आसेफिया कॉलनी, बुढीलेन-कबाडीपुरा, लोटाकारंजा, चेलीपुरा-काचीवाडा, शहाबाजार, गणेश कॉलनी, नेहरू नगर, शताब्दी नगर, स्वामी विवेकानंद नगर, श्रीकृष्ण नगर, पवन नगर, आंबेडकर नगर, मिसारवाडी ईत्यादी वसाहतींमधील No Network भागांचा समावेश आहे. या विस्तृत प्रकल्प अहवालात समाविष्ट बाबींचा संक्षिप्त तपशिल खालील तक्त्यात नमुद करण्यात आला आहे.

| Sr. No | Name of Sub Work | Total cost of Components in Rs. |
|---|---|---|
| 1 | Working Survey | 1598683.00 |
| 2 | Collection system (Length-187.14 km) | 1082690250.60 |
| 3 | Manhole Pumping Station @010 Amber Hill | 11370153.00 |
| 4 | Manhole Pumping Station @012 Harsul Lake | 11145927.00 |
| 5 | Sewage Pumping Station at 09 Himayat Bagh | 8587664.00 |
| 6 | Sewage Pumping Station at 013 Pisadevi Road | 7583343.00 |
| 7 | Rising Main (200 m Long - 300 mm.Dia.) @09 Himayat Bagh<br>Rising Main (200 m Long - 350 mm.Dia.) @013 Pisadevi Road | 3282219.00 |
| 8 | Rising Main (200m Long 150 mm Dia.)@012 Harsul Lake<br>Rising Main (360 m Long-150 mm Dia.)@010 Amber Hill | 1789982.00 |
| 9 | Mechanical Works of Pumping Station-09 Himayat Bagh | 22327948.00 |
| 10 | Mechanical Works of Pumping Station - 013 Pisadevi Road | 19714447.00 |
| 11 | Express Feeder | 7034961.00 |
| 12 | STP of Capacity 4.50 MLD- SBR @013 Pisadevi Road | 90037210.00 |
| 13 | STP of Capacity 2.50 MLD- MMBR @09 Himayat Bagh | 41055418.00 |
| 14 | STP of Capacity 0.5 MLD- MMBR @012 Harsul Lake | 13984713.00 |
| 15 | Compound Wall (Length - 900 m) | 14136489.00 |
| 16 | House Service Connection (3000 nos HH) | 75454757.00 |
| 17 | Road Restoration (Length - 55 km) | 183237399.50 |
| 18 | Utility Shifting | 11306286.00 |
| 19 | Trial Run for One Year | 13285927.00 |
| 20 | Royalty charges for Natural sand, rubble stone above 40mm size & Hard Murum of PWD item | 1797368.00 |

| | | |
|---|---|---|
| 21 | Push Through for Crossing line under Major road | 9752287.00 |
| 22 | PWD/Railway Permission Charges | 10119750.00 |
| | **Total Cost Rs. (A)** | 1641294182.07 |
| | **PMC Charges 1.52%** | 24947671.57 |
| | **Provision for 18% GST without Express Feeder and RoyaltyCharges (B)** | 293843133.55 |
| | **Total Net Cost (A+B)** | 1960084988.00 |

अशा स्वरूपाच्या प्रकल्पासाठी शासन निर्णय क्र. एनयुआर-2008/प्र.क्र.203/नवि-33, मंत्रालय, मुंबई-32 दि.20.02.2010 नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथ्यान अभियान या योजनेतुन योग्य ते आर्थिक सहाय्य महाराष्ट्र शासनाकडुन दिले जाते. सद्यस्थितीत या योजनेतील आर्थिक आकृतीबंध 45:25:30 या गुणोत्तर प्रमाणात आर्थिक सहाय्य केंद्र व राज्य शासनाकडुन अनुदेय करण्यात आले असल्याचे शासन निर्णयात नमुद आहे. तथापी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील मध्य मतदारसंघातील No Network Area मधील या प्रकल्प अहवालासाठी मंजुरी शासनाकडून प्राप्त होईल त्या प्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था या स्वरूपाने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस स्वहिस्सा टाकावा लागणार आहे. समवेतच या अशा स्वरूपाच्या प्रकल्पांसाठी तांत्रिक मान्यता शासन नियुक्त नोडल एजन्सी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडुन घेणे व या प्रकल्पासाठी TPTA बंधनकारक करण्यात आलेले आहे.

जो प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे, त्यामध्ये समाविष्ट बाबी व्यतिरिक्त नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचे सेवामुल्य 1.98% ( GST extra) चा समावेश करण्यात आलेला आहे. या व्यतिरिक्त एकुण प्रकल्प किंमतीच्या 1% एवढे शुल्क शासन मानीकेवरील नियुक्त संस्था यांना त्रयस्थ तांत्रिक परिक्षण व ऑडीट साठी स्थानिक स्वराज्य संस्था या स्वरूपाने महानगरपालिकेस शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना अदा करावे लागतील. या साठीची आर्थिक तरतुद महानगरपालिका अर्थसंकल्प 2023-2024 मधील सुधारीत अर्थसंकल्पात अथवा आर्थिक वर्ष 2024-25 मधील अर्थसंकल्पात आवश्यक ती आर्थिक तरतुद करावी लागेल.

करिता छत्रपती संभाजीनगर मनपा हद्दीतील मध्य मतदार संघातील जलनिःसारण वाहिन्या नसलेल्या भागात जलनिःसारण वाहिनी टाकणे, पुर्वी टाकण्यात आलेल्या व वारंवार नादुरqस्त होत असलेल्या भागातील जलनिःसारण वाहिन्या बदलणे साठी तयार करण्यात आलेला विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता होऊन, मंजुरीसाठी व आर्थिक अनुदान मिळणेसाठी शासनास सादर करणे, यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे तांत्रिक मान्यता देणे साठीचे व Third Party Technical Audit and Inspection (TPTA) साठीचे शुल्क संबंधीत शासन मानीकेवरील नियुक्त एजन्सी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय संभाजीनगर यांनी अदा करणे, शासनाने ठरवुन देईल त्या आर्थिक आकृतीबंधानुसार, स्थानिक स्वराज्य संस्था स्वरूपाने स्व-हिस्सा टाकणेसाठी मनपा अर्थसंकल्पात आवश्यक त्या रकमेची योग्य आर्थिक तरतुद करणे, नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांना पुर्व मंजुरीनुसार या प्रकल्प अहवालासाठीचे सेवा शुल्क अदा करणे व या सर्व खर्चासाठी मनपा अर्थसंकल्पात योग्य ती आर्थिक तरतुद करणे, शासनाकडुन प्रकल्पअहवालास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही नियमानुसार करणे, या प्रकल्पाच्या अनुषंगाने आता किवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यात बदल करणे आवश्यक असल्यास ते बदल करणेबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणे या बाबीस मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर

**<u>ठराव क्रमांक 1028/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर मनपा हद्दीतील मध्य मतदार संघातील जलनिःसारण वाहिन्या नसलेल्या भागात जलनिःसारण वाहिनी टाकणे, पुर्वी टाकण्यात आलेल्या व वारंवार नादुरूस्त होत असलेल्या भागातील जलनिःसारण वाहिन्या बदलणे साठी तयार करण्यात आलेला विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ची तांत्रिक मान्यता होऊन, मंजुरी साठी व आर्थिक अनुदान मिळणेसाठी शासनास सादर करणे, यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे

तांत्रिक मान्यता देणे साठीचे व Third Party Technical Audit and Inspection (TPTA) साठीचे शुल्क संबंधीत शासन मानीकेवरील नियुक्त एजन्सी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय संभाजीनगर यांनी अदा करणे, शासनाने ठरवुन देईल त्या आर्थिक आकृतीबंधानुसार स्थानिक स्वराज्य संस्था स्वरुपाने स्व-हिस्सा टाकणेसाठी मनपा अर्थसंकल्पात आवश्यक त्या रकमेची योग्य आर्थिक तरतुद करणे, नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांना पुर्व मंजुरीनुसार या प्रकल्प अहवालासाठीचे सेवा शुल्क अदा करणे व या सर्व खर्चासाठी मनपा अर्थसंकल्पात योग्य ती आर्थिक तरतुद करणे, शासनाकडुन प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही नियमानुसार करणे, या प्रकल्पाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यात बदल करणे आवश्यक असल्यास ते बदल करणेबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणे या बाबीस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1029/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता पापु विभाग)** **(दि.25.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.04.09.2023 रोजी केलेल्या प्रत्यक्ष पहाणीत वॉर्ड क्र.58 अंतर्गत जसवंतपुरा येथील सद्यस्थितीत वापरात नसलेला उंचावरील जलकुंभ जीर्ण झालेला असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर जलकुंभ अंदाजे 45 वर्षापुर्वी बांधलेला असून जीर्ण झालेला आहे.

या जलकुंभाच्या बांधकामाची स्थिती फारच जीर्ण झालेली असून जलकुंभावर जाण्याच्या पायऱ्या पुर्णपणे तुटलेल्या आहेत. आर.सी.सी.कॉलम तसेच सिमेंट कॉँक्रीटरचा भाग निखळून पडत आहे. जलकुंभाच्या खाली,आजु-बाजुच्या परिसरातील लहान मुले तसेच वृध्द व्यक्ती वावरतात. तसेच बाजुला वसाहत व मनपाची प्रा.शाळा आहे. अशा परिस्थितीत जलकुंभाच्या बांधकामाचा काही लहान अथवा मोठा भाग पडून दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळै जिवीत हानी होऊ शकते. करीता सदरील जलकुंभ निष्काशीत करणे आवश्यक आहे. या जलकुंभावरुन पाणी वितरण नसल्याने जलकुंभ निष्काशीत केल्यानंतर पाणी पुरवठा वितरण विस्कळीत होणार नाही.

करीता, जसवंतपुरा येथील जुने जीर्ण झालेले जलकुंभ निष्काशीत करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1029/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जसवंतपुरा येथील जुने जीर्ण झालेले जलकुंभ निष्काशीत करण्या साठीचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1030/2023:-</u>** **(उद्यान विभाग)** **(दि.25.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की एन-8, सिडको येथील नेहरु उद्यानात भौगोलिक परिस्थिती नुसार पुर्वी कडील भागात तलाव आहे. एन-8 येथील नेहरु उद्यान व स्व.मा.बाळासाहेब ठाकरे बॉटनिकल उद्यान एकत्रच असुन सदर उद्यानाचा सर्वांगीण विकास करण्यात येत आहे. त्या बरोबर उद्यानाच्या सौंदर्यीकरणात भर टाकणे आणि नागरिक/पर्यटकांना मनोरंजनाचे साधन उपलब्ध करुन देणेसाठी नेहरु उद्यानातील नैसर्गिक तलावाचे स्वखर्चाने खोलीकरण करुन परिसराचे सौंदर्यीकरण करणे, विद्युत विषयक कामे करणे, बोटींग प्रकल्प कार्यान्वीत करुन बोटींग चालविणे आणि पाच वर्षासाठी देखभाल व संचलन खाजगी आस्थापना/एजन्सीधारक यांचे मार्फत करण्यासाठी प्रस्तावीत करण्यात येत आहे.

सदर प्रकल्पा अंतर्गत तलावासाठी स्थापत्य व विद्युत विषयक कामे करणे, तलावास संरक्षित जाळी लावणे, तलावाचे खोलीकरण करणे, बोटींग साठी सुरक्षित प्लेटफॉर्म तयार करणे, नागरीकांना बसण्यासाठी आसन व्यवस्था करणे, टिकीट घर तयार करणे इ.व अनुषंगीक कामांचा समावेश आहे.

उक्त बोटींग प्रकल्पासाठी व्यापक प्रसिध्दी देऊन स्वारस्य अभिव्यक्ती-EOI मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदेमध्ये महानगरपालिकेने बोटींग/टिकीट शुल्क (अ) लहान प्रती मुलांसाठी (3 ते 12 वर्ष वयोगट) रु.25/- आणि (ब) 12 वर्षापेक्षा जास्त प्रती मुले/व्यक्तिंसाठी रु.50/- निर्धारित करुन दैनंदिन उत्पन्नापोटी महानगरपालिकेस द्यावयाची रॉयल्टी रक्कम (%) एजन्सीधारकांकडून मागविली आहे.

कोरी निविदा पुस्तिका विक्री व निविदा स्विकृतीच्या निर्धारीत तारखेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | एजन्सीचे नाव | बोटींग प्रकल्पाचे दैनंदिन प्रवेश/टिकीट उत्पन्नाद्वारे महानगरपालिकेस देय रॉयल्टी रक्कम (%) |
|---|---|---|
| 1. | तुळजाई एन्टरप्राईजेस, खिवंसरा पार्क, उल्कानगरी, छत्रपती संभाजीनगर. | 10% |
| 2. | पितांबरी सर्व्हीसेस, नाथ मंदिर रोड, यात्रा मैदान, पैठण | 13% |
| 3. | जय बजरंग सर्व्हिसेस, बालाजीनगर, छत्रपती संभाजीनगर. | 16% |

उक्त तीन एजन्सी यांनी सादर केलेल्या निविदेत बोटींग प्रकल्पाचे दैनंदिन उत्पन्नापोटी महानगरपालिकेस देय सर्वाज जास्त रॉयल्टी रक्कम जय बजरंग सर्व्हीसेस, बालाजीनगर, छत्रपती संभाजीनगर यांची असून ती दैनंदिन उत्पन्नाच्या 16% आहे.

करीता, एन-8 सिडको येथील महानगरपालिकेच्या नेहरु उद्यानातील नैसर्गिक तलावाचे स्वखर्चाने खोलीकरण करुन परिसराचे सौंदर्यीकरण करणे, विद्युत विषयक कामे करणे, बोटींग प्रकल्प कार्यान्वीत करुन बोटींग चालविणे आणि पाच वर्षासाठी देखभाल व संचलन करणे कामी निविदेच्या अटी/शर्तीस अधिन राहून जय बजरंग सर्व्हिसेस, बालाजीनगर, छत्रपती संभाजीनगर यांच्या नियुक्तीस आणि बोटींग/टिकीट शुल्क उत्पन्नापोटी महानगरपालिकेस देय रॉयल्टी साठी जय बजरंग सर्व्हिसेस यांच्या सर्वात जास्त 16% रॉयल्टी दराचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1030/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-8 सिडको येथील महानगरपालिकेच्या नेहरु उद्यानातील नैसर्गिक तलावाचे स्वखर्चाने खोलीकरण करुन परिसराचे सौंदर्यीकरण करणे, विद्युत विषयक कामे करणे, बोटींग प्रकल्प कार्यान्वीत करुन बोटींग चालविणे आणि पाच वर्षासाठी देखभाल व संचलन करणे कामी निविदेच्या अटी/शर्तीस अधिन राहून जय बजरंग सर्व्हिसेस, बालाजीनगर, छत्रपती संभाजीनगर यांच्या नियुक्तीस तसेच बोटींग/टिकीट शुल्क उत्पन्नापोटी महानगरपालिकेस देय रॉयल्टी साठी जय बजरंग सर्व्हिसेस यांच्या सर्वात जास्त 16% रॉयल्टी दरास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1031/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.25.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्व.मा.बाळासाहेब ठाकरे उत्तर गेट पर्यंतच्या अप्रोच रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.44,01,900/- चे तयार करण्यात आले होते. त्यास मा.स्थायी समितीचे ठराव क्र.824/2023 दि.20.06.2023 अन्वये मान्यता झालेली आहे. तथापि, प्रत्यक्ष काम सुरु झाल्यानंतर अंदाजपत्रका व्यतिरिक्त काँक्रिट रस्त्याचे काम करणे आवश्यक असल्याने या कामाचे सुधारित अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.55,20,800/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी लागणार वाढीव खर्च मुळ कामाच्या बचत रक्कमेमधून करण्यात येणार असून सदर वाढीव कामासाठी लागणारा खर्च हा मुळ अंदाजपत्रकीय रक्कमेच्या मर्यादित होणर आहे. वाढीव काम हे मुळ मंजुर निविदा दरानुसार संबंधीत कंत्राटदाराकडून करुन घेण्यात येणार आहे.

करीता सदरील कामाचे सुधारित अंदाजपत्रक र.रु.55,20,800/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1031/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्व.मा.बाळासाहेब ठाकरे उत्तर गेट पर्यंतच्या अप्रोच रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.55,20,800/- च्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच वाढीव काम मुळ मंजुर निविदा दरानुसार म्हणजेच

20.27 टक्के कमी दराने संबंधीत कंत्राटदार यांच्याकडून करुन घेण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1032/2023:-** **(मालमत्ता विभाग)** **(दि.26.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.18.07.2023 रोजी मा.विभागीय आयुक्त महोदय यांच्या दालनात वंदेमातरम् सभागृह बाबत बैठक संपन्न झाली. सदरील बैठकीत त्यांनी वंदेमातरम् सभागृह प्राचार्य शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी सामंजस्य करार प्रक्रिया करुन हस्तांतरीत करण्यासाठी आदेश दिलेले आहेत. तसेच दि.06.09.2023 रोजी व्हि.सी.द्वारे मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण, मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर आणि महानगरपालिकेचे अधिकारी यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये वंदेमातरम् सभागृह हे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने ताब्यात घेऊन सभागृहाची स्वच्छता, पाणीपुरवठा, सुरक्षा व्यवस्था, विद्युत व्यवस्था, व्यवस्थापन व इतर भौतिक सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुषंगाने मा.मंत्री, उच्चव तंत्रशिक्षण व मा.विभागीय आयुक्त महोदय यांच्या आदेश/ निर्देशास अधिन राहून वंदेमातरम् सभागृह हस्तांतरणाचा सामंजस्य करार प्राचार्य, शासकिय ज्ञानविज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या सोबत करुन सभागृहाचाताबा घेण्यासाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1032/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.मंत्रीमंडळाच्या झालेल्या बैठकीतील निर्णयास व मा.विभागीय आयुक्त महोदय यांच्या आदेश/निर्देशास अधिन राहून वंदेमातरम् सभागृहाचा प्राचार्य, शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या सोबत हस्तांतरणाचा सामंजस्य करार करुन सभागृहाचा ताबा घेण्यासाठीच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1033/2023:-** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.26.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर परिसरात रस्त्याची रुंदी कमी असल्याने सदर रस्त्याचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे बाबतचा प्रस्ताव आहे.

करीता, शहरात होणाऱ्या मंत्रीमंडळ बैठकी निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर येथील अंतर्गत रस्त्याचे रुंदीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.29,00,500/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी लागणारा खर्च महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद (शासन निधी शासन निर्णय क्र./मनपा/2023/प्र.क्र.628/नवि-16 दि.30.08.2023) पान क्र.08, अ.क्र.28, तरतुद र.रु.900.00 लक्ष मधुन हाती घेता येईल.

तरी सदरील कामाचे अंदजपत्रक र.रु.29,00,500/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1033/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात होणाऱ्या मंत्रीमंडळ बैठकी निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर येथील अंतर्गत रस्त्याचे रुंदीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.29,00,500/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1034/2023:-** **(नगर रचना विभाग)** **(दि.26.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-2001 (सुधारणा) 2021 हा अधिनियम शासन राजपत्र दि.12 मार्च 2021 अन्वये अंमलात आला आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रशासनाने दि.06.08.2021 रोजी ठराव घेऊन सदर अधिनियमाच्या अंमल बजावाणीस सुरुवात केली आहे. ठरावानुसार गुंठेवारी नियमिती करणासाठी प्रस्ताव दाखल करण्याची अंतिम मुदत दि.30 सप्टेंबर 2022 पर्यंत दिली होती. त्यात वेळोवेळी वाढ करुन दि.31 ऑक्टोंबर 2023 पर्यंत वाढ दिली. त्यानंतरही गुंठेवारी प्रस्ताव स्विकारणे व नियमितीकरण करण्याची प्रक्रिया आज पर्यंत सुरु आहे.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-2001 (सुधारणा) 2021 मधील कलम 4 (1) मध्ये हा अधिनियम अंमलात आल्याचा दिनांकापासून सहा महिन्याच्या आत किंवा नियोजन प्राधिकरण परवानगी देईल, अशा वाढवून दिलेल्या मुदतीत संबंधीत भुखंडधारक गुंठेवारी नियमाधिन करण्यासाठी अर्ज करील. अशी तरतुद आहे.

दि.01.05.2023 पासुन सहा महिने दि.31.10.2023 व दि.01.11.2023 ते दि.30.04.2024 पर्यंत महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-2001 (सुधारणा)-2021अंतर्गत कलम 4 (1) नुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत भुखंड व बांधकाम नियमित करण्यासाठी गुंठेवारी योजना अंतर्गत प्रकरणे दाखल करुन नियमितीकरण करण्यासाठी मुदतवाढ देण्यासाठीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**<u>ठराव क्रमांक 1034/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-2001 (सुधारणा)-2021 मधील कलम 4 (1) च्या तरतुदीनुसार गुंठेवारी अंतर्गत नियमितीकरणासाठी प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रस्तावित केल्याप्रमाणे दि.30.04.2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1035/2023:-</u>** **(आस्थापना-1 विभाग)** **(दि.27.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अतिरिक्त शहर अभियंता संवर्गातील रिक्त असलेले पद पदोन्नतीने भरणे बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दि.26.10.2023 रोजी घेण्यात आली. सद्यस्थितीत अतिरिक्त शहर अभियंता स्त्रवर्गात एकुण (1)पद मंजुरअसुन सदर पद रिक्त आहे.

कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातील कार्यरत अधिकाऱ्यांची सेवा ज्येष्ठता, शैक्षणिक अर्हता, गोपनीय अहवाल, वयाच्या 50/55 नंतर सेवेत ठेवण्या बाबतचे पुनर्विलोकन, विभागीय चौकशी इ.सेवाविषयक बाबी विचारात घेता, अतिरिक्त शहर अभियंता पदावरील रिक्त पदाची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता, खुल्या प्रवर्गातून अतिरिक्त शहर अभियंता या पदावर वेतनश्रेणी (एस-24) 71100-211900 (7 वा वेतन आयोग) मध्ये पदोन्नती देण्याबाबत कार्यरत अधिकाऱ्यांचे सेवा विषयक अभिलेख्यांची पडताळणी निवड समितीने केलेली आहे.

त्यानुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णया विरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब/ दि.07.05.2021मधील सुचनांनुसार निवड समितीने श्री.अविनाश भास्कर देशमुख, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांना खुल्या प्रवर्गातून अतिरिक्त शहर अभियंता या पदावर वेतनश्रेणी (एस-24) 71100-211900 (7 वा वेतन आयोग) मध्ये तातपुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत शिफारस केली आहे.

महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पुर्व मंजुरी आवश्यक राहील. अशी तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेस्त्व पाठविण्याबाबत निवड समितीने शिफारस केली आहे.

करीता, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावरील श्री.अविनाश भास्कर देशमुख यांना खुल्या प्रवर्गातून अतिरिक्त शहर अभियंता या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्त्व पाठविण्या बाबत समितीने शिफारस केल्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1035/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अविनाश भास्कर देशमुख, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांना खुल्या प्रवर्गातून अतिरिक्त शहर अभियंता या पदावर वेतनश्रेणी (एस-24) 71100-211900 (7 वा वेतन आयोग) मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.

बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब/ दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निवड समितीने महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविण्याबाबत निवड समितीने शिफारस केल्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1036/2023:-</u>** **(शहर अभियंता विभाग)** **(दि.30.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री रेणुकामाता मंदिर संकुलाची Basement Floor सह तीन मजली इमारत बांधण्याच्या र.रु.868.29 लक्ष च्या ढोबळ अंदाजपत्रकास तसेच सदरील विकास कामाकरीता शासन निधी प्राप्त करुन घेण्यास्तव शासनास प्रस्ताव पाठविण्यास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.816/2023 दि.16.06.2023 अन्वये सर्वानुमते मंजुरी प्राप्त आहे.

तद्‌नुसार महानगरपालिकेमार्फत जा.क्र./मनपा/वॉर्ड अभि-05/135/2023 दि.28.06.2023 अन्वये मा.प्रधान सचिव नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांना अंदाजपत्रकीय र.रु.868.29 लक्षचा सविस्तर प्रकल्प प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

राज्य शासनास सादर केलेल्या प्रस्तावा संदर्भाने कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्र.तिक्षेवि/2023/प्र.क्र.701/नवि-16 दि.22 सप्टेंबर 2023 अन्वये प्रस्ताव संदर्भाने नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.तिक्षेवि-2002/568/प्र.क्र.89/2002/नवि-18, दि.24 ऑगस्ट 2004 मधील निकष विचारात घेऊन सविस्तर अहवाल शासनास सादर करणे बाबत सुचना प्राप्त आहेत. तसेच जिल्हा नियोजन अधिकारी जिल्हा नियोजन समिती छत्रपती संभाजीनगर यांनी ही त्यांचे कडील पत्र क्र. जिनिस/2023-2024/तिर्थक्षेत्र/प.व्य./2455 दि.26.09.2023 अन्वये सविस्तर माहिती शासनास सादर करणे बाबत सुचना आहेत.

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.तिक्षेवि-2002/568/प्र.क्र.89/2002/नवि-18, दि.24 ऑगस्ट 2004 मधील अट क्र.04 नुसार श्री रेणुकामाता मंदीर एन-9 सिडको हे ‘क’ श्रेणीतील तिर्थक्षेत्र असल्याने एकुण प्रकल्प किंमतीच्या 75% राज्य शासन तसेच 12.50% संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था व उर्वरित 12.50% संबंधीत मंदीराच्या ट्रस्टने करणे आवश्यक आहे. तसेच अट क्र.06 नुसार तिर्थक्षेत्र विकासाअंतर्गत जी कायम स्वरुपी मालमत्ता उभी होणार आहे. त्याची देखभाल दुरुस्ती संबंधीत मंदीराचे ट्रस्ट यांनी करणे आवश्यक आहे. या बाबत संबंधीत मंदीर ट्रस्ट यांच्याकडून ठरावाद्वारे लेखी हमी घेणे बंधनकारक आहे.

तद्‌नुसार श्री रेणुकामाता सार्वजनिक विश्वस्त निधी मंडळ एन-9 सिडको यांनी शासन निर्णय क्र.तिक्षेवि-2002/568/प्र.क्र.89/2002/नवि-18, दि.24 ऑगस्ट 2004 मधील अट क्र.04 व 06 बाबतची आवश्यक पुर्तता मंदीर ट्रस्टचे प्रमाणपत्र व ठरावाद्वारे केलेली असुन संबंधीत मंदीर ट्रस्टने एकुण अंदाज पत्रक र.रु.868.29 लक्ष च्या 12.50% म्हणजेच र.रु.108.53 लक्ष महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर कडे जमा करणार असल्याबाबतचे लेखी प्रमाणपत्र तसेच सदरील इमारत पुर्णत्वानंतर इमारतीची संपुर्ण देखभाल दुरुस्ती मंदीर ट्रस्ट करणार असल्याचा लेखी ठराव दिलेला आहे.

शासन निर्णय क्र. तिक्षेवि-2002/568/प्र.क्र.89/2002/नवि-18, दि.24 ऑगस्ट 2004 मधील अट क्र.04 नुसार एकुण अंदाजपत्रक र.रु.868.29 लक्ष च्या 12.50% म्हणजेच र.रु.108.53 लक्ष महानगरपालिकेने तरतुद करणे आवश्यक आहे. सदरील बाब ही धोरणात्मक असल्याने प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक आहे.

करीता, श्री रेणुकामाता सार्वजनिक विश्वस्त निधी मंडळ एन-9 सिडको यांनी महानगरपालिकेस शासन निर्णय क्र.तिक्षेवि-2002/568/प्र.क्र.89/2002/नवि-18, दि.24 ऑगस्ट 2004 मधील अट क्र.04 व 06 नुसार सादर केलेल्या प्रमाणपत्र व ठरावास मंजुरी देणे एकुण प्रकल्प किंमतीच्या 12.50% म्हणजेच र.रु.108.53 लक्ष महानगरपालिकेचा हिस्सा म्हणुनभरण्यास मंजुरी तसेच आर्थिक तजविज करणे बाबतचा धोरणात्मक प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1036/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री रेणुकामाता सार्वजनिक विश्वस्त निधी मंडळ एन-9 सिडको यांनी महानगरपालिकेस शासन निर्णय क्र.तिक्षेवि-2002/568/प्र.क्र.89/2002/नवि-18, दि.24 ऑगस्ट 2004 मधील अट क्र.04 व 06 नुसार सादर केलेल्या प्रमाणपत्र व ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यास मंजुरी तसेच एकुण प्रकल्प किंमतीच्या 12.50% म्हणजेच र.रु.108.53 लक्ष महानगरपालिकेचा हिस्सा म्हणुन भरणे तसेच सदरील रक्कमेची आर्थिक तजविज करणे बाबतचा धोरणात्मक प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1037/2023:-** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.31.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीत एकुण 10 प्रशासकीय झोनअसुन सदरील झोन मध्ये लहान-मोठे एकुण साधारणत: 1858 कि.मी.लांबीचे रस्ते आहेत. सदरील रस्त्यांची झाडाई करण्यासाठी महानगरपालिकेकडे 03 ट्रक माऊंटेड (मोठ्या) व 03 बोलेरो माऊंटेड (लहान) अशा एकुण 06 स्विपींग मशिन्स कार्यरत आहेत. ट्रक माऊंटेड स्विपींग मशिन्सद्वारे शहरातील मुख्य रस्ते व बोलेरो माऊंटेड स्विपींग मशिन्सद्वारे झोन अंतर्गत रस्ते झाडाई करण्यात येत असुन दररोज साधारणत: एकुण 100 ते 120 कि.मी.लांबीचे रस्ते झाडाई केली जातात.

शहरातील धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी 10 झोन करीता प्रत्येकी 01 प्रमाणे 10 मिनी स्विपींग मशिन्स असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत मनपाकडे 03 मिनी स्विपींग मशिन्स असुन आणखी 07 नवीन मिनी मशिन्स खरेदी करणे आहे. त्या करीता जीईएम पोर्टलद्वारे दरपत्रके घेण्यात आली असता, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | दर |
|---|---|---|
| 1. | मे.प्यारा सिंग ॲण्ड सन्स् | र.रु.34,00,000/- |
| 2. | मे.एच.ए.आर.इंटरनॅशनल | र.रु.36,00,000/- |
| 3. | मे.इन्सॉल मल्टीक्लिन इक्वीपमेंटस प्रा.लि. | र.रु.45,00,000/- |

उपरोक्त नुसार तुलनात्मकदृष्ट्या मे.प्यारा सिंग ॲण्ड सन्स यांचे दर कमी असुन ते प्रति नग रु.24,00,000/- प्रमाणे आहेत. सदरील दर अंदाजपत्रकासाठी ग्राह्य धरण्यात आले असून 07 मिनी रोड स्विपींग मशिन्स खरेदीसाठी र.रु.2,38,00,000/- खर्च अपेक्षित आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाली तर जीईएम पोर्टलद्वारे निविदा मागवून असणारे Auxiliary Enginer असणारे मिनी रोड स्विपींग मशिन्स खरेदी करण्यात येतील. सदरील खर्च NCAP (हवेची गुणवत्ता सुधारणे) साठी प्राप्त शासकीय अनुदानातून करण्यात येईल.

करीता, महानगरपालिकेच्या 10 झोन करीता 10 मिनी रोड स्विपींग मशिन्स् उपलब्ध करुन देण्या करीता 07 नवीन मिनी रोड स्विपींग मशिन्स खरेदी करण्यासाठी र.रु.2,38,00,000/- रक्कमेचे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1037/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टिने नवीन 07 नवीन मिनी रोड स्विपींग मशिन्स् खरेदी करण्यासाठी र.रु.2,38,00,000/- रक्कमेचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. तसेच सदरील खर्च हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्राप्त शासकीय अनुदानातून (NCAP) करण्यास देखील मान्तया देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1038/2023:-** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.31.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.07, मयुरपार्क अंतर्गत हरसिध्दी पशुसंवर्धन सोसायटी व लेखापरिक्षक सह.गृहनिर्माण संस्था येथील मुख्य रस्त्याचे कॉंक्रेटिंग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.1,06,80,500/- चेतयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी लागणारा खर्च हामंजुर रेखांकनात मुलभूत सुविधा पुरविणे या लेखाशिर्षा तून हाती घेता येईल.

तरी, सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,06,80,500/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1038/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.07, मयुरपार्क अंतर्गत हरसिध्दी पशुसंवर्धन सोसायटी व लेखापरिक्षक सह.गृहनिर्माण संस्था येथील मुख्य रस्त्याचे कॉंक्रिटिंग करणे. या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक र.रु.1,06,80,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1039/2023:-** **(घनकचरा विभाग)** **(दि.31.10.2023)**

संदर्भ:-

1. मा.स्थायीसमिती ठराव क्र.146/2018 दि.10.12.2018.
2. करारनामा दि.23.01.2019.
3. जा.क्र./मनपा/घकव्यवि/30/2019 दि.23.01.2023.

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा प्रक्रिया अंतर्गत मौ.कांचनवाडी येथे 30 टन प्रति दिवस क्षमतेचे बायोमिथेनेशन केंद्र उभारणे, चाचणी देणे व 10 वर्षाच्या कालावधीसाठी चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबतचे काम निविदा प्रक्रिया राबवून उपरोक्त संदर्भानुसार मे.बँको कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना देण्यात आले आहे.

निविदेतील अटी शर्तीनुसार संबंधीत एजन्सीधारकास प्लांट चालविण्यासाठी कोणत्याही प्रकारचे टिपींग शुल्क दिले जाणार नाही. त्यांनी कचऱ्याच्या प्रक्रियेतून निर्माण केलेली उत्पादने (गॅस/ विद्युत/कंपोस्ट/इतर) विकुन ऑपरेशन आणि देखभाल खर्च आणि नफा वसुल करेल असे नमुद आहे.

कांचनवाडी बायोमिथेनेशन केंद्राजवळ Sewage Treatment Plant असुन या केंद्राला अंदाजित सरासरी दर दिवशी 11900 Units व सरासरी 361000 Units महिना इतके युनिट लागते त्याचा मासिक खर्च जवळपास र.रु.37,57,390/- (ऑगस्ट 3023 च्या विज देयकानुसार) इतका येतो. बायोमिथेनेशन प्रकल्पावर निर्माण होणारी वीज महावितरण विभागाच्या दरानुसार महानगरपालिकेने खरेदी वीज देयकाचे किमान 95 टक्के देयक युनिट प्रमाणे मे.बँको कन्स्ट्रक्शन प्रा.लि.यांना अदा करुन Sewage Treatment Plant ला लागणारी आवश्यक वीज वापरता येऊ शकते. यासाठी संबधीत एजन्सी मे.बँको कन्स्ट्रक्शन प्रा.लि.छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या मध्ये Power Purchase Agreement गरजेचे आहे.

करीता, कांचनवाडी बायोमिथेनेशन प्रकल्पावरील वीज खरेदी करुन Sewage Treatment Plant वापरण्यासाठी मे.बँको कन्स्ट्रक्शन प्रा.लि.छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्यामध्ये Power Purchase Agreement करणे करीता प्रकरण मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1039/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया अंतर्गत कांचनवाडी बायोमिथेनेशन प्रकल्पावरील वीज खरेदी करुन Sewage Treatment Plant वापरण्यासाठी मे.बँको कन्स्ट्रक्शन प्रा.लि.छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्यामध्ये Power Purchase Agreement करणे करीता मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1040/2023:-** **(उद्यान विभाग)** **(दि.31.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.मनपा/2023/प्र.क्र.628/नवि-16,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32 दि.30.08.2023 नुसार 'महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद' या योजनेतून 'शहर सौंदर्यीकरणाच्या कामाअंतर्गत V.I.P.Movement असलेल्या रस्त्यावर फुल झाडे लावून सुशोभिकरण करणे' या कामांसाठी र.रु.60.00 लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. शासन निर्णयातील विवरणपत्रात अ.क्र.11 वर सदर कामाचा समावेश आहे.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षाचा सांगता सोहळ्याचा कार्यक्रम सिध्दार्थ उद्यान येथे होणार आहे. करीता प्राप्त अनुदानातून सिध्दार्थ उद्यान, शहरातील महत्वपुर्ण रस्ता दुभाजक आणि चौकांचे सुशोभिकरण करणेसाठी विविध प्रजातींचे शोभिवंत झाडे/रोपांची लागवड व संगोपन

करणे इ.कामाचे र.रु.24,29,330/-चे अंदाजपत्रक उद्यान विषयक राज्य दरसुची/ कोटेशन आधारे तयार करण्यात आले आहे.

उक्त काम दि.15.09.2023 पर्यंत पुर्ण करणे गरजेचे असल्याने निर्धारित कार्यक्रमाचा उर्वरित कालावधी विचारात घेता सदर कामाची दरपत्रक सुचना महानगरपालिकेची वेबसाईट व उद्यान विभागाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन दरपत्रके मागविण्यात आली. निर्धारित कालावधीत प्राप्त दरपत्रकाचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | शिवार अॅग्रो सर्व्हिसेस | र.रु.22,61,061.00 (Without GST) |
| 2. | भाग्यश्री रोझ गार्डन अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस | र.रु.26,09,230.00 (Without GST) |
| 3. | सागर नर्सरी | र.रु.26,81,970.00 (Without GST) |

उक्त प्रमाणे सर्वात कती दराचे दरपत्रक शिवार अॅग्रो सर्व्हिसेस यांचे र.रु.22,61,061.00 (Without GST) चे आहे. GST रक्कमेसह शिवार अॅग्रो सर्व्हिसेस यांचे दरपत्रक र.रु.26,68,052/- इतके आहे.

करीता, शहर सौंदर्यीकरणाच्या कामाअंतर्गत V.I.P.Movement असलेल्या रस्त्यावर फुल झाडे लावून सुशोभिकरण करणे या कामाचे शिवार अॅग्रो सर्व्हिसेस यांचे सर्वात कमी र.रु.26,68,052/- (With GST) चे दरपत्रक विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1040/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने ‘महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद’ या योजनेतून दि.30.08.2023 च्या शासन निर्णयान्वये प्राप्त निधी अंतर्गत ‘शहर सौंदर्यीकरणाच्या कामाअंतर्गत V.I.P.Movement असलेल्या रस्त्यावर फुल झाडे लावून सुशोभिकरण करणे’ या कामांसाठी प्राप्त सर्वात कमी दराच्या शिवार अॅग्रो सर्व्हिसेस यांच्या र.रु.26,68,052/-(With GST) चे दरपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1041/2023:-</u>** **(भांडार विभाग)** **(दि.31.10.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध विभागां मार्फत सतत संगणक साहित्याची मागणी होत आहे. सन 2023-24 लेखा अनुदानानुसार संगणक साहित्या खरेदी या लेखाशिर्षांतर्गत “संगणक साहित्य खरेदी” करण्यासाठी र.रु.75.00 लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. दरवर्षी विविध विभागांकडून मागणी नोंदवून संगणक साहित्याची वर्षभरा साठीची निविदा मागविण्यात येते. उपलब्ध तरतुदीमध्ये सातत्याने अत्यावश्यक असलेले संगणक साहित्याची मागणी होणाऱ्या खालील बाबींचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रक तयार करण्यासाठी प्रसिध्द केलेल्या दरपत्रक सुचना पत्रानुसार प्राप्त झालेले दर वापरण्यात आले आहे.

| अ. क्र. | साहित्याचे विवरण | खरेदी संख्या | प्रमाण | दरपत्रकातील प्राप्त कमी दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1. | **<u>Desk Top</u>**<br>HP280 Intel Core i5/12th generation 12400 16 GM RAM/ 1TBHD/512GB SSD/19.5” Monitor/ 10/100/1000/Keyboard and Mouse | 50 | नग | 70200 | 3510000 |
| 2. | **<u>Laptop</u>**<br>HP Lapto 250 G9 Intel Core i5/12th generation 8GB/512GB SSD/15 inch/win/11 Pro1/1/1 | 15 | नग | 702000 | 1053000 |
| 3. | **<u>Printer</u>**<br>HP 208DW Plain Printer With Duplex | 30 | नग | 18800 | 564000 |
| | | | | **Total** | **5127000** |
| | | | | **GST 18%** | **992860** |

| | | |
|---|---|---|
| | **Total** | **6049860** |

उपरोक्त संगणक साहित्य खरेदीसाठी अंदाजे खर्च र.रु.60,49,860/- (अक्षरी साठ लक्ष एकोण पन्नास हजार आठशे साठ फक्त) इतका अपेक्षित आहे. यासाठी "संगणक साहित्य खरेदी" या लेखाशिर्षातून तरतुद उपलब्ध होणे व सदर साहित्य खरेदीसाठी निविदा मागवितांना एका वर्षासाठी उपरोक्त साहित्याच्या दरास मंजुरी घेण्यात येऊन उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत मंजुर दरानुसार आवश्यक साहित्य खरेदी करण्यात येईल. करीता संगणक साहित्य खरेदीचा र.रु.60,49,860/- च्या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1041/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध विभागांच्या मागणीनुसार साहित्य पुरवठा करण्यासाठी "संगणक साहित्य खरेदी" या लेखाशिर्षातून आर्थिक तरतुद र.रु.60,49,860/- (अक्षरी साठ लक्ष एकोण पन्नास हजार आठशे साठ फक्त) उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच निविदा मागवितांना वार्षिक दरांसाठी मंजुरी प्रदानकरण्यात येऊन उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत आवश्यक साहित्य खरेदी करण्यास व र.रु.60,49,860/- च्या खर्चास मंजुरी प्रदान करण्यात येते. निविदा मागविण्याची वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1042/2023:-** **(मालमत्ता विभाग) (दि.31.10.2023)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्र आदिवासी ठाकूर जमात सेवा मंडळ या संस्थेस चिकलठाणा येथील पोलीस चौकी समोरील कै.देविदासभाऊ नवपुते सभागृहाचा तळ मजला यापुर्वी करारनामा क्र.एआरबी5/9279/2021 दि.28.12.2021 रोजी 03 वर्षाच्या कालावधीसाठी वार्षिक भाडे र.रु.14,160/- (18 टक्के जी.एस.टी.सह) प्रमाणे भाडेतत्वावर देण्यात आला होता. संबंधीत संस्था नियमित भाडे करणा करीत असल्याने तसेच इमारतीमधील पहिला मजला विना वापर पडून असल्याने या संस्थेने 30 वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिमाह र.रु.5000/- प्रमाणे भाडे आकारुन भाडेतत्वावर मिळण्यासाठी विनंती केलेली आहे.

त्यानुषंगाने सदर ठिकाणी सामाजिक कार्यासाठी जागेची मागणी असल्याने कोणताही व्यावसायीक वापर अनुज्ञेय होणार नाही. या अटीस अधिन राहून प्रतीमाह र.रु.10,000/- वइतर आकारणी करुन 05 वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक 1042/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र आदिवासी ठाकूर जमात सेवा मंडळ या संस्थेस चिकलठाणा येथील पोलीस चौकी समोरील कै.देविदासभाऊ नवपुते सभागृहाचा तळ मजला यापुर्वी करारनामा क्र.एआरबी5/9279/2021 दि.28.12.2021 रोजी 03 वर्षाच्या कालावधीसाठी वार्षिक भाडे र.रु.14,160/- (18 टक्के जी.एस.टी.सह) प्रमाणे भाडेतत्वावर देण्यात आला होता. संबंधीत संस्था नियमित भाडे करणा करीत असल्याने तसेच इमारतीमधील पहिला मजला विना वापर पडून असल्याने या संस्थेने 30 वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिमाह र.रु.5000/- प्रमाणे भाडे आकारुन भाडेतत्वावर मिळण्यासाठी विनंती केलेली आहे.

त्यानुषंगाने सदर ठिकाणी सामाजिक कार्यासाठी जागेची मागणी असल्याने कोणताही व्यावसायीक वापर अनुज्ञेय होणार नाही. या अटीस अधिन राहून प्रतीमाह र.रु.10,000/- वइतर आकारणी करुन 05 वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यासाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1043/2023:-** **(कार्यकारी अभियंता इमारत व उद्यान विभाग)** **(दि.01.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.02 मधील औरंगाबाद महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्र व रुग्णालयाची आवश्यक दुरुस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची (एस.एस.आर.) सन 2022-2023 नुसार र.रु.53,89,816/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेच्या मंजुर ठराव क्र.910/2023 दि.21.08.2023 अन्वये

प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार या कामाची निविदा प्रक्रिया करण्यात येऊन निविदा प्रक्रियेअंती सदर काम कंत्राटदार श्री.मुजीब उर रहमान खान यांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.00% कमी दराने प्रदान करण्यात येऊन सध्या काम प्रगतीपथावर आहे.

सदर काम करत असतांना, जिन्सी,भवानीनगर व गांधीनगर येथे मुळ अंदाजपत्रकामध्ये काम करावयास लागणाऱ्या अत्यावश्यक बाबींचा समावेश नसल्यामुळे पुढील करता येत नाही. करीता या ठिकाणी कॉंक्रीट डोर फ्रेम, ग्रेनाईट, 60 एमएम इटालियन पेव्हर ब्लॉक व इतर अनुषंगीक आवश्यक बाबींचे करणे Extra Items आवश्यक आहे.

करीता, अतिरिक्त बाबींचे अंदाजपत्रक SSR 2023-2024 च्या दरसुची नुसार र.रु.8,79,239/- इतके तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाची निविदा अं.प.दरापेक्षा 18.00% कमी दराची असल्यामुळे त्यामधून होण्याच्या बचतीमधुन Extra Items चा खर्च भागविण्यात येईल.

करीता सदर कामासाठी अतिरिक्त बाबींचे अंदाजपत्रकीय र.रु.8,79,239/- मंजुरी बाबत व वाढीव काम मुळ कंत्राटदार श्री.मुजीब उर रहमान खान यांच्या मार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1043/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.02 मधील औरंगाबाद महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्र व रुग्णालयाची आवश्यक दुरुस्ती करणे या कामा अंतर्गत अतिरिक्त बाबींचे अंदाजपत्रकीय र.रु.8,79,239/- इतकेस व वाढीव काम मुळ कंत्राटदार श्री.मुजीब उर रहमान खान यांच्या मार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1044/2023:-</u>** **(मालमत्ता विभाग) (दि.02.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या विभागामार्फत वंदे मातरम सभागृहाचा ताबा घेण्यात आलेला आहे. वंदे मातरम् सभागृह येथे एक प्रेक्षकगृह, दोन कलादालन, एक परीसंवाद व्यासपीठ, एक एम्फी थेअटर, एक कार्यालय, एक बुकींग कक्ष, ग्रीन रुम, मेकप रुम, कलावंतासाठी विशेष 11 रुम, टेरेस (गच्ची), दोनचाकी वाहनतळ व चारचाकी वाहनतळ आहेत.

उपरोक्त बाबींची महानगरपालिकेतर्फे खालील नमुद अटी शर्तीस अधिन राहून भाडेतत्वावर देण्यात येणार आहे.

**<u>वंदे मातरम् सभागृह नियमावली.</u>**

1. वंदे मातरम सभागृह येथे एकूण 1077 आसने आहेत. तेथील आसनांची वर्गवारी पुढील प्रमाणे आहे. मुख्य प्रेक्षागृहात 777 व बाल्कनीत 300 आसने आहेत. मुख्य प्रेक्षागृहात रांग क्र.01 मधील दोन आसने परिनिरीक्षक मंडळ सदस्यांसाठी आणि रांग क्र.02 मधील आठ आसने व रांग क्र.03 मधील पाच आसने महानगरपालिकेसाठी कायमस्वरुपी राखीव ठेवण्यात येतील. कोणत्याही परिस्थितीत सदर राखीव आसनांची तिकीट विक्री करता येणार नाही. उर्वरीत 1062 आसने तिकीटांकरीता उपलब्ध राहतील.
2. सदरचे सभागृहात ऐअर कुलर आहे. परंतु विद्युतप्रवाह खंडित झाल्यास उपलब्धतेनुसार विद्युत जेनेत्राचे सहाय्याने इतर विद्युत व्यवस्था चालविली जाईल. त्यासाठी भाडे रक्कमेमध्ये कोणतीही सवलत मिळणार नाही. तसेच विद्युत जेनेत्रासाठी लागणारे डिजेल महानगरपालिका उपलब्ध करुन देईल. त्यासाठीचा संपूर्ण खर्च आयोजकाच्या अनामत रक्कमेतून कपात करण्यात येईल.
3. विद्युत विभागाच्या अभिप्रायानुसार विद्युत देयकापोटीची रक्कम प्रती युनिट प्रमाणे अनामत रकमेतुन कपात करण्यात येईल.
4. एक सत्र हे 04 तासाचे असेल. मुख्य कार्यक्रम 03 तासाचा असुन अर्धा तास आधी व अर्धा तास नंतर सभागृह वापरण्यास मिळेल.
5. सभागृहाचे भाडे व अनामत रक्कम आकारणी पुढीलप्रमाणे राहील.

| **मुख्य सभागृह (आसन क्षमता 1077)** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **विवरण** | **भाडे र.रु (एका सत्रासाठी)** | **अनामत र.रु (एका सत्रा साठी)** |
| 1. | नाटक, शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य | रु. 15,000/- | रु. 10,000/- |
| 2. | शालेय कार्यक्रम / बक्षीस वितरण | रु. 12,000/- | रु. 10,000/- |
| 3. | सभा संमेलने / परिषद / चित्रीकरण / जादुचे प्रयोग / सांस्कृतिक व इतर कार्यक्रमासाठी | रु. 20,000/- | रु. 10,000/- |
| 4. | लावणी, लोकनृत्य | रु.35,000/- | रु. 50,000/- |
| जी.एस.टी. 18 टक्के भाडे रक्कमे व्यतिरिक्त आकारण्यात येईल.<br>शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी प्रयोग केल्यास रु.1,000/- दर जादा आकार पडेल. | | | |

| **परीसंवाद व्यासपीठ (आसन क्षमता 100)** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **विवरण** | **भाडे र.रु (एका सत्रासाठी)** | **भाडे र.रु. (एक दिवसा साठी) (स.10 ते सा.06 )** | **अनामत र.रु (एका सत्रासाठी)** |
| 1. | शालेय कार्यक्रम / बक्षीस वितरण, शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य / सभा संमेलने / परिषद / चित्रीकरण / जादुचे प्रयोग / सांस्कृतिक व इतर कार्यक्रमासाठी | रु.5,000/- | रु.10,000/- | रु.5,000/- |
| 1. जी.एस.टी. 18 टक्के भाडे रक्कमे व्यतिरिक्त आकारण्यात येईल.<br>2. शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी प्रयोग केल्यास रु.1,000/- दर जादा आकार पडेल. | | | | |

| **प्रती कला दालन दर** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **विवरण** | **भाडे रक्कम रु एक दिवसासाठी** | **अनामत रक्कम रु एक दिवसासाठी** |
| **1.** | शालेय कार्यक्रम / बक्षीस वितरण, शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य / सभा संमेलने / परिषद / चित्रीकरण / जादुचे प्रयोग / प्रदर्शन / रंगीत तालीम / सांस्कृतिक व इतर कार्यक्रमासाठी | रु.4,000/- | रु.5,000/- |
| जी.एस.टी. 18 टक्के भाडे रक्कमे व्यतिरिक्त आकारण्यात येईल. | | | |

| **एम्फी थेअटर (आसन क्षमता 150)** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **विवरण** | **भाडे र.रु (एका सत्रासाठी)** | **भाडे र.रु. (एक दिवसासाठी)** | **अनामत रक्कम (एका सत्रासाठी)** |
| 1. | शालेय कार्यक्रम / बक्षीस वितरण, शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य / सभा संमेलने / परिषद / चित्रीकरण / जादुचे प्रयोग / रंगीत तालीम / सांस्कृतिक व इतर कार्यक्रमासाठी | रु.1,000/- | रु.2,500/- | रु.2,000/- |
| जी.एस.टी. 18 टक्के भाडे रक्कमे व्यतिरिक्त आकारण्यात येईल. | | | | |

| **संस्थेस आवश्यकता असल्यास प्रती महा करारनामा तत्वावर हॉल** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विवरण** | **तपशील** | **प्रती महा भाडे** | **अनामत र. रु.** |

| | | | र.रु | |
|---|---|---|---|---|
| 1. | शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य / रंगीत तालीम / सांस्कृतिक व इतर कार्यक्रमासाठी | परीसंवाद व्यासपीठ | रु.8,000/- | रु.5,000/- |
| 2. | | प्रती कला दालन | रु.5,000/- | रु.5,000/- |
| 3. | | एम्फी थेअटर | रु.3,000/- | रु.5,000/- |

1. आठवड्यातून मात्र दोन दिवसांकरीता 03 तासांकरीता परवानगी असेल.
2. जी.एस.टी. 18 टक्के भाडे रक्कमे व्यतिरिक्त आकारण्यात येईल.
3. 09 ते रात्री 11 उपलब्ध करुन देण्यात यईल.

| रुम एकूण 11 | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विवरण** | **प्रती रुम भाडे र.रु एक दिवसासाठी** | **प्रती रुम अनामत र.रु एक दिवसासाठी** |
| 1. | कलावंतांसाठी 05 रुम (साधारण) | रु.1,500/- | रु. 5,000/- |
| 2. | कलावंतांसाठी 06 रुम (विशेष) | रु.2,000/- | रु. 5,000/- |
| जी.एस.टी. 18 टक्के भाडे रक्कमे व्यतिरिक्त आकारण्यात येईल. | | | |

6. उपरोक्त रक्कमेत सुट देण्याचा अधिकार मा.आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना राहिल.
7. लावणी, ऑर्केस्ट्रा, मनोरंजन स्नेहसंमेलने, मेळावे तसेच व्यवस्थापकांना वाटेल अशा कार्यक्रमास आयोजकाने प्रत्येक सत्रासाठी भाडे रक्कमेसह नमुद अनामत रक्कम भरावी.
8. सभागृहात कोणतेहि खाद्यपदार्थ घेऊन जाण्यास व खाण्यास मनाई आहे. तसे आढळल्यास आयोजकाच्या अनामत रक्कमेमधुन रक्कम रु.5,000/- कपात करण्यात येईल.
9. अनामत रक्कम भरली आहे म्हणुन आरक्षण देणे बंधनकारक असणार नाही. उपलब्धतेनुसार आरक्षण दिले जाईल. प्रयोगानंतर नुकसानीचा आढावा घेवून अनामत रक्कम परत केली जाईल. अनामत रकमेवर कुठल्याही प्रकारे व्याज मिळणार नाही. अनामत रक्कमेची मागणी एक वर्ष न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
10. सभागृहाचा वापर सकाळी 09 ते रात्री 11 वाजेपर्यंत करता येईल. या कालावधीत तीन प्रयोग खालील वेळेत होऊ शकतील.

| | |
|---|---|
| सकाळचा प्रयोग | 09 ते 01 |
| दुपारचा प्रयोग | 02 ते 06 |
| रात्रीचा प्रयोग | 07 ते 11 |

11. साधारणपणे प्रयोग सुरु होण्याच्या अर्धा तास आधी सभागृह आयोजकास उपलब्ध होईल. ठरवून दिलेल्या वेळेत प्रयोग संपन्न करण्याची जबाबदारी आयोजकावर राहील. प्रयोग वेळेवर न संपविल्यास प्रयोग बंद करण्याचा अधिकार व्यवस्थापकास राहील. आरक्षित केलेल्या वेळे व्यतिरिक्त एक तासापेक्षा जास्त वेळ प्रयोग चालू असल्यास प्रति तासासाठी रक्कम रु.3,000/- ची कपात अनामत रक्कमेतुन केली जाईल. प्रयोग दोन तासांनंतरही चालू असेल तर पुढीलसत्राचे भाडे रक्कम आयोजकास भरावी लागेल. पुढील सत्राचे आरक्षण असल्यास प्रयोग बंद करण्याचा अधिकार व्यवस्थाकास राहील. प्रयोग रात्री 11 वाजेपर्यंत संपन्न करण्याची जबाबदारी आयोजकावर राहील.
12. प्रत्येक कार्यक्रमाकरिता व्दारपाल व सूरक्षा रक्षकाची व्यवस्था आयोजकास करावी लागेल.
13. सभागृहात होणा-या प्रयोगामुळे कोणाचा हक्कभंग झाला किंवा कायदेशीर गुंतागुंत झाल्यास त्याची जबाबदारी आयोजकावर राहील.
14. प्रयोगाचे पुर्ण भाडे व अनामत रक्क्म भरल्याशिवाय प्रयोगाची आगाऊ तिकीट विक्रीस परवानगी दिली जाणार नाही. प्रयोगापूर्वी चार दिवस आधी सकाळी 09 ते 12 व दुपारी 05 ते 08 आणि प्रयोगाच्या दिवशी पूर्ण दिवस तिकीट विक्री करता देण्यात येईल. काम नियमानुसार सुरु आहे किंवा

असे हे पाहण्याचा अधिकार व्यवस्थापकांना राहील. त्यांनी वेळोवेळी केलेल्या सुचना आयोजकास बंधनकारक राहील.

15. अर्जदारास भाडे व अनामत रक्कम आरक्षाणाच्या वेळीच भरावे लागेल. जर व्यवस्थापनाने तारीख रद्द केली तर अनामत रक्कम परत करण्यात येईल. व्यवस्थापकाने दिलेली तारीख आपसात अदला बदल करता येणार नाही. अर्जदारास दुसरी तारीख / सत्र आरक्षण करणेसाठी वेगळे भाडे व अनामत रक्कम भरणा करावी लागेल.
16. अर्जदाराने आरक्षित केलेली तारीख / सत्र काही कारणामुळे रद्द करावी लागल्यास किंवा बदलल्यास भाडे व अनामत रक्क्मेचा खालीलप्रमाणे परतावा केला जाईल.

| **अ.क्र.** | **आरक्षण रद्द करण्याचा कालावधी** | **परताव्याची रक्कम** | |
|---|---|---|---|
| | | **भाडे** | **अनामत** |
| **1.** | प्रयोगापुर्वी 30 दिवस अगोदर कळविल्यास | 90 टक्के | पूर्ण |
| **2.** | प्रयोगापुर्वी 15 दिवस अगोदर कळविल्यास | 70 टक्के | पूर्ण |
| 3. | प्रयोगापुर्वी 08 दिवस अगोदर कळविल्यास | 50 टक्के | पूर्ण |

प्रयोगाच्या दिनांकापासून 08 दिवसा पुर्वी प्रयोग रद्द झाल्याचे न कळविल्यास भाडे रक्कम पुर्ण कपात करण्यात येईल. कोणत्याही सबबीवर भाडे रक्कम परत मिळणार नाही व केवळ अनामत रक्कमेचा परतावा करण्यात येईल.

17. प्रयोगासंदर्भात सर्व श्रमीक कायदे व शासकिय नियमांचे पालन करण्याची जबाबदारी अर्जदारांवर राहील. प्रयोग सुरु होण्यापुर्वी पोलीस कार्यालयाचे नाहरकत व ध्वनिक्षेपन परवाना, भाडे व अनामत रक्कम भरणा केलेली पावती व इतर आवश्यक प्रमाणपत्रे व्यवस्थापकांना दाखविणे सक्तीचे राहील.
18. आयोजकास प्रयोगाचे कालावधीत सभागृह, परीसंवाद व्यासपीठ, कलादालन, एम्फी थेअटर (आरक्षण केल्यास) संबंधीत मार्ग वापरता येईल. प्रयोगाच्या वेळी संबंधीत व्यक्तीशिवाय इतर व्यक्तीस प्रवेश दिला जाणार नाही. प्रयोग कालावधीत मा.आयुक्त यांनी प्राधीकृत केलेला अधिकारी व व्यवस्थापक यांना कोणत्याही भागास भेट देता येईल. यास आयोजकास प्रतिबंध करता येणार नाही.
19. प्रयोगाच्या वेळी गोंधळ होणार नाही याची खबरदारी आयोजक यांनी घ्यावी. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी आयोजक यांची राहील. त्यामुळे मालमत्तेचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई साठी बाजार भाव प्रमाणे / महानरगपालिकाचे दर पत्रकातील दरासह 20 टक्के जादा रक्कम दंड स्वरुपात आकारण्यात येईल. सदर रक्कम अनामत रक्कमेतून कपात करण्यात येईल.
20. प्रयोग कालावधीत सभागृहात थुंकणे, धुम्रपान करणे किंवा आक्षेपार्ह वर्तन करण्यास मज्जाव राहील. अशा वर्तवणूक करणा-यांस रक्कम रु.500/- प्रतीव्यक्ती प्रमाणे दर आकारण्यात येईल व संबंधीतास सभागृहाबाहेर काढण्याचा अधिकार व्यवस्थापकास राहील.
21. आयोजकाने कागदी कचरा होणारे चमकी, फटाके अथवा शोभेचे फटाके स्प्रे स्टेजवर व परिसरात उडवू नये. तसेच सभागृह परिसरात बॅनर / पोस्टर / स्टीकर चिटकवून विद्रयुपीकरण करु नये.
22. आठ दिवसापेक्षा भाडे रकमेच्या व्यतिरिक्त इतर कुठलिही थकबाकी असल्यास पुढील आरक्षण दिले जाणार नाही.
23. वरील सर्व नियम व अटी आयोजकास बंधनकारक राहतील. उक्त अटी शर्तींचे पालन न झाल्यास अनामत रक्कमेतून रक्कम रु.5,000/- ची कपात करण्यात येईल.
24. सदरच्या नियमांत भर टाकणे व बदल करणे साठी कोणतीही पूर्वसुचना न देता बदल करण्याचा अधिकारी मा.आयुक्त यांना राहील. उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1044/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या विभागामार्फत वंदे मातरम सभागृहाचा ताबा घेण्यात आलेला आहे. यापुढे सदरील सभागृह हे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका स्वत: चालविणार/ भाडेतत्वावर

देणार आहे. एक सत्र हे 04 तासाचे असेल. मुख्य कार्यक्रम 03 तासाचा असुन अर्धा तास आधी व अर्धा तास नंतर सभागृह वापरण्यास मिळेल. महानगरपालिके तर्फे सदरचे सभागृह चालवण्यासठीचे दर पुढीलप्रमाणे प्रमाणे

| **मुख्य सभागृह (आसन क्षमता 1077)** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विवरण** | **भाडे र.रु (एका सत्रासाठी)** | **अनामत र.रु (एका सत्रासाठी)** |
| 1. | नाटक, शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य | रु. 15,000/- | रु. 10,000/- |
| 2. | शालेय कार्यक्रम / बक्षीस वितरण | रु. 12,000/- | रु. 10,000/- |
| 3. | सभा संमेलने / परिषद / चित्रीकरण / जादुचे प्रयोग / सांस्कृतिक व इतर कार्यक्रमासाठी | रु. 20,000/- | रु. 10,000/- |
| 4. | लावणी, लोकनृत्य | रु.35,000/- | रु. 50,000/- |
| 1.जी.एस.टी. 18 टक्के भाडे रक्कमे व्यतिरिक्त आकारण्यात येईल.<br>शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी प्रयोग केल्यास रु.1,000/- दर जादा आकार पडेल. | | | |

| **परीसंवाद व्यासपीठ (आसन क्षमता 100)** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विवरण** | **भाडे र.रु (एका सत्रासाठी)** | **भाडे र.रु. (एक दिवसा साठी) (स.10 ते सा.06 )** | **अनामत र.रु (एका सत्रासाठी)** |
| 1. | शालेय कार्यक्रम / बक्षीस वितरण, शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य / सभा संमेलने / परिषद / चित्रीकरण / जादुचे प्रयोग / सांस्कृतिक व इतर कार्यक्रमा साठी | रु.5,000/- | रु.10,000/- | रु.5,000/- |
| 1. जी.एस.टी. 18 टक्के भाडे रक्कमे व्यतिरिक्त आकारण्यात येईल.<br>2. शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी प्रयोग केल्यास रु.1,000/- दर जादा आकार पडेल. | | | | |

| **प्रती कला दालन दर** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विवरण** | **भाडे रक्कम रु एक दिवसासाठी** | **अनामत रक्कम रु एक दिवसासाठी** |
| **1.** | शालेय कार्यक्रम / बक्षीस वितरण, शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य / सभा संमेलने / परिषद / चित्रीकरण / जादुचे प्रयोग / प्रदर्शन / रंगीत तालीम / सांस्कृतिक व इतर कार्यक्रमासाठी | रु.4,000/- | रु.5,000/- |
| जी.एस.टी. 18 टक्के भाडे रक्कमे व्यतिरिक्त आकारण्यात येईल. | | | |

| **एम्फी थेअटर (आसन क्षमता 150)** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विवरण** | **भाडे र.रु (एका सत्रासाठी)** | **भाडे र.रु. (एक दिवसासाठी)** | **अनामत र. (एका सत्रासाठी)** |
| 1. | शालेय कार्यक्रम / बक्षीस वितरण, शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य / सभा संमेलने / परिषद / चित्रीकरण / जादुचे प्रयोग / रंगीत तालीम / सांस्कृतिक व इतर कार्यक्रमासाठी | रु.1,000/- | रु.2,500/- | रु.2,000/- |
| जी.एस.टी. 18 टक्के भाडे रक्कमे व्यतिरिक्त आकारण्यात येईल. | | | | |

| **संस्थेस आवश्यकता असल्यास प्रती महा करारनामा तत्वावर हॉल** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विवरण** | **तपशील** | **प्रती महा भाडे रक्कम रु** | **अनामत रक्कम रु** |
| 1. | शास्त्रीय गायन / शास्त्रीय नृत्य / रंगीत तालीम / सांस्कृतिक व इतर कार्यक्रमासाठी | परीसंवाद व्यासपीठ | रु.8,000/- | रु.5,000/- |
| 2. | | प्रती कला दालन | रु.5,000/- | रु.5,000/- |
| 3. | | एम्फी थेअटर | रु.3,000/- | रु.5,000/- |
| 1. आठवड्यातून मात्र दोन दिवसांकरीता 03 तासांकरीता परवानगी असेल.<br>2. जी.एस.टी. 18 टक्के भाडे रक्कमे व्यतिरिक्त आकारण्यात येईल.<br>3. 09 ते रात्री 11 उपलब्ध करुन देण्यात यईल. | | | | |

| **रुम एकूण 11** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विवरण** | **प्रती रुम भाडे र.रु एक दिवसासाठी** | **प्रती रुम अनामत र.रु एक दिवसासाठी** |
| 1. | कलावंतांसाठी 05 रुम (साधारण) | रु.1,500/- | रु. 5,000/- |
| 2. | कलावंतांसाठी 06 रुम (विशेष) | रु.2,000/- | रु. 5,000/- |
| जी.एस.टी. 18 टक्के भाडे रक्कमे व्यतिरिक्त आकारण्यात येईल. | | | |

उपरोक्त दरास अटी शर्ती नियमावलीचा प्रस्ताव प्रस्तावित केल्याप्रमाणे मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1045/2023:-</u>** **(नगर रचना विभाग)** **(दि02.11.2023)**

प्रशासक, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचा प्रशासकीय कारभार हा न.भु.क्र.3167 व 2383 मोहल्ला टाऊन हॉल येथील अस्तित्वातील सार्वजनिक वापर (Public and semi public) नमुद असलेल्या अस्तित्वातील दोन्ही इमारती मधुन सुरु आहे. त्यापैकी न.भु.क्र.3167 या मिळकतीवरील इमारतीमध्ये अधिकारी व पदाधिकारी यांचे दालन असुन न.भु.क्र.2383 या मिळकतीवरील इमारतीमध्ये तांत्रिक विभाग कार्यरत आहेत. या दोन इमारतीमध्ये कारभार सुरु असल्याने कर्मचाऱ्यांना व शहरातील नागरीकांना गैरसोईचे होत आहे. करीता महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत एकाच ठिकाणी असावी असे विचाराधीत आहे.

मोहल्ला मजनुहिल एन-10, सिडको छत्रपती संभाजीनगरही जागा सिडको विकास योजना नकाशानुसार उद्यान (Garden) यासाठी राखीव असुन सदरचे क्षेत्र सन-2006 साली सिडको कार्यालयकाडून छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले आहे. त्यापैकी काही क्षेत्रावर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची मौलाना आझाद संशोधन केंद्र यांची इमारत अस्तित्वात आहे.

उर्वरित क्षेत्रापैकी सुमारे 18,000.00 चौ.मी.क्षेत्रावर महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत बांधण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे विचाराधीन असून सिडको कार्यालयाने मंजुर केलेल्या विकास योजना नकाशामध्ये दर्शविण्यात आलेल्या वापरामध्ये बदल करावा या बाबत प्रस्ताव सादर करण्याचे ठरले आहे. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-1966 चे कलम-37 नुसार गौण फेरबदल करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

सदरचा बदल हा सिडको कार्यालयाने मंजुर केलेल्या विकास योजनेतील उद्यान (AMC Garden) यासाठी राखीव असलेल्या क्षेत्रा संदर्भाने आहे. उपरोक्त बाबींचा विचार करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-1966 चे कलम-37 नुसार गौण फेरबदल प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1045/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला मजनुहिल एन-10, सिडको, छत्रपती संभाजीनगर ही जागा सिडको विकास योजना नकाशानुसार उद्यान (Garden) यासाठी राखीव असुन सदरचे क्षेत्र सन 2006 साली सिडको कार्यालयाकडून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले आहे. त्यापैकी काही क्षेत्रावर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची मौलाना आझाद संशोधन केंद्र यांची इमारत अस्तित्वात आहे.

उर्वरित क्षेत्रापैकी सुमारे 18,000.00 चौ.मी.क्षेत्रावर महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत बांधण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे विचाराधीन असून सिडको कार्यालयाने मंजुर केलेल्या विकास योजना नकाशामध्ये दर्शविण्यात आलेल्या वापरामध्ये बदल करावा व या बाबत प्रस्ताव सादर करण्याचे ठरले आहे. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम-37 नुसार गौण फेरबदल करण्याचा गौण फेरबदलाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1046/2023:-** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.02.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव औचित्य साधून त्या निमित्त करावयाच्या विविध विकास कामांमधील मुकूंदवाडी बसस्टॉप सोहम मोटर्स ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत डांबरी रस्ते फुटपाथची कामे करुन सुशोभिकरण करणे या कामाचे र.रु.69,74,945/- च्या कामास प्रशसाकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा मागविण्यात आली असता, निविदा मागविण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोननिविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| 1. | मे.मस्कॉट कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 5.00 टक्के कमी |
| 2. | मे.बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज | अं.प.दरापेक्षा 6.87 टक्के कमी |

वरील प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.87 टक्के कमी दराची निविदा मे.बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज यांची आहे. तरी, मे.बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.87 टक्के कमी दराची निविदा मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1046/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव औचित्य साधुन निमित्त करावयाच्या विविध विकास कामांमधील मुकूंदवाडी बसस्टॉप सोहम मोटर्स ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत डांबरी रस्ते फुटपाथची कामे करुन सुशोभिकरण करणे या कामाचे र.रु.69,74,945/- च्या कामाची मे.बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.87 टक्के कमी दराची निविदा मंजुरी बाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1047/2023:-** **(शिक्षण विभाग)** **(दि.03.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या 58 केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना सर्वशिक्षा अभियान योजनेअंतर्गत गणवेशचा लाभ दिला जातो. उर्वरित बालवाडी, इयत्ता 9 वी व 10 वीतील विद्यार्थ्यांना महानगरपालिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेतून गणवेशचा लाभ दिला जातो. त्यानुषंगाने बालवाडी इयत्ता 9 वी व इयत्ता 10 पर्यंत गणवेश लाभार्थ्यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ग | एकुण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1. | बालवाडी | 3475 |
| 2. | इयत्ता 9 वी व 10 वी | 1815 |
| 3. | एकुण | 5290 |

उपरोक्त प्रमाणे सन 2023-24 या शैक्षणिक वर्षात एकुण 58 शाळेतील विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी र.रु.600/- (ज्यात दोन गणवेश खरेदी शिलाई समाविष्ट) यापमाणे एकुण विद्यार्थी 5290 नुसार

र.रु.31,74,000/-(अक्षरी एकतीस लक्ष चौऱ्याहत्तर हजार मात्र) खर्च होणार आहे. सदर लाभार्थ्यांना शिक्षण विभागा अंतर्गत सन 2023-24 च्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजना पृष्ठ क्र.ई-42 वरील अनु.क्र.07 सांकेतांक 82027400011 तरतुद र.रु.40 लक्ष च्या अधिन राहून खरेदी करावयाचे आहे. करीता. र.रु.31,74,000/- (अक्षरी एकतीस लक्ष चौऱ्याहत्तर हजार मात्र) शालेय व्यवस्थापन समिती (सचिव तथा मुख्याध्यापक) यांना अदा करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1047/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या 58 केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळांतील सर्वशिक्षा अभियान योजने मधुन राहिलेल्या बालवाडी, इयत्ता 9 वी व 10 वीतील विद्यार्थ्यांना महानगरपालिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेतून गणवेशचा लाभ दिला जातो. सदर लाभार्थ्यांना सन 2023-24 या शैक्षणिक वर्षात प्रती विद्यार्थी र.रु.600/- (ज्यात दोन गणवेश खरेदी शिलाई समाविष्ट) याप्रमाणे एकुण विद्यार्थी 5290 नुसार र.रु.31,47,000/- (अक्षरी एकतीस लक्ष चौऱ्याहत्तर हजार मात्र) खर्च होणार आह. सदर लाभार्थ्यांना शिक्षण विभागाअंतर्गत सन 2023-24 च्याअर्थसंकल्पातील लेखाशिर्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजना पृष्ठ क्र.ई-42 वरील अ.क्र.07 सांकेतांक 82027400011 तरतुद र.रु.40 लक्षच्या अधिन राहून खरेदी करण्यासाठी र.रु.31,74,000/- (अक्षरी एकतीस लक्ष चौऱ्याहत्तर हजार मात्र) शालेय व्यवस्थापन समिती (सचिव तथा मुख्याध्यापक) यांना अदा करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1048/2023:-</u>** **(शिक्षण विभाग)** **(दि.03.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खालीलप्रमाणे सहशिक्षक/उपशिक्षक यांचे पती-पत्नी एकत्रीकरण/एकतर्फी आंतर जिल्हा बदलीने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत सेवा वर्ग करण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

| अ क्र | शिक्षकाचे नाव | जिल्हा परिषद/ /नगारपरिषद/ नगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | नेमणुकीचा संवर्ग | प्रस्ताव ना हरकत जा.क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री केशव गोविंदा तांबे | जिल्हा परिषद, नंदुरबार | खुला | जा.क्र/जिपनं/शिक्षण/आस्था-1/आजिब/157/2023 दि.10.03.2023 |
| 2 | श्री.योगेश निवृती खोसरे | जिल्हा परिषद, सिंदुदुर्ग | खुला | जा.क्र/सिंजिप/शिक्षण/प्राथ./आस्था-3/6587/2023, दि.09.03.2023 |
| 3 | श्री.भगवान महादू लखवाळ | जिल्हा परिषद, नंदुरबार | खुला | जा.क्र/जिपनं/शिक्षण/आस्था-1/163/2023, दि.10.04.2023 |
| 4 | श्री.अंबादास उतमराव कन्हाळे | जिल्हा परिषद, नंदुरबार | खुला | जा.क्र/जिपनं/शिक्षण/आस्था-1/164/2023,दि.10.04.2023 |
| 5 | श्री.विजय कृष्णा लोखंडे | जिल्हा परिषद, नंदुरबार | खुला | जा.क्र/जिपनं/शिक्षण/आस्था-1/271/2023, दि.19.05.2023 |
| 6 | श्री.संदीप महादू मुळे | जिल्हा परिषद, नंदुरबार | खुला | जा.क्र/जिपनं/शिक्षण/आस्था-1/272/2023, दि.19.05.2023 |
| 7 | श्री.शेख अरशद शेख इस्माईल | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका | खुला | जा.क्र/मनपा/प्राशिवि/2021/1267 दि.14.12.2021 |
| 8 | श्रीमती सदफ जरीन मिर्झा नवाज बेग | महानगरपालिका शिक्षण मडळ, जळगाव | खुला | जा.क्र/मनपा/शिक्षण/NOC/2022/306,दि.22.02.2022 |
| 9 | श्री.शेख अकिल शेख इस्माईल | महानगरपालिका शिक्षण मडळ, जळगाव | खुला | जा.क्र/मनपा/शिक्षण/NOC/2022/314,दि. 24/02/2022 |
| 10 | श्री.शेख रेहान शेख भिकन | महानगरपालिका शिक्षण मंडळ, जळगाव | खुला | जा.क्र/मनपा/शिक्षण/NOC/2022/312,दि.24.02.2022 |

करिता उपरोक्त प्रमाणे सहशिक्षक/उपशिक्षक यांना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सेवा वर्ग करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1048/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अ.क्र.1 ते 16 मध्ये नमूद सहशिक्षक/उपशिक्षक यांना पती-पत्नी एकत्रीकरण/एकतर्फी आंतर जिल्हा बदलीने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थापने वर सेवा वर्ग करण्यास मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1049/2023:-</u>** **(उप अभियंता जलनि:स्सारण व इमारत विभाग)** **(दि.03.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या गरवारे क्रिडा संकुल येथे कलाग्राम लगत (उत्तर बाजुस) क्रिकेट खेळासाठी पिचेस तयार करणे, या कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.904/2023 दि.17.08.2023 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प लेखाशिर्षक गरवारे क्रिडा संकुलाचा दर्जा वाढविणे व देखभाल दुरुस्ती करणे या उपलब्ध निधीतून करण्यात येणार आहे.

या कामासाठी ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविल्या असता, प्रथम वेळेस अंतिम दिनांकापर्यंत 02 निविदा दर भरणा करुन प्राप्त झाल्या आहेत. निविदेच्या अटी व शर्तीनुसार निविदा धारक यांनी सादर केलेल्या कागदपत्रान्वये 02 निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरले आहेत. प्राप्त दोन पात्र निविदाधारकांपैकी सर्वात कमी दराची निविदा M/s.Vijay Construction यांची असुन ती अंदाजपत्रकीय दराची आहे.

संदर्भ:-Tender ID_2023_AMCA_941098_1

| | | |
|---|---|---|
| 1. | विभागाचे नाव | कार्यकारी अभियंता, इमारत व उद्यान विभाग |
| 2. | कामाचे स्वरुप | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या गरवारे क्रिडा संकुल येथे कलाग्राम लगत (उत्तर बाजुस) क्रिकेट खेळासाठी पिचेस तयार करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, अं.प.र.रु.64,37,491/-मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.904/2023 दि.17.08.2023 |
| | अ)त्यापैकी किती रक्कमेचे निविदा मागविण्यात आले? | र.रु.50,90,036/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत निविदेची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.लोकमत दि.06.09.2023<br>मिड-डे वर्तमानपत्र दि.06.09.2023 |
| 5. | अ) निविदा स्विकारण्याची मुदत | दि.02.09.2023 ते 09.09.2023 |
| | ब) निविदा उघडल्याचा दिनांक | 11.09.2023 |
| | क) निविदा काढण्याची वेळ | प्रथम |
| | ड) एकुण प्राप्त निविदा | 02 (पात्र-2, अपात्र-0) |

(त्यापैकी पात्र टेंडरधारकाची माहिती खालील तक्त्यात आहे)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | टेंडर र.रु. | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रुपये | टक्केवारी |
| 1. | विजय कन्स्ट्रक्शन | र.रु.50,90,036/- | र.रु.50,90,036/- | अं.प. दराने |
| 2. | बाबुराव केरबा अदमाने | र.रु.51,40,937/- | र.रु.51,40,937/- | अं.प.दरापेक्षा 1%जास्त दराने |

| अ क्र | संक्षिप्त तपशील | शेरा |
|---|---|---|
| 1. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | | नाही |
| | क) असल्यास कारणे नमुद करावीत. | | --- |
| 2. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | मनपा अर्थसंकल्प लेखाशिर्षक गरवारे क्रिडा संकुलाचा दर्जा वाढविणे व देखभाल दुरुस्ती करणे. | |
| 3. | सदर कामास खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | | होय |
| 4. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | | नाही |
| 5. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | | होय |

उक्त निविदाधारकांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही M/s.Vijay Construction यांची असुन ती अं.प.दराची आहे. करीता सर्वात कमी दराची निविदा M/s.Vijay Construction यांची अं.प.दराची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1049/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या गरवारे क्रिडा संकुल येथे कलाग्राम  लगत (उत्तर बाजुस) क्रिकेट खेळासाठी पिचेस तयार करणे या कामाच्या प्राप्त निविदां पैकी सर्वात कमी दराची M/s.Vijay Construction यांची अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1050 /2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता इमारत व जलनि:स्सारण विभाग)** **(दि.03.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-11 सिडको या ठिकाणी, सिडको प्राधिकरणाच्या नियोजना नुसार व विकास योजना नकाशा नूसार खुली जागा (0-24) नुसार स्थित आहे. सध्या या जागेमध्ये सुमारे 10 वर्षाहुन अधिक कालावधी पासुन विनापरवानगी अनधिकृतरित्या भाजी मंडई भरत असुन सदयस्थितीत येथे कमी अधिक संख्येने भाजी विक्रेते या ठिकाणी अनाधिकृतरित्या भाजी-पाला विक्रीचा व्यवसाय करीत आहेत. या जागेचे एकुण क्षेत्रफळ सुमारे 4072.07 चौ.मी.असुन, लगत परिसरा मध्ये भाजी मंडईसाठी नागरीकांच्या सोयीसाठी विशेष आरक्षित जागा नसल्याने व ही जागा या परिसरा साठी योग्य असल्याने नागरिक या जागेचा वापर भाजी मंडईसाठी करीत आहेत.सदर ठिकाणी होत असलेला भाजी मंडईचा वापर अनुदेय करुन येथे भाजी विक्रेत्यांसाठी गाळे बांधण्यात यावे, अशी या भागातील नागरिक व जन प्रतिनिधी यांची मागणी आहे. याच अनुषंगाने वर्ष-2019 मध्ये मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.1246 दि.19.12.2019 अन्वये, या जागेत नियमित भाजी मंडई भरविण्यात यावी व येथे व्यवसाय करुन इच्छिणाऱ्या भाजी विक्रेत्या कडून योग्य ते भाडे आकारणी करुन, जागेचा भाजी मंडई साठी होत असलेल्या वापर नियमित करण्यात यावा, अशा आशयाचा अशासकीय ठराव पारीत केलेला आहे.

त्यामुळे सदर विषयाच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर शहर मंजुर विकास नियंत्रणा नियमावली नियम क्र.25:8 मध्ये आरक्षित जागेत अनुज्ञेय वापरा बाबत नगर रचना विभागाने छत्रपती संभाजीनगर शहरासाठी लागू असलेला विकास नियंत्रण नियमावलीतील (Development Control Rule) नियम क्रमांक16.2 नुसार, एकुण आरक्षित क्षेत्राच्या 40% एवढया क्षेत्राचा वापर, भाजीमंडई च्या उद्देशासाठी करता येत असल्याचा अभिप्राय दिला असल्याने या बाबीस मा. प्रशासक तथा आयुक्त यांच्या विशेष अधिकारात प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

प्राथमिक नियोजना नुसार या जागेचे नियोजन केले असता, या खुल्या जागेचे एकुण क्षेत्र सुमारे 4072.07 चौ.मी.पौकी, 40% क्षेत्रफळाची जागा म्हणजेचे 1628.80 चौ.मी.जागेत भाजी मंडईतील रस्त्या साठी ची सोडुन 2 मी.X 2 मी. आकाराचे, सुमारे 140 भाजी/फळ विक्रेत्यांसाठी आधुनिक पद्धतीचे शेड वजा ओटे बांधण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सदर ठिकाणी प्राथमिक सर्वेक्षण करतांना येथे भाजी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या भाजी विक्रेत्यांना विचारणा केली असता, त्यांनी भाजी विक्रीचा

व्यवसाय करणेसाठी महानगरपालिकेने अनुमती दिल्यास त्यासाठीचे ओटे बांधुन दिल्यास ते यासाठी मनपाच्या सूचने नुसार मासीक भाडे व योग्य अनामत रक्कम भरण्यास तयार आहेत. जेणे करुन या जागेचा ते करीत असलेला वापर करणे त्यांना सोईचे होईल अशी तोंडी विनंती केली आहे.

प्रस्तावीत नियोजना नुसार या कामासाठी सा.बा.दरसुची सन 2021-2022 नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. यामध्ये किरकोळ खर्चासाठी व काम करीत असलेले वास्तुविशारद श्री. आशिष जोशी यांचे सेवा शुल्क देणेसाठी आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. कामाच्या संकलने नूसार या 140 गाळयासाठीची अनामत रक्कम या ठिकाणी भाजी विक्रीचा व्यवसाय करुन इच्छिणाऱ्या स्वारस्य, भाजी विक्रेत्याकडून वसुल करण्यात येणार आहे. त्यामुळे व सदर प्रस्तावीत प्रकल्प स्वअर्जित प्रकल्प असल्याने यासाठी कोणताही आर्थिक भार मनपावर येणार नाही. या संकुलात निर्माण होणाऱ्या प्रत्येक गाळयास अनामत र.रु.1.25 लाख रक्कमे व्यतिरिक्त प्रति दिन रु.50/- प्रमाणे भाडे आकारण्यात येणार आहे. गाळे तयार झाल्यानंतर प्रथम तीन वर्षाच्या कालावधीसाठी मासीक भाडयाची रक्कम आगावु स्वरुपात भरणा करून घेण्यात येईल. सदर गाळ्यासाठीचा सुरुवातीचा तीन वर्षाचा करार कालावधी संपल्यानंतर बिनव्याजी स्वरुपाने ही अनामत रक्कम परत करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, गाळे धारकांची विनंती असल्यास कराराचा कालावधी पुढे वाढविण्याची कार्यवाही पुर्वीची कार्यालयाकडे जमा असलेली अनामत रक्कम परत न करता, महानगरपालिकेकडे तशीच राखीव ठेऊन करार कालावधी वाढविण्यात किंवा संमती नसल्यास अनामत रक्कम बिनव्याजी परत करून ओट्याचे वितरण रद्द करण्यात येईल. गाळे/ओटे साठीचे भाडे वसुली करणे व त्यासाठीची अनामत रक्कम भरणा करुन गाळेधारक/भाजी-पाला ओटे धारक यांचे समवेत मनपाचे वतीने करार करणे व इतर कार्यवाही मालमत्ता विभागाकडून करण्यात येईल यावर अनामत रक्कमेवर कधीही व कोणतेही व्याज मागणीचा अधिकार प्रकल्पात सहभागी गाळेधारक यांना राहणार नाही, किंबहुना याच अटीवर स्वारस्य असेलेल्या गाळेधारक/भाजी-पाला विक्री ओटे यांना करारावर देण्याचे कार्यालयाचे नियोजन आहे. या दैनिक भाड्यामध्ये दर तीन वर्षांनी 15% वाढ करण्यात येईल व ही वाढ सर्व गाळेधारक/भाजी पाला विक्री करणारे व ओटयाचा वापर करणारे व्यापारी यांना ही दरवाढ बंधनकारक राहिल.

वर नमूद प्रमाणे एन-11 सिडको, येथील खुल्या जागेत (0.24) अनुदेय मर्यादित सरासरी 2 मीटर X 2 मीटर आकाराचे 140 गाळे/भाजीपाला विक्रीचे ओटे बांधणे या साठी सा.बा. दरसुची सन 2021-2022 च्या दरानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. या प्रकल्पा मधून मनपाला अनामत रक्कमेपोटी रु.1.75 कोटी निधी वापरण्यास मिळणे अपेक्षित असुन, सर्व गाळयांचे सरासरी मासीक भाडे रु.1500/- प्रमाणे 140 गाळयांसाठी रु.2,10,000/- उत्पन्न प्रति/महिना व वार्षीक रु.25,20,000/- उत्पन्न प्राप्त होईल. अंदाजपत्रकात खालील प्रमाणे तरतुदी करण्यात आल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | शेड व ओटे बांधणे | रु.95,80,449.00 |
| 2 | फळ/भाजी ओटे बांधणे | रु.7,99,203.00 |
| 3 | आर.सी.सी.गटार बांधणे | रु.10,95,669.00 |
| 4 | वॉचमन रूम व प्रवेशव्दार बांधणे | रु.3,09,346.00 |
| | **एकुण** | **रु.117,84,667.00** |
| 1 | विद्युती करणासाठी आर्थिक तरतुद 5% | रु.4,79,022.00 |
| 2 | किरकोळ खर्चासाठी तरतुद 5% | रु.5,89,233.00 |
| 3 | वास्तुविशारद यांचे सेवा शुल्क (एक रक्कमी) | रु.50,000.00 |
| 4 | वस्तु व सेवा करासाठी तरतुद 18% | रु.22,07,464.00 |
| | **एकुण** | **रु.1,51,10,000.00** |

तरी या कामाचा अंदाजपत्रकास व या प्रकल्पाचे काम सुरुवाती पासुन काम करीत असलेले वास्तुविशारद श्री.आशिष जोशी यांची कार्यात्तर नेमणूक होऊन, त्यांचे या प्रकल्पासाठीचे एकत्रित सेवा मुल्य र.रु.50,000/- सर्व कारसह अदा करणेस मंजुरी देणे बाबतचा, तसेच मालमत्ता विभागाकडून प्रस्तावात नमूद केल्यानुसार सदर संकुलातील गाळे/ओटे तयार झाल्यानंतर, स्वारस्य असलेल्या गाळेधारका कडून, प्रत्येक गाळे निहाय अनामत रक्कम भरणा करुन घेणे व जमा होणाऱ्या रकमेतून

कामाच्या बांधकामाचा खर्च करणे. पुढील कालावधीत देखभाल दुरुस्ती व रंगकाम करणेचा खर्च भागविणे, तसेच प्रत्येक यशस्वी गाळेधारकाकडून, निश्चित केल्यानूसार पहिल्या तीन वर्षासाठी प्रतिदिन रु.50/- प्रमाणे रक्कमेचा भरणा करुन घेणे, या प्रकल्पाचा जमा-खर्चाचा हिशोब मालमत्ता विभागा मार्फत ठेवुन, यासाठी स्वतंत्र बँक खाते उप आयुक्त,मनपा छत्रपती संभाजीनगर या नावे काढणे या व इतर अनुषंगीक कार्यवाही वर निर्णय घेण्याचे अधिकार मा.प्रशासक/आयुक्त यांना प्रदान करणे या सर्व बाबीस मंजुरी देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1050 /2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहर मंजुर विकास योजना नियमावली नुसार एकुण जागेपौकी अनुदेय मर्यादित 2 मी X2 मी आकाराचे भाजी विक्रीसाठीचे 140 गाळे/ओटे बांधणे या कामाचे अंदाजपत्रक रु.1,51,10,000/- यास मंजुरी देण्यात येते. त्यासाठी नियमानुसार विभागाने निविदा काढणे तसेच या संकुलातील गाळयासाठी, सदर ठिकाणी भाजी-पाला विक्रीचा व्यवसाय करुन इच्छिणा-या भाजी विक्रेत्याकडून एक रक्कमी, बिनव्याजी प्रत्येक ओटे निहाय रु.1.25 लाख रक्कमेचा भरणा करुन घेणे, सुरुवातीला पहिल्या तीन वर्षासाठी प्रतिदिन रु.50/- या प्रमाणे भाडे रक्कमेचा भरणा करुन घेणे या दैनिक भाड्यामध्ये दर तीन वर्षांनी 15% वाढ करण्यात येईल व ही वाढ सर्व गाळे धारक/ भाजी पाला विक्री करणारे व ओटयाचा वापर करणारे व्यापारी यांना ही दरवाढ बंधनकारक राहिल. या प्रकल्पासाठी स्वतंत्र्य बँक खाते उघडणे व ओटे बांधण्याच्या कामाचा खर्च स्थापत्य/कंत्राटदाराचे देयक याच खात्यातुन करणे, भविष्यात वेळोवेळी देखभाल दुरुस्ती व रंगकाम करणे बाबतची कार्यवाही कार्यकारी अभियंता (इमारत व उद्यान) यांच्या रितसर मान्यतेने करणे, यासाठी तसेच या प्रकल्पात तयार होणारे भाजी/फळ विक्रेते भाडे करारावर देणेसाठी कार्यवाही करणे साठीची कार्यवाही मालमत्ता विभागाने करणेस योग्य ती अनुषंगीक कार्यवाही करणे, तसेच कामासाठी कार्यरत वास्तुविशारद श्री.आशिष जोशी यांची नियुक्तीस मान्यता प्रदान करुन त्यांचे एक रक्कमी सेवा मुल्य रु.50,000/- सर्व करासह जमा रकमेतून अदा करणे इत्यादी सह सर्व अनुषंगिक बाबीस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1051/2023:-</u>** **(आरोग्य विभाग)** **(दि.03.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र.जिनिस/जिवायो/प्राआ/2024-25/प.व्य/2638 दि.20.10.2023 नुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2024-2025 चा प्रारुप आराखडा तयार करण्यासाठी योजना निहाय प्रस्तावित निधी मागणीचा आराखडा सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार आरोग्य विभागाचे सक्षमीकरणासाठी खालील 13 बाबीकरिता अनूदान मागणीसाठी प्रसताव सादर.

| Sr No | Particular | Qty | Rate in Rs./piece | Total Cost in 1000 Rs. | Justification | Remark |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | High end USG machine with colour Doppler with 3D/4D capability | 5 | 6,200,000 | 31,000 | For all citizens specially for Pregnant women | At 5 indoor facilities (Cidco N-8,N-11, Kaiser colony, Bansilalnagar, silk mill colony hospitals) |
| 2 | Mobile X-ray machine with DR | 4 | 18,500,00 | 7400 | For all citizens | At 4 Indoor facilities (cidco N-8,N-11 Kaiser colony Bansilal nagar hospitals) |
| 3 | Digital Foetal Doppler | 41 | 5000 | 205 | To record foetal heart sound in pregnant women | For all Health facilities |
| 4 | CTG Foetal Doppler | 6 | 54000 | 321 | To record foetal heart sound in pregnant women | At 6 Indoor facilities (CIdco N-8,N-11 Kaiser colony, Bansilalnagar, silk mill colony, Meltron hospirals) |
| 5 | Medicine/dits | | 100000000 | 100000 | | For all 41 Health facilitie |
| 6 | Central Diagnostic Lab | 1 | 10000000 | 10000 | | In CSMC area |
| 7 | Modular OT | 6 | 11200000 | 67200 | For family planning and | At 6 Indoor facilities (CIdco N-8,N-11 Kaiser |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | other surgeries | colony, Bansilalnagar, silk mill colony, Meltron hospirals) |
| 8 | Modular Labour Room | 6 | 5300000 | 31800 | For Deliveries | At 6 Indoor facilities (CIdco N-8,N-11 Kaiser colony, Bansilalnagar, silk mill colony, Meltron hospirals) |
| 9 | Digital Child Weighing machine | 100 | 3500 | 350 | Two machines/ health facility | Total 82 machines for 41 facilities one machine for each UHWC total 18 machines for UHWC |
| 10 | Suction machine for neonates | 6 | 4500 | 27 | One mafchine/ Indoor facility | At 6 Indoor facilities (CIdco N-8,N-11 Kaiser colony, Bansilalnagar, silk mill colony, Meltron hospirals) |
| 11 | Suction machine for adults (Noiseless high pressure) | 6 | 8232 | 49.392 | One machine/ Indoor facility | At 6 Indoor facilities (CIdco N-8,N-11 Kaiser colony, Bansilalnagar, silk mill colony, Meltron hospirals) |
| 12 | Material, Instruments, x-ray films etc for dental procedures at N-8 hospital | | 150000 | 150 | | At cidco N-8 hospital |
| 13 | Dental Chair | 2 | 180000 | 360 | | At cidco N-11 hospital and silk mill colony |
| Total Budget | | | | 248865.392 | | |

उपरोक्त 1 ते 13 बाबी खरेदी करण्यासाठी र.रु.24,88,65,392/- (रुपये चोवीस कोटी अठ्ठ्याऐंशी लक्ष पासष्ट हजार तीनशे ब्यान्नव फक्त) अनुदान प्राप्तीसाठी प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस सादर करण्याच्या मान्यतेस्तव सादर. तसेच अनुदान प्राप्तीनंतर सदरील खरेदी ही विहीत पध्दतीने करणे व उपरोक्त साहित्यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याच्या मान्यतेस्तव सादर. प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1051/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2024-25 चा आरोग्य विभागासाठी प्रारुप आराखडा तयार करण्यात आलेला आहे. आरोग्य विभागाचे सक्षमीकरण्यासाठी 13 बाबी करिता रु.24,88,65,392/- (रुपये चोवीस कोटी अठ्ठयांऐशी लक्ष पासष्ट हजार तीनशे बावन रुपये फक्त) निधी मागणीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस सादर करण्यास व तसेच अनूदान प्राप्तीनंतर सदरील खरेदी ही विहीत पध्दतीने करणे व उपरोक्त साहित्या मध्ये आवश्यक्ते नूसार बदल सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1052/2023:-</u>** **(आरोग्य विभाग)** **(दि.03.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन आपल्यादारी या तत्वावर छत्रपती संभाजीनगर हद्दीतील सर्व नागरिकांची सर्वकष वैद्यकीय तपासणी, उपचार करण्याकरिता दि.13.10.2023 रोजी महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आलेले होते. सदरील शिबिर आयोजन करण्याबाबत शासन स्तरावरुन सूचना होत्या. सदरील महाआरोग्य शिबीराची पुर्वतयारी, रुपरेषा आखणी व प्रत्यक्ष अंमल बजावणी साठी मा.जिल्हाधिकारी महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आलेली होती. सदरील बैठकीसाठी मा.आयुक्त, मनपा छत्रपती संभाजीनगर, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. छत्रपती संभाजीनगर, अतिरिक्त आयुक्त, अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा प्रशासनाचे अधिकारी तसेच जिल्हा परिषदचे अधिकारी यांची उपस्थिती होती. सदरील महाआरोग्य शिबीरासाठी अतिरिक्त आयुक्त यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. दि.01.08.2023 ते दि.06.08.2023 प्राथमिक तपासणी, दि.07.08.2023 ते दि.11.08.2023 द्वितीय तपासणी व दि.13.08.2023 रोजी प्रत्य उपचार करण्यात आलेले आहे.

दि.01.08.2023 ते दि.13.08.2023 या संपूर्ण कालावधीत मनपा आरोग्य विभागाचा संपूर्ण कर्मचारी वर्ग शिबीरासाठी कार्यरत होता. यामध्ये मनपा आरोग्य विभागाच्या 500 आशा वर्कर या आरोग्य पथका मध्ये घरोघरी जाऊन भेटी, तपासणीसाठी प्रवृत्त करणे, शिबीराचे फायदे, प्राथमिक, द्वितीय व प्रत्यक्ष उपचारासाठी शिबीराच्या ठिकाणी येण्याबाबत मार्गदर्शनाची भूमिका पार पाडलेली आहे.

महाआरोग्य शिबीराच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीमध्ये तसेच मा.आयुक्त यांच्यासोबत झालेल्या चर्चेनुसार आशा वर्कर यांना मानधन देण्याबाबत चर्चा झालेली होती. तसेच अशा वर्कर यांच्या संघटनेने दि.01.08.2023 ते दि.13.08.2023 या 13 दिवसांचे रु.500/-प्रतिदिन याप्रमाणे मानधन देण्याची मागणी केलेली आहे.

आशा वर्कर या कामावर आधारित मोबदला या तत्वावर कार्यरत आहेत. आशा वर्कर यांना महाआरोग्य शिबीराचे सोपविण्यात आलेली कामाची जबाबदारी ही दैनंदिन कामापेक्षा अधिकची असल्याने व जबाबदारीचे महत्वाचे काम असल्यामुळे नोडल अधिकारी यांनी शिफारस केल्यानुसार रु.250/- प्रतिदिन मानधन मनपा फंडातून अदा करण्यासाठी रु.16,25000/- खर्च अपेक्षित आहे. रु.16,25000/- खर्च मनपा फंडातून करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1052/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन आपल्यादारी या तत्वावर छत्रपती संभाजीनगर हद्दीतील सर्व नागरिकांची सर्वकष वैद्यकीय तपासणी, उपचार करण्याकरिता दि.13.10.2023 रोजी महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आलेले होते. सदरील कार्यक्रमात मनपा आरोग्य विभागाच्या 500 आशा वर्कर या आरोग्य पथकामध्ये घरोघरी जाऊन भेटी, तपासणीसाठी प्रवृत्त करणे, शिबीराचे फायदे, प्राथमिक, द्वितीय व प्रत्यक्ष उपचारासाठी शिबीराच्या ठिकाण येणा-याबाबत मार्गदर्शनाची भूमिका पार पाडलेली आहे. दि.01.08.2023 ते दि.13.08.2023 या 13 दिवसांचे रु.250/- प्रतिदिन याप्रमाणे र.रु.16,25000/- मानधन मनपा फंडातून अदा करण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1053/2023:-</u>** **(उद्यान विभाग)** **(दि.03.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.उच्च न्यायालय (खंडपीठ औरंगाबाद) परिसरातील मा.मुख्य न्यायाधीश यांचे निवासस्थान लगत कृत्रिम तलाव आहे. सदर कृत्रिम तलावाचे सुशोभिकरण करणे बाबत दि.04.09.2023 रोजी मा.मुख्य न्यायाधिश, मा. उच्च न्यायालय (खंडपीठ औरंगाबाद) व मा. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचे समवेत संयुक्त स्थळ पाहणी अंती निर्णय झाला. सदर कामांतर्गत कृत्रिम तलाव भोवती जॉगिंग ट्रॅक तयार करणे, गजीबोची उभारणी करणे, कास्टिंग बॅचेस बसविणे, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व एल.ई.डी.बोलार्ड दिवे बसविणे इत्यादी कामाचा समावेश करण्यात आला आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याची दरसुची सन 2022-23 व काही बाबी कोटेशन/मंजुर दरपत्रक आधारे र.रु.29,24,029/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करुन, प्रस्तावीत कामासाठी जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत निधी मिळणे करीता मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव (जिल्हा नियोजन समिती), छत्रपती संभाजीनगर यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव (जिल्हा नियोजन समिती) यांनी दि.20.10.2023 अन्वये प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश निर्गमीत केले आहे.

मा.मुख्य न्यायाधिश, मा. उच्च न्यायालय (खंडपीठ औरंगाबाद) व मा. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचे समवेत संयुक्त स्थळ पाहणी दरम्यान सदर काम तातडीने हाती घेऊन, पुर्ण करणे बाबत सुचना आहे. करीता कामाची तातडी विचारात घेता उक्त काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची-ड, प्रकरण-5 मधील नियम 2 (2) मधील तरतुदी नुसार उपलब्ध गुत्तेदार श्री मुबारक महेबुब पठाण यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने विना निविदा काम करुन घेणेस्तव प्रस्तावीत करण्यात येते.

करीता र.रु.29,24,029/- चे अंदाजपत्रक आणि उपलब्ध गुत्तेदार श्री.मुबारक पठाण यांचेकडुन उक्त तरतुदीनुसार अंदाजपत्रकीय दराने काम करुन घेणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1053/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.उच्च न्यायालय (खंडपीठ औरंगाबाद) परिसरातील मा.मुख्य न्यायाधीश यांचे निवासस्थान लगत असलेल्या कृत्रिम तलावाचे सौंदर्यीकरण करणे अंतर्गत तलाव भोवती जॉगिंग ट्रॅक तयार करणे, गजीबोची उभारणी करणे, कास्टिंग बेंचेस बसविणे, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व एल.ई.डी.बोलार्ड दिवे बसविणे इत्यादी कामांचे अंदाजपत्रक र.रु.29,24,029/- ला आणि सदर कामाचा खर्च जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 अंतर्गत प्राप्त निधी मधुन भागविण्यास मान्यता देण्यात येते. तसेच कामाची तातडीने विचारात घेऊन सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची-ड, प्रकरण-5 मधील नियम 2 (2) मधील तरतुदी नुसार उपलब्ध गुत्तेदार श्री.मुबारक महेबुब पठाण यांचे मार्फत विना निविदा अंदाज पत्रकीय दराने काम करुन घेणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1054/2023:-</u>** **(घनकचरा व्यवस्थापन विभाग)** **(दि.03.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 15 व्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेचा समावेश शासन निर्णय क्र.एफएफसी 2020/प्र.क्र.56/नवि-4, दि.28.10.2020 अन्वये Milion Plus Cities मध्ये करण्यात आलेला असुन निधी वितरण बाबत मार्गदर्शक सूचना करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णय क्र.एफएफसी-2022/प्र.क्र.- 115/ नवि-04, दिनांक 25.10.2022 अन्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस सन 2021- 2022 या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा व व्यवस्थापन सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन यासाठी बंधनकारक अनुदान (Tied Grants) र.रु.31,38,34,885/- एवढा निधी प्राप्त झालेला ने आहे.

15 व्या वित्त आयोगाच्या सन 2021-2022 या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या व पुढील प्राप्त होणा-या बंधनकारक अनुदानातुन (Tied Grants) प्रभावी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वाहतूक करणेच्या कामाचा खर्च भागविणेसाठीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1054/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 15 व्या वित्त आयोगाच्या सन 2021-2022 या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या व पुढील प्राप्त होणा-या बंधनकारक अनुदानातुन (Tied Grants) प्रभावी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वाहतूक करणेच्या कामाचा खर्च भागविणेसाठीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1055/2023:-</u>** **(मालमत्ता विभाग)** **(दि.06.11.2023)**

आयुक्त, प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या मालकीचे औरंगपुरा येथील नाथ सुपर मार्केट व महानगरपालिकेस 75/25 टक्के विकास योजना आन नभुक्र.16031/4,16030/पी येथील तापडीया इमारत, श्रेयनगर बिल्डींग मधील हॉल साठी निविदा मागविण्यात आलेली आहे. सदरच्या निविदेमध्ये उच्च दराच्या निविदेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. न.भु.क्र.16031/4 16030/पी येथील तापडीया इमारत श्रेयनगर स्टिल पहिला मजला, प्रती माह र.रु.11 203/- निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्री मिलींद रामकृष्ण गिते यांचे निविदा दर प्रती माह र.रु.11.500/- एवढे आहे.
2. न.भु.क्र.16031/4, 16030/पी येथील तापडीया इमारत, श्रेयनगर, स्टित दुसरा मजला, प्रती माहे र.रु.14,388/-निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये मिलींद रामकृष्ण गिते याचे निविदा दर प्रती माह र.रु.14700/- एवढे आहे
3. नाथ सुपर मार्केट व्यापारी संकुल, औरंगपुरा, दुसरा मजला, प्रती माह रक्कम रु1384/- निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये आरती बुक सेंटर यांचे निविदा दर प्रती माह रक्कम रू 8000/- ऐवढे आहे.

4. नाथ सुपर मार्केट व्यापारी संकुल, औरंगपुरा, तिसरा मजला, पूर्व पश्चिम बाजु, प्रती माहे र.रु.1,06,118/- निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये आरती बुक सेंटर यांचे निविदा दर प्रती माहे र.रु.1,07,000/- ऐवढे आहे.

वरील प्रमाणे निविदेमध्ये प्राप्त उच्च दराचा बाबातचा प्रस्ताव मा स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर

**<u>ठराव क्रमांक 1055/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीचे औरंगपुरा येथील नाथ सुपर मार्केट व महानगरपालिकेस 75/25 टक्के विकास योजना आरक्षणातुन न.भु.क्र. 16031/4, 16030/पी येथीत तफडीया इमारत, श्रेयनगर बिल्डींगमधील हॉलसाठी निविदा मागविण्यात आलेती असून, उच्च दराच्या निविदा खालील प्रमाणे

1. न.भु.क्र.16031/4, 16030/पी येथील श्री.मिलींद रामकृष्ण गिते यांचे उच्चतम निविदा दर प्रती माह र.रु.11,500/- एवढे आहे.
2. न.भु.क्र,16031/4, 16030/पी येथील मितीद रामकृष्ण गिते यांचे उच्चतम निविदा दर प्रती माह र.रु.14,700/- एवढे
3. नाथ सुपर मार्केट व्यापारी संकुल, औरंगपुरा येथील दुसरा मजलासाठी आरती बुक सेंटर यांचे निविदा दर प्रती माह र.रु.8000/- एवढे आहे.
4. नाथ सुपर मार्केट व्यापारी संकुल, औरंगपुरा, तिसरा मजला, पूर्व पश्चिम बाजुसाठी आरती बुक सेंटर यांचे निविदा दर प्रती माह र.रु.1,07,000/- एवढे आहे.

वरील नमुद अक्र.01 ते 04 निविदा धारकांच्या उच्च दराच्या निविदास मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1056/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता-रस्ते विभाग)** **(दि.06.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.08 अंतर्गत गट क्र.38 समर्थ कल्याण को. ऑप. हाऊसींग सोसायटी कांचनवाडी येथे मंजुर रेखांकनात कॉक्रीट रस्ते तयार करणे या कामाचे अंदाज पत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 दरसुची नुसार र.रु.8393,900/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2023-24 शहर विकास निधीतून विविध विकास कामे मधील मंजुर रेखांकनात मुलभूत सुविधा पुरविणे या लेखाशिर्षक अंतर्गत उपलब्ध तरतुदीमथुन करण्यात येईल. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.8393,900/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1056/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.08 अंतर्गत गट क्र.38 समर्थ कल्याण को. ऑप. हाऊसींग सोसायटी कांचनवाडी येथे मंजुर रेखांकनात कॉँक्रीट रस्ते तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.8393,900/- चे तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1057/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता-रस्ते विभाग)** **(दि.06.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.08 अंतर्गत गट क्र.23/पैकी, साफल्य को.ऑप. हाऊसींग सोसायटी कांचनवाडी येथे मंजुर रेखांकनात कॉँक्रीट रस्ते तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 दरसुची नुसार र.रु.78,10,700/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2023-24, शहर विकास निधीतून विविध विकास कामे मधील मंजुर रेखांकनात मुलभूत सुविधा पुरविणे या लेखाशिर्षक अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधुन करण्यात येईल. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.78,10,700/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1057/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.08 अंतर्गत गट क्र.23/पैकी, साफल्य को. ऑप. हाऊसींग सोसायटी कांचनवाडी येथे मंजुर रेखांकनात कॉंक्रीट रस्ते तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.78,10,700/- चे तयार करण्यात आले असुन सदर अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1058/2023:-** **(कार्यकारी अभियंता-रस्ते विभाग)** **(दि.06.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.08 अंतर्गत गट क्र.4 व 10, नव कांचननगर को. ऑप. हाऊसींग सोसायटी नक्षत्रवाडी येथे मंजुर रेखांकनात कॉक्रीट रस्ते तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 दरसुची नुसार र.रु.1,16,15,600/-चे तयार करण्यात आले आहे.

सदर कामासाठी लागणारा साचे अर्थसंकल्प 2023-24, शहर विकास निधीतून विविध विकास कामे मधील मंजुर रेखांकनात मुलभूत सुविधा पुरविणे या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधुन करण्यात येईल. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,16,15,600/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर

**ठराव क्रमांक 1058/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.08 अंतर्गत गट क्र.4 व 10, नव कांचननगर को.ऑप. हाऊसींग सोसायटी नक्षत्रवाडी येथे मंजुर रेखांकनात कॉंक्रीट रस्ते तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,16,15,600/- चे तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1059/2023:-** **(कार्यकारी अभियंता-रस्ते विभाग)** **(दि.06.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.08 अंतर्गत गट क्र.38/पैकी, मौजे कांचनवाडी, पैठण रोड येथील शिल्पकार सोसायटी या मंजुर रेखांकनात अंतर्गत कॉक्रीट रस्ते तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 दरसूची नुसार र.रु.52,35,200/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2023-24 शहर विकास निधीतून विविध विकास कामे मधील मंजुर रेखांकनात मुलभूत सुविधा पुरविणे या लेखाशिर्षक अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधुन करण्यात येईल. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.52,35,200/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1059/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.08 अंतर्गत गट क्र.38/पैकी, मौजे कांचनवाडी, पैठण रोड येथील शिल्पकार सोसायटी या मंजुर रेखांकनात अंतर्गत कॉंक्रीट रस्ते तयार करणे या कामाचे अंदाज पत्रक र.रु.52,35,200/- चे तयार करण्यात आले असुन सदर अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1060/2023:-** **(कार्यकारी अभियंता-रस्ते विभाग)** **(दि.06.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.08 मधील कांचनवाडी गट क्र.39/पैकी, संत जय जनार्धन को.ऑप.हाऊसींग सोसायटी येथे मंजुर रेखांकनात कॉंक्रीट रस्ते तयार करणे बाबत कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 दरसुची नुसार र.रु.27,92,500/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2023-2024 मध्ये मंजुर रेखांनात मुलभूत सुविधा पुरविणे. वार्ड अभियंता कार्यालय 01 ते 09-रस्ते करीता लेखाशिर्षा अंतर्गत र.रु.24.74 कोटी तरतुदी मधुन प्रस्तावित आहे.

करिता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.27,92,500/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिति सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1060/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र08 मधील कांचनवाडी गट क्र.39/पैकी, संत जय जनार्धन को.ऑप.हाऊर्सीग सोसायटी येथे मंजुर रेखांकनात कॉंक्रीट रस्ते तयार करणे बाबत कामाचे अंदाज पत्रक र.27,92,500/- चे तयार करण्यात आले असुन सदर अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1061/2023:-</u>** **(लेखा विभाग)** **(दि.06.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मागील वर्षी सन-2022 मध्ये दिवाळी सणासाठी मा.प्रशासक महोदय यांनी मान्यता दिल्याप्रमाणे सण अग्रिम, सानुग्रह अनुदान व दिवाळी भेट दिली गेली.

याही वर्षी दिवाळीसाठी (सण अग्रिम, सानुग्रह अनुदान व दिवाळी भेट) देण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

शासन निर्णय क्र.अग्रिम-2018/प्र.क्र.-37/विनियम दि.23.10.2018 चे अवलोकन व्हावे.

अ) दिवाळी सणासाठी अग्रिम:-

सदर शासन निर्णयाच्या निर्देशाप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांचे ग्रेड वेतन रु.4800/- पेक्षा अधिक नाही अशा सर्व अराजपत्रित अधिकारी/कर्मचाऱ्यांना रु.12,500/- अग्रिम द्यावयाचे आहे.

| आस्थापना | लाभार्थी | प्रती लाभार्थी र.रु.12,500/- | एकुण देय होणारे अग्रिम |
|---|---|---|---|
| महानगरपालिका | 676 | 12,500/- | 84,50,000/- |
| शिक्षण विभाग | 279 | 12,500/- | 34,87,500/- |
| **एकुण अंदाजित अग्रिम र.रु.** | | | **1,19,37,500/-** |

ब) दिवाळी सणानिमित्त वर्ग-4 कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान:-

महानगरपालिकेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी ज्यांचे ग्रेड वेतन र.रु.1800/- पेक्षा अधिक नाही अशांना नमुद अटीनुसार सानुग्रह अनुदान र.रु.3500/-प्रस्तावित करण्यात येत आहे.

| आस्थापना | लाभार्थी | प्रती लाभार्थी र.रु.3,500/- | एकुण देय होणारे अग्रिम |
|---|---|---|---|
| महानगरपालिका | 2499 | 3,500/- | 87,46,500/- |
| शिक्षण विभाग | 52 | 3,500/- | 1,82,500/- |
| **एकुण अंदाजित सानुग्रह अनुदान र.रु.** | | | **89,28,500/-** |

चतुर्थ श्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांना सन 2022-23 या वर्षात सलग सेवा किमान सहा महिने केलेली असेल अशा पात्र कर्मचाऱ्यांना सदर सानुग्रह अनुदान देय राहील.

सतत गैरहजर, निलंबीत तसेच ज्या कर्मचाऱ्यांचे परिवेक्षाधिन कालावधी खुला करण्यात आलेला नाही. अशांना सादर सानुग्रह अनुदान देय राहणार नाही (दिले जाणार नाही).

क) दिवाळी सणानिमित्त दै.वेतन (वर्ग3/4) शिक्षण विभागातील (बालवाडी शिक्षिका,तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक), आरोग्य विभागातील लिंकवर्कर सुपरवायझर व बचत गटातील साफसफाई मजुर दिवाळी भेट:-

| आस्थापना | लाभार्थी | प्रती लाभार्थी र.रु.2,000/- | एकुण देय होणारे अग्रिम |
|---|---|---|---|
| महानगरपालिका | 17 | 2000/- | 34,000/- |
| शिक्षण विभाग | 192 | 2000/- | 3,84,000/- |
| आरोग्य विभाग | 4 | 2,000/- | 8,000/- |
| बचतगट सफाई मजुर | 331 | 2,000/- | 6,62,000/- |
| **एकुण अंदाजित दिवाळी भेट र.रु.** | | | **10,88,000/-** |

अ) सण अग्रिमसाठी :- र.रु.1,19,37,500/-
ब) सानुग्रह अनुदान साठी :- र.रु.89,28,500/-
क) दिवाळीभेट साठी :- र.रु.10,88,000/-

अशी एकत्रित :- र.रु.2,19,54,000/-

सन 2023-24 च्या अर्थसंकल्पात सानुग्रह अनुदान/सण अग्रिमसाठी भाग (3 अ) मध्ये कर्मचारी अग्रिम व कर्जेसाठी र.रु.5.00 कोटी तरतुद करण्यात आलेली आहे.

करीता प्रस्ताव मा.महासभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1061/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2023-24 च्या अर्थसंकल्पात सानुग्रह अनुदान/सण अग्रिमसाठी भाग (3 अ) मध्ये कर्मचारी अनुदान/सण अग्रिम साठी र.रु.5.00 कोटी तरतुद करण्यात आलेली आहे. त्यातून वरील अ,ब,क मध्ये नमुद केलेली रक्कम ही दिवाळी सणासाठी अग्रिम, सानुग्रह अनुदान, दिवाळी भेट म्हणुन रक्कम अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1062/2023:-** **(आस्थापना विभाग)** **(दि.06.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विविध विवक्षित सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्यासाठी दि.24.03.2023 रोजी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन दि.05.04.2023 रोजी मुलाखती घेण्यात येऊन खालील पात्र सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांची त्यांच्या नावासमोर विवक्षित कामासाठी स्थायी समितीचा ठराव क्र.764 दि.17.04.2023 नुसार कार्यालयीन आदेश दि.20.04.2023 मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून 06 महिन्यांच्या कालावधी करीता सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आली होती.

| अ. क्र. | नियुक्त उमेदवारांचे नाव व पदनाम | कार्यालयीन आदेश क्र. व दिनांक | विवक्षित कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| 1. | श्री.सय्यद मुर्तुझा कादरी, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/568 दि.20.04.2023 | शहर अभियंता विभागाच्या निविदा सुचना प्रसिध्द करणे, निविदा तयार करणे, तांत्रिक कागदपत्रे तयार करणे, करारनामे कार्यदिशाबाबतची कामे इ.दैनंदिन तांत्रिक कामांवर देखरेख करणे. |
| 2. | श्री.रविंद्र हरिश्चंद जोशी, कनिष्ठ अभियंता (विद्युत) | जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/570 दि.20.04.2023 | विद्युत विभागांतर्गत निविदा सुचना प्रसिध्द करणे, निविदा तयार करणे, तांत्रिक कागदपत्रे तयार करणे, करारनामे कार्यदिशाबाबतची कामे इ.दैनंदिन तांत्रिक कामांवर देखरेख करणे. |
| 3. | श्री.अशोक देवराव साळवे, उपअभियंता (स्थापत्य) | जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/572 दि.20.04.2023 | रस्ते व बांधकाम विभागांतर्गत शासकीय अनुदान व मनपा निधीमधील रस्त्यांच्या कामासाठी निविदा सुचना प्रसिध्द करणे, निविदा तयार करणे, तांत्रिक कागदपत्रे तयार करणे, करारनामे, कार्यदिशाबाबतची कामे. |

तथापि, उक्त आदेशाची मुदत दि.20.10.2023 रोजी संपल्याने शहर अभियंता यांनी संबंधीतांची सेवा पुढील सहा महिन्यांसाठी आवश्यक असल्याने मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला आहे.

करीता, उक्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या विवक्षित कामासाठी सेवा करार पध्दतीने दि.24.03.2023 रोजीच्या जाहिरातीमध्ये व दि.20.04.2023 रोजीच्या कार्यालयीन आदेश मध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून आदेश निर्गमनाच्या दिनांकापासून पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी तात्पुरती नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1062/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,श्री.सय्यद मुर्तुझा कादरी, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), श्री.रविंद्र हरिश्चंद्र जोशी, कनिष्ठ अभियंता (विद्युत), श्री.फारुख कमाल मो,अ.रशिद सिद्दीकी, कनिष्ठ अभियंता (विद्युत) व श्री.अशोक देवराव साळवे, उपअभियंता (स्थापत्य) यांनात्यांच्या नावासामोर प्रस्तावात

दर्शविलेल्या विवक्षित कामासाठी सेवा करार पध्दतीने दि.24.03.2023 रोजी जाहिराती मध्ये व दि.20.04.2023 रोजीच्या कार्यालयीन आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून आदेश निर्गमनाच्या दिनांकापासून पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी तात्पुरती नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1063/2023:-</u>** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.06.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीत एकुण 10 प्रशासकीय झोन असुन सदरील झोनमध्ये लहान-मोठे एकुण साधारणत: 1858 कि.मी.लांबीचे रस्ते आहेत. सदरील रस्त्यांची झाडाई करण्यासाठी महानगरपालिकेकडे 03 ट्रक माऊंटेड (मोठ्या) व 03 बोलेरो माऊंटेड (लहान) अशा एकुण 06 स्विपींग मशिन्स कार्यरत आहेत. ट्रक माऊंटेड स्विपींग मशिन्सद्वारे शहरातील मुख्य रस्ते झाडाई करण्यात येत असून मुख्य रस्त्यांवरील धुळीचे प्रमाणे कमी करण्यासाठी आणखी नवीन 03 ट्रक माऊंटेड स्विपींग मशिन्सची आवश्यकता आहे.

त्याकरीता उत्तम दर्जाच्या ट्रक माऊंटेड स्विपींग मशिन खरेदी साठी जीईएम पोर्टलद्वारे दरपत्रके घेण्यात आली असता, खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| Sr.No. | Name of Company | Rate |
|---|---|---|
| • | M/s Roots Multiclean Ltd. | 94,50,000/- |
| • | M/sTPS Infrastructure Ltd. | 97,00,000/- |
| • | M/sCEKSAN Sweepers | 1,00,00,000/- |

उपरोक्त नुसार तुलनात्मकदृष्ट्या मे.रुटस् मल्टीक्लिन लि.यांचे दर कमी असुन प्रतिनग र.रु.94,50,000/- प्रमाणे आहेत. 03 ट्रक माऊंटेड मेकॅनिकल रोड स्विपींग मशिन्स खरेदीसाठी प्राप्त न्युनतम दरानुसार र.रु.2,83,50,000/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. अंदाज पत्रकास मान्यता मिळाली तर रोड स्विपींग मशिन ज्यामध्ये रोड स्विपींग सोबतच दुभाजके धुणे, दुभाजकातील झाडांवरील धुळ क्लिअर करणे तसेच चांगल्या क्षमतेचे Suction System असेल या बाबी अंतर्भुत करुन जीईएम पोर्टलद्वारे जाहीर निविदा मागवुन 3 ट्रक माऊंटेड स्विपींग मशिन्स खरेदी करण्यात येतील. रोड स्विपींग मशिन्स या घनकचरा विभागाशी संबंधीत असल्यामुळे सदरील खर्च 15 वा वित्त आयोगाच्या “पाणी पुरवठा व जलनि:स्सारण व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन” साठी प्राप्त अनुदानातून करण्यात येईल.

करीता, 03 ट्रक माऊंटेड स्विपींग मशिन्स खरेदीसाठी र.रु.2,83,50,000/- रक्कमेचे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1063/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 03 ट्रक माऊंटेड स्विपींग मशिन्स 15 वा वित्त आयोगाच्या “पाणी पुरवठा व जलनि:स्सारण व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन” साठी प्राप्त अनुदानातून खरेदी करण्यासाठी र.रु.2,83,50,000/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1064/2023:-</u>** **(शिक्षण विभाग)** **(दि.06.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती फरहत काशिफ शेख, प्राथमिक शाळा, मंजुरपुरा उर्दु, केंद्र नुतन माध्यमिक शाळा ज्युब्लीपार्क, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर या शाळेवर सहशिक्षिका म्हणुन सद्यस्थितीमध्ये कार्यरत असुन त्यांनी त्यांची सेवा महानगरपालिका, नाशिक येथील आस्थापनेवर एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने वर्ग करण्यासाठी प्रस्ताव सादर करुनविनंती केली आहे.

करीता श्रीमती फरहत काशिफ शेख, प्राथमिक शाळा, मंजुरपुरा उर्दु, केंद्र नुतन माध्यमिक शाळा ज्युब्लीपार्क, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांची सेवा नाशिक महानगरपालिका, नाशिक शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने वर्ग करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता व महानगरपालिका, नाशिक यांच्याकडून एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने सेवेत रुजु करुन घेण्याबाबत संमतीपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधीतास महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

शिक्षण विभागाच्या आस्थापनेवरुन कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करण्याकरीता मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1064/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती फरहत काशिफ शेख, प्राथमिक शाळा, मंजुरपुरा उर्दु, केंद्र नुतन माध्यमिक शाळा ज्युब्लीपार्क, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांची एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने सेवा नाशिक महानगरपालिका नाशिक शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर वर्ग करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी व महानगरपालिका नाशिकने त्यांची सेवा वर्ग करण्यास संमती दिल्यानंतर त्यांना महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभागाच्या आस्थापनेवरुन कार्यमुक्त करण्याची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1065/2023:-</u>** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.07.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासनाच्या नियमानुसार महानगरपालिकेची विविध प्रकारची एकुण 59 वाहने ही 15 वर्षापेक्षा जास्त वयोमान असल्यामुळे निर्लेखित होणार आहेत. त्यानुषंगाने घनकचरा/जलनि:स्सारण/पाणी पुरवठा संबंधीत 39 नवीन वाहने/मशिनरी 15 वा वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून खरेदी करण्यासाठी र.रु.15,23,47,088/- च्या एकत्रित अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.900 दि.02.08.2023 नुसार मान्यता घेण्यात आली आहे. सदरील एकत्रितअंदाजपत्रकात 28 टन जीव्हीडब्ल्यु चेसीसवर 20 हजार लि.क्षमतेचे 02 टँकर्स उभारणी करण्यासाठी र.रु.29,91,40/ (जीएसटी सह) च्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त आहे.मान्यता मिळाल्या नंतर 28 टन जीव्हीडब्ल्यु चेसीसवर 20 हजार लि.क्षमतेचे 02 टँकर्स उभारणी करण्यासाठी महाटेंडर द्वारे 18 टक्के जीएसटी वगळून (निविदा र.रु.25,35,085/-) जाहीर निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदेच्या पहिल्या वेळी 03 निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या असून पात्र निविदा धारकांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1. | मे.ॲक्टीव्ह मोटर्स | र.रु.25,35,085.00 |
| 2. | मे.न्यु साधना इंजिनिअरींग वर्क्स | र.रु.25,98,462.13 |
| 3. | मे.मणियार ॲण्ड कंपनी | र.रु.26,61,839.25 |

उपरोक्त नुसार मे.ॲक्टीव्ह मोटर्स यांची निविदा तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची असुन ती अंदाजपत्रकीय दराची आहे. त्यामुळे त्यांची निविदा स्विकृत करणे योग्य होईल.

करीता, 28 टन जीव्हीडब्ल्यु चेसीसवर 20 हजार लि.क्षतेचे 02 टँकर्स उभारणी करण्यासाठी मे.ॲक्टीव्ह मोटर्स यांची अंदाजपत्रकीय दराची र.रु.25,35,085/- (जीएसटी शिवाय) खर्चाची निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1065/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 28 टन जीव्हीडब्ल्यु चेसीसवर 20 हजार लि.क्षतेचे 02 टँकर्स उभारणी करण्यासाठी मे.ॲक्टीव्ह मोटर्स यांची अंदाजपत्रकीय दराची र.रु.25,35,085/- (जीएसटी शिवाय) खर्चाची निविदा स्विकृत करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1066/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.13.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नक्षत्रवाडी येथील खंडोबा मंदिर ते शुभ लाभ अपार्टमेंट रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.2,47,24,810.00 (GST सह) चे तयार करण्यात आले आहे.यास मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.794/2023 दि.01.06.2023 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. यानुसार निविदा र.रु.2,01,41,977.00 च्या मर्यादेत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता, यामध्ये पात्र L1 निविदाधारक मे.अमन कन्स्ट्रक्शन हे असुन त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर रक्कमेपेक्षा 1.09% कमी दराने म्हणजेच र.रु.1,99,23,235.00 (GST वगळून) चे प्राप्त असुन या मर्यादेत संबंधीत कंत्राटदाराकडून काम करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

संदर्भ:- Tender ID_2023_AMCA_955781_1 सन 2023-2024

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता रस्ते |
| 2. | कामाचे स्वरुप | नक्षत्रवाडी येथील खंडोबा मंदिर ते शुभ लाभ अपार्टमेंट रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरीकरण करणे बाबत. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.794/2023 दि.01.06.2023 नुसार र.रु.2,47,24,810.00/- (GST सह) यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.2,01,41,977.00 |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | • संकेतस्थळ-महा ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.20.10.2023 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.13.10.2023 ते दि.03.11.2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.06.11.2023 |
| | क) निविदेची कितवी वेळ होती? | दुसरी वेळ |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 02 (दोन) |

(त्यापैकी पात्र टेंडरधारकाची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर र.रु. | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रुपये | टक्केवारी |
| 1. | मे.अमन कन्स्ट्रक्शन | 2,01,41,977.00 | 1,99,23,235.00 | 1.09% |
| 2. | श्री.पुनित गौतम कटारिया | 2,01,41,977.00 | 1,99,40,557.00 | 1.00% |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | विकास योजनेअंतर्गत रस्ते मजबुती करणे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे L1 निविदाधारक मे.अमन कन्स्ट्रक्शन यांची निविदा, मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 1.09% म्हणजेच र.रु.1,99,23,235.00 (GST वगळून) ची असुन त्यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1066/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नक्षत्रवाडी येथील खंडोबा मंदिर ते शुभ लाभ अपार्टमेंट रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.2,47,24,810.00 (GST सह) चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाकरीता L1 निविदाधारक मे.अमन कन्स्ट्रक्शन हे असुन त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 1.09% कमी दराने म्हणजेच र.रु.1,99,23,235.00 (GST वगळून) ची प्राप्त असुन

सदर निविदे बाबतच्या प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1067/2023:-** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.13.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ईटखेडा येथील नाथपुरम ते 40 ग्रीन पर्यंतच्या 24 मी. व 30 मी. विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.2,86,69,374.00 (GST सह) चे तयार करण्यात आले आहे. यास मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.795/203 दि.01.06.2023 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. यानुसार निविदा र.रु.2,33,55,203.00 च्या मर्यादेत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता, यामध्ये पात्र L1 निविदाधारक श्री.पुनित गौतम कटारिय हे असुन त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुरनिविदा रक्कमेपेक्षा 1.00% कमी दराने म्हणजेच र.रु.2,31,21,651.00 (GST वगळून) चे प्राप्त असुन या मर्यादेत संबंधीत कंत्राटदाराकडून काम करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

संदर्भ:- Tender ID_2023_AMCA_955781_2 सन 2023-2024

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता रस्ते |
| 2. | कामाचे स्वरुप | ईटखेडा येथील नाथपुरम ते 40 ग्रीन पर्यंतच्या 24 मी. व 30 मी. विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरीकरण करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.795/2023 दि.01.06.2023 नुसार र.रु.2,86,69,374/- (GST सह) यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.2,33,55,203.00 |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | • संकेतस्थळ-महा ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.20.10.2023 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.13.10.2023 ते दि.03.11.2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.06.11.2023 |
| | क) निविदेची कितवी वेळ होती? | दुसरी वेळ |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 02 (दोन) |

(त्यापैकी पात्र टेंडरधारकाची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर र.रु. | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रुपये | टक्केवारी |
| 1. | श्री.पुनित गौतम कटारिया | 2,33,55,203.00 | 2,31,21,651.00 | 1.00% |
| 2. | मे.अमन कन्स्ट्रक्शन | 2,33,55,203.00 | 2,35,88,755.00 | 1.00% |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | विकास योजनेअंतर्गत रस्ते मजबुती करणे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |
| तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे L1 निविदाधारक श्री.पुनित गौतम कटारिया यांची निविदा, मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 1.00% म्हणजेच र.रु.2,31,21,651.00 (GST वगळून) ची असुन त्यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर. | | |

**<u>ठराव क्रमांक 1067/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ईटखेडा येथील नाथपुरम ते 40 ग्रीन पर्यंतच्या 24 मी. व 30 मी. विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.2,86,69,374.00 (GST सह) चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाकरीता L1 निविदाधारक श्री.पुनित गौतम कटारिया हे असून त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 1.00% कमी दराने म्हणजेच र.रु.2,31,21,651.00 (GST वगळून) ची प्राप्त असुन सदर निविदे बाबतच्या प्रस्तावात मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1068/2023:-</u>** **(आस्थापना विभाग)** **(दि.17.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक वेतन-1119/प्र.क्र.3/2019/सेवा-3, दि.02.03.2019 अन्वये सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेबाबत खालीलप्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे.

**शासन निर्णय :-**

सातव्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये, 10, 20 व 30 वर्षांच्या नियमित सेवेनंतरची, तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि.01.01.2016 पासून पुढील प्रमाणे अंमलात येईल.

**I.** योजनेचा तपशील :-

(i) सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-20 पर्यंत वेतन घेणा-या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु.15600-39100 व ग्रेड पे रु.5400/- या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी/ अधिकारी यांना लागू राहील. संबंधित कर्मचारी/अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-21 मध्ये वेतन आहरीत करु लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

(ii) या योजनेखाली पात्र कर्मचारी/अधिकारी यांना संपूर्ण सेवा कालावधीत, पात्रतेनुसार तीन वेळा, या योजनेचा लाभ मंजूर करण्यात येईल. मात्र, ज्या कर्मचारी/अधिकारी यांना दोन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत. त्यांना या योजनेखाली फक्त एकच लाभ अनुज्ञेय होईल. थोडक्यात संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना एकाच पदोन्नती साखळीतील पदावर मिळून त्यांची एकूण नियमित व सलग सेवा 30 वर्ष असल्यास, या 30 वर्षाच्या कालावधीत झालेल्या कार्यत्मक पदोन्नती व लाभ यांची संख्या, किमान तीन असावी. त्याशिवाय ज्या कर्मचारी/अधिकारी यांना तीन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना या योजनेअंतर्गत एकही लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.

(iii) या योजनेअंतर्गत एकाच पदोन्नती साखळीतील पदावर मिळून झालेल्या संपूर्ण सेवा कालावधीत, संबंधितास सुरुवातीस लाभ मंजुर झाला असल्यास व तदनंतर लाभाच्या वेतनश्रेणीत त्याची कार्यात्मक पदोन्नती झाल्यास, पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय नसल्याने, अशा पदोन्नतीची गणना एकूण तीन कार्यात्मक पदोन्नतीच्या संख्येमध्ये करण्यात येणार नाही.

(iv) या तीन लाभाच्या योजनेच्या लाभार्थीस, पदोन्नतीच्या पदाकरीता विहित केलेली अर्हता, ज्येष्ठता, पात्रता, अर्हता परीक्षा, विभागीय परीक्षा उत्तीर्ण असणे, गोपनीय अहवालाची प्रतवारी, विभागीय चौकशी व न्यायिक प्रकरण प्रलंबित नसणे (शासन निर्णय सा.प्र.वि. दि.15/12/2017 नुसार), यथास्थिती जातीवैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे, अशा पदोन्नतीच्या कार्यपध्दतीची, विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पूर्तता करणे आवश्यक आहे.

(v) तीन लाभांच्या योजनेचा पहिला व दुसरा लाभ - ज्या कर्मचारी/अधिकारी यांनी यापूर्वी अनुज्ञेयतेनुसार यथास्थिती कालबध्द पदोन्नती योजना अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला वा दुसरा लाभा यापूर्वी घेतलेला आहे, त्यांचे सदर लाभ हे तीन लाभाच्या योजनेखालील प्रकरणपरत्वे पहिला वा दुसरा लाभ समजण्यात येतील

(vi) विवक्षित सेवा कालावधीनंतर (After specified number of years of service), संबंधित पदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा (Non-Functional Pay Structure) मंजूर करण्यात आलेला/येणारा, लाभ हा या योजनेखालील पहिला लाभ (First benefit of MACPS) समजण्यात येईल. उदा.मंत्रालय/विधानमंडळ सचिवालय कक्ष अधिका-यांना चार वर्षाच्या नियमित सेवेनंतर देण्यात येत असलेली अकार्यात्मक वेतनसंरचना.

ज्या कर्मचारी/अधिकारी यांना पहिला लाभ म्हणून ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे, त्या पदाला विवक्षित सेवा कालावधीनंतर, त्या पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-यामध्ये वाढ न होता, अकार्यात्मक व तत्सम उच्च वेतनसंरचना मंजूर करण्यात येत असेल तर ती अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचना हा दुसरा लाभ (Second benefit of MACPS) म्हणुन मंजूर करण्यात येईल.

(vii) पूर्वी 12 व 24 वर्षांच्या सेवेनंतर मिळणारे लाभ, सातव्या वेतन आयोगात 10, 20 व 30 वर्षांच्या सेवेनंतर पात्रतेनुसार अनुज्ञेय केले आहेत. त्यामुळे ज्या कर्मचारी/अधिकारी यांना दि.01.01.2016 पूर्वी अनुज्ञेयतेनुसार यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजूर झाला आहे, अशा कर्मचारी/अधिकारी यांना उर्वरित यथास्थिती दुसरा व तिसरा लाभ पुढील तक्त्यात नमूद केल्यानुसार, पात्रतेनुसार, अनुज्ञेय राहील.

| दि.01.01.2016 पूर्वी<br>12 वा 24 वर्षाच्या सेवेनंतर घेतलेला लाभ | दुस-या लाभाची अनुज्ञेयता | तिस-या लाभाची अनुज्ञेयता |
|---|---|---|
| पहिला लाभ | पहिल्या लाभापासून आठ वर्षांनंतर (12+8) | दुस-या लाभापासून दहा वर्षांनंतर (20+10) |
| दुसरा लाभ | लागू नाही. | दुस-या लाभापासून सहा वर्षांनंतर (24+6) |

(viii) ज्या कर्मचा-यास दि.01/01/2016 ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत यथास्थिती 12 वा 24 वर्षांच्या सेवेनंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर झाला आहे, त्यांना 20 (12+8) व 30 (24+6) एवढया वर्षांच्या नियमित सेवेनंतर, पात्रतेनुसार, यथास्थिती दुसरा व तिसरा लाभ मंजूर करण्यात यावा.

दि.01.01.2016 ते सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत सेवांतर्गत प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश, निर्गमित होणाच्या तारखेपर्यंत ज्यांना, शासन निर्णय वित्त विभाग दि.01.01.2010 नुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, अशा कर्मचारी/अधिकारी यांचे असुधारीत लाभाचे, यापूर्वीचे आदेश रद्द करुन त्यांना तीन लाभाच्या योजने नुसार सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्स नुसार, पदोन्नतीच्या पदाच्या सातव्या वेतन आयोगच्या वेतनश्रेणीत, सदर लाभ सुधारीत रित्या मंजूर करण्यात येतील.

त्याअनुषंगाने असुधारीत लाभाची रक्कम, सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजित करुन फरकाची रक्कम संबंधितांना अनुज्ञेय करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| उदा. क्ष कर्मचारी नियुक्ती दि. 01.07.2006 मूळ नियुक्ती-लिपिक टंकलेखक पे बँड 5200-20200 व ग्रेड पे 1900 | शासकीय सेवेत 12 वर्ष पूर्ण दि.01.07.2018 | तीन लाभाच्या सु.से.आ.प्र. योजने खाली सदर लाभ 10 वर्षांनंतर अनुज्ञेय असल्यामुळे दि.01.07.2016 पासून पहिला लाभ अनुज्ञेय होईल व यापूर्वी मंजूर केलेला 12 वर्षाचा लाभ रद्द करुन सुधारीत दिनांकास लाभ मंजूर |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात यावा व फरकाची रक्कम अनुज्ञेय असल्यास संबंधितांना अदा करण्यात यावी. |
| उदा. ज्ञ कर्मचारी नियुक्ती दि.01.07.1994<br>मुळ नियुक्ती-लिपीक टंकलेखक पे बँड 5200-20200 व ग्रेड पे 1900 | शासकीय सेवेत 12 वर्ष पूर्ण झाल्याने पहिला लाभ दि.01.07.2006 अनुज्ञेय झाला आहे. दुसरा लाभ दि.01.07.2018 रोजी अनुज्ञेय झाला आहे. | तीन लाभाच्या सु.से.आ.प्र. योजने खाली सदर लाभ 20 वर्षांनंतर म्हणजेच दि.01.07.2014 पासून सुधारीत दुसरा लाभ अनुज्ञेय होईल. तथापि सदर योजना दि.01.01.2016 पासून अंमलात अल्याने यापूर्वी दि.01.07.2018 रोजीचा मंजूर केलेला 24 वर्षाचा लाभ रद्द करुन सुधारीत दिनांकास, म्हणजेच दि.01.01.2016 रोजी अनुज्ञेय होईल व फरकाची रक्कम अनुज्ञेय असल्यास संबंधितांना देण्यात यावी. |

(ix) ज्या कर्मचारी/अधिकारी यांच्या नियमित सेवेची 10 वर्षे दि.31.12.2015 पूर्वी किंवा दि.31.12.2015 रोजी पूर्ण होतील, त्यांना तीन लाभाच्या योजनेअंतर्गत पहिला लाभ हा दि.01.01.2016 रोजी पात्रतेनुसार अनुज्ञेय होईल.

| | | |
|---|---|---|
| उदा. य कर्मचारी नियुक्ती दि.01.07.2005 | शासकीय सेवेत 10 वर्ष पूर्ण झाल्याने पहिला लाभ दि.01.07.2015 अनुज्ञेय झाला आहे. | तीन लाभाची सु.से.आ.प्र. योजना दि.01.01.2016 पासून अंमलात आल्याने या योजनेखाली पहिला लाभ दि.01.01.2016 रोजी अनुज्ञेय होईल. |

ज्या कर्मचारी/अधिकारी यांना यापूर्वीच्या योजनेनुसार पदोन्नतीच्या साखळीतील पदावर दि.01.01.2016 पूर्वीच पहिला लाभ मंजूर केला आहे, अशा कर्मचा-यांना त्यांची 12+8 अशी 20 वर्षाची सेवा, ही दि.01.01.2016 पूर्वी पूर्ण होत असल्यास,संबंधितास दुसरा लाभ (Second benefit on promotional post) दि.01.01.2016 पासून पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरेल.

| | | |
|---|---|---|
| उदा. क्ष कर्मचारी नियुक्ती दि.01.07.1994<br><br>मूळ नियुक्ती-लिपिक टंकलेखक<br><br>पे बँड 5200-20200 व ग्रेड पे 1900 | शासकीय सेवेत 12 वर्ष पूर्ण झाल्याने पहिला लाभ दि.01.07.2006 अनुज्ञेय झाला आहे. | दुसरा लाभ दिनांक 01/07/2018 रोजी अनुज्ञेय आहे.तीन लाभाची सु.से.आ.प्र. योजना खाली दुसरा लाभ 20 (12+8) वर्षांनंतर अनुज्ञेय असला तरी दि.01.07.2014 पासून दुसरा लाभ अनुज्ञेय होईल. तथापि सदर योजना दि. 01.01.2016 पासून अंमलात आल्याने, सदर लाभ दि.01.01.2016 पासून अनुज्ञेय होईल व यापूर्वी दि.01.07.2018 रोजी 24 वर्षाचा लाभ मंजूर केला असल्यास तो लाभ रद्द करुन सुधारीत दिनांकास (दि.01.01.2016) दुसरा लाभ मंजूर करण्यात यावा व फरकाची रक्कम अनुज्ञेय असल्यास देण्यात यावी. तिसरा लाभ दि.01.01.2026 रोजी अनुज्ञेय होईल. |

वरीलप्रमाणे ज्या कर्मचारी/अधिकारी यांची 20 वर्षाची सेवा ही दि.01.01.2016 रोजी व नंतरच्या तारखेस पूर्ण होईल, त्यांना, तिसरा लाभ हा दुस-या लाभापासून 10 वर्षानंतर पदोन्नतीच्या

साखळीतील पदावर (Third benefit on promotional post) अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार मंजुर करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| उदा. क्ष कर्मचारी नियुक्ती दि. 01.07.1997<br>मूळ नियुक्ती-लिपिक टंकलेखक<br>पे बँड 5200-20200 व ग्रेड पे 1900 | शासकीय सेवेत 12 वर्ष पूर्ण झाल्याने दि.01.07.2009 रोजी पहिला लाभ अनुज्ञेय झाला आहे. शासकीय सेवेत 20 (12+8) वर्ष पूर्ण झाल्याने दि.01.07.2017 रोजी दुसरा लाभ अनुज्ञेय झाला. | तीन लाभाची सु.से.आ.प्र. योजना खाली दुसरा लाभ दि.01.07.2017 रोजी अनुज्ञेय झाल्याने, तिसरा लाभ 10 वर्षांनंतर म्हणजेच दि.01.07.2027 पासून अनुज्ञेय होईल. |

(x) ज्या कर्मचारी/अधिकारी यांना यापूर्वीच्या योजनेनुसार दि.01.01.2016 पूर्वीच पदोन्नतीच्या साखळीतील पदावर दुसरा लाभ मंजूर केला आहे, अशा कर्मचा-यांना त्यांची 24+6 अशी 30 वर्षाची सेवा, ही दि.01/01/2016 पूर्वी पूर्ण होत असल्यास, संबंधितास तिसरा लाभ दि.01.01.2016 पासून पात्रतेनुसार अनुज्ञेय करण्यात यावा. तसेच ज्यांची तिस-या लाभाच्या अनुज्ञेयतेसाठी 30 वर्षाची सेवा ही दि.01.01.2016 रोजी व नंतरच्या तारखेस पूर्ण होत असल्यास, त्यांना संबंधित तारखेस पात्रतेनुसार, तिसरा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| उदा. क्ष कर्मचारी नियुक्ती दि.01.07.1985<br>मूळ नियुक्ती-लिपिक टंकलेखक<br>पे बँड 5200-20200 व ग्रेड पे 1900 | शासकीय सेवेत 12 वर्ष पूर्ण झाल्यामुळे दि.01.07.1997 रोजी पहिला लाभ अनुज्ञेय झाला आहे. शासकीय सेवेत 24 वर्ष पूर्ण झाल्यामुळे दि.01.07.2009 रोजी दुसरा लाभ अनुज्ञेय झाला आहे. | तीन लाभाची सु.से.आ.प्र. योजना दि.01.01.2016 रोजी अस्तित्वात आली असल्यामुळे खाली तिसरा लाभ (24+6) वर्षांनंतर म्हणजेच दि.01.07.2015 पूर्ण होत असेल तरी त्यांना सदर लाभ दि.01.07.2016 पासून अनुज्ञेय होईल. |
| उदा. ज्ञ कर्मचारी नियुक्ती दि. 01.07.1986<br>मूळ नियुक्ती-लिपिक टंकलेखक<br>पे बँड 5200-20200 व ग्रेड पे 1900 | शासकीय सेवेत 12 वर्ष पूर्ण झाल्यामुळे दि.01.07.1998 रोजी पहिला लाभ अनुज्ञेय झाला आहे.शासकीय सेवेत 24 वर्ष पूर्ण झाल्यामुळे दि.01.07.2010 रोजी दुसरा लाभ अनुज्ञेय झाला आहे. | तीन लाभाची सु.से.आ.प्र. योजने खालील तिसरा लाभ 30 (24+6) वर्षांनंतर म्हणजेच दि.01.07.2016 रोजी अनुज्ञेय होईल. |

(xi) दि.01 जानेवारी, 2016 व त्यानंतरच्या पदोन्नतीच्या वेळी, म.ना.से.(सुधारीत वेतन) नियम, 2019 या अधिसुचनेतील नियम क्र.13 नुसार वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय केला जाणार असल्यामुळे त्याच तरतुदीनुसार पदोन्नतीच्या साखळीतील पदावरील पदधारकास नवीन योजनेमध्ये वेतन निश्चितीचा लाभ अनुज्ञेय राहील.

(xii) एकाकी पदावरील कर्मचारी/अधिकारी यांना यापूर्वीच्या योजनेनुसार दि.01.01.2016 पूर्वीच पहिला लाभ मंजूर केला आहे, अशा कर्मचा-यांना त्यांची 20 (12 +8) वर्षांची सेवा ही दि.01.01.2016 पूर्वी पूर्ण होत असल्यास, संबंधितास दुसरा लाभ हा सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार वेतन मॅट्रीक्समधील नजिकच्या वेतनस्तरामध्ये (Immediate Next Level) दि.01.01.2016 पासून पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरेल.

| | | |
|---|---|---|
| उदा. क्ष कर्मचारी नियुक्ती दि.01.07.1995<br>मूळ नियुक्ती-वाहन चालक | शासकीय सेवेत 12 वर्ष पूर्ण झाल्याने दि.01.07.2007 रोजी पहिला लाभ अनुज्ञेय झाला आहे. क्ष कर्मचा-याच्या शासकीय सेवेची | तीन लाभाची सु.से.आ.प्र. योजना दि.01.01.2016 रोजी अस्तित्वात आली असल्यामुळे दुसरा लाभ हा, सोबत जोडलेल्या |

| | | |
|---|---|---|
| सदर पदास सहाव्या वेतन आयोगातील अनुज्ञेय वेतन संरचनेशी समकक्ष वेतनस्तर एस-6 | 20 (12+8) वर्ष ही दि.01.07.2015 रोजी पूर्ण झाली. क्ष कर्मचा-यांची शासन निर्णय वित्त विभाग दि. 01 मार्च 2019 मधील तरतुदीनुसार, दि.01.01.2016 रोजीची वेतननिश्चिती ही एस-7 या वेतनस्तरामध्ये करण्यात येणे अपेक्षित आहे. | परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार वेतन मॅट्रीक्स मधील नजिकच्या वेतन स्तरामध्ये (Immediate Next Level) दि.01.01.2016 रोजी वेतनस्तर एस-8 मध्ये अनुज्ञेय होईल. |

(xiii) दि.01.01.2016 पूर्वी शासन सेवेत पदोन्नतीच्या साखळीतील पदावर कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांना दि.01.01.2019 रोजी व नंतर तीन लाभाच्या योजनेतील यथास्थिति पहिला, दुसरा व तिसरा लाभ हा पात्रतेनुसार, सातव्या वेतन आयोगाच्या वेतनमॅट्रीक्समध्ये पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत अनुज्ञेय राहील.

(xiv) सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीतील सुधारणा तसेच तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि.01.01.2016 पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे जे कर्मचारी व अधिकारी हे पूर्वीच्या योजनानुसार यथास्थिति पहिला व दुसरा लाभ घेऊन दि.01.01.2016 पूर्वीच शासन सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत/मृत्यू पावले आहेत, त्यांना यथास्थिती 12+8 व 24+6 याप्रमाणे सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.

तथापि, ज्या कर्मचारी/अधिकारी यांना कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना/सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, यांचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ हा दि.31.12.2015 पूर्वी प्राप्त होऊन ते दि.01.01.2016 रोजी वा नंतरच्या तारखेस सेवानिवृत्त झाले आहेत/मृत्यु पावले आहेत, अशा कर्मचारी/अधिकारी यांच्या लाभाच्या तारखेपासून यथास्थिती 8 वर्षाची सेवा तसेच 6 वर्षाची सेवा ही त्यांच्या निवृत्तीच्या तारखेस/मृत्युच्या तारखेस पूर्ण होत आहे, अशा कर्मचारी/अधिकारी यांना अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार यथास्थिती दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| उदा. क्ष कर्मचारी नियुक्ती दि. 01.07.1986 मूळ नियुक्ती-लिपीक टंकलेखक पे बँड 5200-20200 व ग्रेड पे 1900 | शासकीय सेवेत 12 वर्ष पूर्ण दि.01.07.1998 रोजी पहिला लाभ व दुसरा लाभ दि.01.07.2010 रोजी अनुज्ञेय झाले आहेत. सेवानिवृत्ती दि.31.03.2018 | संबंधित कर्मचा-यांस यापूर्वी दोन लाभ मंजूर करण्यात आलेले आहेत व दि.31.03.2018 रोजी सेवानिवृत्त होण्यापूर्वी दि.01.07.2016 रोजी त्यांची 30 (24+6) वर्षांची सेवा पूर्ण झाली असल्यामुळे सदर दिनांकास तिसरा लाभ अनुज्ञेय होईल. |

(xv) एकाकी अथवा एकाकी संवर्गातील पदावर कार्यरत राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी, यांना दि.01.01.2016 ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत यथास्थिती 12 वा 24 वर्षाच्या सेवेनंतर पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर झाला आहे, त्यांना 20 (12+8) व 30 (24+6) एवढया वर्षाच्या सेवेनंतर पात्रतेनुसार यथास्थिती दुसरा वा तिसरा लाभ सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार वेतन मॅट्रीक्समधील नजिकच्या वेतनस्तरामध्ये (Immediate Next Level) मंजूर करण्यात यावा.

(xvi) एकाकी अथवा एकाकी संवर्गातील पदावर कार्यरत राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी, यांना दि.01.01.2016 ते सातव्या वेतन आयोगानुसार तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश निर्गमित होण्याच्या तारखेपर्यंत ज्यांना शासन निर्णय वित्त विभाग दि.05.07.2010 नुसार यथास्थिती पहिला व दुसरा लाभ मंजूर केला आहे, त्याबाबतचे आदेश रद्द करुन, सर्व संबंधितास, सातव्या

वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्सनुसार, सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार, सदर लाभ सुधारीतरित्या मंजूर करण्यात येतील. त्या अनुषंगाने असुधारीत लाभाची रक्कम, सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजित करुन फरकाची रक्कम संबंधितांना अनुज्ञेय करण्यात यावी.

(xvii) दि.01.01.2019 रोजी व नंतर शासन सेवेत पदोन्नतीच्या साखळीतील पदावर अथवा एकाकी पदावर किंवा एकाकी संवर्गावर, सरळसेवा प्रवेशाने नियुक्त होणा-या कर्मचारी/अधिकारी यांना यथास्थिती 10, 20 व 30 वर्षांच्या नियमित सेवेनंतर, सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार, वेतन मॅट्रिक्समधील विद्यामान वेतनस्तर विचारात घेऊन, नजिकच्या वेतनस्तरामध्ये (Immediate Next Level) यथास्थिती पहिला, दुसरा व तिसरा लाभ, हे पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरतील.

(xviii) वरील सर्व प्रसंगांमध्ये वेतनमॅट्रीक्समधील एस-20 या वेतनस्तरामध्ये वेतन आहरित करेपर्यंतच, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांस यथास्थिती पहिला वा दुसरा वा तिस-या लाभाच्या अनुज्ञेयतेसाठी, गोपणीय अहवाल प्रतवारीच्या सरासरीचा निकष हा निकटच्या पदोन्नतीच्या पदासाठी सामान्य प्रशासन विभागाने विहीत केल्यानुसार राहील. तसेच वर्ग-4 मधील कर्मचारी व मागासवर्गीय कर्मचारी यांच्या पदोन्नतीकरीता सामान्य प्रशासन विभागाने विहीत केलेले आदेश तसेच धोरण विचारात घेऊन संबंधितांची या योजनेअंतर्गत लाभासाठी पात्रता तपासण्यात येईल.

(xix) या योजनेचा पहिला अथवा दुसरा लाभ मिळाल्यानंतर कर्मचा-यास पदोन्नतीच्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल व त्यानंतर पदोन्नती साखळीत पुढील पदोन्नतीचा संवर्ग उपलब्ध नसेल तर, तो ज्या पदाच्या वेतनसंरचनेत वेतन घेत आहे ते पद जणूकाही एकाकी पद आहे असे समजून संबंधित कर्मचा-यास त्यांचा वेतनमॅट्रीक्समधील, विद्यामान वेतनस्तर विचारात घेऊन, नजिकच्या वेतनस्तरामध्ये (सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार) अनुज्ञेय लाभ, पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

2. कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचारी/अधिकारी यांस भविष्यात होणा-या/झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत, कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून 10 वर्षांच्या नियमित सेवेनंतर, अन्य विहित अटी व शर्तीच्या पूर्ततेनंतर, या योजने अंतर्गत यथास्थिती पहिला/दुसरा/तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.
3. या योजनेखाली पहिला, दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसूली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधिताची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, 1981 मधील नियम 12 च्या तरतुदीनुसार करण्यात येईल.
4. रोजंदारीवरील, कार्यव्ययी आस्थापनेवरील, कंत्राटी तत्वावरील व तदर्थ (Ad-hoc) नियुक्त करण्यात आलल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

परिशिष्ट.

(शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वेतन 1119/प्र.क्र.3/सेवा-3, दिनांक 02 मार्च 2019 सोबतचे)

| अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (से.आ.प्र.यो.) | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | दि.1/1/2019 वा त्यानंतर शासन सेवेत/ जिल्हापरिषदेत/ अनुदानित संस्थेत रुजु झालेल्या प्रकरणी | | | |
| 2) | विभागात पदोन्नतीची वेतनश्रेणी नसलेल्या, एकमेव संवर्ग असलेल्या पदावरील प्रकरणी | | | |
| 3) | विभागातील पदोन्नतीची वेतनश्रेणी नसलेल्या, एकमेव पदावरील प्रकरणी | | | |
| | कोणत्या वेतनश्रेणीत नियुक्ती | से.आ.प्र.यो. अंतर्गत अनुज्ञेय वेतनश्रेणी | से.आ.प्र.यो. अंतर्गत अनुज्ञेय वेतनश्रेणी | से.आ.प्र.यो. अंतर्गत अनुज्ञेय वेतनश्रेणी |
| अक्र | सुरवातीस | नियुक्तीपासून 10 वर्षाच्या सेवेनंतर | नियुक्तीपासून 20 वर्षाच्या सेवेनंतर किंवा मागील पदोन्नतीच्या | नियुक्तीपासून 30 वर्षाच्या सेवेनंतर किंवा मागील पदोन्नतीच्या |

| | | | तारखेपासून 10 वर्षाच्या सेवेनंतर | तारखेपासून 10 वर्षाच्या सेवेनंतर |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | एस-1 | एस-2 | एस-3 | एस-4 |
| 2 | एस-2 | एस-3 | एस-4 | एस-5 |
| 3 | एस-3 | एस-4 | एस-5 | एस-6 |
| 4 | एस-4 | एस-5 | एस-6 | एस-7 |
| 5 | एस-5 | एस-6 | एस-7 | एस-8 |
| 6 | एस-6 | एस-7 | एस-8 | एस-9 |
| 7 | एस-7 | एस-8 | एस-9 | एस-10 |
| 8 | एस-8 | एस-9 | एस-10 | एस-11 |
| 9 | एस-9 | एस-10 | एस-11 | एस-12 |
| 10 | एस-10 | एस-11 | एस-12 | एस-13 |
| 11 | एस-11 | एस-12 | एस-13 | एस-14 |
| 12 | एस-12 | एस-13 | एस-14 | एस-15 |
| 13 | एस-13 | एस-14 | एस-15 | एस-16 |
| 14 | एस-14 | एस-15 | एस-16 | एस-17 |
| 15 | एस-15 | एस-16 | एस-17 | एस-18 |
| 16 | एस-16 | एस-17 | एस-18 | एस-19 |
| 17 | एस-17 | एस-18 | एस-19 | एस-20 |
| 18 | एस-18 | एस-19 | एस-20 | एस-21 |
| 19 | एस-19 | एस-20 | एस-21 | लागू नाही |
| 20 | एस-20 | एस-21 | लागू नाही | लागू नाही |

वरील नमुद प्रमाणे सातव्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये, 10, 20 व 30 वर्षांच्या नियमित सेवेनंतरची, तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि.01.01.2016 पासून लागु करण्याच्या तरतुदी, अटी शर्ती आहेत. असे नमुद आहे.

5. तसेच शासन निर्णय क्रमांक वेतन-1119/प्र.क्र.3/सेवा-3, दि.01.01.2019 अन्वये राज्य शासकीय कर्मचारी व अन्य पात्र कर्मचारी यांना तीन लाभांची सुधारीत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतच्या, राज्य वेतन सुधारणा समितीच्या शिफारशी स्विकृतीबाबतच्या शासन निर्णयातील सोबतच्या विवरणपत्र अ.क्र.01 मधील शिफारशींवर शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार स्वायत्त संस्था सोडून इतर कर्मचा–यांकरीता केलेल्या शिफारशी स्वीकारण्यात येत आहेत.

दि.11.09.2019 रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.1161/2019 नुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांना 7 व्या वेतन आयोगाप्रमाणे प्रस्ताव दर्शविल्यानुसार सुधारित वेतनश्रेणी दि.01.01.2016 पासून लागू करण्यास मंजूरी दिली. तथापि महानगरपालिकेची आर्थिक स्थिती व उत्पन्न विचारात घेता,त्याचा प्रत्यक्ष आर्थिक लाभ दि.01.09.2019 पासून लागू करुन दि.01.01.2016 ते दि.31.08.2019 या कालावधीतील थकबाकी अधिकारी/कर्मचा-यांना व सेवानिवृत्त वेतन धारकांना अनुज्ञेय राहणार नाही,असा ठराव पारीत केलेला आहे.

7 व्या वेतन आयोगाच्या धर्तीवर 03 लाभांची आश्वासित प्रगती योजना दि.01.01.2016 पासून लागू करुन त्याचा प्रत्यक्ष आर्थिक लाभ दि.01.09.2019 पासून लागू करुन दि.01.01.2016 ते दि.31.08.2019 या कालावधीतील थकबाकी अधिकारी/कर्मचा-यांना व सेवानिवृत्त वेतन धारकांना कोणतीही थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही.

करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

**<u>ठराव</u> –**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, दि.11.09.2019 रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.1161/ 2019 नुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांना 7व्या वेतन आयोगाप्रमाणे

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सुधारित वेतनश्रेणी दि.01.01.2016 पासून लागू करण्यास ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

सदर ठरावानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचा-यांना 7 वा वेतन आयोग दि.01.01.2016 पासून लागू करुन त्याचा प्रत्यक्ष आर्थिक लाभ दि.01.09.2019 पासून लागू करुन दि.01.01.2016 ते दि.31.08.2019 या कालावधीतील थकबाकी अधिकारी/कर्मचा-यांना व सेवानिवृत्त वेतन धारकांना अनुज्ञेय केलेली नाही. त्याच धर्तीवर 03 लाभांची आश्वासित प्रगती योजना दि.01.01.2016 पासून लागू करुन त्याचा प्रत्यक्ष आर्थिक लाभ दि.01.09.2019 पासून लागू करुन दि.01.01.2016 ते दि.31.08.2019 या कालावधीतील थकबाकी अधिकारी/कर्मचा-यांना व सेवानिवृत्त वेतन धारकांना कोणतीही थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही,या अटी व शर्तीनुसार प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1069/2023:-</u>** **(उद्यान विभाग)** **(दि.17.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.उच्च न्यायालय (खंडपीठ औरंगाबाद) परिसरातील मा.मुख्य न्यायाधीश यांचे निवासस्थान लगत कृत्रिम तलाव आहे. सदर कृत्रिम तलावाचे सुशोभिरकण करुन वृक्षारोपण करणे बाबत दि.04.09.2023 रोजी मा.मुख्य न्यायाधीश, मा.उच्च न्यायालय (खंडपीठ औरंगाबाद) व मा.जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचे समवेत संयुक्त स्थळ पाहणी अंती निर्णय झाला. सदर कामाअंतर्गत फायबर डोम गजिबोची उभारणी करणे, लोखंडी ग्रील बसविणे, एन्टीस्किड टाईल्स लावणे, भारतीय वंशावळीची/आयुर्वेदिक/फळांची झाडे लावणे इ.कामाचा समावेश करण्यात आला आहे. सदर कामाचे र.रु.29,92,991/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याची दरसुची सन 2022-23 व काही बाबी कोटेशन/मंजुर दरपत्रक आधारे तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करुन प्रस्तावित कामासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत् निधी मिळणे करीता मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव (जिल्हा नियोजन समिती), छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव (जिल्हा नियोजन समिती) यांनी दि.20.10.2023 अन्वये प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश निर्गमित केले आहे.

मा.मुख्य न्यायाधीश, मा.उच्च न्यायालय (खंडपीठ औरंगाबाद) व मा.जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचे समवेत संयुक्त स्थळ पाहणी दरम्यान सदर काम तातडीने हाती घेऊन पुर्ण करणे बाबत सुचना आहे. करीता कामाची तातडी विचारात घेता, उक्त काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची-ड, प्रकरण-5 मधील नियम 2 (2) मधील तरतुदी नुसार उपलब्ध गुत्तेदार श्री.सिद्दीकी मोहम्मद मुज्तबा रियोज्जोद्दीन यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने विना निविदा काम करुन घेण्यास्तव प्रस्तावीत करण्यात येते.

करीता, र.रु.29,92,991/- चे अंदाजपत्रक आणि उपलब्ध गुत्तेदार श्री.सिद्दीकी मोहम्मद मुज्तबा रियोज्जोद्दीन यांच्याकडून उक्त तरतुदीनुसार अंदाजपत्रकीय दराने विना निविदा काम करुन घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1069/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.उच्च न्यायालय (खंडपीठ औरंगाबाद) परिसरातील मा.मुख्य न्यायाधीश यांचे निवासस्थान लगत असलेल्या कृत्रिम तलावाचे सौंदर्यीकरण करुन वृक्षारोपण करणे अंतर्गत फायबर डोम गजिबोची उभारणी करणे, लोखंडी ग्रील बसविणे, एन्टीस्किड टाईल्स लावणे, भारतीय वंशावळीची/आयुर्वेदिक/फळांची झाडे लावणे इ.कामाचे अंदाजपत्रक र.रु.29,92,991/- ला आणि सदर कामाचा खर्च जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 अंतर्गत प्राप्त निधी मधुन भागविण्यास मान्यता देण्यात येते. तसेच कामाची तातडीने विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची-ड प्रकरण-5 मधील नियम 2 (2) मधील तरतुदी नुसार उपलब्ध गुत्तेदार श्री.सिद्दीकी मोहम्मद मुज्तबा रियोज्जोद्दीन यांचे मार्फत विना निविदा अंदाजपत्रकीय दराने काम करुन घेण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1070/2023:-** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.20.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या मोकळ्या जागा शहरात विविध ठिकाणी आहेत. सदरील जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता असते तसेच मोकळ्या जागांपासून महानगरपालिकेस कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नाही. या बाबींचा विचार करुन महानगरपालिकेने बायजीपुरा येथील सेंर्टल नाका जवळच्या मोकळ्या जागेवर प्रगती पेट्रोल पंप सुरु केलेला आहे. सदरील पेट्रोल पंपापासून महानगरपालिकेस मागील आर्थिक वर्षी रु.56 लाखाचे उत्पन्न मिळाले आहे. या व्यतिरिक्त सदरील जागेचे प्रतिवर्ष रु.18 लाख भाडेही महानगरपालिकेस मिळते. तसेच नागरीकांना चांगल्या दर्जाचे पेट्रोलियम उत्पादन उपलब्ध करुन देण्यात महानगरपालिका यशस्वी ठरली आहे. या बाबींचा विचार करुन दि.06.07.2023 रोजी स्मार्ट सिटी येथे घेतलेल्या बैठकीत शहरातील खालील ठिकाणी पेट्रोल पंप सुरु करण्याचे ठरले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | शहानुरमियाँ दर्गा | 02. | आनंद गाडे चौक, एकनाथनगर |
| 03. | शिवाजीनगर | 04. | रोजाबाग |
| 05. | हर्सुल स्मृतीवन, हसुरल | 06. | घनकचरा प्रक्रिया केंद्राजवळ चिकलठाणा |
| 07. | घनकचरा प्रक्रिया केंद्राजवळ, हर्सुल | 08. | फारोळा |

प्रगती पेट्रोल पंप प्रमाणेच पेट्रोलियम कंपनीच्या खर्चाने सर्व इन्फ्रास्ट्रक्चर उभे करुन घेण्यात येईल. तसेच प्रस्तावित पेट्रोल पंप/रिटेल आऊटलेट मध्ये सीएनजी, इव्ही चार्जिंग इत्यादी सुविधाही उपलब्ध करुन देण्यात येतील.इव्ही चार्जींग साठी साधारणत: अर्धा ते एक तास वेळ लागतो. ही बाब लक्षात घेऊन पेट्रोल पंप परिसरात एक छोटेसे कॅफे (उपहारगृह) चालु करण्यात येईल. जेणे करुन इव्ही चार्जींग दरम्यान लागणारा वेळ घालविण्यासाठी ठिकाण उपलब्ध होईल.

तद्नुषांने शहरातील नागरीकांना चांगल्या दर्जाचे पेट्रोलियम उत्पादन उपलब्ध व्हावे व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे या दृष्टिकोनातून शहरातील वरील ठिकाणी प्रस्तावात नमुद सुविधां सह नवीन पेट्रोल पंप/रिटेल आऊटलेट सुरु करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1070/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील वरील आठ ठिकाणी नागरीकांना चांगल्या दर्जाचे पेट्रोलियम उत्पादन उपलब्ध व्हावे व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे या उद्देशाने प्रस्तावात नमुद सुविधांसह नवीन पेटोल पंप/रिटेल आऊटलेट सुरु करण्यासाठी सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1071/2023:-** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.20.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागातील जुनी भंगार वाहने व एम.एस.स्क्रॅप, ॲटोमोबाईल स्क्रॅप, जुने टायर, प्लास्टिक व लोखंडी (स्टील) ड्रम इत्यादींचा लिलाव दि.07जुन 2023 रोजी मेसर्स बीड बाजार ॲटो प्रा.लि. नेरुळ, मुंबई यांच्या मार्फत ई-ऑक्शन पध्दतीने करण्यात आलेला होता. तथापि, लिलाव समितीच्या दि.11.07.2023 च्या बैठकीत "लिलावात योग्य प्रमाणात स्पर्धा न झाल्यामुळे" हा लिलाव रद्द केला आहे.

शासन निर्णय क्र.एमव्हीआर/0522/प्र.क्र.41/भाग-4/परि-2 दि.27.01.2023 अन्वये राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडील 15 वर्षापेक्षा जास्त वयोमान असलेली वाहने प्रादेशिक परिवहनविभागामार्फत परस्पर लिलाव करण्याचा शासन निर्णय आहे. त्यानुसार महानगरपालिकेची वरील प्रमाणे लिलावात रद्द झालेली 36 वाहने प्रादेशिक परिवहन विभागामार्फत लिलाव करण्यासाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तथापि, त्यांच्याकडून कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही. यांत्रिकी विभागात वाहने लावण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. नवीन वाहने खरेदी करण्याची प्रक्रिया सुरु आहे. नवीन वाहने ठेवण्यासाठीही जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे महानगरपालिकेमार्फत ई-लिलाव करुन सदरील वाहने व भंगार साहित्याचा लिलाव करणे योग्य होणार आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत सदरील जुन्या भंगार वाहनांचे मुल्यांकन करुन घेण्यात आलेले आहे. तसेच वाहना व्यतिरिक्त इतर भंगार साहित्याचे मुल्यांकन स्थानिक एजन्सी कडून दरपत्रके (कोटेशन) मागवुन निश्चित करण्यात आलेले आहेत ते खालीलप्रमाणे.

| | **साहित्याचा प्रकार** | **साहित्याचा साठा प्रत्यक्ष स्थळी कमी/जास्त** | **प्रस्तावित दर (GST व इतर कर अतिरिक्त)** | **प्राप्त होणारी रक्कम प्रत्यक्ष स्थळी कमी/जास्त धरुन** |
|---|---|---|---|---|
| परिशिष्ठ-अ | जुनी वाहने | 36 वाहने (वेगवेगळ्या वजनाची) | रु.38 प्रति किलो | र.रु.30,82,500/- |
| परिशिष्ठ-ब | एम.एस.स्क्रॅप | 54850 किलो | रु.33 प्रतिकिलो | र.रु.18,10,050/- |
| | ॲटोमोबाईल पार्ट | 6000 किलो | रु.33 प्रतिकिलो | र.रु1,98,000/- |
| | प्लास्टिक ड्रम | 48 नग | रु.435 प्रतिनग | र.रु.20,880/- |
| | लोखंडी ड्रम | 46 नग | रु.360 प्रतिनग | र.रु.16,560/- |
| | जुने टायर | 4500 किलोग्रॅम | रु.10 प्रतिकिलो | र.रु.45,000/- |
| | | | **एकुण** | **र.रु.51,72,990/-** |

करीता, दि.07 जुन 2023 रोजीच्या रद्द झालेल्या लिलावातील वाहने व इतर भंगार साहित्य यांचा महानगरपालिकेमार्फत शासनमान्य संकेतस्थळावर ई-ऑक्शन पध्दतीने वरील प्रमाणे Base Price गृहीत धरुन लिलाव करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1071/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जुन्या वाहनांचा लिलाव करण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागा मार्फत प्रतिसाद मिळत नसल्यामुळे प्रस्तावात नमुद दर गृहित धरुन शासनमान्य संकेतस्थळावर ई-ऑक्शन पध्दतीने लिलाव करण्यासाठी सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1072/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.20.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सेव्हनहिल उड्डाणपुला खालील (पश्चिम बाजु) खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे या कामाचे ठेकेदार मे.गुदगे कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 23.90% कमी दराने म्हणजेच निविदा र.रु.25,36,274/- पर्यंत करुन घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ:-निविदा क्रमांक 2023_AMCA_948193_1 दि.20.10.2023

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | वॉर्ड अभियंता कार्यालय क्र.9 |
| 2. | कामाचे स्वरुप | खुली जागेस संरक्षित भिंत बांधणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | र.रु.39,99,968/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.33,32,817/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | स्थानिक दैनिक वर्तमानपत्र |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.03 ऑक्टोंबर 2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.20 ऑक्टोंबर 2022 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एकुण 08 आठ निविदांपैकी 08 पात्र ठरल्या |

(त्यापैकी पात्र टेंडरधारकाची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| **अ. क्र.** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **टेंडर र.रु.** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| 1. | मे.गुदगे कन्स्ट्रक्शन | 25,36,274/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 23.90% कमी दराने |
| 2. | मे.रॉयल एन्टरप्राईजेस | 25,66,269/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 23.00% कमी दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| 3. | श्री.सिद्दीकी जलीसउद्दीन मोईजउद्दीन | 27,37,909/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.85% कमी दराने |
| 4. | मे.एम.आय इन्फ्रा | 27,52,907/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.40% कमी दराने |
| 5. | मे.बिल्डवेल कन्स्ट्रक्शन | 27,66,238/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.00% कमी दराने |
| 6. | श्री.संतोष रुपचंद चव्हाण | 28,99,551/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.00% कमी दराने |
| 7. | मे.बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज | 29,99,536/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00% कमी दराने |
| 8. | श्री.सुमेश सुमतीलाल कटारिया | 32,37,499/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 02.86% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | ------ |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | 2023-24 या वर्षातील शासन निधी (मनपा क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी र.रु.40.00 कोटी अनुदान) |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | ------ |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभेचा ठराव क्र.925/2023 दि.01.09.2023 |

तरी विषयांकीत काम ठेकेदार मे.गुदगे कन्स्ट्रक्शन यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 23.90% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.25,36,274/- पर्यंत काम करुन घेणेचा व करार करण्यास प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव क्रमांक 1072/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सेव्हनहिल उड्डाणपुला खालील (पश्चिम बाजु) खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे या कामाचे ठेकेदार मे.गुदगे कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 23.90% कमी दराने म्हणजेच निविदा र.रु.25,36,274/- पर्यंत करुन घेणे व करार करणेच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1073/2023:-** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.20.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहर सौंदर्यीकरणाच्या कामांतर्गत झोन क्र.09 मधील क्रांतीचौक येथील शिवसृष्टी संरक्षित करण्यासाठी विविध कामे करणे या कामाचे ठेकेदार श्री.मुजीब उर रहेमान खान यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.00% कमी दराने म्हणजेच निविदा र.रु.20,21,235/- पर्यंत करुन घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ:-निविदा क्रमांक-2023_AMCA_943314_1 दि.21.09.2023

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | वॉर्ड अभियंता कार्यालय क्र.9 |
| 2. | कामाचे स्वरुप | शिवसृष्टी सुरक्षेच्या दृष्टिने कामे करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | र.रु.29,94,400/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.24,95,351/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती | स्थानिक दैनिक वर्तमानपत्र |

| | | |
|---|---|---|
| | त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.19 सप्टेंबर 2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.21 सप्टेंबर 2022 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एकुण 03 निविदांपैकी 03 पात्र ठरल्या |

(त्यापैकी पात्र टेंडरधारकाची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| **अ. क्र.** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **टेंडर र.रु.** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| 1. | श्री.मुजीब उर रहेमान खान | 20,21,235/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.00% कमी दराने |
| 2. | मे.आर.यु.सी.कन्स्ट्रक्शन | 21,95,909/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.00% कमी दराने |
| 3. | मे.बिल्डवेल कन्स्ट्रक्शन | 24,70,398/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 01.00% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | ------ |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | 2023-24 या वर्षातील शासन निधी (मनपा क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी र.रु.40.00 कोटी अनुदान) |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | ------ |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभेचा ठराव क्र.950/2023 दि.07.09.2023 |

तरी विषयांकीत काम ठेकेदार श्री.मुजीब उर रहेमान खान यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.00% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.20,21,235/- पर्यंत काम करुन घेणेचा व करार करण्यास प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यता घेणे बाबत सादर.

**<u>ठराव क्रमांक 1073/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर सौंदर्यीकरणाच्या कामाअंतर्गत झोन क्र.09 मधील क्रांतीचौक येथील शिवसृष्टी संरक्षित करण्यासाठी विविध कामे करणे या कामाचे ठेकेदार श्री.मुजीब उर रहेमान खान यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.00% कमी दराने म्हणजेच निविदा र.रु.20,21,235/- पर्यंत काम करुन घेणे व करार करण्याच्या प्रस्तावा सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1074/2023:-</u>** **(कार्य. अभियंता रस्ते विभाग)** **(दि.20.11.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहर सौंदर्यीकरणाच्या कामांतर्गत झोन क्र.09 मधील उस्मानपुरा चौक (गोपाल टी चौक) येथे वाहतुकबेट विकसीत करणे या कामाचे ठेकेदार मे.रॉयल एंटरप्राईजेस यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.87% कमी दराने म्हणजेच निविदा र.रु.32,02,291/- पर्यंत करुन घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भः-निविदा क्रमांक 2023_AMCA_943321_1 दि.21.09.2023

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | वॉर्ड अभियंता कार्यालय क्र.9 |
| 2. | कामाचे स्वरुप | सौंदर्यीकरण करणे व वाहतुकबेट विकसीत करणे |

| | | |
|---|---|---|
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | र.रु.49,95,488/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.40,98,670/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | स्थानिक दैनिक वर्तमानपत्र |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.19 सप्टेंबर 2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.21 सप्टेंबर 2022 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एकुण 05 निविदांपैकी 05 पात्र ठरल्या |

(त्यापैकी पात्र टेंडरधारकाची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर र.रु. | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | मे.रॉयल एंटरप्राईजेस | 32,02,291/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.87% कमी दराने |
| 2. | मे.आर.यु.सी.कन्स्ट्रक्शन | 33,60,499/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.01% कमी दराने |
| 3. | मे.एम.आय.इन्फ्रा | 33,81,403/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.50% कमी दराने |
| 4. | मे.बिल्डवेल कन्स्ट्रक्शन | 36,47,816/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.00% कमी दराने |
| 5. | श्री.मुजीब उर रहेमानखान | 36,47,816/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.00% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | ------ |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | 2023-24 या वर्षातील शासन निधी (मनपा क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी र.रु.40.00 कोटी अनुदान) |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | ------ |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभेचा ठराव क्र.951/2023 दि.07.09.2023 |

तरी विषयांकीत काम ठेकेदार मे.रॉयल एंटरप्राईजेस यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.87% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.32,02,291/- पर्यंत काम करुन घेणेचा व करार करण्यास प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यता घेणे बाबत सादर.

**<u>ठराव क्रमांक 1074/2023:-</u>**

| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | ---- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई-सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद अंतर्गत मंजुर अनुदान र.रु.40.00 कोटी मधील यादीतील पान क्र.07 अ.क्र.12 वर र.रु.1.00 कोटी व उर्वरित रक्कम महानगरपालिकेच्या फंडातून |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे नमुद कामाचे L1 निविदाधारक श्री.जागीरदार सबाहुद्दीन, कंत्राटदार, छत्रपती संभाजीनगर यांची निविदा मंजुर निविदा रक्कमेपक्षा 25.17% कमी दराची म्हणजेच निविदा र.रु.78,03,231/- (GST वगळून) ची असुन त्यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1089/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.20, जयभिमनगर, टाऊन हॉल उड्डाणपुलाखाली सिमेंट कॉंक्रीट करणे व चौक विकसीत करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.1,30,30,629/- (18% GST सह) चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी L1 निविदाधारक श्री.जागीरदार सबाहुद्दीन, कंत्राटदार, हे असुन त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर निविदा रक्कमेपक्षा 25.17% कमी दराची म्हणजेच निविदा र.रु.78,03,231/- (GST वगळून) चे प्राप्त असुन सदर निविदेत बाबतच्या प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1090/2023:-</u>** **(कार्य. अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.30.11.2023)**

विषयः- वॉर्ड क्र.38,मसनतपुर येथील सम्राट प्रिंटच्या बाजुला असलेल्या नाल्याचा प्रवाह MIDC रोड लगत वळवुन नदीत सोडणे करीता RCC नाला बांधणे तसेच ड्रेनेज लाईन टाकणे व इतर कामे करणे.

या कामाचे ठेकेदार मे.बालाजी सिव्हील इंडस्ट्रीज यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00% कमी दराने म्हणजेच र.रु.62,44,127.01/- पर्यंत करुन घेण्यास अधिक टेंडरअटी/शर्तीतील भाववाढ व विशेष सुत्रानुसार फरक अदा करण्यास/कपात करण्यास व करार करण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ:-टेंडर क्रमांक/Tender ID_2023_AMCA_926431_02

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | उपअभियंता झोन क्र.05, सिडको |
| 2. | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.38,मसनतपुर येथील सम्राट प्रिंटच्या बाजुला असलेल्या नाल्याचा प्रवाह MIDC रोड लगत वळवुन नदीत सोडणे करीता RCC नाला बांधणे तसेच ड्रेनेज लाईन टाकणे व इतर कामे करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.सर्वसाधारण सभा दि.14.06.2023 विषय क्र.813 र.रु.82,55,399/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.69,37,919/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ----- |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.30.08.2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.07.09.2023 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 02 (दोन) |

(त्यापैकी पात्र टेंडरधारकाची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर र.रु. | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | बालाजी सिव्हील इंडस्ट्रीज | 6244127.01 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00% कमी दराने |
| 2. | जागीरदार सबाहुद्दीन | 9808873.61 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 01.86% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नाला ट्रेडिंग कामे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी विषयांकीत काम ठेकेदार बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज यांच्याकडून दरापेक्षा 10.00% कमी दराने म्हणजेच निविदा र.रु.62,44,127.01/- पर्यंत करुन घेण्यास अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे बाबत सादर.

**<u>ठराव क्रमांक 1090/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.38,मसनतपुर येथील सम्राट प्रिंटच्या बाजुला असलेल्या नाल्याचा प्रवाह MIDC रोड लगत वळवुन नदीत सोडणे करीता RCC नाला बांधणे तसेच ड्रेनेज लाईन टाकणे व इतर कामे करण्याचे अंदाजपत्रक र.रु.82,55,319/- यास मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्रमांक-813 दि.14.06.2023 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. या अनुषंगाने सदर कामासाठी र.रु.69,37,918/- च्या मर्यादित निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

करीता, सदरील कामाकरीता प्राप्त पात्र निविदाधारकांपैकी L1 निविदाधारक बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज यांची मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 10.00% कमी दराची म्हणजेच र.रु.62,44,127.01/- ची प्राप्त असुन सदर निविदा स्विकृतीचा प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1091/2023:-</u>** **(कार्य.अभियंता रस्ते विभाग)** **(दि.01.12.2023)**

विषयः- (राष्ट्रीय शुध्द हवा (NCAP) कार्यक्रम अंतर्गत) झोन क्र.02 मधील निराला बाजार ते नागेश्वरवाडी पर्यंत मुख्य रस्त्याच्या कडेला फुटपाथ करणे/पेव्हर बसविणे बाबत.

संदर्भः-टेंडर क्र.आय.डी._2023_AMCA_952013_01. सन 2023-24 (पहिल्या वेळैस)

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | उपअभियंता झोन क्र.02 |
| 2. | कामाचे स्वरुप | 15 वा वित्त आयोग (राष्ट्रीय शुध्द हवा (NCAP) कार्यक्रम अंतर्गत) |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | र.रु.56,83,941/-मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.782/2023 दि.11.05.2023 |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.47,36,618/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-महाटेंडर विभाग जा.क्र.मनपा/ का. अभि.बी आणि ई/76/2023 दि.20.09.2023 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत/ दिनांक | दि.09.10.2023 ते दि.17.10.2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.19.10.2023 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | पहिल्या वेळेस - सात |

(त्यापैकी पात्र टेंडरधारकाची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर र.रु. | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | मे.गुदगे कन्स्ट्रक्शन औरंगाबाद | 34,34,048/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27.50% कमी दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | | होय |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | | |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | प्रस्तावित काम 15 वा वित्त आयोगा अंतर्गत (NCAP) प्राप्त निधी मधुन प्रस्तावित | |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | | -- |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | | -- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | | होय |

विषयांकीत कामासाठी पहिल्या वेळेस निविदा मागविण्यात आली असता, ठेकेदार मे.गुदगे कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27.50% कमी दराची निविदा दाखल केलेली आहे. कंत्राटदार यांनी सदर कामासाठी भरलेले निविदा दराने काम करण्यास सहमती दिली आहे. तरी ठेकेदार यांची 27.50% कमी दराने म्हणजेच टेन्डर र.रु.34,34,048/- पर्यंत काम करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1091/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, (राष्ट्रीय शुध्द हवा (NCAP) कार्यक्रम अंतर्गत) झोन क्र.02 मधील निराला बाजार ते नागेश्वरवाडी पर्यंत मुख्य रस्त्याच्या कडेला फुटपाथ करणे/पेव्हर बसविणे या कामासाठी प्राप्त निविदाधारक ठेकेदार मे.गुदगे कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांच्याकडून अंदाज पत्रकीय दरापेक्षा 27.50% कमी दराने म्हणजेच टेन्डर र.रु.34,34,048/- पर्यंत काम करुन घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1092/2023:-</u>** **(कार्य.अभियंता रस्ते विभाग)** **(दि.04.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.24 शाहबाजार अंतर्गत अशोकनगर स्मशानभुमी विकसीत करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2021-22 च्या दरसुची नुसार अंदाजपत्रकीय र.रु.29,25,939/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2023-24 च्या अर्थसंकल्पातील Ward-03-ABS-02 Sr.No.10 नुसार चालु आर्थिक वर्षाच्या नवीन कामासाठी तरतुद निरंक असुन व र.रु.35.00 लक्ष Spill Over (Spill Zone-03-Pg 23) कामासाठी ठेवण्यात आली आहे. विकास कामे करण्यासाठी ह्या कामाचे समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेची मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1092/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.24, शाहबाजार अंतर्गत अशोकनगर स्मशानभुमी विकसीत करणे या कामासाठी अंदाजपत्रकीय र.रु.29,25,939/- पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते अंदाजपत्रक मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1093/2023:-</u>** **(कार्य.अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.04.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,मध्य मतदार संघातील No Sewer Network Area भागांमध्ये जलनि:स्सारण वाहिनी टाकणे या प्रकल्पासाठी नियुक्त PMC यांनी भीमनगर (उत्तरेकडील भाग), भावसिंगपुरा भीमनगर (दक्षिण), नंदनवन कॉलनी, शांतीपुरा, जयसिंगपुरा, कोतवालपुरा,

गरमपाणी नागेश्वरवाडी, समर्थनगर, समतानगर, कोटला कॉलनी, सिल्लेखाना, गांधीनगर, खोकडपुरा, भवानीनगर, संजयनगर, नवाबपुरा, राजाबाजार, गुलमंडी, भडकलगेट, बुढ्ढीलेन, खडकेश्वर, औरंगपुरा, हर्सुल, भगतसिंग नगर-म्हसोबा नगर, एकता नगर, चेतनानगर-राजनगर, वानखेडेनगर-होनाजीनगर, सईदा कॉलनी, यादवनगर एन-11, मयुरपार्क, सुरेवाडी, मयुरनगर-सुदर्शन नगर, रोजाबाग, भारतमातानगर, विश्वासनगर, हर्षनगर, पहाडसिंगपुरा, बेगमपुरा, आरेफकॉलनी, प्रगती कॉलनी, जयभीमनगर-आसेफिया कॉलनी, बुढ्ढीलेन-कबाडीपुरा, लोटाकारंजा, चेलीपुरा-काचीवाडा, शहाबाजार, गणेश कॉलनी, नेहरुनगर, शताब्दीनगर, स्वामी विवेकानंदनगर, श्रीकृष्णनगर, पवननगर, आंबेडकरनगर, मिसारवाडी इ.भागांमध्ये जलनि:स्सारण वाहिनी नव्याने टाकणे बाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल र.रु.196,00,84,988/- चा तयार करण्यात आला होता.त्यास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.1028/2023 दि.23.10.2023 अन्वये मान्यता प्राप्त झाली होती.

तद्नंतर विस्तृत प्रकल्प अहवाल तांत्रिक मान्यतेसाठी शासन नियुक्त नोडल एजन्सी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सादर केले असता, त्यांनी पत्र क्र.जा.क्र.मनिसंस कक्ष/तांशा-ग्रा/मजीप्रा/ सीआर-82/442 दि.30.11.2023 अन्वये काही बदल सुचविले आहेत. त्यानुषंगाने नियुक्त PMC यांनी या कार्यालयाच्या सुचनेनुसार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाच्या सुचनेनुसार आवश्यक बदल करुन र.रु192,65,12,181/- किंमतीचा सुधारित विस्तृत प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन 2023-24 व सार्वजनिक बांधकाम दरसुची सन 2022-23 नुसार तयार करुन सादर केला आहे.या सुधारति प्रकल्प अहवालात खालील तक्त्यात नमुदप्रमाणे विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

| Sub Work No. | Name Of Sub Work | Total Cost of Components in Rs. |
|---|---|---|
| 1. | Working Survey | Rs.1,552,119.0 |
| 2. | Collection system (Length-187.14Km) | Rs.1,057,608,070.6 |
| 3. | Manhole pumping station @010 Amber Hill | Rs.11,370,153.0 |
| 4. | Manhole pumping station @012 Harsul Lake | Rs.11,146,927.0 |
| 5. | Sewage pumping station @09 Himayat Bagh | Rs.8,261,360.0 |
| 6. | Sewage pumping station @13 Pisadevi Road | Rs.7,286,290.0 |
| 7. | Rising Main (200 m long-300 mm Dia.) @09 Himayat Bagh<br>Rising Main (200 m long-350 mm Dia.) @013 Pisadevi Road | Rs.2,775,050.0 |
| 8. | Rising Main (200 m long-150 mm Dia.) @012 Harsul Lake<br>Rising Main (360 m long-150 mm Dia.) @010 Amber Hill | Rs.1,737,846.0 |
| 9. | Mechanical Works of Pumping Station-09 Himayat bagh | Rs.21,677,619.0 |
| 10. | Mechanical Works of Pumping Staion-013 Pisadevi Road | Rs.19,140,239.0 |
| 11. | Express Feeder | Rs.6,830,059.0 |
| 12. | STP of capacity 4.50 MLD-SBR@013 Pisadevi Road | Rs.89,881,581.0 |
| 13. | STP of capacity 2.50 MLD-MMBR@09Himayat Bagh | Rs.40,940,079.0 |
| 14. | STP of capacity 0.5 MLD-MMBR@012 Harsul Lake | Rs.13,889,361.0 |
| 15. | Compound Wall (Length-900m) | Rs.13,724,746.0 |
| 16. | Effulent Storage tank @013 Pisadevi Road | Rs.3,993,828.0 |
| 17. | Effluent Storage tank@09 HimayatBagh | Rs.3,274,473.0 |
| 18. | House Service Connection (4000 nos HH) | Rs.97,676,060.0 |
| 19. | Road Restoration (Length-55.50km) | Rs.177,900,387.8 |
| 20. | Utility Shifting | Rs.10,999,470.0 |
| 21. | Trial and Run For Three Month | Rs.3,224,740.0 |
| 22. | Royalty Charges for Natural Sand, Rubble stone above 40 mm size & Hard Murum of PWD Item. | Rs.1,809,017.0 |
| 23. | Push Through for crossing line under Major Road | Rs.4,699,985.0 |
| 24. | Testing Charges | Rs.137,031.8 |
| A | Total Cost Rs.(A) | Rs.161,15,36,492.19 |
| | PWD/Railway Permission Charges | Rs.9,825,000.0 |
| B | Provision for 18% GST without Express Feeder and Royalty Charges (B) | Rs.288,521,534.91 |
| | Add for Labour Insurance (1%) on PWD amount | Rs.513,788.29 |
| | TPI Charges 1% | Rs.16,115,364.92 |
| | Total Net Cost (A+B) | Rs.192,65,12,181.00 |

करीता, (1) सुधारित विस्तृत प्रकल्प अहवाल र.रु.192,65,12,181/- शासन नियुक्त नोडल एजन्सी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून तपासुन व तांत्रिक मान्यता घेऊन शासनास अनुदान मागणीसाठी सादर करणे, (2) या नव्याने सादर करण्यात येत असलेल्या जलनि:स्सारण प्रकल्पाच्या विस्तृत प्रकल्प अहवालास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक आकृतीबंधानुसार महानगरपालिकेचा हिस्सा टाकणे, (3) या सुधारित जलनि:स्सारण प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर शासन निर्देशानुसार निविदा कार्यवाही व इतर संलग्न कार्यवाही करणे, त्यात आवश्यकतेनुसार बदल करावयाचे झाल्यास ते बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करण्यासह मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1093/2023:-</u>**

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे, (1) सुधारित विस्तृत प्रकल्प अहवाल र.रु.192,65,12,181/- शासन नियुक्त नोडल एजन्सी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून तपासुन व तांत्रिक मान्यता घेऊन शासनास अनुदान मागणीसाठी सादर करणे, (2) या नव्याने सादर करण्यात येत असलेल्या जलनि:स्सारण प्रकल्पाच्या विस्तृत प्रकल्प अहवालास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक आकृतीबंधानुसार महानगरपालिकेचा हिस्सा टाकणे, (3) या सुधारित जलनि:स्सारण प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर शासन निर्देशानुसार निविदा कार्यवाही व इतर संलग्न कार्यवाही करणे, त्यात आवश्यकतेनुसार बदल करावयाचे झाल्यास ते बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करण्यासह मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1094/2023:-</u>** **(मालमत्ता विभाग)** **(दि.06.12.2023)**

आयुक्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीता आहेत की, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.797 दि.20.06.2012 नुसार शहर सौंदर्यीकरण दत्तक योजना अंतर्गत शहरातील पुष्पनगरी स्मशानभुमीचा विकास व सौंदर्यीकरण करणे बाबत रोटरी क्लब, औरंगाबाद (पुर्व) व पल्लवांकुर नर्सरिज, समर्थनगर, औरंगाबाद यांच्या समवेत महानगरपालिकेने द्विपक्षीय सामंजस्य करारनामा (Non Financial Memorandum of Understanding) 10 वर्षाच्या कालावधीसाठी दि.01.01.2023 ते दि.31.12.2023 पर्यंत करण्यात आला होता. सदरच्या द्विपक्षीय सामंजस्य करारनामाची मुदत संपत असल्याने संबंधीत संस्थेने पुढील 10 वर्षासाठी मुदतवाढ मिळणे बाबत संस्थेने विनंती केलेली आहे. त्यानुसार संस्थेसोबत पुर्वी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार संस्थेस पुढील 10 वर्षासाठी मुदतवाढ देऊन शहर सौंदर्यीकरण दत्तक योजना अंतर्गत शहरातील पुष्पनगरी स्मशानभुमीचा विकास व सौंदर्यीकरण करणे बाबत रोटरी क्लब, औरंगाबाद (पुर्व) व पल्लवांकुर नर्सरिज, समर्थनगर औरंगाबाद यांना द्विपक्षीय सामंज्यस करारनामा (Non Financial Memorandum of Understanding) 10 वर्षाच्या कालावधीसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 1094/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.797 दि.20.06.2012 नुसार शहर सौंदर्यीकरण दत्तक योजना अंतर्गत शहरातील पुष्पनगरी स्मशानभुमीचा विकास व सौंदर्यीकरण करणे बाबत रोटरी क्लब, औरंगाबाद (पुर्व) व पल्लवांकुर नर्सरिज, समर्थनगर, औरंगाबाद यांच्या समवेत महानगरपालिकेने द्विपक्षीय सामंजस्य करारनामा (Non Financial Memorandum of Understanding) 10 वर्षाच्या कालावधीसाठी दि.01.01.2023 ते दि.31.12.2023 पर्यंत करण्यात आला होता. सदरच्या द्विपक्षीय सामंजस्य करारनामाची मुदत संपत असल्याने संबंधीत संस्थेने पुढील 10 वर्षासाठी मुदतवाढ मिळणे बाबत संस्थेने विनंती केलेली आहे. त्यानुसार संस्थेसोबत पुर्वी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार संस्थेस पुढील 10 वर्षासाठी मुदतवाढ देऊन शहर सौंदर्यीकरण दत्तक योजना अंतर्गत शहरातील पुष्पनगरी स्मशानभुमीचा विकास व सौंदर्यीकरण करणे बाबत रोटरी क्लब, औरंगाबाद (पुर्व) व पल्लवांकुर नर्सरिज, समर्थनगर औरंगाबाद यांना द्विपक्षीय सामंज्यस

करारनामा (Non Financial Memorandum of Understanding) 10 वर्षाच्या कालावधीसाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1095/2023:-** **(कार्य.अभियंता रस्ते विभाग)** **(दि.06.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहर व लगतच्या भागांमध्ये वाढती नागरी वसाहत व त्या प्रमाणात वाढती रहदारी लक्षात घेता, शासनाच्या धोरणानुसार मंजुर विकास आराखड्यातील रुंदीनुसार रस्ते विकसित करणे आवश्यक आहे. यामुळे जुन शहर व शहरालगत विकसित होणाऱ्या भागांमध्ये रस्त्यांच्या माध्यमातून सुलभ व सुरळीत वाहतुकीस फायदा होणार आहे.

या अनुषंगाने शहरातील रोशनगेट, चंपाचौक, इंदिरानगर, हर्सुल इत्याची तसेच शहरालगत झपाट्याने विकसित होणाऱ्या नागरी वसाहतींचा भाग जसे की, भावसिंगपुरा, पडेगाव, मिटमिटा, पहाडसिंगपुरा, चिकलठाणा, नारेगाव, पिसादेवी, सातारा-देवळाई, नक्षत्रवाडी, कांचनवाडी, ईटखेडा, इ.भागातील महत्वाच्या एकुण 47 विकास योजना रस्त्यांची यादी (12 मी.,15मी.,18 मी.,24 मी.,व 30 मी. प्रमाणे) तयार करण्यात आली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदाजीत खर्च (रु.कोटी) |
|---|---|---|
| 1. | गट क्र.52 व 53 भावसिंगपुरा, पुर्व-पश्चिम नाला क्रॉस करुन जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीट करणे. | 5.92 |
| 2. | भावसिंगपुरा स्लम गट क्र.26 पश्चिमेकडे जाणारा गट क्र.63 पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 3.95 |
| 3. | गट क्र.27, भावसिंगपुरा पासुन दक्षिणेकडे मुंबई हाय-वे चिनार गार्डन पर्यंत (भागश:) कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 44.75 |
| 4. | मौजे भावसिंगपुरा मनपा शाळेसमोरुन गट क्र.63,61,62,48 मधुन जाणारा दक्षिणेकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीट करणे. | 6.27 |
| 5. | मौजे भावसिंगपुरा रमाई आंबेडकर चौक ते कत्तलखाना पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 30.38 |
| 6. | भावसिंगपुरा भागातील विविध विकास योजना रस्त्यांचे कॉंक्रीट करणे. | 24.60 |
| 7. | मकबरा ते जळगाव रोड पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 83.55 |
| 8. | गट क्र.263 मिटमिटा ते गट क्र.148 मिटमिटा (पुर्व-पश्चिम) पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 27.34 |
| 9. | गट क्र.138,139 व 155 मिटमिटा येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 19.45 |
| 10. | शेळी, मेंढी पालन ते गट क्र.62 पडेगाव ते गट क्र.63 पडेगाव (L Shape) पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 13.94 |
| 11. | गट क्र.47 पडेगाव ते गट क्र.61, पडेगाव ते गट क्र.59 पडेगाव (L Shape) पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 16.40 |
| 12. | गट क्र.70 पडेगाव ते गट क्र.102 पडेगाव पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 4.67 |
| 13. | पडेगाव सबस्टेशन ते सफारी पार्क मार्गे नाशिक महामार्गा पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 50.13 |
| 14. | मिटमिटा कादरी दवाखाना समोरील गट क्र.101 ते कत्तलखाना पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 28.86 |
| 15. | रोशनगेट ते कटकट गेट पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 3.50 |
| 16. | इंदिरानगर स्लम मधुन (सर्वे न.32) ते सेंर्टल नाका रोड पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 1.95 |
| 17. | चंपाचौक ते जालना रोड पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 21.27 |
| 18. | जालना रोड ते अपेकस हॉस्पीटल ते टाकळकर सोसायटी पर्यंत भागश: कॉंक्रीट | 2.80 |

| | | |
|---|---|---|
| | रस्ता तयार करणे. | |
| 19. | हर्सुल गावठान, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते पिसादेवी पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 50.13 |
| 20. | हर्सुल जेल ते स्मृतीवन (जटवाडा रोड) पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 27.34 |
| 21. | हर्सुल गाव PMAY Project ते पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 9.34 |
| 22. | गट क्र.220 हर्सुल, गट क्र.25 व 26 आणि गट क्र.226 हर्सुल मधील विकास योजना रस्त्याचे कॉंक्रीट करणे | 20.50 |
| 23. | राष्ट्रवादी भवन ते डी.मार्ट एन-11 पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 3.28 |
| 24. | हयात हॉटेल ते सुखना नदी (चिलकठाणा) पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 9.11 |
| 25. | चिलकठाणा भागातील विविध 12.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रीट करणे. | 23.34 |
| 26. | सिव्हील हॉस्पीटल (चिकलठाणा) ते नारेगाव पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 45.57 |
| 27. | मनपा शाळा गोकुळधाम ते सातारा गाव हद्दी पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 15.19 |
| 28. | वसंत विहार ते अग्रसेन विद्यामंदीर पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 9.11 |
| 29. | गोकुळधाम ते अपार्टमेंट ते श्री.मंत्री यांच्या घरा पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 15.19 |
| 30. | पैठण रोड ते गोल्ड सिटी हॉस्पिटल, दिशा संस्कृतीकडे जाणाऱ्या रस्त्यांचे कॉंक्रीट करणे. | 1.52 |
| 31. | बीड-बायपास ते सोलापुर हाय-वे (पुर्ण विकास) पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 45.57 |
| 32. | बीड-बायपास ते सोलापुर हाय-वे (पुर्ण विकास) पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 45.57 |
| 33. | बीड बायपास ते सातारा गाव पर्यंत रुंदीकरणासह कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 12.30 |
| 34. | बीड बायपास (वखार महामंडळ) ते गट क्र.08 सातारा पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 22.79 |
| 35. | गट क्र.79 सातारा ते सोलापुर हाय-वे पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 21.48 |
| 36. | सोलापुर हाय-वे ते गट क्र.229 सातारा पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 26.03 |
| 37. | गट क्र.229 सातारा ते उत्तरेकडील रस्त्याचे कॉंक्रीट करणे. | 3.28 |
| 38. | सातारा गाव ते देवळाई गाव पर्यंत रुंदीकरणासह कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 60.76 |
| 39. | बीड बायपास ते गट क्र.90 देवळाई पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 10.37 |
| 40. | बीड बायपास ते गट क्र.130 देवळाई पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 6.61 |
| 41. | गट क्र.100 देवळाई ते गट क्र.110 देवळाई पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 5.84 |
| 42. | सोलापुर हाय-वे ते बाळापुर (खडीरोड) पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 22.79 |
| 43. | आंबेडकर नगर ते पिसादेवी पर्यंत रुंदीकरणासह कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 42.53 |
| 44. | गट क्र.22 व 23 सातारा (ऑरेंज सिटी) पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 3.89 |
| 45. | पैठण रोड गट क्र.18 नक्षत्रवाडी ते STP ते गट क्र.114 नक्षत्रवाडी पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 45.57 |
| 46. | गट क्र.114 नक्षत्रवाडी ते गट क्र.113 नक्षत्रवाडी पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 7.78 |
| 47. | गट क्र.42 कांचनवाडी गावठाण ते गट क्र.55 कांचनवाडी मनपा हद्द पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 22.03 |
| | **एकुण अंदाजित खर्च (रु.कोटी)** | **1024.54** |

उक्त नमुद रस्ते कॉंक्रीट पध्दतीने विकसित करण्याच्या दृष्टिने शासन निधी उपलब्ध होण्यासाठी ढोबळ मानाने आधारभुत प्रस्ताव र.रु.1024.54 कोटीचा तयार करण्यात आला असुन ‘2023-2024 भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना’ अंतर्गत शासनाकडून निधी उपलब्धतेच्या अधिन राहून सदर रस्त्यांची कामे करण्याचे नियोजन आहे. तसेच मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.902/2023 दि.08.08.2023 अन्वये महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्यामार्फत प्रथम प्राधान्याने करावयाच्या रस्ते कामांचा विस्तृत प्रकल्प अहवाल मंजुर शासन निधीच्या मर्यादेत तयार करण्याचे नियोजनआहे.

करीता, उपरोक्त प्रमाणे छत्रपतीसंभाजीनगर शहर व लगतच्या भागातील एकुण 47 विकास योजना रस्ते कॉँक्रीटद्वारे विकसित करावयाच्या कामांच्या ढोबळमानाने आधारभुत प्रस्ताव र.रु.1064.54 कोटी रक्कमेच्या तयार करण्यात आला असुन प्रस्ताव‘2023-2024 भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना’ अंतर्गत निधी प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे करीता मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1095/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहर व लगतच्या भागांमध्ये वाढती नागरी वसाहती व त्या प्रमाणात वाढती रहदारी लक्षात घेता, प्रस्तावात नमुद प्रमाणे जुने शहर व शहरा लगत विकसित होणाऱ्या भागांमध्ये एकुण 47रस्ते विकास योजना रुंदीनुसार कॉँक्रीट रस्ते विकसित करण्याचे नियोजन आहे.

या अनुषंगाने ‘2023-2024 भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना’ अंतर्गत ढोबळमानाने तयार करण्यात आलेला आधारभुत र.रु.1024.54 कोटीचा प्रस्तावास शासन निधी उपलब्ध होणे करीता शासनास पाठविणे, तद्नंतर मंजुर शासन निधीच्या मर्यादेत महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या मार्फत प्रथम प्राधान्याने करावयाच्या रस्ते कामांचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1096/2023:-** **(आस्थापना-1 विभाग)** **(दि.06.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नगर विकास विभागाचा शासन निर्णय दि.26.08.2021 अन्वये महानगरपालिकेमधील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सेवा प्रवेश नियम मंजुर करण्यात आलेले आहेत. तसेच दि.15.02.2023 रोजीच्या शासन निर्णयानुसार काही पदांचे सेवाप्रवेश नियमात सुधारणा करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेच्या क्रिडा विभागामार्फत अनेक नवनवीन उपक्रमराबविण्यात येत आहेत. त्यामध्ये आम्हाला खेळु द्या तसेच गरवारे स्टेडियम हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम तया करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. हे स्टेडियम झाल्यावर छत्रपती संभाजीनगर शहराच्या लौकीकात आणखी भर पडणार आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पावर काम करण्यासाठी क्रिडा अधिकारी या पदावर कार्यक्षम व पुर्णवेळ अधिकारी असणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना विविध खेळांचे उत्तम मार्गदर्शन मिळावे यासाठी शारिरिक शिक्षकांऐवजी क्रिडा प्रशिक्षक नियुक्ती करणे आवश्यक वाटते.

त्यानुषंगाने सदर पदे भरण्यासाठी महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियमात खालीलप्रमाणे सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहेत.

## शिक्षण क्रिडा व सांस्कृतिक विभाग

| सेवा प्रवेश नियमातील अ.क्र. | पदनाम व पद संख्या | सेवाप्रवेश नियमानुसार | | प्रस्तावित सुधारणा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीच्या पध्दती व नेमणुकी करीता अर्हता | पदनाम व पदसंख्या | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीच्या पध्दती व नेमणुकी करीता अर्हता |
| 92 | शारिरिक शिक्षक 12 पदे | नामनिर्देशन/ सरळसेवा 100 % | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी.<br>ब) शासनमान्य बी.पी.एड. उत्तीर्ण (प्रचलित शासन निर्णयानुसार)<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक | क्रिडा प्रशिक्षक<br>क्रिकेट-2<br>फुटबॉल-1<br>व्हॉलीबॉल-1<br>जिम्नॅस्टिक-3<br>बॉक्सिंग-1<br>कबड्डी-1<br>हॉकी-1<br>बास्केटबॉल-1<br>तलवारबाजी-1 | नाम निर्देशन/ सरळसेवा 100 % | 1) क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, जिम्नॅस्टिक, बॉक्सींग, कबड्डी, हॉकी बास्केटबॉल, तलवार बाजी, इ.पैकी एका खेळात विशेष प्राविण्य व (आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/ राज्य स्तरावरील) आणि राष्ट्रीय प्रशिक्षण संस्था किंवा तत्सम संख्येकडील प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र असणाऱ्या व प्रशिक्षणाचा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | किमान 3 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>2) मराठी भाषेचे भाषेचे ज्ञान आवश्यक नसल्यास नियुक्तीपासून 06 महिन्याच्या आत मराठी भाषेचे ज्ञान अंगीकृत करणे आवश्यक राहील. |
| 93 | क्रिडा अधिकारी | पदोन्नती 100% | औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक क्रिडा अधिकारी या पदावर किमान 3 वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवा ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | क्रिडा अधिकारी | समा योजन 100% | राज्य शासनाच्या क्रिडा विभागामध्ये किंवा इतर महानगरपालिकांमध्ये क्रिडा अधिकारी या पदावर कार्यरत असणाऱ्या प्रशिक्षणाचा किमान 01 वर्षाचा अनुभव व असणाऱ्या अधिकाऱ्यांमधून समायोजनाने नियुक्ती करण्यात येईल. |

## <u>घनकचरा व्यवस्थापन विभाग</u>

याशिवाय छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील स्वच्छता निरीक्षक या पदावर नियुक्तीची पध्दती प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार विहित आहे. तथापि, सदर सेवाप्रवेश नियमाची अंमलबजावणी करतांना अडचणी निर्माण झालेल्या आहेत. कारण स्वच्छता निरिक्षक पदावर पदोन्नतीची तरतुद नाही. शिवाय आकृतीबंधामध्ये सफाई कामगार यांच्यावर पर्यवेक्षण करणारे मुकादम/पर्यवेक्षक हे पद अस्तित्वात नाही. त्यामुळे गट-ड मधील कर्मचाऱ्यास थेट गट-क मधील वरील वेतनश्रेणीतील (स्वच्छता निरीक्षक पदावर) नामनिर्देशनाने नियुक्ती द्यावी लागते. यासाठी गट-ड संवर्गात पात्र उमेदवार उपलब्ध होत नसल्याचे दिसुन येत आहे. या सर्व बाबी पाहता प्रचलित सेवाप्रवेश नियमामध्ये खालील प्रमाणे सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहेत.

**(शासन निर्णय क्र.औमपा-2023/प्र.क्र.6/नवि-24 दि.15.02.2023 मध्ये सुधारणा)**

| सेवा प्रवेश नियमा तील अ.क्र. | पदनाम व पद संख्या | सेवाप्रवेश नियमानुसार | | प्रस्तावित सुधारणा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीच्या पध्दती व नेमणुकी करीता अर्हता | पदनाम व पदसंख्या | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीच्या पध्दती व नेमणुकी करीता अर्हता |
| 50 | स्वच्छता निरिक्षक | नामनिर्देशन 50 % | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी.<br>ब) स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक | स्वच्छता निरिक्षक | सरळसेवा 100 % | 1) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी.<br>2) स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण.<br>3) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| | | खाते अंतर्गत परिक्षा निवडीने 50% | नामनिर्देशनासाठीची अर्हता धारण करणाऱ्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून सरळसेवेने भरती करावयाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन निवड करता येईल. | स्वच्छता निरीक्षक | नामनिर्देशन 50% | सरळसेवा नियुक्तीसाठीची अर्हता धारण करणाऱ्या छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून मर्यदित विभागीय परिक्षेच्या माध्यमातून नियुक्ती देण्यात येईल. |

## <u>पाणी पुरवठा विभाग (वेतनश्रेणीमध्ये सुधारणा)</u>

दुसरे असेही की, सेवा प्रवेश नियमानुसार पाणी पुरवठा लाईनमन या संवर्गातून इलेक्ट्रिक पंप ऑपरेटर या पदावर पदोन्नती देण्याची तरतुद आहे. परंतु या दोन्ही पदांची वेतनश्रेणी एस-6 (रु.19900-63200) अशी दर्शविली आहे. त्यांचे वेतनश्रेणीत समानता असल्याने पदोन्नती देण्यास अडचण होत

आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक पंप ऑपरेटर या पदाची वेतनश्रेणी एस-7 (21700-69100) अशी करणे आवश्यक आहे.

करीता, वरीलप्रमाणे सुधारणा करण्यासाठी शासन मान्यतेसाठी पाठविण्याकरीता मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करावयाचा प्रस्ताव मान्यतेस्तव.

**<u>ठराव क्रमांक 1096/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शारिरिक शिक्षक ऐवजी क्रिडा प्रशिक्षक, क्रिडा अधिकारी व स्वच्छता निरिक्षक (खाते अंतर्गत परिक्षा निवडीने) या पदांच्या सेवा प्रवेश नियमान व इलेक्ट्रिक पंप ऑपरेटर या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे सुधारण करुन शासन मान्यतेसाठी पाठविण्याची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1097/2023:-</u>** **(कार्य.अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.08.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील महानगरपालिकेच्या विविध शाळांच्या आवारात प्रि-फॅब्रिकेटेड कंटेनर अभ्यासिका उभारणे या कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.958/2023 दि.08.09.2023 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाचा खर्च जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 मधुन नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत निधीतून करण्यात येणार आहे.

या कामासाठी GeM पोर्टल मार्फत निविदा मागविल्या असता, प्रथम वेळेत अंतिम दिनांका पर्यंत 03 निविदा दर भरणा करुन प्राप्त झाल्या आहेत. निविदेच्या अटी व शर्तीनुसार निविदाधारक यांनी सादर केलेल्या कागदपत्रान्वये 03 निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरले आहेत. प्राप्त तीन पात्र निविदाकारांपैकी सर्वात कमी दराची निविदा M/s Trimurti Agro Industries यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.016% कमी दराची आहे.

| संदर्भ:- GeM Bid No. GEM/2023/B/4181058 | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **विवरण** | **शेरा** |
| 1. | विभागाचे नाव | कार्यकारी अभियंता, इमारत व विद्युत विभाग |
| 2. | कामाचे स्वरुप | छत्रपती संभाजीनगर शहरातील महानगरपालिकेच्या विविध शाळांच्या आवारात प्रि-फॅब्रिकेटेड कंटेनर अभ्यासिका उभारणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय,अं.प.र.रु.9,99,70,058/- मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.958/2023 दि.08.09.2023 |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.9,99,70,058/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | GEM पोर्टलद्वारे निविदा प्रकाशित करण्यात आली आहे. |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.13.10.2023 ते दि.04.11.2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.09.11.2023 |
| | क) निविदा काढण्याची वेळ? | प्रथम |
| | ड) एकुण प्राप्त निविदा | 03 (पात्र-3, अपात्र-0) |

(त्यापैकी पात्र निविदाधारकाची यादी खालील प्रमाणे आहे.)

| **अ क्र** | **कंत्राटदाराचे नाव** | **निविदा र.रु.** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** | |
|---|---|---|---|---|
| | | | **रक्कम रुपये** | **टक्केवारी** |
| 1. | Trimurti Agro Industries | र.रु.9,99,70,058/- | र.रु.9,99,54,000/- | अं.प.दरापेक्षा 0.016% कमी दराने |
| 2. | Ayaan Green Infra LLP | र.रु.9,99,70,058/- | र.रु.9,99,68,400/- | अं.प.दरापेक्षा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | 0.002% कमी दराने |
| 3. | Agronova Green Tech | र.रु.9,99,70,058/- | र.रु.10,08,00,000/- | अं.प.दरापेक्षा 0.846% जास्त दराने |

| अ क्र | संक्षिप्त तपशील | | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | | नाही |
| | क) असल्यास कारणे नमुद करावीत. | | --- |
| 2. | सदर कामाचा खर्च कोणत्या लेखाशिर्षकातुन करण्यात येणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 मधुन नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत निधीतून | |
| 3. | सदर कामास खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | | होय |
| 4. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | | नाही |
| 5. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | | होय |

या निविदेच्या अनुषंगाने गठीत निविदा समितीची बैठक दि.05.12.2023 रोजी संपन्न झाली. सदर निविदा समितीने प्राप्त निविदांवर विचार निनिमय करुन प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची म्हणजेच M/s Trimurti Agro Industries यांची अं.प.दरापेक्षा 0.016% कमी दराची निविदा मान्य करण्याची शिफारस केली आहे.

तरी प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची M/s Trimurti Agro Industries यांची अं.प.दरापेक्षा 0.016% कमी दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1097/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व निविदा समितीने शिफारस केल्यानुसार, छत्रपती संभाजीनगर शहरातील महानगरपालिकेच्या विविध शाळांच्या आवारात प्रि-फॅब्रिकेटेड कंटेनर अभ्यासिका उभारणे या कामासाठी प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची M/s Trimurti Agro Industries यांच्या अं.प.दरापेक्षा 0.016% कमी दराच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1098/2023:-** **(कार्यकारी अभियंता इमारत विभाग)** **(दि.08.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको एन-5 येथील स्व. राजीव गांधी मैदान येथे क्रीडा संकुल विकसित करणे करीता अंदाजे र.रु.7,95,43,710/- इतका खर्च अपेक्षित आहे. परंतु महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती लक्षात घेता पहिला टप्पा म्हणुन बंदीस्त प्रेक्षागृह बांधणेचे अंदाज पत्रक एस.एस.आर.सन-2022-23 नुसार र.रु.1,19,98,653/- चे तयार करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.क्री.सु.नि./मंजुरी आदेश/2022-23 का.इ.9/5706 दि.31.03.2023 अन्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका झोन क्र.05 एन-7 सिडको अंतर्गत राजीव गांधी मैदान येथे बंदिस्त प्रेक्षागृह बांधणे करीता र.रु.120.00 लक्ष च्या प्रकल्पास मंजुरी झालेली आहे.

सदरील प्रकल्पा करीता राज्य शासन अनुदान मर्यादा 75 टक्के (र.रु.90.00 लक्ष) व उर्वरीत 25 टक्के महानगरपालिका हिस्सा (र.रु.30.00 लक्ष) इतका असणार आहे. त्यानुसार सदरील प्रकल्पा करीता र.रु.90.00 लक्ष शासकीय अनुदान व उर्वरीत र.रु.30.00 लक्ष महानगरपालिका हिस्स्याची तजविज अर्थसंकल्प सन 2023-24 पा.क्र.ई.55 क्र.6/1 इतर भांडवली व विकास कामे अनुक्रमांक ०२ शासन पुरस्कृत योजनांसाठी अंशदान महानगरपालिका हिस्सा कोड क्र.11141390014 मध्ये उपलब्ध निधी र.रु.800.00 लक्ष मधुन प्रस्तावित आहे.

तरी एन-5 सिडको अंतर्गत राजीव गांधी मैदान येथे बंदिस्त प्रेक्षागृह बांधणेचे र.रु.1,19,98,653/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1098/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-5 सिडको अंतर्गत राजीव गांधी मैदान येथे बंदिस्त प्रेक्षागृह बांधणेचे र.रु.1,19,98,653/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1099/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.11.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.20, आसेफिया कॉलनी अंतर्गत आर.सी.सी.कमान बांधणे बाबत (मुख्यद्वार तयार करणे) कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.29,96,664/- (18% GST सह) चे तयार करण्यात आले आहे. यास मा.स्थायी समिती सभा मंजुर ठराव क्र.831/2023 दि.22.06.2023 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. यानुसार निविदा र.रु.25,39,546/- च्या मर्यादेत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता, यामध्ये पात्र L1 निविदाधारक मे.हिन्दुस्तान कन्स्ट्रक्शन हे असुन त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 01.00% कमी दराने म्हणजेच र.रु.25,14,151/- (GST वगळून) चे प्राप्त असुन सदर काम संबंधीत कंत्राटदाराकडुन करुन घेणेस व करार करण्यास मा.स्थायी समिती सभा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

संदर्भ:-टेंडर आय.डी. 2023_AMCA_924509_01 सन 2023-24

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | उपअभियंता झोन क्र.1 |
| 2. | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.20, आसेफिया कॉलनी अंतर्गत आर.सी.सी.कमान बांधणे बाबत (मुख्यद्वार तयार करणे) |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय,मा.स्थायी समिती सभा मंजुर ठराव क्र.831/2023 दि.22.06.2023 नुसार र.रु.29,96,664/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.25,39,546/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | • संकेतस्थळ-महाई-टेन्डर<br>• प्रसिध्दी दि.10.07.2023 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत/दिनांक | दि.12.07.2023 ते दि.26.07.2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.25.10.2023 |
| | क) निविदेची कितवी वेळ होती? | प्रथम |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 03 (तीन) |

(त्यापैकी पात्र टेंडरधारकाची माहिती)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर र.रु. | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | 25,39,546.08 | अंदाजपत्रकीय दराने |
| 2. | हिन्दुस्तान कन्स्ट्रक्शन | 25,14,150.62 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.00% कमी दराने |
| 3. | रोहित राजेंद्र गायकवाड | 27,96,040.23 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.10% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | शहर सौंदर्यीकरण नवीन कामे भाडवली कामे पान क्र.ई-70 अ.क्र.01 नुसार उपलब्ध तरतुद र.रु.30.00 लक्ष मधुन | |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | | होय |
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | | |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | | होय |
| तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे नमुद कामाचे L1 निविदाधारक मे.हिन्दुस्तान कन्स्ट्रक्शन, कंत्राटदार, छत्रपती संभाजीनगर यांची निविदा रक्कमेपेक्षा 01.00% कमी दराची म्हणजेच निविदा र.रु.25,14,151/- (GST वगळून) ची असुन त्यांची निवदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर. | | | |

**<u>ठराव क्रमांक 1099/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.20, आसेफिया कॉलनी अंतर्गत आर.सी.सी.कमान बांधणे बाबत (मुख्यद्वार तयार करणे) कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.29,96,664/- (18% GST सह) चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी L1 निविदाधारक मे.हिन्दुस्तान कन्स्ट्रक्शन, कंत्राटदार, हे असुन त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 01.00% कमी दराने म्हणजेच र.रु.25,14,151/- (GST वगळून) चे प्राप्त असनु सदर निविदे बाबतच्या प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1100/2023:-</u>** **(शहर अभियंता विभाग)** **(दि.11.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-9, जळगांव रस्ता येथील रेणुकामाता मंदिर व कालभैरव नाथ मंदिर समोरील हरीतपट्टा विकासीत करण्यासाठी सचिव, श्री रेणुकामाता मंदिर विश्वस्त मंडळ यांना औरंगाबाद शहर सौंदर्यीकरण दत्तक योजने अंतर्गत दि.30.01.2019 च्या पत्राद्वारे रितसर द्विपक्षीय सामंजस्य करार करून पाच वर्षासाठी प्रायोजकत्व दिले आहे. सदर करार कालावधी दि.31.12.2023 रोजी संपुष्टात येत आहे.

सचिव, श्री रेणुकामाता मंदिर विश्वस्त निधी मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी दि.21.09.2023 च्या अर्जान्वये उक्त विकास व सौंदर्यीकरण कामाचे पुढील पाच वर्षाच्या कालावधीसाठी प्रायोजकत्व वाढवून मिळणे करीता विनंती केली आहे. प्रत्यक्ष जायमोक्यावरील विकासकाचे काम समाधानकारक आहे.

करीता एन-9, जळगांव रस्ता येथील रेणुकामाता मंदिर व कालभैरवनाथ मंदिर समोरील हरीतपट्टा विकास व सौंदर्यीकरण कामी सचिव, श्री रेणुकामाता मंदिर विश्वस्त निधी मंडळ यांना दि.01.01.2024 पासुन पुढील पाच वर्षांचे प्रायोजकत्व देणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1100/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-9, जळगांव रस्ता येथील रेणुकामाता मंदिर व कालभैरवनाथ मंदिर समोरील हरीतपट्टा विकास व सौंदर्यीकरण कामी सचिव, श्री रेणुकामाता मंदिर विश्वस्त निधी मंडळ यांना दि.01.01.2024 पासुन पुढील पाच वर्ष करीता प्रायोजकत्व देण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1101/2023:-</u>** **(शिक्षण विभाग)** **(दि.12.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.इरफान अहेमद मो इस्माईल, कनिष्ठ लिपीक, शिक्षण विभाग यांनी स्वतःच्या हृदय रक्तवाहिन्यांचे आजार (Chest Pain & Sweating) या आजारपणावर

ॲपल हॉस्पिटल येथे दि.16.08.2022 ते दि.19.08.2022 या कालावधीत उपचार केला असून त्यासाठी एकूण रु.2,57,808/- (अक्षरी- दोन लक्ष सत्तावन्न हजार आठशे आठ मात्र) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.2,19,280/- असून सदर रक्कमेच्या 90% र.रु.1,97,352/- आहे. त्यापैकी 5% र.रु.12,890/- (एकुण दाखल केलेले देयके रु.2,57,808/- च्या 5% प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.1,84,462/- (एक लक्ष चौऱ्यांशी हजार चारशे बासष्ठ मात्र) देय आहे.

सदरील आजार (हृदय रक्तवाहिन्यांचे आजार) या शासनमान्य गंभीर आजारामध्ये येतो. परंतु उपचार केलेले रुग्णालय शासनमान्य असलेल्या रुग्णालयांच्या यादीत समाविष्ठ नाही.

त्यामुळे संबंधितास शासन निर्णयामधील तरतूदीच्या अधिन राहून रु.1,00,000/- मंजूर करण्यात येऊन 5% रक्कम रु.5,000/- मनपा फंडात जमा करुन उर्वरित देय रक्कम रु. 95,000/- अदा करण्यास आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

तथापी शासन निर्णयामधील प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम, 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रु.1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहे. तसेच रु.1,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रकमेस मंजुरीचे अधिकार आयुक्त यांना असुन रु.2,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करिता श्री. इरफान अहेमद मो इस्माईल, कनिष्ठ लिपीक, शिक्षण विभाग यांना शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून प्रत्यक्ष देय र.रु.95,000/- (रुपये-पंच्च्यान्नव हजार रुपये मात्र) वैद्यकिय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1101/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.इरफान अहेमद मो इस्माईल, कनिष्ठ लिपीक, शिक्षण विभाग यांनी स्वतःच्या आजारपणावर ॲपल हॉस्पिटल येथे उपचार केला असुन संबंधितास शासन निर्णयामधील तरतूदीच्या अधिन राहून निव्वळ र.रु.95,000/- (रुपये-पंच्च्यान्नव हजार रुपये मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1102/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.12.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.62 सिडको एन-6 येथील ड्रेनेज लाईन बदलणे या कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाच्या दरसुची (SSR) सन-2021-22 नुसार र.रु.29,95,973/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च सन 2023-2024 मधील लेखाशिर्ष वार्ड निहाय तरतुद पान क्र.2 क्र.ई-70 झोन क्र.05 अंतर्गत भांडवली कामे जलनिःसारण) मधून हाती घेण्यात येणार आहे. सद्य आर्थिक वर्षा करीता रु.30.00 लक्ष ची तजविज करण्यात आलेली आहे.

करीता सदरील कामाचे र.रु.29,95,973/- अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1102/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.62 सिडको एन-6 येथील ड्रेनेज लाईन बदलणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.29,95,973/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1103/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.12.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.08.12.2023 रोजी औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.कार्यालयाने (ASCDCL) महानगरपालिकेस पत्र देऊन कळविले आहे की, ASCDCL कार्यान्वयन यंत्रणे मार्फत सुरु असलेल्या र.रु.317.22 कोटी मंजुर निधीतुन प्रकलपांतर्गत समाविष्ट 110 रस्ते कामां पैकी उपलब्ध निधी र.रु.180.00 कोटी मर्यादेत रस्त्यांची कामे सुरु करण्यात आलेली असुन

उर्वरित 53 रस्त्यांच्या कामासाठी निधीची आवश्यकता असुन या कामांसाठी महानगरपालिकेकडुन निधी उपलब्ध करुन देणे बाबत मागणी केली आहे.

सदर प्रकल्पांतर्गत समाविष्ट रस्ते हे शहरातील मुख्य नागरीक वसाहती व मुख्य बाजारपेठेतील असल्यामुळे सदर रस्त्यांची कामे पुर्ण होण अत्यंत गरजेचे आहे. या रस्त्यांची कामे निधी प्राप्त झाल्यास कार्यान्वयक यंत्रणा ASCDCL यांच्या मार्फत पुर्ण होणार असुन यामुळे शहरातील नागरीकांना वाहतुकीच्या द्दष्टिने फायदा होणार आहे. पत्रासोबत उर्वरित करावयाच्या रस्ते कामांची यादी खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अपेक्षित र.रु.(कोटी) |
|---|---|---|
| 1. | गारखेडा येथील कारगील मैदान समोरील रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीटद्वारे तयार करणे. | 1.27 |
| 2. | महात्मा गांधी पुतळा शहागंज ते सिटी चौक ते मुख्य पोस्ट ऑफिस पर्यंत रस्ता व्हाईट टॉपिंग द्वारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 5.06 |
| 3. | महात्मा गांधी पुतळा शहागंज ते किराणाचावडी ते अभियन टॉकिज पर्यंत रस्ता व्हाईट टॉपिंग द्वारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 4.74 |
| 4. | बीड बायपास येथील संभाजीनगर कमान ते छत्रपतीनगर दत्त मंदिर पर्यंत व्हाईट टॉपिंगद्वारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 1.68 |
| 5. | आनंद गाडे चौक एकनाथनगर ते रेल्वेगेट पर्यंत व्हाईट टॉपिंगद्वारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 2.12 |
| 6. | दादुजी कोंडदेव स्कुल ते मारुती मंदिर पर्यंत व्हाईट टॉपिंगद्वारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे व फुटपाथ करणे. | 1.16 |
| 7. | सराफा ते पानदरिबा/बोहरी कठडा पर्यंत व्हाईट टॉपिंगद्वारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 0.36 |
| 8. | कॅन्सर हॉस्पिटल व्हि.आय.पी.रोड जंक्शन ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रापर्यंतच्या रस्त्याचे व परिसरातील रस्ते व्हाईट टॉपिंगद्वारे कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | 0.98 |
| 9. | सिडको एन-6 येथील शिवज्योती हौसिंग सोसायटी मधील अंतर्गत रस्ते व्हाईट टॉपिंगद्वारे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | 1.66 |
| 10. | बुन स्कुल जटवाडा रोड समोरील फरहतनगर मंजुर रेखांकनातील विकास योजना रस्ता व अंतर्गत रस्ते पर्यंत व्हाईट टॉपिंगद्वारे कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | 1.72 |
| 11. | बन्सीलालनगर येथील हॉटेल तंदुर लोलगे पेट्रोल पंप ते नुतन स्कुल ते श्री.जोनी व केळकर यांच्या घरापर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | 1.80 |
| 12. | कांचनवाडी ते नाथपुरम चौक व नाथ व्हॅली रस्ता ते रॉकवुड सोसायटी पर्यंतचा रस्ता कनव्हेश्नल कॉंक्रीट पध्दतीने तयार करणे. | 0.64 |
| 13. | हॉटेल पुषकर एन-9 सिडको ते महानगरपालिका शाळेपर्यंतचा रस्ता पर्यंत व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | 1.52 |
| 14. | महात्मा गांधी पुतळा शहागंज ते छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | 2.29 |
| 15. | मोंढा हौद ते हरी मस्जिद पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | 1.04 |
| 16. | एम्स हॉस्पिटल एन-11 ते हर्सुल टी-पॉईंट स्मशानभुमी पर्यंतचा सर्व्हिस रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | 3.89 |
| 17. | हॉटेल शरद एन-9, पवननगर ते शिवजागृती मंदिर एन-9,एम-2 पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट द्वारे तयार करणे. | 1.57 |

| | | |
|---|---|---|
| 18. | शंभुनगर त्रिशरण चौक ते गादिया विहार पर्यंतचा रस्ता पुलाच्या बांधकामासह व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 2.68 |
| 19. | हॉटेल शदर ते गौरव प्रोव्हिजन साई मैदान ते शिव हॉटेल (एन-11 सुदर्शननगर) पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 1.98 |
| 20. | शिवजागृती मंदिर एन-9,एम-2 ते ट्राफिक गाडेन सिडको एन-9 पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 0.79 |
| 21. | हर्सुल येथील सारंगधर चव्हाण किराणा ते खत्रीनगर कृष्णापुरवाडी पर्यंतचा रस्ता व कांचनवाडी येथील वुडरिज शाळे जवळील डी.पी.रस्ता कनव्हेशनल कॉँक्रीट पध्दतीने तयार करणे. | 5.14 |
| 22. | शितला माता मंदिर टिळकपथ ते आर्य समाज मंदिर औरंगपुरा पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 1.35 |
| 23. | वानखेडेनगर मधील श्री.अब्दुल सत्तार यांच्या घरापासून ते जटवाडा रोड येथील गट नं.16,17,139,141 व 110 पर्यंतचा रस्ता कनव्हेशनल कॉँक्रीट पध्दतीने तयार करणे. | 2.81 |
| 24. | वॉर्ड क्र.6, यादवनगर ते एन-11 महानगरपालिका आरोग्य केंद्र मार्गे राष्ट्रवादी भवन पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 0.83 |
| 25. | आंबेडकर पुतळा,भगतसिंगनगर ते पिसादेवी पर्यंतचा रस्ता कनव्हेशनल कॉँक्रीट पध्दतीने तयार करणे. | 6.19 |
| 26. | एम.आय.टी.चौक ते सि.ए.असोसिएशन पर्यंतचा रस्ता पुलाच्या बांधकामासह व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 3.18 |
| 27. | हर्सुल टी-पॉईंट ते कलावती लॉन्स (जाधववाडी सर्व्हिस रोड) पर्यंतचा रस्ता कनव्हेशनल कॉँक्रीट पध्दतीने तयार करणे. | 9.22 |
| 28. | हर्सुल येथील सर्वे नं.153 बारव विहीर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक वडाच्या झाडापर्यंतचा रस्ता कनव्हेश्नल कॉँक्रीट पध्दतीने तयार करणे आणि फुटपाथ व दुभाजक बांधणे. | 10.70 |
| 29. | पेठेनगर येथील कमल सोसायटी ते निसर्ग कॉलनी पर्यंतचा रस्ता पुलासह कनव्हेश्नल कॉँक्रीट पध्दतीने तयार करणे. | 0.71 |
| 30. | चिकलठाणा विमानतळा समोरील न्यु हायस्कुल ते पळसकर हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 1.07 |
| 31. | एन-1 टाऊन सेंटर येथील सर्व्हिस इंडस्ट्रियल एरिया येथील रस्ता रस्ता व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 4.24 |
| 32. | एन-1 भागातील मुख्य प्रशासक सिडको यांचे निवासस्थान ते पी.एफ.कार्यालय पर्यंत व अंतर्गत रस्ते व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 4.29 |
| 33. | एम.आय.डी.सी.चिकलठाणा भागातील धुत हॉस्पिटल ते उत्तरानगरी मुख्य रस्ता व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 3.85 |
| 34. | एम.टी.डी.सी.हॉलीडे कॅम्प ते अण्णाभाऊ साठे चौक मार्गे मिलींदनगर कबीरनगर रस्ता व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 4.19 |
| 35. | मुख्य बसस्थानक ते खामनदीवरील पुलापर्यंतच्या रस्त्याचे व सिध्दार्थ जलतरण तलाव ते गरमपाणी जंक्शन पर्यंतच्या रस्त्याचे कॉँक्रीट करणे. | 2.49 |
| 36. | दशमेशनगर शिव मंदिर ते विश्वरुप हॉल पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 1.85 |
| 37. | मंत्री मार्बल इंडस्ट्रिज ते राज बिल्डकॉन ते स्कॉन प्रोजेक्टस ते पॅरासन कंपनी ते मनपा शाळा मसनतपुर रस्ता व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट द्वारे तयार करणे. | 3.43 |

| | | |
|---|---|---|
| 38. | हनुमाननगर येथील श्री.अण्णसाहेब शिंदे यांच्या घराजवळील हनुमान मंदिर ते पुंडलिकनगर मुख्य रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 0.22 |
| 39. | रिलायन्स पेट्रोल पंप, जळगाव रोड पासून ते एन-7 पोलीस स्टेशन मार्गे त्रिदेवता मंदिर पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 3.42 |
| 40. | साई मैदान एन-11 ते टि.व्ही.सेंटर रस्ता (जिजाऊ चौक) पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 0.83 |
| 41. | मंजुरपुरा ते मनपा कार्यालय ते टाऊन हॉल ओव्हर ब्रीज सर्व्हिस रस्त्यापर्यंत रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 4.35 |
| 42. | अण्णाभाऊ साठे चौक ते शहागंज चमन पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 3.13 |
| 43. | बळवंत वाचनालय औरंगपुरा ते बाराभाई ताजिया गुलमंडी पर्यंत रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 1.59 |
| 44. | ड्रिमलॅण्ड लॉज ते मुलमची बाजार (मोहन टॉकीज मागील बाजु) ते घासमंडी पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 1.33 |
| 45. | पार्श्वनाथ चौक ते राजे संभाजी चौक मार्गे महावीर जैन मंदिर, सिडको एन-9 व बळीराम पाटील शाळेलगतचा रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 3.21 |
| 46. | मनपा कार्यालय ते जामा मस्जिद कब्रस्तान पर्यंचा रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 1.43 |
| 47. | पैठणगेट पार्किंग ते गायत्री चाट भांडार गुलमंडी पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 1.53 |
| 48. | एन-5, सिडको, श्री.काकडे पाटील,प्लॉट नं.334 ई यांच्या घरापासुन ते एन-5 कम्युनिटी सेंटर पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 1.60 |
| 49. | तोतला हॉस्पिटल ते मोतीवालानगर पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 1.80 |
| 50. | एन-1 सिडको सेक्टर-ए येथील विविध ठिकाणी रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 3.27 |
| 51. | एम.आय.डी.सी.चिकलठाणा भागात मडिलगेकर आर्ट स्टुडिओ समोरील रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 1.18 |
| 52. | हर्सुल येथील श्री.बन्सीमामा जाधव यांच्याघरापासुन ते राधास्वामी कॉलनी ते नवीन वसाहत पर्यंतचा रस्ता कनव्हेशनल काँक्रीट पध्दतीने तयार करणे. | 2.75 |
| 53. | एम.आय.डी.सी.चिकलठाणा भागातील पावरलुम जवळील लक्ष्मी अग्नी कंपनी ते साई चौक पर्यंतचा रस्ता व्हाईट टॉपिंग काँक्रीट द्वारे तयार करणे. | 1.37 |
| | **एकुण** | **137.50** |

करीता, उक्त नमुद तक्त्यामधील ASCDCL या कार्यान्वियन यंत्रणेस उर्वरित 53 रस्ते कामांकरीता आवश्यक निधी र.रु.137.50 कोटी प्रथम प्राधान्याने उपलब्ध करुन देणेसाठी सन '2023-24 भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना' अंतर्गत महानगरपालिकेस शासन निधी प्राप्त होणेसाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करणे व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करणे बाबतचा स्वतंत्र प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1103/2023:-**

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे, ASCDCL या कार्यान्वयन यंत्रणेमार्फत सुरु असलेल्या र.रु.317.22 कोटी रस्ते प्रकल्पातील समाविष्ट रस्त्यांपैकी उर्वरित रस्ते कामांकरीता कार्यान्वयन यंत्रणेच्या मागणी प्रमाणे प्रकल्प पुर्ण होणेच्या दृष्टिने प्रथम प्राधान्याने आवश्यक निधी र.रु.137.50 कोटी '2023-24 भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना' अंतर्गत शासन निधी प्राप्त

होण्यासाठी प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1104/2023:-** **(कार्यकारी अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.13.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मध्य मतदार संघातील No sewer network area भागांमध्ये जलनिःसारण वाहिनी टाकणे या प्रकल्पासाठी नियुक्त PMC यांनी भीमनगर (उत्तरेकडील भाग), भावसिंगपुरा भीमनगर (दक्षिण), नंदनवन कॉलोनी शांतीपुरा, जयसिंगपुरा, कोतवालपुरा, गरमपाणी, नागेश्वरवाडी, समर्थनगर, समता नगर कोटला कॉलनी, सिल्लेखाना, गांधीनगर खोकडपुरा, भवानीनगर, संजयनगर, नवाबपुरा, राजा बाजार, गुलमंडी, भडकल गेट, बुढीलेन, खडकेश्वर, औरंगपुरा, हर्सुल, भगतसिंग नगर-म्हसोबा नगर, एकता नगर, चेतना नगर- राज नगर, वानखेडे नगर- होनाजी नगर, सईदा कॉलनी, यादव नगर एन-11, मयुर पार्क, सुरेवाडी, मयुर नगर- सुदर्शन नगर, रोजाबाग, भारतमाता नगर, विश्वास नगर हर्ष नगर, पहाडसिंगपुरा, बेगमपुरा, आरेफ कॉलनी प्रगती कॉलनी, जयभीमनगर-आसेफिया कॉलनी, बुढीलेन-कबाडीपुरा, लोटाकारंजा, चेलीपुरा-काचीवाडा, शहाबाजार, गणेश कॉलनी, नेहरू नगर, शताब्दी नगर, स्वामी विवेकानंद नगर, श्रीकृष्ण नगर, पवन नगर, आंबेडकर नगर, मिसारवाडी इत्यादी भागांमध्ये जलनि:स्सारण वाहिनी नव्याने टाकणे बाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल र.रु.196,00,84,988/- चा तयार करण्यात आला होता, त्यास मा. सर्वसाधारण सभा विषय क्र.1028/2023 दि.23.10.2023 अन्वये मान्यता प्राप्त झाली होती.

तद्नंतर विस्तृत प्रकल्प अहवाल तांत्रिक मान्यतेसाठी शासन नियुक्त नोडल एजन्सी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सादर केले असता त्यांनी सुचविलेल्या बदलांनुसार नियुक्त PMC यांनी या कार्यालयाच्या सुचनेनुसार व महाराष्ट्र जीवन प्राधीकरण कार्यालयाच्या सुचने नुसार आवश्यक बदल करून र.रु.192,65,12,181/- किंमतीचा सुधारित विस्तृत प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधीकरण सन 2023-24 व सार्वजनिक बांधकाम दरसुची सन 2022-23 नुसार तयार करुन सादर केला होता. त्यास मा. सर्वसाधारण सभा विषय ठराव क्र.1093/2023 दि.04.12.2023 अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. तद्नंतर महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातर्फे जा.क्र.मु अमजीप्राछसं/तांशा-3/3435/2023 दि.06.12.2023 नुसार तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या सादर प्रकल्प अहवालात जे बदल महाराष्ट्र जीवन प्राधीकरण कार्यालयाने सुचविले होते. त्यानुसार सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे, त्यामध्ये Sand Boxing, Murum filing, चे परिमाण कमी करणे, Manhole Pumping Station मध्ये पुर्वी कोटेशनवर आधारीत घेतलेल्या दराऐवजी मजीप्रा दरसुची मधील पंपाचे दर घेणे, पंपिंग स्टेशन साठीचे पंप सिस्टीममध्ये कमी अश्व शक्तीचे पंप (BHP) आवश्यकतेनुसार घेणे, Express Fidder साठीचे विद्युत वाहीनीची लांबी वाढविणे, मिळकतींची मुख्य जलनि:सारण वाहीनीस जोडणी करावयाची संख्या नागरीकांनी स्थळावर केलेल्या जोडण्या विचारात घेऊन त्यांची संख्या कमी केल्याने व या अनुरूप रॉयल्टी चार्जेस, टेस्टींग चार्जेस, जीएसटी चार्जेस इत्यादी बाबींसह कामगार विमाची 1% रक्कम कमी झाल्याने एकुण प्रकल्प अहवालाच्या किंमतीत बदल झाला आहे. त्याचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Sub Work No. | Name of Sub Work | Total Cost of Components in Rs. |
|---|---|---|
| 1. | Working Survey | Rs.1,552,119.0 |
| 2. | Collection system (Length - 187.14 Km) | Rs.1,09,06,40,879.6 |
| 3. | Manhole pumping station @010 Amber Hill | Rs.78,10,080.0 |
| 4. | Manhole pumping station @012 Harsul Lake | Rs.91,95,846.0 |
| 5. | Sewage pumping station @09 Himayat Bagh | Rs.8,261,360.0 |
| 6. | Sewage pumping station @013 Pisadevi Road | Rs.74,54,541.0 |
| 7. | Rising Main (200 m long - 300 mm Dia.)@09 Himayat Bagh<br>Rising Main (200 m long - 350 mm Dia.)@013 Pisadevi Road | Rs.2,775,050.0 |
| 8. | Rising Main (200 m long - 150mm Dia.)@012 Harsul Lake<br>Rising Main (360 m long - 150mm Dia.)@010 Amber Hill | Rs.1,737,846.0 |
| 9. | Mechanical Works of Pumping Station -09 Himayat Bagh | Rs.1,20,73,222.0 |
| 10. | Mechanical Works of Pumping Station - 013 Pisadevi Road | Rs.1,26,04,973.0 |

| | | |
|---|---|---|
| 11. | Express Feeder | Rs.1,02,40,799.0 |
| 12. | STP of capacity 4.50 MLD - SBR @ 013 Pisadevi Road | Rs.89,881,581.0 |
| 13. | STP of capacity 2.50 MLD - MMBR @ 09 Himayat Bagh | Rs.40,940,079.0 |
| 14. | STP of capacity 0.5 MLD - MMBR @ 012 Harsul Lake | Rs.13,889,361.0 |
| 15. | Compound Wall (Length - 900 m) | Rs.13,724,746.0 |
| 16. | Effluent Storage tank@ 013 Pisadevi Road | Rs.3,993,828.0 |
| 17. | Effluent Storage tank@ 09 Himayat Bagh | Rs.3,274,473.0 |
| 18. | House Service Connection (2000 nos HH) | Rs.4,88,38,030.0 |
| 19. | Road Restoration (Length - 50 km) | Rs.15,82,12,092.8 |
| 20. | Utility Shifting | Rs.10,999,470.0 |
| 21. | Trial and Run For Three Month | Rs.3,224,740.0 |
| 22. | Royalty Charges for Natural Sand, Rubble stone above 40mm Size & hard Murum of PWD Item | Rs.16,71,426.0 |
| 23. | Push Through for crossing line under Major Road | Rs.4,699,985.0 |
| **A** | **Total Cost Rs (A)** | Rs.155,76,96,527.44 |
| **B** | PWD/Railway Permission Charges | Rs.9,825,000.0 |
| | Provision for 18% GST without Express Feeder and Royalty Charges (B) | Rs.27,82,41,174.44 |
| | Add for Technical Sanction by MJP (1%) | Rs.1,55,76,965.27 |
| | Add for Labour Insurance (1%) on PWD amount | Rs.3,53,408.29 |
| | **Total Net Cost (A+B)** | Rs.186,16,93,076.00 |

करिता (1) महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांनी सुचविलेले बदल करून सुधारित विस्तृत प्रकल्प अहवाल र.रु.186,16,93,076/- नगर परिषद प्रशासन, संचालनालय, नवी मुंबई-400614 यांना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत अनुदान मागणीसाठी सादर करणेस, (2) या नव्याने सादर करण्यात येत असलेल्या जलनि:स्सारण प्रकल्पाच्या विस्तृत प्रकल्प अहवालास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासनाने ठरवून दिलेल्या आर्थिक आकृतीबंधानुसार महानगरपालिकेचा हिस्सा टाकणेस, (3) या सुधारीत जलनि:स्सारण प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर शासन निर्देशानुसार निविदा कार्यवाही व इतर संलग्न कार्यवाही करणे, त्यात आवश्यकतेनुसार बदल करावयाचे झाल्यास ते बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणेसह मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1104/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांनी सुचविलेले बदल करून सुधारित विस्तृत प्रकल्प अहवाल र.रु.186,16,93,076/- नगर परिषद प्रशासन, संचालनालय, नवी मुंबई-400614 यांना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत अनुदान मागणीसाठी सादर करणेस, (2) या नव्याने सादर करण्यात येत असलेल्या जलनि:स्सारण प्रकल्पाच्या विस्तृत प्रकल्प अहवालास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासनाने ठरवून दिलेल्या आर्थिक आकृतीबंधानुसार महानगरपालिकेचा हिस्सा टाकणेस व (3) या सुधारीत जलनि:स्सारण प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर शासन निर्देशानुसार निविदा कार्यवाही व इतर संलग्न कार्यवाही करणे, त्यात आवश्यकते नुसार बदल करावयाचे झाल्यास ते बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणेसह मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1105/2023:-** **(कार्यकारी अभियंता जलनि:स्सारण विभाग)** **(दि.13.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पश्चिम मतदार संघातील No sewer network area भागामध्ये जलनि:स्सारण वाहिनी टाकणे या प्रकल्पासाठी नियुक्त PMC यांनी पडेगाव, मिटमिटा, भीमनगर, हमालवाडा-रेल्वेस्टेशन, राहुलनगर, बनेवाडी, कांचनवाडी-नक्षत्रवाडी, ईटखेडा इ. भागांमध्ये Package-01 म्हणुन जलनि:स्सारण वाहिनी नव्याने टाकणे बाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल र.रु.232,21,27,411/- चा तयार करण्यात आला होता, त्यास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.1007/2023 दि.11.10.2023 अन्वये मान्यता प्राप्त झाली होती.

तद्रंतर विस्तृत प्रकल्प अहवाल तांत्रिक मान्यतेसाठी शासन नियुक्त नोडल एजन्सी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सादर केले असता, त्यांनी सुचविलेल्या बदलांनुसार नियुक्त PMC यांनी या

कार्यालयाच्या सुचनेनुसार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाच्या सुचनेनुसार आवश्यक बदल करुन र.रु.215,39,93,438/- किंमतीचा सुधारित विस्तृत प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन 2023-24 व सार्वजनिक बांधकाम दरसुची सन 2022-23 नुसार तयार करुन सादर केला होता. त्यास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.1088/2023 दि.29.11.2023 अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. तद्नंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातर्फे जा.क्र.मुअमजीप्राछसं /तांशा-3/3436/2023 दि.06.12.2023 नुसार तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या सादर प्रकल्प अहवालात जे बदल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाने सुचविले होते त्यानुसार सुधारित विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये Sand Boxing, Murum Filing चे परिणाम कमी करणे, Manhole Pumping Station मध्ये पुर्वी कोटेशनवर आधारित घेतलेल्या दराऐवजी मजीप्रा दरसुचीमधील पंपाचे दर घेणे, पंपींग स्टेशन साठीचे पंप सिस्टीममध्ये कमी अश्वशक्तीचे पंप (BHP) आवश्यकतेनुसार घेणे, Express Fidder साठीचे विद्युत वाहिनीची लांबी वाढविणे, मिळकतींची मुख्य जलनि:स्सारण वाहिनीस जोडणी करावयाची संख्या नागरीकांनी स्थळावर केलेल्या जोडण्या विचारात घेऊन त्यांची संख्या कमी केल्याने व या अनुरुप रॉयल्टी चार्जेस, टेस्टिंग चार्जेस, जी.एस.टी. चार्जेस इ.बाबींसह कामगार विमाची 1% रक्कम कमी झाल्याने एकुण प्रकल्प अहवालाच्या किंमतीत बदल झाला आहे. त्याचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Sub Work No. | Name of Sub Work | Total Cost of Components in Rs. |
|---|---|---|
| 1. | Working Survey | Rs.16,20,411.0 |
| 2. | Collection sys (Length - 198 Km) | Rs.1,16,57,74,887.6 |
| 3. | Manhole pumping station @07 | Rs.98,05,168.0 |
| 4. | Manhole pumping station @08 | Rs.1,14,61,094.0 |
| 5. | Sewage pumping station at 01 | Rs.78,45,360.0 |
| 6. | Rising Main 1 200 m long - 350 mm Dia.)@06 | Rs.15,87,243.0 |
| 7. | Rising Main 2 (200 m long - 200 mm Dia.)@07 | Rs.50,19,837.0 |
| 8. | Rising Main 3 (200 m long 300 mm Dia.)@08 | Rs.13,40,286.0 |
| 9. | Mechanical Works of Pumping Station -01 | Rs.1,38,64,689.0 |
| 10. | Express Feeder | Rs.1,81,22,591.0 |
| 11. | Solar Power Plant (300 Kwp) | Rs.1,14,37,930.0 |
| 12. | STP of capacity 6.5 MLD-SBR | Rs.10,69,21,378.0 |
| 13. | STP of capacity 1 MLD-MMBR | Rs.2,33,30,457.0 |
| 14. | STP of capacity 3 MLD-MMBR | Rs.3,98,31,915.0 |
| 15. | Compound wall (Length-900 m) | Rs.1,22,29, 980.0 |
| 16. | Effluent storage tank | Rs.51,55,552.0 |
| 17. | House Service Connection (2500 nosHH) | Rs.1,15,03,113.0 |
| 18. | Road Restoration (Length-55 Km) | Rs.9,98,09,067.8 |
| 19. | Utility Shifting | Rs.1,18,68,628,.0 |
| 20. | Special purpose vehicle Mounted Combination of suction cum jetting Machine | Rs.31,00,000.0 |
| 21. | Trial and Run for Three Month | Rs.26,27,525.0 |
| 22. | Royalty Charges for Natural sand, Rubble stone above 40 mm size and Hard Murum of PWD Item | Rs.11,61,584.0 |
| 23. | Push Through for crossing line under Major Road | Rs.2,14,93,013.0 |
| **A** | **Total Cost Rs (A)** | Rs.1,58,69,11,709.44 |
| **B** | PWD/Railway Permission Charges | Rs.1,95,75,000.00 |
| | Provision for 18% GST without Express Feeder and Royalty Charges | Rs.28,21,72,956.20 |
| | Add for Technical Sanction by MJP (1%) | Rs.1,58,69,117.09 |
| | Add for Labour Insurance (1%) on PWD amount | Rs.2,28,155.75 |
| | **Total Net Cost (A+B)** | Rs.190,47,56,939.00 |

करीता, (1) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सुचविलेले बदल करुन सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल र.रु.190,47,56,939/- नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-400032 यांना

शासनाच्या अमृत 2.0 अभियान अंतर्गत अनुदान मागणीसाठी सादर करण्यास (2) या नव्याने सादर करण्यात येत असलेल्या जलनि:स्सारण प्रकल्पाच्या विस्तृत प्रकल्प अहवालास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक आकृतीबंधानुसार महानगरपालिकेचा हिस्सा टाकणेस व (3) या सुधारित जलनि:स्सारण प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर शासन निर्देशानुसार निविदा कार्यवाही व इतर संलग्न कार्यवाही करणे, त्यात आवश्यकतेनुसार बदल करावयाचे झाल्यास ते बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करण्यासह मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1105/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सुचविलेले बदल करुन सुधारति विस्तृत प्रकल्प अहवाल र.रु.190,47,56,939/- नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-400032 यांना शासनाच्या अमृत 2.0 अभियान अंतर्गत अनुदान मागणी साठी सादर करण्यास (2) या नव्याने सादर करण्यात येत असलेल्या जलनि:स्सारण प्रकल्पाच्या विस्तृत प्रकल्प अहवालास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक आकृतीबंधानुसार महानगरपालिकेचा हिस्सा टाकणेस व (3) या सुधारित जलनि:स्सारण प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर शासन निर्देशानुसार निविदा कार्यवाही व इतर संलग्न कार्यवाही करणे, त्यात आवश्यकतेनुसार बदल करावयाचे झाल्यास ते बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करण्यासह मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1106/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.18.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.104 अंतर्गत जालाननगर श्री गणपती विसर्जन विहीरीचे बांधकाम करणे या कामाचे ठेकेदार श्री.प्रभाकर गणपत मोहिते यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00% कमी दराने म्हणजेच निविदा र.रु.30,47,601/- पर्यंत करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ:-निविदा क्र.2023_AMCA_954448_1 दि.01.11.2023.

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | वॉर्ड अभियंता कार्यालय क्र.1 |
| 2. | कामाचे स्वरुप | विहिरीचे बांधकाम करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | र.रु.40,06,101/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.33,86,223/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.27 ऑक्टोबर-2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.01 नोव्हेंबर-2023 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एकुण 03 निविदांपैकी 03 पात्र ठरल्या. |

(त्यापैकी पात्र टेंडरधारकाची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर र.रु. | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | श्री.प्रभाकर गणपतराव मोहिते | 30,47,601/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00% कमी दराने |
| 2. | मे.आर.यु.सी. कन्स्ट्रक्शन | 32,16,573/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.01% कमी दराने |
| 3. | श्री.सुरेश यशवंत डोईफोडे | 32,16,912/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.00% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | सन 2023-2024 या आर्थिक वर्षातील गणपती विसर्जन विविध कामे या लेखाशिर्षमधुन |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभेचा अं.प.मंजुरीचा ठराव क्र.981/2023 दि.21.09.2023 |
| तरी विषयांकीत काम ठेकेदार श्री.प्रभाकर गणपतराव मोहिते यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.30,47,601/- पर्यंत करुन घेणेचा व करार करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. | | |

**<u>ठराव क्रमांक 1106/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.104 अंतर्गत जालाननगर श्री गणपती विसर्जन विहीरीचे बांधकाम करणे या कामाचे ठेकेदार श्री.प्रभाकर गणपत मोहिते यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00% कमी दराने म्हणजेच निविदा र.रु.30,47,601/- पर्यंत करुन घेणे व करार करणेच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1107/2023:-</u>** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.13.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.100 दशमेशनगर येथील सिटी सर्व्हे नं.16910/अ मधील खुल्या जागेस संरक्षित भींत बांधणे व उद्यान विकसीत करणेच्या कामाचे र.रु.29,99,388/- चे अंदाजपत्रक SSR 2022-23 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन यास मा.प्रशासक महोदय यांची मान्यता प्राप्त आहे.

सदरील अंदाजपत्रकात दशमेशनगर येथील सिटी सर्व्हे नं.16910/अ मधील खुल्या जागेस संरक्षित भींत बांधणे, वॉचमन रुम आणि उद्यान विकसीत करणे प्रस्तावित आहेत. सदरील कामाचा खर्च सन 2023-2024 आर्थीक वर्षाच्या अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.Zone-9 E-57 अ.क्र.03 वरील मंजुर रेखांकनात मुलभुत सुविधा पुरविणे या लेखाशिर्षामधुन करता येईल.

करीता, वॉर्ड क्र.100 दशमेशनगर येथील सिटी सर्व्हे नं.16910/अ मधील खुल्या जागेस संरक्षित भींत बांधणे व उद्यान विकसीत करण्याच्या कामाचा र.रु.29,99,388/- चा अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1107/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर सौंदर्यीकरणाच्या कामाअंतर्गत वॉर्ड क.100 दशमेशनगर येथील सिटी सर्व्हे नं.16910/अ मधील खुल्या जागेस संरक्षित भींत बांधणे व उद्यान विकसीत करण्याच्या कामाचा र.रु.29,99,388/- च्या अंदाजपत्रक मंजुरीच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1108/2023:-</u>** **(आरोग्य विभाग)** **(दि.14.12.2023)**

प्रशासकीय मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती जयश्री पन्नालाल सोनवणे सेविका, सिल्कमिल कॉलनी रुग्णालय, आरोग्य विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या पतीच्या नामे यशवंत रुंजाजी मुगदल यांच्या (हृदयरोग) या आजारावर उपचारासाठी खाजगी रुग्णालय ओरीऑन सिटी केअर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असून र.रु.1,68,956/-(एक लाख अडुसष्ट हजार नऊशे छपन्न फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन (हृदयरोग) या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.1,68,956/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.2,008/- वजा जाता र.रु.1,66,948/- शिल्लक राहते व शिल्लक

रक्कमेच्या 90% र.रु.1,50,253/- इतकी असुन 5% र.रु.8447/- इतकी आहे. एकुण निव्वळ देय र.रु.1,41,806/- इतकी असुन संबंधीतास द्यावयाचे आहे.

संबंधीताने ओरीऑन सिटी केअर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र-2011/प्र.क्र.333-11/राकवि-2, मंत्रालय मुंबई-32 दि.16.11.2011 नुसार परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या या आजारवर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालय प्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्रीमती जयश्री पन्नालाल सोनवणे, सेविका, सिल्कमिल कॉलनी रुग्णालय, आरोग्य विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.1,68,956/- संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1108/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती जयश्री पन्नालाल सोनवणे सेविका, सिल्कमिल कॉलनी रुग्णालय, आरोग्य विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या पतीच्या नामे यशवंत रुंजाजी मुगदल यांच्या (ह्रदयरोग) या आजारावर खाजगी रुग्णालय ओरीऑन सिटी केअर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेला आहे. एकुण केलेला खर्च र.रु.1,68,956/- इतका झाला असुन 90% र.रु.1,50,253/-इतकी येते. एकुण खर्चाच्या 5% र.रु.8,447/- ही मनपा फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.1,41,806/- एवढी येते. दि.14.05.2023 च्या परिपत्रकानुसार मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिकारात र.रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधीतास र.रु.1,00,000/- च्या 5% रक्कम मनपा फंडात जमा करुन उर्वरित र.रु.95,000/- (पंच्च्यान्नव हजार रुपये फक्त) संबंधीतास अदा करावयाच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1109/2023:-</u>** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.14.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासनाच्या नियमानुसार महानगरपालिकेची विविध प्रकारची एकुण 59 वाहने ही 15 वर्षापेक्षा जास्त वयोमान असल्यामुळे निर्लेखित होणार आहेत. त्यानुषंगाने घनकचरा/जलनि:स्सारण/पाणीपुरवठा संबधीत 39 वाहने/मशिनरी 15 वा वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून खरेदी करण्यासाठी र.रु.15,23,47,088/- च्या एकत्रित अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.900 दि.02.08.2023 नुसार मान्यता घेण्यात आली आहे. सदरील एकत्रित अंदाजपत्रकात 10 हजार लि.क्षमतेचे 03 टँकर्स उभारणी करण्यासाठी 16 टन जीव्हीडब्ल्यु चेसिस करीता र.रु.81,53,220/- च्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त आहे. मान्यता मिळाल्यानंतर 10 हजार लि. क्षमतेचे टँकर्स उभारणी करण्यासाठी तीन 16 टन जीव्हीडब्ल्यु चेसिस खरेदी करीता जीईएम पोर्टलद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदेच्या दुसऱ्या वेळी 02 निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या असुन पात्र निविदाधारकांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1. | मे.अशोक लिलॅण्ड लि. | र.रु.58,49,970.00 |
| 2. | मे.टाटा मोटर्स लि. | र.रु.63,33,231.00 |

उपरोक्त नुसार मे.अशोक लिलॅण्ड लि. यांचे निविदा दर तुलनात्मकदृष्ट्या कमी असुन ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा र.रु.23,03,250/- (28.25%) ने कमी आहेत. त्यामुळे त्यांची निविदा स्विकृत करणे योग्य होईल.

करीता 10 हजार लि.क्षमतेचे टँकर्स उभारणी करण्यासाठी तीन 16 टन जीव्हीडब्ल्यु चेसिस खरेदी करीता मे.अशोक लिलॅण्ड लि.यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा र.रु.23,03,250/- (28.25%) ने कमी दराची र.रु.58,49,970/- खर्चाची निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1109/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 10 हजार लि.क्षमतेचे टँकर्स उभारणी करण्यासाठी तीन 16 टन जीव्हीडब्ल्यु चेसिस खरेदी करीता मे.अशोक लिलॉण्ड लि.यांची अंदाजत्रकीय दरापेक्षा र.रु.23,03,250/- (28.25%) ने कमी दराची र.रु.58,49,970/- खर्चाची निविदा स्विकृत करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1110/2023:-** **(आरोग्य विभाग)** **(दि.14.12.2023)**

प्रशासकीय मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती रेखा शिवलिंग नायमाने, एएनएम, आ.के.चिकलठाणा, आरोग्य विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या पतीच्या नामे किसन फकीरचंद जंघाळे यांच्या (अपघात) या आजारावर खाजगी रुग्णालय सह्यााद्री अस्थिरोग, बालरोग, डेंटल नर्सिंग होम व मॅटर्निटी हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असुन र.रु.1,99,844/- (एक लाख नौव्यान्नव हजार आठशे चौरेचाळीस रुपये फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन (अपघात) या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.1,99,844/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.63,882/- वजा जाता र.रु.1,35,962/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या 90% र.रु.1,22,365/- इतकी होते. एकुण खर्चाच्या 5% र.रु.9,992/- इतकी येते. निव्वळ देय र.रु.1,12,373/- इतकी असुन र.रु.1,00,000/- च्या मर्यदीत रक्कमेच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येते.

संबंधीताने सह्यााद्री अस्थिरोग, बालरोग, डेंटल नर्सिंग होम व मॅटर्निटी हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र-2020/प्र.क्र.66/राकवि/2, नवीन इमारत, मंत्रालय मुंबई-32 दि.17.12.2020 नुसार परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केली आहे.

करीता श्रीमती रेखा शिवलिंग नायमाने, एएनएम, आ.के.चिकलठाणा, आरोग्य विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.95,000/- संबंधिताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1110/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती रेखा शिवलिंग नायमाने, एएनएम, आ.के.चिकलठाणा, आरोग्य विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या पतीच्या नामे किसन फकीरचंद जंघाळे यांच्या (अपघात) या आजारावर खाजगी रुग्णालय सह्यााद्री अस्थिरोग, बालरोग, डेंटल नर्सिंग होम व मॅटर्निटी हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेला आहे. दि.14.05.2023 च्या परिपत्रकानुसा मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिकारात र.रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधितास र.रु.1,00,000/- च्या 5% रक्कम मनपा फंडात जमा करुन उर्वरित र.रु.95,000/- (पंच्च्यान्नव हजार रुपये फक्त) संबंधिताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1111/2023:-** **(कार्य.अभियंता रस्ते विभाग)** **(दि.15.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.12, बेगमपुरा अंतर्गत तळेश्वर कॉलनी येथील कृष्ण मंदिराच्या मागे व विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.34,99,119/- चे तयार करण्यात आले आहे. सदरअंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2023-24 मधील लेखाशिर्षक:नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग, झोन क्र.01 नवीन कामाच्या यादीत पान क्र.ई-70 अ.क्र.1

तरतुद र.रु.50.00 लक्ष उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येईल. तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.34,99,119/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1111/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.12, बेगमपुरा अंतर्गत तळेश्वर कॉलनी येथील कृष्ण मंदिराच्या मागे व विविध ठिकाणी सिमेंट कॉँक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.34,99,119/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1112/2023:-</u>** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.18.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या मोकळ्या जागा शहरात विविध ठिकाणी आहेत. त्या जागेवर अतिक्रमण होऊ नये व त्यापासून महानगरपालिकेस उत्पन्न प्राप्त व्हावे या दृष्टिकोनातून शहरात खालील आठ ठिकाणी पेट्रोल पंप/ रिटेल आऊटलेट उभारण्यास सर्वसाधारण सभेने ठराव क्र.1070 दि.20.11.2023 अन्वयये मान्यता दिलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | शहानुरमियाँ दर्गा | 2 | आनंद गाडे चौक, एकनाथनगर |
| 3 | शिवाजीनगर | 4 | रोजाबाग |
| 5 | हर्सुल स्मृतीवन,हर्सुल | 6 | घनकचरा प्रक्रिया केंद्राजवळ, चिकलठाणा |
| 7 | घनकचरा प्रक्रिया केंद्राजवळ,हर्सुल | 8 | फारोळा |

उपरोक्त प्रमाणे दि.17.10.2023 रोजी पेट्रोलियम कंपनीकडून एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (EOI) (स्वारस्य प्रस्ताव) मागविण्यात आले होते. त्यानुसार हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनी प्रा.लि. (HPCL) व इंडियन ऑईल कार्पोरेशन लि. (IOCL) यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाले. दि.06 नोव्हेंबर 2023 रोजीच्या पेट्रोल पंप समितीच्या बैठकीत खालील ठिकाणी नमुद कंपन्यांकडून पेट्रोल पंप उभारणी करुन घेण्याचे ठरले आहे.

**<u>हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.(HPCL)</u>**

1. आनंद गाडे चौक, एकनाथनगर
2. रोजाबाग
3. घनकचरा प्रक्रिया केंद्र,हर्सुल

**<u>इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.</u>**

1. शहानुरमियाँ दर्गा
2. स्मृतीवन जटवाडा रोड, हर्सुल,
3. घनकचरा प्रक्रिया केंद्र चिकलठाणा.

शिवाजीनगर व फारोळा याबाबत दोन्ही पेट्रोलियम कंपन्यांनी स्वारस्य दाखविले नाही.

करीता वरीलप्रमाणे पेट्रोलियम कंपनीकडून संबंधीत जागेचा महानगरपालिकेशी रेडीरेकनर दरानुसार 20 वर्षाचा भाडे करार (लीज डीड ॲग्रीमेंट) करणे. दर तीन वर्षानंतर जागेची 10% भाडेवाढ करण्यास मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1112/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.व इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.यांना प्रत्येकी तीन ठिकाणी पेट्रोल पंप उभारणीसाठी महानगरपालिकेची जागा 20 वर्षाचा भाडे करार (लीज डीड ॲग्रीमेंट) करुन तीन वर्षानंतर जागेच्या दरात 10% भाडेवाढ करुन लीज डीड करण्यासाठी स्थायी समिची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1113/2023:-</u>** **(शिक्षण विभाग)** **(दि.18.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.देवेंद्र रुपरावजी सोळंके, मुख्याध्यापक,कें.प्रा.शा. इंदिरानगर, बायजीपुरा यांनी स्वतःच्या ह्रदयरोग शस्त्रक्रिया या आजारपणावर शेठ नंदलाल धुत हॉस्पिटल येथे दि.23.05.2023 ते दि.25.05.2023 या दरम्यान उपचार केला असुन त्यासाठी र.रु.2,60,223/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष साठ हजार दोनशे तेवीस मात्र) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.2,41,354/- असुन सदर रक्कमेच्या 90% र.रु.2,17,218/- आहे. त्यापैकी 5% र.रु.13,011/- (एकुण दाखल केलेले देयक र.रु.2,60,223/- च्या 5% प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.2,04,207/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष चार हजार दोनशे सात मात्र) देय आहे.

संबंधीतांनी सदरील गंभीर आजारावर उपचार करण्यासाठी कार्यालयाकडुन र.रु.1,50,000/- अग्रिम घेतलेले आहे.

सदरील शेठ नंदलाल धुत हॉस्पिटल हे उपचार केलेले (ह्दयरोग शस्त्रक्रिया) रुग्णालय शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्यावत दि.16.11.2011 पत्रात प्रसिध्द रुगणालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ठ आहे.

शासन निर्णयामधील प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून तसेच दि.14.05.2013 च्या परिपत्रकानुसार र.रु.1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहे. तसेच र.रु.1,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मंजुरीचे अधिकार आयुक्त यांना असुन र.रु.2,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करीता, श्री.देवेंद्र रुपरावजी सोळंके, मुख्याध्यापक, कें.प्रा.शा.इंदिरानगर, बायजीपुरा यांना शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून निव्वळ देय र.रु.2,04,207/- मधुन अग्रिम र.रु.1,50,000/- वजा जाता र.रु.54,207/- (अक्षरी रक्कम रुपये चौपन्न हजार दोनशे सात मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1113/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.देवेंद्र रुपरावजी सोळंके, मुख्याध्यापक,कें.प्रा.शा. इंदिरानगर, बायजीपुरा यांनी स्वत:च्या (ह्दयरोग शस्त्रक्रिया) या आजारपणावर शेठ नंदलाल धुत हॉस्पिटल येथे उपचार केला असून संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून निव्वळ देय र.रु.2,04,207/- मधुन अग्रिम र.रु.1,50,000/- वजा जाता र.रु.54,207/- (अक्षरी रक्कम रुपये चौपन्न हजार दोनशे सात मात्र) वैद्यकीय खर्च अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1114/2023:-</u>** **(कार्य. अभियंता रस्ते विभाग)** **(दि.18.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य प्रशासकीय इमारत आहे. सदर इमारत ही टप्पा क्र.1, टप्पा क्र.2, टप्पा क्र.3 व जुनी नगर परिषद वेळेची इमारत अशा एकुण इमारतींची संख्या चार आहे. यातील इमारती मधील संपुर्ण कार्यालयीन इमारतीचे बांधीव क्षेत्रफळ (1) Wing–B-4884.52 चौ.मी. (2) फेज–I (G+1)-1473.10 चौ.मी. (3) फेज-II (G+FF+SF)-2302.89 चौ.मी. (4) फेज-III (GF+FF+SF)-4772.49 चौ.मी.असे आहे.

या बाबींच्या अनुषंगीक दर सा.बां.दरसुची वा इतर विभागाच्या दरसुची मध्ये नसल्याने स्मार्ट सिटी मध्ये हाऊस किपींग करीता निविदा काढण्यात आली होती. सदर निविदेचे आकलन केले असता, स्मार्ट सिटी कार्यालयाचे क्षेत्र फळ सुमारे 5000 चौ.मी.असुन त्या करीता एकुण निविदा खर्च र.रु.3,81,776.32/- प्रतिमाह एवढा असल्याचे प्रारुप निविदेमध्ये नमुद आहे त्या अनुषंगाने प्रती चौ.मी.दर विचारात घेता व या आधारे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीच्या हाऊस किपींग साठीचा सहा महिन्याकरीता र.रु.61,82,730/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेतील कर्मचारी यांची अपुरी संख्या पाहता, दैनिक स्वरुपात योग्य निगा राखणे शक्य होत नाही. त्यास्तव चांगली स्वच्छता राखणेसाठी खाजगी हाऊस किपींग एजन्सीची नियुक्ती योग्य वाटते जेणेकरुन दैनिक स्वरुपात दिवसातून किमान दोन वेळा स्वच्छतागृहे, सर्व प्रशासकीय विभाग व इमारत, विभागातील फर्निचर,ए.सी./कुलर, दरवाजे खिडकी, पार्किंग एरिया, सामासिक अंतरातील जागा, टेरेस व त्यावरील AC चे Spit Unit, टाऊन हॉल, बॅडमिंटन हॉल, रेकॉर्ड

रुम, टेलिफोन ऑपरेटर रुम, सर्व अॅन्टी चेंबरर्स, पदाधिकारी दालन मा.सर्वसाधारण सभागृह व परिसर, मा.स्थायी समिती सभागृह, आयुक्त,अति.आयुक्त, उपआयुक्त यांची दालने यांची दैनंदिन स्वच्छता राखण्यासाठी हाऊस किपींगसाठी खाजगी एजन्सीची नेमणुक करणे आवश्यक वाटते. संचिकेत नमुदनुसार या कामाचा खर्च भांडवली खर्च-अ.अं.प.प्रशासकीय इमारती 17741200007, ई-96 अ.क्र.15 मधुन प्रस्तावित करण्यात येत आहे.

करीता, तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.61,82,730/- (सहा महिन्याच्या कालावधी करीता) यास मंजुरी देण्यास निविदा कार्यवाही करण्यास व इतर संलग्न कार्यवाही करणे, तसेच आवश्यकतेनुसार कामात बदल करावयाचे झाल्यास ते बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करण्याचा व अंदाजपत्रकास मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1114/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुख्य प्रशासकीय इमारतीचे हाऊस किपींगचे अंदाजपत्रक र.रु.61,82,730/- (सहा महिन्याच्या कालावधी करीता) यास मंजुरी देणेस, निविदा कार्यवाही करणे व इतर संलग्न कार्यवाहीकरणे, तसेच आवश्यकते नुसार कामात बदल करावयाचे झाल्यास ते बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करण्यासह अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1115/2023:-</u>** **(कार्य. अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.18.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवाचेऔचित्य साधुन त्या निमित्त करावयाच्या विविध विकास कामांतर्गत रेल्वेस्टेशन रोड येथे कारंजा उभारणे व बेट विकसीत करणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 अन्वये र.रु.49,94,233/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी लागणारा खर्च हा मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव निमित्त शासनाकडून प्राप्त होणाऱ्या शासन निर्णय क्र.628 दि.30.08.2023 अनु-09 अन्वये उपलब्ध तरतुद रु.50.00 लक्ष मधुन हाती घेण्यात येईलृ

तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.49,94,233/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1115/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन रोड येथे कारंजा उभारणे व बेट विकसीत करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.49,94,233/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1116/2023:-</u>** **(कार्य. अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.18.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील हर्सुल टी-पॉईंट मार्गावर कारंजे उभारणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची सन 2022-23 अन्वये र.रु.49,96,818/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी लागणारा खर्च हा मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव निमित्त शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या शासन निर्णय क्र.628 दि.30.08.2023 अनु-10 अन्वये उपलब्ध तरतुद र.रु.50.00 लक्ष मधुन हाती घेण्यात येईल.

तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.49,96,818/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1116/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहरातील हर्सुल टी-पॉईंट मार्गावर कारंजे उभारणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.49,96,818/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1117/2023:-</u>** **(कार्य. अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.18.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इंदिरानगर बायजीपुरा महानगरपालिका शाळेलगत असलेली मोकळी जागा जी शहराच्या मंजुर विकास योजनेमध्ये आरक्षण क्र.194 “हायस्कुल व प्ले ग्राउंडसाठी”

(नभुक्र.12369/187) आरक्षित आहे. या जागेत महानगरपालिकेच्या शाळेतील मुलांना खेळण्यासाठी मैदान तयार करण्यास्तव या मैदानास सर्व बाजुंनी संरक्षित भींतीची कामे व तत्संबंधीचे इतर कामे करणे या करीता अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.35,29,600/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी लागणारा खर्च हा "मंजुर रेखांकनात मुलभूत सुविधा पुरविणे" या लेखाशिर्षांतर्गत तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.

तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.35,29,600/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1117/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बायजीपुरा महानगरपालिका शाळेलगतच्या मोकळ्या जागेवर संरक्षित भींत बांधणे व तत्संबंधीचे कामे करणे यासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.35,29,600/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1118/2023:-</u>** **(आरोग्य विभाग)** **(दि.20.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम-2016 जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन (सुधारित) नियम-2018 अन्वये महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय, निम शासकीय, खाजगी स्वयंसेवी/धर्मादाय संस्था किंवा व्यक्ती ज्या जैविक कचरा (बायोमेडिकल वेस्ट) निर्माण करतात अशा सर्व संस्था म्हणजे सर्व प्रकारचे वैद्यकीय व्यावसायीक, रुग्णालये, दवाखाने, रक्तपेढ्या, पॅथॉलॉजी प्रयोगशाळा, विज्ञान, वैद्यकीय, पशु विद्यालय व महाविद्यालय, संशोधन संस्था, कत्तलखाने, पशु वैद्यकीय रुग्णालय, गोठे, तबेले, कुक्कूटपालन केंद्रे, दुग्ध व्यवसाय केंद्रे, इ. सर्व धारकांना म्हणजेच नियमानुसार "ॲक्युपायर" असे संबोधण्यात आलेले सर्व "ॲक्युपायर" यांची जैविक कचऱ्याची विहित शास्त्रोक्त पध्दतीने व कायद्यानुसार विल्हेवाट लावण्याची जबाबदारी बंधनकारक आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरीकांच्या आरोग्य दृष्ट्या अनेक दुर्धर रोगांचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी जैविक कचरा विल्हेवाट योग्य पध्दतीने करण्यासाठी महानगरपालिका जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प (इन्सीनिरेटर) खाजगी तत्वावर (बोल्ट-बिल्ड, ऑपरेट, लिज ॲण्ड ट्रान्सफर) या पध्दतीने कार्यान्वीत आहे. जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यासाठी दि.20.12.2001 रोजी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.554/3 च्या मंजुरीनुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका तर्फे मा.आयुक्त व मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस यांच्यामध्ये दि.19.09.2002 मध्ये 20 वर्षाकरीता बोल्ट तत्वावर प्रकल्प उभारण्यासाठी करारनामा करण्यात आलेला होता. सदर प्रकल्प हा कार्यान्वीत असुन दि.14.02.2023 रोजी 20 वर्षाचा कालावधी संपलेला आहे.

Air Plasma Incineration based Technology या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत कार्यपध्दती नुसार प्रकल्प उभारण्यासाठी नवीन निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही चालु आहे. Expression of Interest (EOI)/RFP Bhabha प्रसिध्द करणे आवश्यक आहे. या कार्यपध्दती नुसार जैव-कचऱ्यावर करण्यात येणारी प्रक्रिया अत्यंत प्रभावी असल्याचे दि.03.11.2023 रोजीच्या मा.अतिरिक्त आयुक्त-1 व मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या Bhabha Automatic Research Centre Trombay (BARC) मुंबई या संस्थेमार्फत विकसीत झालेल्या Air Plasma Incineration based Technology प्रकल्पाची पाहणी दरम्यान निर्देशनास आले आहे.

याबाबत दि.07.12.2023 रोजी एम.पी.सी.बी.चे अधिकारी तसेच मनपाचे अधिकारी व सध्या कार्यान्वीत असणाऱ्या जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्प मे.वॉटर ग्रेस प्रोडक्टस यांचे प्रतिनिधी यांच्या समवेत वि.सी.द्वारे बैठक पार पडली सदरील बैठकीत खालील बाबी निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

1. मनपातर्फे अंमलबजावणीसाठी प्रस्तावीत असलेली Air Plasma Incineration based Technology वर आधारित जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यासाठी एम.पी.सी. बी.ची मान्यता घेणे.
2. उक्त प्रस्तावीत अत्याधुनिक प्रकल्पाची निविदा प्रक्रिया तसेच प्रकल्प उभारणी व कार्यन्वीत होण्या करीता अंदाजीत एका वर्षाचा कालावधी दि.31 डिसेंबर-2024 पर्यंत लागणार आहे. सदरील

कालावधीसाठी सध्या कार्यान्वीत असलेले मे.वॉटर ग्रेस प्रोडक्टस यांना दि.31 डिसेंबर 2024 पर्यंत अथवा प्रकल्प कार्यान्वीत होईपर्यंत जी तारीख अगोदरची असेल तो पर्यंत प्रकल्प कार्यन्वीत ठेवणे बाबत एम.पी.सी.बी.कडून मान्यता घेणे.

उपरोक्त प्रस्ताव जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्प कायद्यातील सुधारीत तरतुदीनुसार सादर करण्यात येत आहे. मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळण्यास्तव, मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1118/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टिने अनेक दुर्धर रोगांचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी जैव-वैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिकद्वारे अंमलबजावणीसाठी प्रस्तावीत Air Plasma Incineration based Technology वर आधारित जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यासाठी सविस्तर प्रस्ताव एम.पी.सी.बी.कडे मान्यतेस्तव सादर करणे तसेच अत्याधुनिक प्रकल्पाची निविदा प्रक्रिया तसेच प्रकल्प उभारणी व कार्यान्वीत होण्याकरीता लागणाऱ्या अंदाजीत एक वर्षाच्या कालावधीसाठी मे.वॉटर ग्रेस प्रोडक्टस यांना दि.31 डिसेंबर 2024 पर्यंत अथवा प्रकल्प कार्यान्वीत होई पर्यंत जी तारीख अगोदरची असेल तो पर्यंत प्रकल्प कार्यान्वीत ठेवणे बाबत एम.पी.सी.बी.कडुन मान्यता घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1119/2023:-</u>** **(झोन क्र.5,आस्थापना विभाग)** **(दि.20.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.अनिल त्रिंबकराव ताठे, वरिष्ठ लिपीक, झोन क्र.5, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या आईच्या (नामे सौ.जिजाबाई त्रिंबकराव ताठे) Carcinoma Breast Rt या आजारावर उपचारासाठी खाजगी रुग्णालय एशियन हॉस्पीटल, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर येथे र.रु.1,33,574/- इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन Carcinoma Breast Rt या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.1,33,574/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.12,294/- वजा जाता र.रु.1,21,280/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या 90 टक्के र.रु.1,09,152/- इतकी होते. एकुण खर्चाचा 5 टक्के र.रु.6,678/- ही मनपा फंडात जमा करुन एकुण निव्वळ देय र.रु.1,02,474/- संबधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने एशियन हॉस्पीटल, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-2011/प्र.क्र.33/ 11 राकावि-2, मंत्रालय, मुंबई-32 दि.16.11.2011 नुसार परिशिष्ठ-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या Carcinoma Breast Rt याआजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालया प्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी मा.वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.अनिल त्रिंबकराव ताठे, वरिष्ठ लिपीक, झोन क्र.5, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.1,02,474/- संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 1119/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अनिल त्रिंबकराव ताठे, वरिष्ठ लिपीक, झोन क्र.5, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी स्वतःच्या आईच्या Carcinoma Breast Rt या आजारावर खाजगी रुग्णालय एशियन हॉस्पीटल, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेले आहेत. नियमा प्रमाणे एकुण र.रु.1,02,474/- खर्च अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. सदर रक्कम संबंधीतास अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1120/2023:-</u>** **(घनकचरा व्यवस्थापन विभाग)** **(दि.20.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीगनर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थान विभागा अंतर्गत हर्सुल येथे महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील जागेवर 100 TPD क्षमतेचा

चा Construction and Demolition Waste चा प्लांट तयार करावयाचा असुन त्यासाठी नियुक्त PMC M/s MaRS Planning and Engineering Services Pvt.Ltd., अहमदाबाद यांनी स्वच्छ भारत अभियान 2.0 अंतर्गत शासनाच्या City Solid Waste Action Plan ला मिळालेल्या मान्यतेनुसार अंदाजपत्रके व निविदा आराखडा यावर सनियंत्रण समितीने निर्णय घेऊन अंतिम करणे आवश्यक आहे. यासाठी आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेला आहे.

या मान्यतेस अनुसरुन प्रथम टप्या अंतर्गत शहरात हर्सुल भागात 100 TPD क्षमतेचा Construction and Demonition Waste चा प्लांट तयार करणेसाठी चे अंदाजपत्रक नियुक्त PMC यांनी सार्वजनिक बांधकाम दरसुची सन 2022-23 नुसार तयार करून सादर केला आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये शेड तयार करणे, कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे, कुंपण भिंत बांधणे, रस्त्याचा पाया/तळ तयार करणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, मशीन Platform तयार करणे, लॉन एरिया तयार करणे, प्रकल्पासाठी लागणा-या मशीनरी व उपकरणे खरेदी करणे, किरकोळ खर्चासाठी व विद्युतीकरणासाठी तरतुद करणे, इत्यादी बाबींचा समावेश आहे. सदर कामासाठी स्वच्छ भारत अभियान 2.0 अंतर्गत उपलब्ध होण्याच्या निधीतुन या कामाचा खर्च प्रस्तावित करण्यात येत आहे. शासन मान्यतेनुसार आवश्यकता भासल्यास महानगरपालिकेच्या हिस्साची तरतुद करण्यात येईल.

तरी उक्त कामासाठी तयार करण्यात आलेले स्थापत्य कामा करिताचे अंदाजपत्रक र.रु.7,10,33,852/- व यांत्रिकी बाबींचे अंदाजपत्रक र.रु.3,70,00,000/- असे एकुण अंदाजपत्रक र.रु.10,80,33,852/- यांस मंजुरी देणेबाबतचा, तसेच या अनुषंगाने नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार M/s MaRS Planning and Engineering Services Pvt. Ltd., अहमदाबाद यांचे सेवाशुल्क एकुण प्रकल्प किंमतीच्या 1.70% (GST अतिरीक्त) दराने करारनाम्यानुसार अदा करणेस, या कामाची स्थापत्य व यांत्रिकी कामासाठी स्वतंत्र B-1 निविदा प्रसिद्ध करणेस व आता किंवा भविष्यात आवश्यकते नुसार या प्रकल्पात काही बदल करावयाचे झाल्यास ते बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणेसह मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1120/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागा अंतर्गत हर्सुल येथे महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील जागेवर 100 TPD क्षमतेचा Construction and Demolition Waste चा प्लांट तयार करणेची स्थापत्य व यांत्रिकी कामासाठी स्वतंत्र B-1 निविदा प्रसिद्ध करणे, प्रकल्पासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) M/s MaRS Planning and Engineering Services Pvt. Ltd., अहमदाबाद यांचे सेवाशुल्क मंजुर दराने अदा करणेस, प्रकल्पासाठीची आर्थिक तरतुद स्वच्छ भारत अभियान 2.0 अंतर्गत प्राप्त निधीतून करणेस, या साठी आवश्यकतेनुसार महानगरपालिका हिस्साची तरतुद करणेस, इतर संलग्न कार्यवाही करणे व आता किंवा भविष्यात या कामाच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार बदल करावयाचे झाल्यास ते बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणेसह मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1121/2023:-** **(आस्थापना-1 विभाग)** **(दि.21.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.गोविंद विनायकराव बाराबोटे, अधिक्षक, उपअभियंता, झान क्र.7 कार्यालय याच स्वतःच्या आजारपणावर (IHD with DM with CAO (Bypass & Angioplasty) कमलनयन बजाज हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचारापोटी र.रु.4,77,395/- (अक्षरी रुपये चार लाख सत्याहत्तर हजार तीनशे पंच्याण्णव फक्त) इतका खर्च झाला आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमामध्ये या आजाराचा आकस्मिक आजार म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.16.11.2011 मध्ये परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांनी खाजगी रुग्णालयात

घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची यादीमध्ये उक्त रुग्णालयाचे नांव समाविष्ट आहे.

श्री.गोविंद विनायकराव बाराबोटे, अधिक्षक यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/51.दि.10.01.2023 अन्वये उक्त आजारपणावर उपचार घेण्यासाठी रु.1,50,000/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) अग्रीम मंजूर करण्यात आले असून सदर अग्रीम कमलनयन बजाज हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर यांना अदा करण्यात आलेले आहे.

संबंधिताच्या आजारपणावर रु.4.77.395/- एवढा वैद्यकीय खर्च झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.4,73,926/- एवढी असून सदर रकमेच्या 90% र.रु.4.26,533/- (अक्षरी रुपये चार लाख सव्वीस हजार पाचशे तेहत्तीस फक्त) पैकी 5% र.रु.23,869/- (अक्षरी रुपये तेवीस हजार आठशे एकोणसत्तर फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.4.77,395/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करुन उर्वरित र.रु. 4,02,664/- (अक्षरी रुपये चार लाख दोन हजार सहाशे चौसष्ट फक्त) रक्कम देय आहे.

करिता श्री.गोविंद विनायकराव बाराबोटे, अधिक्षक यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रु.4,73,926/- च्या 90% र.रु.4,26,533/- (अक्षरी रुपये चार लाख सव्वीस हजार पाचशे तेहत्तीस फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देवून अग्रीम र.रु.1.50,000/- समायोजन करुन उर्वरीत र.रु.2,52,664/- संबंधितास अदा करण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1121/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.गोविंद विनायकराव बाराबोटे, अधिक्षक यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.4,73,926/- च्या 90% र.रु.4,26,533/- (अक्षरी रुपये चार लाख सव्वीस हजार पाचशे तेहत्तीस फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देवून अग्रीम र.रु.1,50,000/- समायोजन करुन ऊर्वरीत र.रु.2,52,664/- संबंधितास अदा करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1122/2023:-** **(कार्य. अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.21.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागात खेळाचे मैदान स्थित असुन सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. या मैदानाचे क्षेत्र सुमारे 5 एकर असुन सदर जागेत क्रिकेट खेळाचे मैदान पुर्वी विकसित करण्यात आलेले आहे. तथापी, काळा ओघात या मैदानात नव्याने अमेरीकन गवत लावणे, अस्तित्वातील स्प्रिंकलर व्यवस्था दुरूस्त करणे व इतर संलग्न बाबींची कामे हाती घेणे आवश्यक झाले आहे. तशी मागणी क्रिडा विभागाने केली होती. त्यास्तव या कामाचे सां. बां. दरसुची सन 2022-2023 नुसार व Non DSR Item साठी खुल्या बाजारातुन मागविलेल्या दरांपैकी सर्वात कमी दर विचारात घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प 2023-24 लेखाशिर्षक गरवारे क्रिडा संकुल दर्जा वाढविणे व देखभाल दुरुस्ती करणे तरतुद रू 350 लक्ष मधुन करण्यात येणार आहे.

सदर काम तातडीचे असल्याने, या कामाची रीतसर ई-निविदा काढण्यात आली असुन, सदर कामाचे अंदाजपत्रक रु.76,31,831-00 यांस व निविदा काढण्याच्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1122/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागातील खेळाचे मैदानातील 5 एकर जागेतील क्रिकेट खेळाचे मैदानाची आवश्यक ती कामे करणे व दुरुस्ती करणे अंदाजपत्रक र.रु.76,31,831/- यांस तसेच प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेच्या कार्यवाहीस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1123/2023:-** **(कार्य. अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.21.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चिकलठाणा औद्योगिक वसाहतीमधील क्रिंडागण स्थित असुन सदरचे क्रिडांगण व लगतची सुमारे 27 एकर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सदर क्रिडांगण क्रिकेट खेळासाठी तयार करण्यात आलेले आहेत. त्याचे क्षेत्र सुमारे 5 एकर 3 गुंठे एवढे आहे. या

क्रिकेट खेळासाठी मैदानातील नेट प्रॅक्टीस साठी जाळी लावणे आवश्यक ठिकाणी अतिरीक्त गवत लावणे, स्प्रिं-कलर गन व इतर बाबींसाठी र.रु.60,34,385/- साठी ई-निविदा प्रकाशित करण्यात आली होती. निविदा भरण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत एकुण 3 निविदा प्राप्त झाल्या असुन एकुण प्राप्त निविदांपैकी निविदा भरलेले तिसरे कंत्राटदार Mujeeb Ur-Reheman यांनी similar work done अंतर्गत सादर केलेले काम केल्याचे प्रमाणपत्र similar work done या संज्ञेत बसत नसल्याने ते तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरलेले नाही. उर्वरित पात्र निविदाधारकांचे संक्षिप्त माहिती खालील नमुद प्रमाणे आहे.

| संदर्भः- Tender ID_2023_AMCA_957170_1 | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **विवरण** | **शेरा** |
| 1. | विभागाचे नाव | कार्यकारी अभियंता, इमारत व विद्‌युत विभाग |
| 2. | कामाचे स्वरुप | मनपा गरवारे क्रिडा संकुल येथे क्रिकेटच्या मैदानाचे देखभाल व दुरुस्ती करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? | होय,अं.प.र.रु.76,31,831/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.60,34,385/- |
| 4. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.25.10.2023 ते दि.02.11.2023 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.07.12.2023 |
| | क) निविदा काढण्याची वेळ? | प्रथम |
| | ड) एकुण प्राप्त निविदा | 03 (पात्र-2, अपात्र-1) |

(त्यापैकी पात्र निविदाधारकाची यादी खालील प्रमाणे आहे.)

| **अ क्र** | **कंत्राटदाराचे नाव** | **निविदा र.रु.** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** | |
|---|---|---|---|---|
| | | | **रक्कम रुपये** | **टक्केवारी** |
| 1. | Baburao Kerba Admane | र.रु.60,34,385/- | र.रु.60,34,385/- | अं.प.दराने |
| 2. | M/s Vijay Constrution | र.रु.60,34,385/- | र.रु62,15,416/-/- | अं.प.दरापेक्षा 3% जास्त दराने |

| **अ क्र** | **संक्षिप्त तपशील** | **शेरा** |
|---|---|---|
| 1. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | क) असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 2. | सदर कामाचा खर्च कोणत्या लेखाशिर्षकातून करण्यात येणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | गरवारे क्रिडा संकुल दर्जा वाढविणे व देखभाल दुरुस्ती |
| 3. | सदर कामास खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 4. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 5. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

सदर निविदा समितीने प्राप्त निविदांवर विचार विनिमय करुन प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची म्हणजेच Baburao Kerba Admane यांची अं.प.दराची निविदा मान्यता करण्याची शिफारस केली आहे.

तरी प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची Baburao Kerba Admane यांची अं.प.दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1123/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व निविदा समितीने शिफारस केल्यानुसार मनपा गरवारे क्रिडा संकुल येथे क्रिकेटच्या मैदानाचे देखभाल व दुरुस्ती करणे या कामासाठी प्राप्त व पात्र ठरलेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराची Baburao Kerba Admane यांची अं.प.दराच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1124/2023:-** **(आस्थापना झोन क्र.1 विभाग)** **(दि.21.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.अखील डर रहेमान कनिष्ठ लिपीक, उपअभियंता झोन क्र. 01 छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या स्वतःच्या वडीलांच्या नामे मुबस्सीर रहेमान यांच्या आजारावर (फुफुसाचे विकार) या आजारावर खाजगी रुग्णालय सहरा हॉस्पीटल, आयकॉन हॉस्पीटल, एम.जी.एम. हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असून र.रु.1,76,706/- (अक्षरी एक लाख शहात्तर हजार सातशे सहा रुपये मात्र) फक्त इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली असून (फुप्फुसाचे विकार) या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.1,76,706/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.17,884/- वजा जाता र.रु.1,58,822/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या 90% र.रु.1,42,939/- इतकी होते एकुण खर्चाच्या 5% र.रु.8,835/- इतकी येते. निव्वळ देय र.रु.1,34,104/- इतकी असून रु.1,00,000/- च्या मर्यादीत रक्कमेच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्वी करण्यात येते.

संबंधिताने सहरा हॉस्पीटल, आयकॉन हॉस्पीटल, एम.जी.एम. हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेला आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र-202/प्र.क्र.66/राकवि-2, नवीन इमारत मंत्रालय, मुंबई-32 दि.17.12.2020 नुसार परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालय प्रमाणे प्रतिपूर्ती अनुशेयतेसाठी वैद्यकीय अधिका-यांनी शिफारस केलेली आहे.

करीता श्री.अखील उर रहेमान कनिष्ठ लिपीक, उपअभियंता झोन क्र.01 छत्रपती संभाजीनगर यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.95,000/- संबंधिताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक 1124/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अखील उर रहेमान कनिष्ठ लिपीक, उपअभियंता झोन क्र.01 छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या स्वःच्या वडीलांच्या नामे मुबस्सीर रहेमान यांच्या आजारावर (फुप्फुसाचे विकार) या आजारावर खाजगी रुग्णालय सहारा हॉस्पीटल, आयकॉन हॉस्पीटल, एम.जी.एम.हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेला आहे. दि.14.05.2013 च्या परिपत्रका नुसार मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यंच्या अधिकारात र.रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधितास र.रु.1,00,000/- च्या 5% रक्कम मनपा फंडात जमा करुन उर्वरित र.रु.95,000/- (पंच्योन्नव हजार रुपये फक्त) संबंधिताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1125/2023:-** **(आस्थापना-1 विभाग)** **(दि.21.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातील रिक्त असलेले पद पदोन्नतीने भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या

निवड समितीची बैठक दि.01.012.2023 रोजी घेण्यात आली. सद्य:स्थितीत कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गात एकुण (06) पदे मंजुर असून (05) पदे रिक्त आहेत.

उपअभियंता (स्थापत्य) संवर्गातील कार्यरत अधिकाऱ्यांची सेवा ज्येष्ठता, शैक्षणिक अर्हता, 50/55 नंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकन, गोपनीय अहवाल, विभागीय चौकशी, इ. सेवाविषयक बाबी विचारात घेता, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णया विरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निवड समितीने खालील अधिकाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर वेतनश्रेणी (एस-23) 67700-208700 (7 वा वेतन आयोग) मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्या बाबत शिफारस केली आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | मुळ जात प्रवर्ग |
|---|---|---|
| 1) | श्री.सुनिल एम.जाधव | अजा |
| 2) | श्री.सुमंत श्रीरामबुवा रामदासी | खुला |

महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2021 मधील नियम-6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेचवर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नदीने भरतांना सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पुर्वमंजुरी आवश्यक राहील. अशी तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार मा.सर्वसाधाण सभेची मान्यता घेऊन तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविण्याबाबत निवड समितीने शिफारस केली आहे.

करीता उपअभियंता (स्थापत्य) या पदावरील उक्त अधिकाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविण्याबाबत समितीने शिफारस केल्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1125/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सुनिल एम.जाधव व श्री.सुमंत श्रीरामबुवा रामदासी उपअभियंता (स्थापत्य) यांना खुल्या प्रवर्गातुन कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर वेतनश्रेण (एस-23) 67700-208700 (7 वा वेतन आयोग) मध्ये तात्पुरत्य स्वरुपात पदोन्नती देण्या बाबत सामान्य प्रशासान विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निवड समितीने महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2021 मधील नियम-6 नुसार वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविण्याबाबत निवड समितीने शिफारस केल्यानुसार मा.सर्वसाधरण सभेची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1126/2023:-</u>** **(मालमत्ता विभाग)** **(दि.21.12.2023)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे सिध्दार्थ उद्यान येथील दुमजली वाहनतळ 10 वर्षाच्या कालावधी साठी श्री.खाजा उस्मानोद्दीन अमीनोद्दीन यांना वार्षिक भाडे र.रु.14,40,000/- व इतर आकारणी करुन करार नामा क्र.अगग-5/8244/2015 दि.09.12.2015 अन्वये भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे.

परंतु, संबंधीतास दि.02.04.2014 रोजी प्रत्यक्ष वाहनतळाचा ताबा देण्यात आलेला आहे. श्री.खाजा उस्मानोद्दीन अमीनोद्दीन यांनी कोव्हीड-19 या साथरोगामध्ये भारत बंद असल्याने उक्त कालावधीचे भाडे माफ करण्यासाठी विनंती केली आहे. त्यानुषंगाने दि.16.03.2020 ते दि.15.11.2021 (एक वर्षे आठ महिने) या कालावधीमध्ये सिध्दार्थ उद्यान बंद असल्याकारणाने उक्त कालावधीचे भाडे र.रु.35,53,450/- माफ करण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1126/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे सिध्दार्थ उद्यान येथील दुमजली वाहनतळ 10 वर्षाच्या कालावधी साठी श्री.खाजा उस्मानोद्दीन अमीनोद्दीन यांना वार्षिक भाडे र.रु.14,40,000/- व इतर आकारणी करुन करार नामा क्र.अगग-5/8244/2015 दि.09.12.2015 अन्वये भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे.

परंतु, संबंधीतास दि.02.04.2014 रोजी प्रत्यक्ष वाहनतळाचा ताबा देण्यात आलेला आहे. श्री.खाजा उस्मानोद्दीन अमीनोद्दीन यांनी कोव्हीड-19 या साथरोगामध्ये भारत बंद असल्याने उक्त कालावधीचे भाडे माफ करण्यासाठी विनंती केली आहे. त्यानुषंगाने दि.16.03.2020 ते दि.15.11.2021 (एक वर्षे आठ महिने) या कालावधीमध्ये सिध्दार्थ उद्यान बंद असल्या कारणाने उक्त कालावधीचे भाडे र.रु.35,53,450/- माफ करण्यासाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1127/2023:-</u>** **(आस्थापना -1 विभाग)** **(दि.21.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, “महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ड्रेनेज,रस्ते इ.कामे करणे” या विवक्षित कामाकरीता कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/748 दि.29.06.2022 अन्वये श्री.भागवत दिनकर फड, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त)यांना सेवा करार पध्दतीने अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कलावधीकरीता नियुक्ती करण्यात आली होती. तथापि सदर आदेशाची मुदत दि.28.12.2022 रोजी संपलेली आहे.

“जी-20 कार्यक्रमा अंतर्गत औरंगाबाद शहरातील प्रस्तावीत तांत्रिक कामे करणे तसेच महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ड्रेनेज रस्ते इ.कामे करणे” या विवक्षित कामाकरीता मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.626 दि.03.01.2023 नुसार श्री.भागवत दिनकर फड, कार्यकारी अभियंता यांना दोन दिवसांचा खंड देऊन दि.02.01.2023 ते दि.30.06.2023 या कालावधीसाठी कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/22 दि.03.01.2023 च्या आदेशानुसार मुदतवाढ देण्यात आलेली होती. तथापि, सदर आदेशाची मुदत दि.30.06.2023 रोजी संपलेली होती.

र.रु.100 कोटीचे रस्त्यांचे कामे सुरु असुन Comprehensive City development Plan हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे. त्यासाठी श्री.भागवत फड यांची सेवा उपयुक्त राहणार असल्याने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.845 दि.30.06.2023 नुसार र.रु.100 कोटीचे रस्त्यांचे कामे व Comprehensive City Development Plan राबविणे या विवक्षित कामाकरीता दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/987 दि.30.062023 अन्वये दि.05.07.2023 ते दि.04.01.2024 या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली असून सदर आदेशाची मुदतवाढ दि.04.01.2024 रोजी संपणार आहे. सदर कामासाठी श्री.फड यांच्या सेवेची आवश्यक आहे.

करीता श्री.भागवत दिनकर फड, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना र.रु.100 कोटीचे रस्त्यांचे कामे व Comprehensive City Development Plan राबविणे य विवक्षित कामाकरीता दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन (सुट्टीचे दिवस वगळून) दि.09.01.2024 पासुन पुढील 06 महिन्यांच्या कालावधी करीता कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/748 दि.29.06.2022 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1127/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.भागवत दिनकर फड, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना र.रु.100 कोटीचे रस्त्यांचे कामे व Comprehensive City Development Plan राबविणे य विवक्षित कामाकरीता दोनदिवसांचा तांत्रिक खंड देऊन (सुट्टीचे दिवस वगळून) दि.09.01.2024 पासुन पुढील 06 महिन्यांच्या कालावधीकरीता कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/748 दि.29.06.2022 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1128/2023:-</u>** **(मालमत्ता विभाग)** **(दि.21.12.2023)**

आयुक्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, विभागीय किरकोळ विक्रेता प्रमुख, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.इंडियन ऑईल भवन, प्लॉट क्र.99, ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर यांनी इंडियन ऑईलच्या कार्यालयासाठी 1500 चौ.मी.जागा किंवा 10000 चौ.फुट आकाराचा हॉल शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये वाहनतळाच्या सुविधेसह मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुषंगाने गारखेडा येथील रिलायन्स मॉल लगत असलेली महानगरपलिकेच्या मालकी व ताब्यातील इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील पुर्व मध्य बाजुचा हॉल ज्याचे क्षेत्रफळ 154.00 चौ.मी.आकाराचा हॉल सार्वजनिक बांधकाम विभागाचे वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार प्रती माह र.रु.38,275/- प्रमाणे वार्षिक भाडे र.रु.4,59,300/- त्यावर 18%जी.एस.टी. र.रु.82,674/- असे एकुण र.रु.5,41,974/- एवढी भाडे आकारणी करुन सदर हॉल भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 1128/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभागीय किरकोळ विक्रेता प्रमुख, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.इंडियन ऑईल भवन, प्लॉट क्र.99, ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर यांनी इंडियन ऑईलच्या कार्यालयासाठी 1500 चौ.मी.जागा किंवा 10000 चौ.फुट आकाराचा हॉल शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये वाहनतळाच्या सुविधेसह मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुषंगाने गारखेडा येथील रिलायन्स मॉल लगत असलेली महानगरपलिकेच्या मालकी व ताब्यातील इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील पुर्व मध्य बाजुचा हॉल ज्याचे क्षेत्रफळ 154.00 चौ.मी.आकाराचा हॉल सार्वजनिक बांधकाम विभागाचे वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार प्रती माह र.रु.38,275/- प्रमाणे वार्षिक भाडे र.रु.4,59,300/- त्यावर 18%जी.एस.टी. र.रु.82,674/- असे एकुण र.रु.5,41,974/- एवढी भाडे आकारणी करुन सदर हॉल भाडेतत्वावर देणेसाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1129/2023:-</u>** **(नगर रचना विभाग)** **(दि.21.12.2023)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्यामार्फत प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.टिपीएस-1818/प्र.क्र.236/18/कलम-37 (1 कक) व कलम 20(4)/नवि-13 दि.02.12.2020 अन्वये राज्यातील महानगरपालिकांसाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजुर केलेली आहे. सदर नियमावलीतील नियम क्र.6.3 मधील टेबल क्र.6-जी खालील नोट चारमध्ये प्रिमियम एफ.एस.आय.किंवा टि.डी.आर.स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन सम प्रमाणात आकरण्याची नियोजन प्राधिकरणास मुभा देण्यात आली आहे.

सद्यस्थितीत स्थानिक परिस्थितीनुसार शहर मंजुर विकास योजनेनुसारची अंमलबजावणी ही अत्यंत अल्प झाल्याचे दिसुन येते. त्यास चालना देण्यासाठी व मंजुर करण्यात आलेल्या विकास योजनेनुसार विकास योजना रस्ते, आरक्षणे इ.चा विकास होणे करीता टि.डी.आर.क्षेत्राचा मोठ्या प्रमाणावर वापर होणे आवश्यक आहे. जेणे करुन विकास योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करता येऊ शकेल.

तद्नुषंगाने विकास योजना आरक्षणाने बाधीत होणाऱ्या क्षेत्राचा मोबदला टि.डी.आर.स्वरुपात घेणे करीता नागरिकांमध्ये प्रोत्साहन देणे नियोजन प्राधिकरणाच्या धोरणानुसार शक्य होईल व त्यानुसार प्रिमियम एफ.एस.आय. व टि.डी.आर.समान प्रमाणात वापरण्याबाबत निर्णय उक्त नमुद तरतुदीनुसार घेणे योग्य होईल.

तद्नुषंगाने विकास परवानगी घेतेवेळी प्रिमियम एफ.एस.आय.व टि.डी.आर. समान प्रमाणात वापरण्याबाबत खालील प्रमाणे निर्णय होणे आवश्यक आहे.

| Plot Area | Premium FSI & TDR |
|---|---|
| Up to 300 sqm | As per owners requirmenat |
| Above 300 sqm | TDR & Premium FSI allowed to consume in equal proportion |

करीता, प्रिमियम एफ.एस.आय.व टि.डी.आर.समान प्रमाणात वापरण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1129/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय क्र.टिपीएस-1818/प्र.क्र.236/18/कलम-37 (1कक) व कलम 20 (4)/नवि-13 दि.02.12.2020 अन्वये राज्यातील महानगरपालिकांसाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजुर केलेली आहे.

शासन निर्णय क्र. टिपीएस-1818/प्र.क्र.236/18 (भाग-1) /पुरकरपत्र/नवि-13 दि.08.10.2021 अन्वये प्राधिकरणाने त्यांचे स्थानिक परिस्थितीप्रमाणे मंजुर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील नियम क्र.6.3 मधील टेबल क्र.6-जी खालील नोट चार प्रमाणे प्रिमियम एफ.एस.आय.व टि.डी.आर.वापराचा प्राधान्यक्रम निश्चित करणे बाबतचे आदेश काढणे बाबत नमुद केले आहे.

त्यानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी संदर्भीय शासन निर्णयानुसार खालील प्रमाणे प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येत ओह.

| Plot Area | Premium FSI & TDR |
|---|---|
| Up to 300 sqm | As per owners requirmenat |
| Above 300 sqm | TDR & Premium FSI allowed to consume in equal proportion |

सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1130/2023:-** **(नगर रचना विभाग)** **(दि.21.12.2023)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रशासकीय प्रस्ताव सादर करीत आहेत की, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहरास ऐतिहासिक महत्व असुन वाकाटक, सातवहन या घराण्याची समृध्दीने भरभराटीस आलेली वैभवशाली सत्ता या शहरात होती. तसेच मध्यम युगीन कालखंडात खिलजी-मुघल, निजाम या घराण्यातील बादशाह, सुभेदार, सरदार यांच्या ऐतिहासिक कालखंडात अनेक सांस्कृतिक परिवर्तन होत गेले व शहराच्या परिसरात कला, शिल्पकला, स्थापत्यकला व संस्कृती बहरत गेली.या 2000 वर्षाचया कालखंडात समृध्द वास्तु, सुंदर लेण्या, भव्य प्रवेशद्वार, अपराजित किल्ले, सुंदर बगीचे, विविध तलाव व नहरी अशा विविध वारसांची निर्मिती तत्कालीन रचनाकारांनी, स्थापत्यकारांनी केली आणि म्हणुनच छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) परिसर हा ऐतिहासिक वारसा स्थळांची समृध्द देणगी असलेला परिसर आहे.

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) परिसरात ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या अनेक वास्तु आहेत. त्यापैकी अजिंठा व वेरुळ या लेणी जागतिक वारसा स्थळ म्हणुन युनेस्कोने (UNESCO) सन-1982 या वर्षीच जाहिर केलेल्या आहेत. तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील बीबी-का-मकबरा, नौखंडा पॅलेस, पानचक्की, रंगमहल तलाव, हर्सुल तलाव हे ऐतिहासिक स्थळे तसेच शहरातील मोठे मुघल कालीन दरवाजे, दिल्ली दरवाजा, रंगीन दरवाजा, भडकलगेट, मकई गेट, काला दरवाजा, रोशन गेट, पैठणगेट, नोबत दरवाजा, कटकटगेट व थत्ते नहर, नहर-ए-अंबारी, नहर-ए-पानचक्की, किलेअर्क, हिमायतबाग इ.समृध्द वारसा आजही सुस्थितीत असुन या वास्तु पर्यटकांना आकर्षित करतात. तसेच औरंगाबाद परिसरातील वारसा स्थळांची माहिती घेण्यासाठी, अभ्यास करण्यासाठी संशोधना करीता इतिहासप्रेमी, वास्तु रचनाकार, स्थापत्यकार व अभियांत्रिकीची अभ्यासक या शहरास भेटी देतात. म्हणुन छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) हे महराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागाचे मुख्यालय असुन एक महत्वाचे मध्यवर्ती, औद्योगिक व ऐतिहासिक पर्यटन केंद्र आहे. महाराष्ट्र राज्याची पर्यटन राजधारी म्हणुन छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) या शहराची ओळख आहे. या शहराला खुप मोठ्या प्रमाणावर ऐतिहासिक वारसा लाभला असून इतिहासाची साक्ष देण्याऱ्या अनेक वास्तु या शहरामध्ये आहेत.

या वास्तुंचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी शासन निर्णयक्र.टिपीएस-3006/248/प्र.क्र. 29/ 2008/नवि-30 दि.14 मार्च 2008 अन्वये हेरिटीज कमेटी स्थापन करण्यात आली. तसेच सदर कमेटीच्या वेळोवेळी बैठका होऊन त्यामध्ये शहराचा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी विविध प्रयोजन व निर्णय घेतले जातात. त्यामुळे या शहरातील वास्तुचे संरक्षण व संवर्धन करणे आवश्यक

आहे. दि.10.10.2023 रोजी हेरिटेज संवर्धत कमेटीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहरातील ऐतिहासिक स्मारकांचे संवर्धन करण्यासाठी निधी उपलब्धतेबाबत चर्चा करण्यात आली. तसेच एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील कलम 14.5.12 च्या तरतुदीमध्ये हेरिटेज कन्झर्व्हेशन फंड बाबत तरतुद नमुद आहे. त्या अनुषंगाने शहरात संवर्धनाचे काम खुप मोठ्या प्रमाणावर करावयाचे आहे. सदर काम करण्यासाठी निधी अपुरा पडत असल्याने कायम स्वरुपी निधी उपलब्ध होण्यासाठी हेरिटेज समितीमार्फत मागणी करण्यात आली. त्या अनुषंगाने शहरातील ऐतिहासिक वारसा संरक्षण व संवर्धन करण्यासाठी विकास परवानगी देते वेळी हेरिटेज सेस आकारणे बाबत निर्णय होणे योग्य होईल. सदर हेरिटेज सेस हा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील ऐतिहासिक वास्तुच्या संवर्धनासाठी वापरण्यात येईल.

ऐतिहासीक वास्तुच्या संवर्धनाचा प्रस्ताव प्रथम हेरिटेज संवर्धन समितीच्या समोर ठेवण्यात येईल. तद्नंतरच ऐतिहासीक वास्तुच्या संवर्धनाचे काम करण्यात येईल. आपतकालीन परिस्थितीमध्ये ऐतिहासीक इमारतीच्या संवर्धनाची आवश्यकता भासल्यास हेरिटेज कमिटीची बैठक घेणे शक्य नसल्यास प्राप्त परिस्थितीची निकड लक्षात घेता सदर हेरिटेज सेस वापरण्याचे अधिकार आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्याकडे राहतील.

| **अ.क्र** | **प्रस्तावाचा प्रकार** | **आकारावयाचा हेरिटेज सेस** |
|---|---|---|
| 1. | स्वयं विकसीत गृहनिर्माण प्रकल्प | शहर विकास निधी व जमिन विकास शुल्काच्या एकुण जमा रक्कमेच्या 2% |
| 2. | रेखांकन | विकास आकारा जमिन विकास शुल्काच्या एकुण जमा रक्कमेच्या 2% |
| 3. | रेखांकन (स्वयं विकसित अंतर्गत विकास) | जमिन विकास शुल्काच्या एकुण जमा रक्कमेच्या 2% |

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील 2.2.1 अन्वये आकारण्यासाठी नियोजन प्राधिकरणास मुभा असुन त्यानुसार परवानगी कारणाने आकरण्यात येणाऱ्या शुल्कात वाढीव शुल्क आकारण्याची तरतुद ठेवण्यात यावी. ज्यानुसार शहरातील ऐतिहासिक स्मारकांचे संवर्धन करण्यासाठी कायम स्वरुपी महसुल उपलब्ध होईल. सबब नगर रचना विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या बांधकाम परवानगी, स्वयं विकसीत गृहनिर्माण्ध प्रकल्प, रेखांकन, रेखांकन (अंतर्गत विकास स्वयं विकसीत) या प्रस्तावावर उक्त नमुद केल्याप्रमाणे हेरिटेज संवर्धन शुल्क आकारणीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1130/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दि.10.10.2023 रोजी हेरिटेज संवर्धन कमिटीची बैठकीतील निर्णयानुसार व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील 14.5.12 च्या तरतुदी नुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील ऐतिहासिक स्मारकांचे संरक्षण व संवर्धन करणे करीता हेरिटेज सेसची दि.01.01.2024 रोजीपासून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर पुढील प्रमाणे आकारणी करण्यात येत आहे.

| **अ.क्र** | **प्रस्तावाचा प्रकार** | **आकारावयाचा हेरिटेज सेस** |
|---|---|---|
| 1. | स्वयं विकसीत गृहनिर्माण प्रकल्प | शहर विकास निधी व जमिन विकास शुल्काच्या एकुण जा रक्कमेच्या 2% |
| 2. | रेखांकन | विकास आकारा जमिन विकास शुल्काच्या एकुण जमा रक्कमेच्या 2% |
| 3. | रेखांकन (स्वयं विकसित अंतर्गत विकास) | जमिन विकास शुल्काच्या एकुण जमा रक्कमेच्या 2% |

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील 2.2.1 अन्वये आकारण्यासाठी नियोजन प्राधिकरणास मुभा असुन त्यानुसार परवानगी कारणाने आकरण्यात येणाऱ्या शुल्कात वाढीव शुल्क आकारण्याची तरतुद ठेवण्यात यावी. ज्यानुसार शहरातील ऐतिहासिक स्मारकांचे संवर्धन करण्यासाठी

कायम स्वरुपी महसुल उपलब्ध होईल. सबब नगर रचना विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या बांधकाम परवानगी, स्वयं विकसीत गृहनिर्माण्ध प्रकल्प, रेखांकन, रेखांकन (अंतर्गत विकास स्वयं विकसीत) या प्रस्तावावर उक्त नमुद केल्याप्रमाणे हेरिटेज संवर्धन शुल्क आकारणीचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1131/2023:-</u>** **(कार्य.अभियंता रस्ते विभाग)** **(दि.21.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.मनपा-2023/प्र.क्र.628/नवि-16 दि.30.08.2023 नुसार मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकरीता "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई-सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद" यायोजनेअंतर्गत् र.रु.40.00 कोटी निधी महानगरपालिकेस वितरीत करण्यात आला असुन नमुद अटी व शर्तीस अधिन राहून प्रकल्पांतर्गतची कामे करण्याकरीता कर्यान्वयन यंत्रणा "महानगरपालिका" राहील अशी मंजुरी प्राप्त आहे.

सदर शासन निर्णयातील विवरणपत्रातील अनु.क्र.02 नुसार शहर सौंदर्यीकरणाच्या कामां अंतर्गत दिल्लीगेट ते हर्सुल टी पॉईंट पर्यंत सायकल ट्रॅक तयार करणे या कामाकरीता र.रु.03.00 कोटीची मंजुरी प्राप्त आहे. तथापि, सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असल्यामुळे नमुद काम रद्द करण्यात येऊन त्या ऐवजी क्रांतीचौक ते गुरुगोविंदसिंग चौक (गोपाल कल्चरल हॉल) या 40 मी.रुंद विकास योजना रस्त्याच्या दोन्ही बाजुस फुटपाथ, सायकल ट्रॅक, पार्किंग, लॅण्डस्केपिंग, विद्युत कामे इ.कामे करण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे शासन निर्णयात नमुद प्रमाणे नागरीकांच्या प्राथमिक सोई-सुविधांमध्ये भर पडणार असुन पर्यायाने शहर सौंदर्यीकरणामध्ये सुध्दा भर पडणार आहे. तसेच मंजुर निधी हा त्यास उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येणार आहे.

उक्त नमुद नुसार क्रांतीचौक ते गुरु गोविंदसिग चौक (गोपाल कल्चरल हॉल) पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस फुटपाथ, सायकल ट्रॅक, पार्किंग, लॅण्डस्केपिंग, विद्युत कामे करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 च्या राज्य दरसुची नुसार र.रु.2,99,89,843/- (18टक्के जी.एस.टी.सह) चे महानगरपालिका पॅनेलवरील नियुकत वास्तु विशारद अर्बन ॲटेलिअरचे संचालक श्री.धीरज देशमुख यांच्या मार्फत तयार करुन घेण्यात आले आहे.

करीता, उक्त नमुद नुसार शासन निर्णयातील विवरणपत्रातील अनु.क्र.02 नुसार शहर सौंदर्यीकरणाच्या कामांतर्गत दिल्लीगेट ते हर्सुल टि पॉईंटपर्यंत सायकल ट्रॅक तयार करणे या ऐवजी या कामाकरीता मंजुर र.रु.03.00 कोटी मधुन क्रांतीचौक ते गुरु गोविंदसिंग चौक (गोपाल कल्चरल हॉल) या 40 मी.रुंद विकास योजना रस्त्याच्या दोन्ही बाजुस फुटपाथ, सायकल ट्रॅक, पार्किंग, लॅण्डस्केपिंग, विद्युत कामे इ.कामे करणेचे अंदाजपत्रक र.रु.2,99,89,843.00 (18 टक्के जी.एस.टी.सह) यास प्रशासकीय मंजुरीचा प्रस्ताव व तद्नुषंगाने बी-1 स्वरुपात निविदा कार्यवाही करण्याकरीता मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1131/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय क्र.मनपा-2023/प्र.क्र.628/नवि-16 दि.30.08.2023 मधील विवरणपत्रातील अनु.क्र.02 नुसार शहर सौंदर्यीकरणाच्या कामा अंतर्गत दिल्लीगेट ते हर्सुल टी पॉईंट पर्यंत सायकल ट्रॅक तयार करणे या कामाकरीता र.रु.03.00 कोटीची मंजुरी प्राप्त आहे. तथापि, सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असल्यामुळे नमुद काम रद्द करण्यात येऊन त्याऐजवी क्रांतीचौक ते गुरु गोविंदसिंग चौक (गोपाल कल्चरल हॉल) या 40 मी.रुंद विकास योजना रस्त्याच्या दोन्ही बाजुस फुटपाथ, सायकल ट्रॅक, पार्किंग, लॅण्डस्केपिंग, विद्युत कामे इ.कामे करण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे नागरीकांच्या प्राथमिक सोई-सुविधांमध्ये भर पडणार असुन पर्यायाने शहर सौंदर्यीकरणामध्ये सुध्दा भर पडणार आहे. तसेच मंजुर निधी हा त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर कामाचे महानगरपालिका पॅनेलवरील नियुक्त वास्तुविशारद अर्बन ॲटेलिअर चे संचालक श्री.धीरर देशमुख यांच्या मार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 च्या राज्य दरसुची नुसार तयार करण्यात आलेले र.रु.2,99,89,843.00 (18 टक्के जी.एस.टी.सह) च्या

अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व बी-1 स्वरुपात निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1132/2023:-</u>** **(कार्य. अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.22.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरामध्ये एकुण चार STP आहेत. सद्यस्थितीत सरासरी 75 MLD पाण्यावर प्रक्रिया करुन सदरचे पाणी खाम/सुखना नदीमध्ये सोडण्यात येते. या पाण्याचा वापर व लाभ पुढील भागात असणाऱ्या शेतकरी वर्गास होत असुन काही प्रमाणात या पाण्याचा पुर्नवापर अंतर्गत उद्यान विभागाकडून उद्यान विभागाकडून उद्यान जगविण्यासाठी, हरीतपट्टे विकसित करण्यासाठी व रस्त्यांवरील दुभाजकातील झाडे जगविण्यासाठी केला जातो.

यासाठी प्रक्रियायुक्त पाण्याचा पुनर्वापर पिण्याच्या पाण्याच्या व्यतिरिक्त/मानवी संपर्क विरहीत उद्देशासाठी वापर वाढविण्याच्या शासनाच्या स्तरावरुन सुचना आहेत. प्रक्रियायुक्त पाण्याचा पुनर्वापर वाढविण्यास्त्व व पिण्याचे पाणी व्यवस्थेवरील ताणकमी करण्यासाठी शहरात विकेंद्रीत पध्दतीने Pre Fabricated कमी क्षमतेचे तसेच कमी जागेत बसणारे STP प्लांटची उभारणी करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने एन-1 सिडको पंप हाऊस येथे पथदर्शक स्वरुपाने Pre Fabricated उभारणेचे काम करण्यात आले आहे. याच धर्तीवर सिध्दार्थ उद्यान येथे 2000 CMPD चा Decentralized Plant उभारणे करीता अंदाजपत्रक र.रु.3,55,29,703/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये Electrical Work, Operation & Maintenance for five years व Civil work मध्ये Pre-fabricated STP, Foundation, Pipeline, Collection Tank, Treated Water Pipeline इत्यादींचा समावेश आहे. या उभारण्यात येणाऱ्या STP चे प्रक्रियायुक्त पाणी महानगरपालिकेच्या उद्यानांकरीता, वृक्षांच्या संगोपनाकरीता, Gardening करीता वापरण्यात येणार असुन उर्वरित पाण खामनदी/नाला पात्रात सोडले जाणार आहे.

करीता, सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु.3,55,29,703/- मान्यतेस्तव तसेच मंजुरी झाल्यानंतर स्वतंत्र पणे कामनिहाय बी-1 निविदा काढण्यास या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे वा त्यात बदल करण्याचा अधिकार आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1132/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अंदाजपत्रक र.रु.3,55,29,703/- चा सिध्दार्थ उद्यान येथे 2000 CMPD Decentralized Plant उभारणे यांस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात येते. या कामांच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे वा त्यात बदल करण्याचे अधिकार आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रदान करण्यास व या कामांच्या स्वतत्रपणे कामानिहाय बी-1 निविदा काढण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1133/2023:-</u>** **(कार्य. अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.22.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरामध्ये एकुण चार STP आहेत. सद्यस्थितीत सरासरी 75 MLD पाण्यावर प्रक्रिया करुन सदरचे पाणी खाम/सुखना नदीमध्ये सोडण्यात येते. या पाण्याचा वापर व लाभ पुढील भागात असणाऱ्या शेतकरी वर्गास होत असुन काही प्रमाणात या पाण्याचा पुर्नवापर अंतर्गत उद्यान विभागाकडून उद्यान जगविण्यासाठी, हरीतपट्टे विकसित करण्यासाठी व रस्त्यांवरील दुभाजका तील झाडे जगविण्यासाठी केला जातो.

या साठी प्रक्रियायुक्त पाण्याच पुनर्वापर निण्याच्या पाण्याच्या व्यतिरिक्त/मानवी संपर्क विरहीत उद्देशासाठी वापर वाढविण्याच्या शासनाच्या स्तरावरुन सुचना आहेत.प्रक्रियायुक्त पाण्याचा पुनर्वापर वाढविण्यास्त्व व पिण्याचे पाणी व्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठी शहरात विकेंद्रीत पध्दतीने Pre Fabricated कमी क्षमतेचे तसेच कमी जागेत बसणारे STP प्लांटची उभारणी करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने एन-1सिडको पंप हाऊस येथे पथदर्शक स्वरुपाने Pre Fabricated उभारणेचे काम करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर गांधीनगर येथे 2000 CMPD चा Decentralized STP उभारणे करीता अंदाजपत्रक र.रु.3,27,40,093/- तयार करण्यात आले आहे. सदरअंदाजपत्रकामध्ये Electrical Work, Operation & Maintenance forfive years व Civil Work मध्ये Pre-

Fabricated STP, Foundation, Pipeline, Collection Tank, Treated Water Pipeline इत्यादींचा समावेश आहे. या उभारण्यात येणाऱ्या STP चे प्रक्रियायुक्त पाणी महानगरपालिकेच्या उद्यानांकरीता, वृक्षाच्या संगोपनाकरीता, Gardening करीता वापरण्यात येणार असुन उर्वरित पाणी खामनदी/नाला पात्रात सोडले जाणार आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु.3,27,40,093/- मान्यतेस्तव तसेच मंजुरी झाल्यानंतर स्वतंत्रपणे कामानिहाय बी-1 निविदा काढण्यास या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे वा त्यात बदल करणेचा अधिकार आयुक्त,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1133/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अंदाजपत्रक र.रु.3,27,40,093/- चा गांधीनगर येथे 2000 CMPD Decentralized STP उभारणे यास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात येते. या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे वा त्यात बदल करण्याचे अधिकार आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रदान करण्यास व या कामांच्या स्वतंत्रपणे कामनिहाय बी-1 निविदा काढण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1134/2023:-</u>** **(कार्य. अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.22.12.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरामध्ये एकुण चार STP आहेत. सद्यस्थितीत सरासरी 75 MLD पाण्यावर प्रक्रिया करुन सदरचे पाणी खाम/सुखना नदीमध्ये सोडण्यात येते. या पाण्याचा वापर व लाभ पुढील भागात असणाऱ्या शेतकरी वर्गास होत असुन काही प्रमाणात या पाण्याचा पुर्नवापर अंतर्गत उद्यान विभागाकडून उद्यान विभागाकडून उद्यान जगविण्यासाठी, हरीतपट्टे विकसित करण्यासाठी व रस्त्यांवरील दुभाजकातील झाडे जगविण्यासाठी केला जातो.

यासाठी प्रक्रिया युक्त पाण्याचा पुनर्वापर पिण्याच्या पाण्याच्या व्यतिरिक्त/मानवी संपर्क विरहीत उद्देशासाठी वापर वाढविण्याच्या शासनाच्या स्तरावरुन सुचना आहेत. प्रक्रियायुक्त पाण्याचा पुनर्वापर वाढविण्यास्तव व पिण्याचे पाणी व्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठी शहरात विकेंद्रीत पध्दतीने Pre Fabricated कमी क्षमतेचे तसेच कमी जागेत बसणारे STP प्लांटची उभारणी करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने एन-1 सिडको पंप हाऊस येथे पथदर्शक स्वरुपाने Pre Fabricated उभारणेचे काम करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर नागेश्वरवाडी येथे 2000 CMPD चा Decentralized STP उभारणे करीता अंदाजपत्रक र.रु.3,27,40,093/- तयार करण्यात आले आहे. सदरअंदाजपत्रकामध्ये Electrical Work, Operationa & Maintenance forfive years व Civil Work मध्ये Pre-Fabricated STP,Foundation, Pipeline, Collection Tank, Treated Water Pipeline इत्यादींचा समावेश आहे. या उभारण्यात येणाऱ्या STP चे प्रक्रियायुक्त पाणी महानगरपालिकेच्या उद्यानांकरीता, वृक्षाच्या संगोपनाकरीता, Gardening करीता वापरण्यात येणार असुन उर्वरित पाणी खामनदी/नाला पात्रात सोडले जाणार आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु.3,27,40,093/- मान्यतेस्तव तसेच मंजुरी झाल्या नंतर स्वतंत्रपणे कामनिहाय बी-1 निविदा काढण्यास या कामाच्या अनुषंगाने आत किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे वा त्यात बदल करण्याचा अधिकार आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1134/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अंदाजपत्रक र.रु.3,27,40,093/- चा नागेश्वरवाडी येथे 2000 CMPD Decentralized STP उभारणे यास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात येते. या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे वा त्यात बदल करण्याचे अधिकार आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रदान करण्यास व या कामांच्या स्वतंत्रपणे कामनिहाय बी-1 निविदा काढण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| **महापालिका सचिव**<br>महानगरपालिका औरंगाबाद | **प्रशासक**<br>महानगरपालिका औरंगाबाद |